हरि नारायण आपटेकृत

उषःकाल

(संक्षिप्त आवृत्ति)

१९५२

आर्यभूषण मुद्रणालय

हरि नारायण आपटे



जन्म
[दिनांक ८ मार्च १८६४]

मृत्यु
[दिनांक ३ मार्च १९१९]

हरि नारायण आपटेकृत

उषःकाल

(संक्षिप्त आवृत्ति)

संपादक :
भालचंद्र लक्ष्मण लिखिते
एम्. ए., एल्एल्. बी.

किंमत २५ रुपये

[redacted]

सन १९५२

प्रथमावृत्ति	१९३८–२०००
पुनर्मुद्रण	१९४०–३०००
,,	१९४२–३०००
,,	१९४६–२०००
,,	१९४९–३०००
,,	१९५१–५०००
,,	१९५२–५०००

मुद्रक व प्रकाशक:
श्री. केशव गणेश शारंगपाणी
आर्यभूषण मुद्रणालय
९१५।१ शिवाजीनगर, पुणे ४

प्रकाशकाचें निवेदन

कै. हरिभाऊ आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांपैकीं 'उषःकाल' या सुप्रसिद्ध कादंबरीची 'संक्षिप्त आवृत्ति' तयार करवून ती आज प्रसिद्ध करून आम्ही वाचकांच्या हातीं ठेवीत आहोंत. कै. हरिभाऊ आपटे यांनीं आपल्या मृत्युपत्रानें आपल्या सर्व लिखाणाची मालकी 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' च्या आर्यभूषण छापखान्याकडे सुपूर्त केली असल्यामुळें सदर छापखान्यांतून कै. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या बालवाचकांकरितां तयार करविण्यांत येत आहेत; व त्यांतीलच हें चौथें पुष्प आहे. या लोकप्रिय कादंबरीची संक्षिप्त आवृत्ति तयार करण्याचें काम आमचे मित्र श्री. भालचंद्र लक्ष्मण लिखिते, एम. ए., एल्एल्. बी., फायनॅन्स् मेंबर, संस्थान फलटण, यांनीं केलें आहे. हें काम किती उत्तम तऱ्हेनें पुरें झालें आहे, तें या पुस्तकाच्या वाचनानेंच कळून येणार आहे. श्री. लिखिते यांनीं मराठी भाषा घेऊन एम्. ए. ची परीक्षा दिलेली आहे, हें या संक्षिप्त आवृत्तीच्या संपादकांचें वैशिष्ट्य आहे. कै. हरिभाऊ यांच्या 'केवळ स्वराज्यासाठीं' या कादंबरीच्या संक्षिप्त आवृत्तीचें दुसरें पुनर्मुद्रण प्रकाशित करण्याचे वेळीं 'उषःकाल' या कादंबरीची संक्षिप्त आवृत्ति काढण्याचें काम हातीं घेतलें असल्याचें आम्हीं प्रस्तावनेंत नमूद केलें होतें. तें कार्य आज एक वर्षाच्या आंतच पुरें झालेलें आहे.

उषःकाल ही कादंबरी 'अडीचशें वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र' या दुसऱ्या नांवानें कै. हरिभाऊ यांनी प्रसिद्ध केली आहे. तीनशें वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्राची स्थिति कशी होती, ती आज या कादंबरीच्या संक्षिप्त आवृत्तीच्या वाचनानें आमच्या बालवाचकांना चांगल्या प्रकारें कळून येणार आहे; व या दृष्टीनें हें पुस्तक विशेष उपयुक्त आहे, अशी आमची

समजूत आहे. बृहन्महाराष्ट्रांतील बालवाचकांना मराठी साम्राज्याचा उषःकाल तीनशें वर्षांपूर्वी कसा झाला, याची यथातथ्य कल्पना असणें अत्यावश्यक असल्यानें शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांकडून व एकंदर महाराष्ट्रीय जनतेकडून या पुस्तकांस योग्य आश्रय मिळेल अशी आम्हांस आशा आहे.

यानंतर कै. **हरिभाऊ** यांच्या एकाद्या सामाजिक कादंबरीची संक्षिप्त आवृत्ति काढण्याचा आमचा मनोदय आहे. हें पुस्तक हातीं पडणाऱ्या वाचकांपैकीं कोणी वाचकानें कै. **हरिभाऊ** यांच्या सामाजिक कादंबऱ्यांपैकीं कोणत्या कादंबऱ्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या प्रसिद्ध कराव्या, याबद्दल सूचना केल्यास हातीं येणाऱ्या सर्व सूचनांचा विचार करून बहुमत पडणाऱ्या कादंबऱ्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या क्रमाक्रमानें अधिकारी गृहस्थांकडून तयार करवून प्रसिद्ध करूं असें आश्वासन देऊन आम्हीं महाराष्ट्रीय वाचकांनीं अशा तऱ्हेच्या प्रयत्नांस भरपूर आश्रय द्यावा, अशी नम्र विनंती करितों.

आर्यभूषण छापखाना, पुणें नं. २
ता. १।४।३८
वर्षप्रतिपदा, शके १८६०

प्रकाशक

१८८५ सालीं प्रसिद्ध झाली. ह्या कादंबरीचीं पहिलें दोन प्रकरणें प्रसिद्ध होतांच केवळ पुण्यांतच नव्हे, तर सगळ्या महाराष्ट्रांतील वाचकवर्गात मोठी खळबळ उडून गेली. या कादंबरीनंतर हरिभाऊंची आजकालच्या गोष्टींतली दुसरी गोष्ट 'गणपतराव' ही कानिटकर मंडळीच्या मनोरंजन मासिक पुस्तकांत प्रसिद्ध होऊं लागली. तेव्हां या लिखाणाची इतकी गोडी लागली कीं पुढील प्रकरण केव्हां प्रसिद्ध होईल व केव्हां तें आपण वाचूं इतका चटका लोकांना लागला; यावरून या उद्योन्मुख कादंबरीकाराच्या लेखणींत वाचकांच्या मनांत खळबळ उडवून देण्याचें कसें सामर्थ्य होतें याची साक्ष पटते. या मनोरंजन मासिकांत हरिभाऊंनीं गणपतराव व चाणाक्षपणाचा कळस या दोन कादंबऱ्या; श्रुतकीर्तिचरित्र व जयध्वज हीं दोन नाटकें; मारून मुटकून वैद्यबुवा, पळपुट्या वैद्य इत्यादि मोलियरच्या आधारें लिहिलेलीं प्रहसनें, कांहीं लहानसहान गोष्टी, निबंध व कविता लिहिल्या.

लोकशिक्षणाचें, बहुजनसमाजांत विचारजागृति करण्याचें कार्य विस्तृत प्रमाणावर करण्यासाठीं सन १८९० सालच्या आक्टोबरांत हरिभाऊंनीं 'करमणूक' पत्र काढलें. यावेळीं जुन्यानव्याचा झगडा जोरानें चाललेला होता. सुधारकांच्या मतांचा उच्चारहि बहुजनसमाजास अभद्र वाणीसारखा वाटे, इतकी त्यांविषयीं लोकांच्या मनांत अप्रीति होती. ही अप्रीति नाहींशी करून इष्ट सुधारणांना लोकमत अनुकूल करण्याचें कार्य हरिभाऊंनीं करमणुकीच्या द्वारें अत्यंत यशस्वी-पणें केलें.

करमणूक पत्र त्यांनीं अठ्ठावीस वर्षें चालविलें आणि स्वभाषेची आणि स्वदेशाची सेवा त्यांनीं या पत्राच्या द्वारें प्रामुख्यानें केली. पुणें-वैभवांत प्रसिद्ध झालेली मधली स्थिति व त्यानंतर मनोरंजनांत लिहिलेल्या गणपतराव (ही अपुरीच राहिली) व चाणाक्षपणाचा कळस ह्या कादंबऱ्यांखेरीज बाकी आपल्या सर्व कादंबऱ्या त्यांनीं करमणुकींतूनच प्रसिद्ध केल्या. ह्या कादंबऱ्यां-शिवाय शेंकडों मोठ्या व छोट्या गोष्टी, लहान लहान निबंध, छोटीं चरित्रें, निवडक माहिती, कविता, चुटके, वगैरे किती तरी मजकूर त्यांनीं लिहिला. प्रचलित राजकारण, सामाजिक, धार्मिक इत्यादि प्रश्नांवर वर्तमानपत्रांतून होणारे वादविवाद यांपासून आपल्या करमणुकीस अलिप्त ठेवावयाचें असें जें धोरण त्यांनीं प्रारंभींच ठरविलें, तेंच अखेरपर्यंत मोठ्या दक्षतेनें त्यांनीं कायम राखलें. आपलीं राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादि बाबतींतील मतें त्यांनीं आपल्या

कादंबऱ्यांतील पात्रांच्या मुखांतून वदविलीं आणि तींहि मोठ्या खुबीनें व चटकदार रीतीनें; पण इतर वर्तमानपत्रांसारखी या विषयांची चर्चा त्यांनीं करमणुकींतून कधींहि केली नाहीं. या प्रश्नांची विशेष चर्चा करण्याची, विशेषतः सामाजिक प्रश्नांची चर्चा करण्याची, त्यांना जेव्हां आवश्यकता वाटली, त्यावेळीं त्यांनीं सुधारकाचें पुनरुज्जीवन केलें.

हरिभाऊंनीं करमणुकींतून एकंदर १८ मोठ्या कादंबऱ्या लिहिल्या; त्यांपैकीं ८ सामाजिक असून १० ऐतिहासिक आहेत. ‘चाणाक्षपणाचा कळस’ सारखी केवळ मनोरंजक कादंबरी त्यांनीं पुढें लिहिली नाहीं. ह्याशिवाय ‘गड आला पण सिंह गेला’ ही कादंबरीवजा मोठी गोष्ट त्यांनीं लिहिली; कादंबऱ्यांपैकीं म्हैसूरचा वाघ, सूर्यग्रहण व कालकूट ह्या कादंबऱ्या अपूर्ण आहेत. त्यांच्या करमणुकीवर व त्यांच्या कांहीं कादंबऱ्यांवर त्या वेळीं येऊं पाहणारें गंडांतर त्यांच्या एका हितचिंतकाच्या व थोर मित्राच्या खटपटीमुळें टळलें म्हणून बरें, नाहींपेक्षां त्यांच्या कांहीं उत्कृष्ट कादंबऱ्यांस कायमचा—निदान कांहीं काळ तरी—महाराष्ट्र मुकला असता. मी व यशवंतराव खरे या कादंबऱ्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध करतांना त्यांचीं शेवटलीं प्रकरणें आज त्या पुस्तकांत आहेत त्याहून निराळ्या तऱ्हेनें लिहिण्याचें त्यांच्या मनांत होतें. पण सदर गंडांतराच्या वावटळीमुळें तो विचार त्यांना सोडून देणें भाग पडलें. वज्राघात ही त्यांनीं संपूर्ण लिहिलेली शेवटची कादंबरी होय. त्यांनीं वज्राघात लिहिण्यास आरंभ केला, त्या वर्षी त्यांच्या आवडत्या मुलीच्या मृत्यूनें त्यांच्या हृदयावर वज्राघात झाला. करमणुकीचे तेव्हांचे चालक गोविंदराव डुकले त्याच वर्षी दिवंगत होऊन बाबाजी सखाराम कंपनीवर वज्राघात झाला व हरिभाऊंच्या कादंबरीलेखनावरहि वज्राघातच झाला. यानंतर त्यांनीं करमणुकींत नवीन कादंबरी लिहिली नाहीं. पुणें-वैभव, कानिटकर मंडळीचें मनोरंजन व स्वतःची करमणूक यांशिवाय त्यांची कादंबरी अन्यत्र कोठेंहि प्रसिद्ध झाली नाहीं. ‘काळ तर मोठा कठीण आला’ ह्या त्यांनीं दुष्काळावर लिहिलेल्या मोठ्या गोष्टीचें त्यांनींच इंग्रजींत केलेलें भाषांतर मात्र ‘रामजी’ या नांवानें विलायतेंतील प्रख्यात मेसर्स फिशर अनविन कंपनीनें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें.

मनोरंजनांत प्रसिद्ध केलेल्या नाटकांशिवाय संत सखूबाई व सती पिंगला हीं दोन नवीन नाटकें त्यांनीं लिहिलीं. निरनिराळ्या विद्वज्जनसभांपुढें वाङ्मयावर सुंदर

भाषणें केलीं व निबंध वाचले. विद्यार्थिदर्शेंतहि त्यांनीं कांहीं चांगले निबंध लिहिले व काव्यरचना केली. साप्ताहिक अँग्लो-मराठी ज्ञानप्रकाशाचीं व पुढें ज्ञानप्रकाश दैनिक झाल्यावर त्याचीं संपादकीय सूत्रें कांहीं काल त्यांच्याकडे होतीं व सुधारकाचें पुनरुज्जीवन केल्यावर त्यांत कांहीं सुंदर निबंध त्यांनीं लिहिले. हा त्यांचा सगळा लेखनोद्योग मनांत आणला म्हणजे वाङ्मय-क्षेत्रांत त्यांनीं केलेली कामगिरी केवळ संख्येच्या दृष्टीनेंहि फारच मोठी आहे अशी खात्री पटल्यावांचून रहात नाहीं. त्यांच्या आयुष्याचा लेखनव्यवसायांत गेलेला काल साधारणतः पसतीस वर्षांचा आहे. पण त्यांत जास्त नेटाची व उत्साहपूर्वक कामगिरी करमणुकीच्या सुरवातीपासून पुढील २०–२१ वर्षांतच झाली.

हा सगळा लेखनाचा प्रचंड खटाटोप त्यांनीं लोकशिक्षणासाठीं व बहुजनहित-साधनासाठीं केला; पैशासाठीं अगर कीर्तीसाठीं केला नाहीं. त्यांच्या गुणांवर लुब्ध होऊन कीर्ति त्यांच्याकडे धांवत आली, तशी लक्ष्मी मात्र आली नाहीं. श्री आणि सरस्वती यांच्यांत छत्तिसाचा आंकडा असतो हाच सिद्धांत पुनश्च प्रस्थापित करणारें महाराष्ट्रांतील ह्या कादंबरीकारकुलगुरूचें चरित्र आहे. आर्यभूषण छापखान्यानें आणि महाराष्ट्रांतील या नामांकित मुद्रणालयाचे निःसीम सेवक के. रा. रा. केशवराव बाळ यांनीं वेळोवेळीं त्यांना जें साह्य केलें तें केलें नसतें व अखेर त्यांचे परममित्र गोपाळराव गोखले यांच्या 'सर्व्हंट्स ऑफ् इंडिया सोसायटी'नें त्यांच्या ऋणविमोचनाची व त्यांच्या कुटुंबाच्या आजन्म निर्वाहाची व्यवस्था केली नसती तर त्यांच्या मनाला होणाऱ्या सांपत्तिक दुःस्थितीच्या वेदना अखेरच्या क्षणापर्यंत वाढत गेल्या असत्या.

चुलते अण्णासाहेब यांनीं आपल्या संपत्तींतली एक कपर्दिकहि जरी हरिभाऊंना दिली नाहीं, तथापि त्यांनीं आयुष्याच्या अखेरीस 'आनंदाश्रम' ही संस्था स्थापन करून शिल्लक संपत्तीचा सद्व्यय केला, व त्या आश्रमाची व्यवस्था ठेवण्याचें काम हरिभाऊंच्या हातीं सोंपवून त्या आश्रमाच्या खर्चांतून हरिभाऊंच्या संसारयात्रेची थोडीशी सोयहि करून ठेविली. हरिभाऊंनीं या आश्रमांत पंचवीस वर्षे वास्तव्य केलें आणि त्यांचा लेखनाचा बहुतेक उद्योग याच आश्रमांत झाला.

कौटुंबिक सुखाचा वांटा या कादंबरीकाराच्या भागधेयांत विधीनें लिहिला नव्हता असें म्हटलें पाहिजे. अगदीं शैशवांत मातृसुख संपलें; जुन्या वळणामुळें

व विचारामुळें पित्याचा ळळा लागला नाहीं, तारुण्यांत प्रथम पत्नी व तिला झालेलीं तिन्हीं मुलें गेलीं; द्वितीय विवाह केल्यावर फार वर्षांनीं त्यांना एक मुलगी झाली पण आयुष्याच्या उतरणीजवळ ते येत आहेत तोंच काळानें तिला उचलून नेलें आणि यानंतर बरोबर एक वर्षानें त्यांचे परम स्नेही गोपाळराव गोखले गेले. अशीं त्यांच्या कौटुंबिक दशेंत आभाळावर आभाळें येत गेलीं. पण त्यांच्या प्रेमळ स्वभावांत, सौजन्यांत, आदरातिथ्यवृत्तींत अगर स्नेहशीलपणांत कधींहि बदल झाला नाहीं. गर्वानें त्यांना स्पर्श केला नाहीं; विनयाची वृत्ति त्यांना सोडून गेली नाहीं.

त्यांनीं वाङ्मयाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतहि पुष्कळ कार्य केलें व बहुमान मिळविला. पुण्यांतील प्रमुख पुढाऱ्यांत त्यांची गणना होत होती. पुणें म्युनिसिपालिटीचे ते एक वेळ अध्यक्ष होते. ज्या युनिव्हर्सिटीची परीक्षा ते पास होऊं शकले नाहींत त्याच युनिव्हर्सिटीनें त्यांना आपल्या अत्युच्च परीक्षेंत पुढें मराठीचे परीक्षक नेमलें. मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें वुईलसन फायलालॉजिकल लेक्चरर म्हणून त्यांची नेमणूक होऊन त्यांनीं सन १९१५ सालीं Marathi–its Sources and Development या विषयावर सहा व्याख्यानें दिलीं. १९१५ सालीं पुण्यास भरलेल्या पंधराव्या प्रांतिक परिषदेच्या स्वागत मंडळाचे ते अध्यक्ष होते. त्यांनीं फार मोठा मित्रपरिवार गोळा केला, व त्यांत अनेक थोर विद्वान् होते.

अखेर दीपनिर्वाणाचा दिवस आला. १९१८ च्या आक्टोबरांत त्यांच्या एका डोळ्यास पक्षघाताचा विकार झाला. त्यांतून बरे झाल्यावर बंगाल्यांतील रेल्वेचे शेअर खपविण्यास ते कलकत्त्यास गेले. तेथून परत येतांना वाटेंत त्यांना जलोदराचा विकार झाल्याचें डॉक्टरांनीं सांगितलें. औषधोपचारासाठीं ते मुंबईस आले, पण दुखणें वाढत गेलें. यावेळीं १९१९ च्या मार्च महिन्याची सुरुवात होती. त्या महिन्याच्या तिसऱ्या तारखेस ते मुंबईहून पुण्यास गेले. दुपारीं १ वाजतां ते आनंदाश्रमांत जाऊन पोहोंचले आणि त्याच दिवशीं सायंकाळीं त्यांच्या जीर्ण शरीराचा त्याग करून त्यांतील चैतन्य शाश्वतांत विलीन झालें.

◆◆◆

कै. हरि नारायण आपटे
यांचें
अल्प चरित्र

दृष्टीसमोर असलेल्या माणसाचें अंतरंग शोधणारी, ओष्ठ संभाषणासाठीं आतुर, मुखावर स्मिताची छटा, उंच आणि विस्तीर्ण भालप्रदेश, वाटोळा चेहरा, आणि साधारण स्थूल–फार उंच नव्हे व ठेंगूहि नव्हे–अशी शरीरयष्टि, अशी कै. **हरि नारायण आपटे** यांची बाह्यरूपाकृति होती. प्रिय कन्येचा वियोग झाला त्या दिवसापासून त्यांच्या चर्येवरील स्मिताची छटा मावळली, आणि त्या ठिकाणीं विरक्तीनें पसरलेली गंभीरपणाची छाया दृग्गोचर होऊं लागली. जरा जोगनें त्यांच्या देहावर आपला पगडा बसवूं लागली, आणि पन्नाशीच्या घरांत पोंचण्यापूर्वींच ते पंचावन्न साठ वर्षांच्या वयाचे वृद्ध दिसूं लागले. यानंतर सातच वर्षं त्यांनीं इहलोकांत वास्तव्य केलें. १८६४ सालच्या मार्च महिन्याच्या आठव्या तारखेस त्यांच्या इहलोकवासास प्रारंभ झाला आणि तो १९१९ सालच्या मार्च महिन्याच्या तिसऱ्या तारखेस संपला. एकंदर पंचावन्न वर्षांत पांच दिवस कमी इतका काळ ते आमच्यामध्यें राहिले, आणि एवढ्या अर्धशतावधीच्या आयुष्यांत महाराष्ट्र–शारदेच्या भक्तमंडळींत फार मोठ्या मानाचें, फार मोठ्या कीर्तीचें व चिरस्मरणीय स्थान मिळवून ते गेले.

नारायण चिमणाजी ऊर्फ नानासाहेब आपटे यांचे **हरि नारायण आपटे** हे ज्येष्ठ पुत्र. बारशाच्या दिवशीं या मुलाचें नांव बाळकृष्ण असें ठेविलें होतें, पण कुटुंबांत दुसरा बाळकृष्ण आहे, असें आढळल्यावर तें नांव बदलून हरि हें दुसरें नांव ठेवण्यांत आलें. हरिभाऊंना मातृसुख फारसें लाधलें नाहीं. ते चार वर्षांचे असतांना त्यांची मातुःश्री इहलोक सोडून गेली. मातेच्या वियोगानंतर हरिभाऊंचें लालनपालन त्यांच्या चुलताचुलतीकडून–महादेव चिमणाजी आपटे व त्यांच्या पत्नी सौ. पार्वतीबाई यांजकडून–होऊं लागलें व या काका–काकींचा हरिभाऊंस फार लळा लागला. हरिभाऊ जरा मोठे होतात न होतात तोंच काकींच्या मायेचें छत्रहि काळानें हिरावून नेलें. नानासाहेबांच्या मावशी–चिमामावशी–ह्यांनीं हरिभाऊंना काकींच्या मागून वाढविलें. हरिभाऊंचे वडील नानासाहेब हे सरकारी नोकर असून त्यांचे आचारविचार पक्क्या कर्मठ ब्राह्मणासारखे. चुलते महादेव चिमणाजी–हे पुढें नामांकित वकील झाले—यांचे आचारविचार पूर्णपणें सुधारक

पंथाचे. हरिभाऊंचें बालपण यांच्याच सान्निध्यांत गेलें व या मातृविहीन मुलाचें कोडकौतुक त्यांनींच पुरविलें.

श्रीगणेशा शिकण्याचा आरंभ हरिभाऊंनीं मुंबईत केला, पण नानासाहेबांनीं आपलें बिऱ्हाड पुण्यास नेल्यावर हरिभाऊंस घेऊन ते पुण्यास गेले, व तेथील हायस्कुलांत त्यांनीं त्यांना घातलें. या वेळीं हरिभाऊंचें वय चौदा वर्षांचें होतें. पुण्यांत त्यांना घरीं संस्कृत शिकविण्यासाठीं शास्त्री ठेवण्यांत आला होता व त्याच्या जवळ हरिभाऊंनीं काव्यनाटकादिकांचा बराच अभ्यास केला. हरिभाऊ पुण्यास आल्यानंतर दोन वर्षांनीं न्यू इंग्लिश स्कूल ही नवीन शाळा निघाली व हरिभाऊ हायस्कूल सोडून या शाळेंत गेले, व याच शाळेंतून ते मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. यानंतर पुढील शिक्षणासाठीं ते डेक्कन कॉलेजांत गेले. न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींनीं फर्ग्युसन कॉलेज काढतांच डेक्कनमधून ते फर्ग्युसनमध्यें आले. या कॉलेजांत एक वर्ष घालवून पुन्हां ते डेक्कनमध्यें गेले. या दोन्ही कॉलेजांत मिळून सरासरी पांच वर्षें त्यांनीं काढलीं. हरिभाऊंचा ओढा व आसक्ति एका विषयाकडे; हरिभाऊंचा आणि गणिताचा तर छत्तिसाचा आंकडा; यामुळें हरिभाऊंची कॉलेजच्या परीक्षेंत प्रगति होऊं शकली नाहीं आणि अर्थात् युनिव्हर्सिटीला आपली एखादी पदवी त्यांना अर्पण करतां आली नाहीं. पण त्यांच्या अंगच्या रसज्ञता व मर्मज्ञता या गुणांचें तेज शाळा व कॉलेज या दोन्ही ठिकाणच्या गुणज्ञ गुरुजनांच्या नजरेस आलें व त्यामुळें हरिभाऊ त्यांच्या सकौतुक आदरास व प्रेमास पात्र झाले. त्यांना वाचनाचा छंद फार होता व त्या पायीं हजारों रुपये त्यांनीं वेंचले. आपली वाचनाची तृष्णा तृप्त करण्यासाठीं ते फ्रेंच व जर्मन भाषा शिकले. कैक हजार ग्रंथ त्यांनीं सर्व भाषांतील मिळून वाचले आणि वाङ्मयप्रासादाच्या प्रत्येक दालनांत त्यांनीं प्रवेश केला.

हरिभाऊंचें जीवितकार्य त्यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्या हेंच आहे. ह्या कादंबऱ्या त्यांनीं जनमनोरंजनार्थ लिहिल्या नाहींत. त्या पतितांच्या उद्धारासाठीं, दीनांच्या दुःखविमोचनासाठीं, मार्गभ्रष्टांना सन्मार्गदर्शनासाठीं, हताश झालेल्या हृदयांत नवचैतन्य उत्पन्न करण्यासाठीं, समाजशुद्धीसाठीं, राष्ट्रीय भावना उद्दीपित करण्यासाठीं, त्यांनीं लिहिल्या.

'आजकालच्या गोष्टी— मधली स्थिति' ही त्यांची पहिली कादंबरी हरिभाऊंनीं कॉलेजांत असतांना लिहिली, व पुणेंवैभव ह्या अस्तंगत साप्ताहिक पत्रांत ती

अनुक्रमणिका

उषःकाल

१. मारुतीचें देवालय

शके १५६८ सालीं आषाढ कृष्ण दशमीच्या दिवशीं रात्रीं पुण्याहून सासवडला जाण्याच्या रस्त्यावर अतोनात पाऊस पडला होता, आणि पुन्हां जबरदस्त सर येण्याचा चांगलाच संभव दिसत होता. आकाश सगळें तेलांत मिसळलेल्या काजळानें रंगविल्याप्रमाणें एकजात काळेंभोर झालें होतें; क्षणोक्षणीं विजांचा कडकडाट व चमचमाट चालला होता. ज्या विशेष घटकेचें आम्ही वर्णन देतों आहों, त्या घटकेस पाऊस पडत नव्हता; परंतु सुमारें घटका दीड घटका आर्धीपर्यंत एकसारखा पाऊस पडून सर्व झाडेंझुडपें भिजून चिंब होऊन गेलीं होतीं. शेंड्यावर पडलेल्या पाण्याचे बिंदु पानांवर टप्‌टप् पडून, त्या सर्वांचा मिळून केवढा तरी मोठा आवाज होत होता, व रात्र फार फार विलक्षण रौद्र दिसूं लागली होती. त्यांत आणखी भयंकर श्वापदांची आणि जीवजिवाणूंची भीति बाळगण्यालाही कारण होतें. अशा वेळीं वाटसरू त्या वाटेनें जाण्यास धजतो कशाला ! एखादा धजलाच तर त्याचें काम त्याला आपल्या जीवापेक्षांही प्यार असलें पाहिजे हें उघड होतें. पण चमत्कार हा कीं, त्या तशा भयंकर वेळींही त्या रस्त्यावरून एक घोडेस्वार खूप झपाट्यानें चालला होता. घोड्याच्या पायाला कांहीं लागून तो अडखळून पडेल कीं काय, याची त्याला अणुमात्र दिक्कत वाटत नव्हती.

हा घोडेस्वार कांहीं कोठल्या पलटणींतला होता असें नाहीं. विजेच्या एखाद्या लकेरीनें पाडलेल्या उजेडानें त्याचा पोषाक कसा काय होता हें सहज दिसण्याजोगें होतें. त्याच्या अंगांत झिरझिरीत मलमलीचा कमरेच्या खालपर्यंत गेलेला मुसलमानी पद्धतीचा सदरा असून, तो भिजून चिंब झाल्यामुळें अगदीं अंगाला चिकटून बसला होता; डोक्याला एक हिंदु-

स्थानी तऱ्हेचा दुपेटा गुंडाळलेला असून त्याचा एक सोगा पाठीवर लोंबत पडलेला, परंतु आतां भिजल्यामुळें पाठीला चिकटून गेला होता. त्याच्या हातांत लांबलचक तलवार असून ती नागवी होती. होईल तितक्या वेगानें घोड्यानें पळावें म्हणून तो त्यास उत्तेजन देत होता. थोड्याच वेळांत पावसाच्या टपटपीस सुरवात होऊन मुसळधार पाऊस आला आणि घोड्यानेंच पुढें जाण्याचें नाकारल्याचें जेव्हां दिसलें, तेव्हां तो एका मोठ्या थोरल्या वृक्षाखालीं जाऊन थांबला. पावसाचा जोर कमी होतो केव्हां आणि मी पुढें जाईन केव्हां, असें त्यास होऊन गेलें होतें. 'काय करावं या पावसाला! काम फत्ते करून शेवटीं फसगत होणार कीं काय, कांहींच समजत नाहीं. प्रतिज्ञा भोगून निघालों त्याप्रमाणें केलं तर खरं, पण या वेळीं मंडळींत जाऊन पडायला पाहिजे होतं. तें कसं साधणार! इतक्या पावसाच्या सपाट्यांत आपली दुष्मान् मंडळी तर खास आपल्या मागोमाग येत नाहींत ना?' अशीं वाक्यें त्या स्वाराच्या तोंडून बाहेर पडलीं.

पाऊस अद्यापि अजिबात थांबला नव्हताच, पण आकाश किंचित् निवळूं लागलें होतें. आमचा स्वार पहिल्याप्रमाणेंच जोरानें चालला. रस्ता केव्हां मागें सारीन या विचाराखेरीज आतां दुसरें कांहींही त्याच्या मनांत वागत नव्हतेंसें दिसलें. होतां होतां सुमारें तीन साडेतीन घटकांनीं तो एकदम थांबला. यावेळीं पाऊसही अजिबात थांबला होता, परंतु त्या आमच्या स्वारास दुसरा कांहीं तरी आवाज त्याच वेळीं ऐकूं आला असावा असें दिसलें. कारण तो थांबून नीटपणें कानोसा घेतल्याप्रमाणें करी व अगदीं न्याहाळून पाही. सुमारें पाव घटकेच्या आंतच मागल्या बाजूनें पांच चार घोड्यांचीं पावलें वाजत आहेत असा त्याला स्पष्ट भास झाला. यावेळीं लागोपाठ दोनदां तीनदां विजा चमकून मागून येणारे घोडे कोणाचे आणि ते कोणत्या बाजूनें कसे येताहेत हें त्यास पाहण्यास सांपडलें. मागून येणारी मंडळी चार होती. आमच्या स्वारानें त्यांस पाहण्याबरोबर पुढें होण्यासाठीं घोड्याला टांच मारली. परंतु पुन्हां कांहीं विचार त्याच्या मनांत येऊन त्यानें आपल्या घोड्यास मागें ओढण्यासाठीं हिसडा दिला. घोड्याला आपल्या धन्याचें हृद्गत कांहींच कळेना. पुढें जावयाचें कीं मागें जावयाचें? कीं जागच्या जागीं उभें रहावयाचें? परंतु

तितक्यांत ते मागले घोडेस्वार अगदींच नजीक आले आणि तितक्यांतच आमच्या स्वाराचा कांहीं विचार कायम ठरून त्यानें आपल्या घोड्यास मागें होण्यासाठीं झपाट्यानें लगामास हिसका दिला. पण या करण्यापासून इष्ट गोष्ट लांबच राहिली; घोडा अतोनात भडकला आणि जिकडे वाट फुटेल तिकडे जाऊं लागला. हा घोडा एकाएकींच भडकून पुढें झाल्यामुळें मागून येणाऱ्या चार स्वारांचे घोडेही चमकले आणि भडकले; त्यांपैकीं एक घोडेस्वार पुढें आणि आमचा घोडेस्वार मागें अशी स्थिति झाली, आणि बाकीचे कोणीकडच्या कोणीकडेच गेले.

आमच्या घोडेस्वाराची आणि त्या पुढल्या घोडेस्वाराची त्या रात्रीं अशी शर्यत लागली कीं बा ! एकाचाही घोडा आवरेना. इतक्यांत पुढील घोडा धाडकन् एका मोठ्या थोरल्या झाडाच्या बुंध्याला लागून खालीं पडला व वरील स्वार "या अल्ला ! या रहीम !" असें म्हणत धाडकन् जमिनीवर आपटला. त्या आवाजानें पुन्हां झेंड्या चमकला व तिसऱ्याच बाजूला भडकला. होतां होतां पळून थकल्यामुळें झेंड्या थोडासा ताळ्यावर आला व त्यानें आपल्या धन्याच्या ताब्यांत आपलें मन व शरीर पूर्ववत् दिलीं. परंतु आतां आपण आहोंत कोठें व जातों कोठें याचा सुमार आमच्या स्वारास लागेना व तें समजण्यासाठीं तो अगदीं आतुर झालेला दिसला. इतक्यांत त्याला कांहीं तरी विशेष दिसून त्यानें घोड्याला थोड्या अधिक वेगानें समोरच जाण्याचा इषारा केला व झेंड्यास मानेवर थोपटून लाडिकपणानें म्हटलें, "झेंड्या, झेंड्या, आतां भडकून शिकार घालविलीसना ? कांहीं हरकत नाहीं. तुला आज फार त्रास झाला आहे. पण आतां थोडा नेट कर. त्या समोरच्या दिव्यापर्यंत चल. तिथें गेलों म्हणजे उतरून आपण स्वस्थ विसांवा घेऊं. तिथें झोपडी, नाहीं तर देऊळ, घर, कांहीं तरी असेल. चल. आतां असा गळूं नको." इतकें बोलून त्यानें त्याला चुचकारलें, मानेवर थोपटलें; व त्याचें तोंड वर करून त्याचें चुंबन घेतल्यासारखें केलें. हें त्या स्वाराचें कुरवाळणें पाहून 'मराठ्या स्वाराचा घोडा म्हणजे त्याचा जीव कीं प्राण,' असें म्हणत त्याची सत्यता कोणासही स्पष्ट दिसून आली असती. थोड्याच वेळांत तो स्वार त्या दुरून दिसणाऱ्या प्रकाशाच्या अगदीं नजीक आला व पहातो तों तेथें एक लहानसें मारुतीचें देवालय

असून त्याच्या पुढल्या पटांगणांत दोन बाजूंस मोठाले टेंभे जळत जळत आतां अगदीं विझण्याच्या बेतांत आले आहेत असें दिसलें. आमचा स्वार त्या पटांगणांत जाऊन घोड्यावरून खालीं उतरला व इकडे तिकडे पाहूं लागला; परंतु त्यास तेथें कोणी चिटूपांखरूंही दिसेना. कोणी तरी माणूस दिसेल, म्हणून त्यानें पुष्कळ त्या देवळांत हुडकलें, पण व्यर्थ. शेवटीं तो निराश होऊन तसाच जमिनीवर पडला, तों खालीं जमिनीच्या गर्भांत कोणी तरी बोलत हंसत असल्याचा ध्वनि त्यास ऐकूं आला आणि त्यामुळें तो विस्मित होऊन खडबडून इकडे तिकडे पाहूं लागला.

परंतु पहिल्या प्रथम ते शब्द त्याच्या कानीं पडतांच ते जमिनीच्या गर्भांतूनच निघत आहेत अशी कल्पना त्यास आली नाहीं. प्रथम त्याला वाटलें, कीं जवळ आसपास कोठें तरी कोणी कुजबुजत आहे किंवा फार हलकें बोलत आहे; म्हणून त्यानें अत्यंत स्तब्ध बसून नीट कानोसा घेतला. पण कांहीं सुद्धां ऐकूं आलें नाहीं. नंतर त्या देवळाच्या बाहेर जवळपास कोणी बोलत असेल, असा तर्क करून त्यानें मोठ्या सावधगिरीनें एकदां दोनदां त्या देवळाच्या भोंवतालीं थबकत थबकत प्रदक्षिणा घातल्या. त्याचप्रमाणें देवळांतही त्यानें चारी बाजूंच्या भिंतींना धरून प्रदक्षिणा घातली. तेथें एका कोपऱ्यांत एक धुनी असून तेथें चार ओंडके, दोन चिलमी, एक लोटा, एक चिमटा अशा प्रकारच्या वस्तु होत्या. आपण ऐकलेले शब्द मनुष्याचेच खास असें वाटूनच तो खडबडून उठला होता. परंतु आतां इतका शोध करूनही त्यासंबंधानें मागमूस लागत नाहीं, व आतां तपास करण्याला कोणताही मार्ग राहिला नाहीं, असें पाहून बिचारा अगदीं निराश झाला आणि तेथून जाणेचा विचार त्याच्या मनांत आला. पण लागलींच असेंही मनांत आलें, कीं न जाणों आपण भलत्याच दिशेला गेलों तर? आपला पुढला बेत सगळाच फसायचा. हें देऊळ अगदीं निर्जन दिसतें आहे; पण रात्रीं येथें कोणी मंडळी जमते खास. त्याखेरीज मारुतीपुढें हा ताजा फोडलेला नारळ, हे आतांपर्यंत जळत असलेले टेंभे, हे कुठले? इत्यादि अनेक विचार त्याच्या मनांत येत होते. "इथें जी मंडळी जमत असेल ती आपल्यासारखी, आपल्या विचाराचीच, आपल्या कृतनिश्चयाचीच असेल काय? वा! जर ती तशी

असेल तर आणखी काय पाहिजे ! काय आमचं सगळं धैर्यवीर्य नष्ट झालं ? भीष्म, द्रोण, कर्ण, अर्जुन, भीमादि वीरांनीं ज्या भूमींत जन्म घेतला, ती भूमि आज वांझ झाली ? तिच्यांत एक सुद्धां कुलदीपक वीर पुरुष उपजत नाहीं ? छे, छे, मी तर आपलं घरदार सोडण्याची पाळी आली, तरी सोडीन–बहुतांशीं सोडलंच आहे म्हणा–पण पुरतेपणीं सोडीन. बाबांना माझं करणं, माझे विचार, माझं कांहींच आवडत नाहीं. आणखी मला त्यांचं कांहीं आवडत नाहीं. ते म्हणतात, 'आपण त्या दुष्मनांच्या अन्नाचे शरमिंदे, त्यांच्या अन्नानं वाढलेले !' "त्यांच्या बापानं ठेविलं आहे अन्न ! आमचा देश; आमचा पैसा; आमची जमीन; सारं कांहीं आमचं. आमचं आम्ही खातों – असं असून हीं म्हातारीं माणसं म्हणतात, आम्ही त्यांच्या अन्नाचे लोक ! वा ! वा !! हरामखोरांनीं पाहिजे त्या तऱ्हेनं आमचा अपमान करावा, आमचा धर्म बुडवावा, आमच्या बायकांची थट्टा करावी, गाईंचा वध चवाठ्यावर–चावडीवर करावा; आणखी तें आम्हीं मुकाट्यानं पाहून मनांतल्या मनांत स्वस्थ खिन्न व्हावं ! बेहेत्तर आहे आमचा अजीबात नायनाट झाला तरी ! आम्हांला हा या हरामखोरांचा जुलूम सहन होत नाहीं. हाच आमचा अपराध–याच अपराधाबद्दल आमचे बाप, आजे आम्हांला घरांतून हांकून देऊं म्हणणार ! द्या हांकून ! माझ्यासारखे जर सगळे तरुण लोक हांकून दिले, आणि ते एका ठिकाणीं झाले, तर काय उत्तम गोष्ट होणार आहे ?" असा मनाला आनंद देणारा विचार उद्भवतांच त्याची वृत्ति उल्हसित झाली. अशी मंडळी खरोखर एकवटली तर जें काय होईल असें त्यास वाटत होतें, त्याचें चित्र त्याच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. त्या वेळीं तो सहज त्या समोरच्या बलभीम मूर्तीकडे पहात होता. इतक्यांत तो एकाएकीं दचकला व त्याच्या तोंडून एकदम "अरे ! पण हें काय ?" असे उद्गार निघाले.

तो एकसारखा त्या बलभीमाच्या मूर्तीकडे पहात होता. ती मूर्ति हळूहळू पुढें सरकत होती ! पहिल्या प्रथम हा केवळ मघाच्याप्रमाणेंच भास असावा असें त्या शूर शिपायास वाटलें; परंतु ती मूर्ति डुलत नव्हती किंवा तिचा झोंक पुढें पडत नव्हता; केवळ जशीच्या तशी उभीच्या उभी अशी अत्यंत मंदपणानें पुढें सरकत होती. हें आहे काय ?

या मूर्तींत चेतना उत्पन्न झाली काय? कीं कोणी तिच्या आड बसून तिला सरकवीत आहे? छे! एक ते बाहेरले टेंभे आणखी ही कोंपऱ्यांतली धुनी, यांखेरीज मनुष्यवस्तीचें चिन्हसुद्धां कोठें दिसलें नाहीं. असें असतां आतां एकाएकीं ही मारुतीची पवित्र मूर्ति सरकाविणार कोण? आणि काय म्हणून? असे अनेक प्रश्न त्याच्या मनांत आले. पण समाधानकारक असें उत्तर मुळींच सुचेना. जागचें उठून पुढें जाऊन चटकन् पहावें तर छाती होईना. इतक्यांत मारुतीच्या मागें किंचित् प्रकाश दिसल्याचा त्याला भास झाला; आणि मारुती आपल्या मूळ जागेपासून चांगला हात सव्वाहात इतका पुढें आलेला दिसला. हा उजेड आला कोठून? हें सगळें आहे तरी काय? आमच्या मित्राची तर अक्कल गुंग झाली. कांहींना कांहीं तरी फार विलक्षण गूढ या ठिकाणीं आहे, कीं भूतचेष्टा आहेत? भूतचेष्टा म्हणाव्या, तर त्या देवमूर्तीशीं कशा चालणार? कांहीं तरी गूढत्व खास, व तें आपण उलगडलेंच पाहिजे, असें वाटून त्यानें आपली तलवार सांवरली आणि एक एक पाऊल टाकीत तो मारुतीच्या अगदीं जवळ तर गेलाच व मूर्तीच्या स्कंधावरून हलकेंच पहातो, तों बलभीमाच्या आसनाखालीं चांगलें एक चौकोनी भोंक असून त्यांतून दिव्याची सूक्ष्म तिरीप येत आहे, असें त्यास दिसलें. त्याचप्रमाणें कोणी कांहीं ओंवी किंवा अभंग किंवा श्लोक आपल्याशींच धीरगंभीर अशा स्वरांत गुंगत आहे, असेंही त्यास ऐकूं आलें. त्यानें ताबडतोब त्या दिव्याजवळ जाण्याचा निश्चय केला. पण पुन्हां त्यास शंका आली कीं, न जाणों, आपण खालीं गेलों, आणि वरून ही मारुतीची मूर्ति पुन्हां आपल्या स्थानीं येऊन आपला कोंडमारा झाला, किंवा जे कोणी आंत असतील त्यांनीं आपला प्राण घेतला तर? पण जो खरा शूर, त्यास या असल्या शंका किती वेळ थांबविणार? 'खरा मराठ्याचा बच्चा मी; मीं अशा शंका घेऊन माघार घ्यावी?' असें आपल्याशींच पुटपुटून त्यानें मागल्या बाजूस जाऊन 'जय बलभीमकी जय!' असा शब्द उच्चारून आंत पाय सोडले.

२. थोरले साहेब

परंतु आमच्या शिपाई मित्रास त्या भुयारांत उतरण्याच्या खटाटोपांत सोडून विजापूरकरांच्या हद्दींतल्या एका जबरदस्त किल्ल्याकडे आतां आम्ही वाचकांस चलण्याची विनंति करणार आहों. त्या काळीं महाराष्ट्रांत जे काय अत्यंत प्रचंड असे गड होते व आतां नामशेष आहेत, त्यांत किल्ले सुलतानगड हा अगदीं श्रेष्ठ किल्ला होता. त्याचें फार प्राचीन नांव भीमगड असें होतें. सुलतानगड हें नांव सुद्धां बरेंच जुनें होतें. या किल्ल्याच्या योगानें आसपास पांचपंचवीस कोसपर्यंत फार मोठा दरारा रहात असे. किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेलें सुलतानपूर अगदीं लहानें गांव होतें. सरासरी शेंसवाशें घरें असतील इतकींच ! एकंदर वस्ती असेल सुमारें चारपांचशें. या गांवची मुखत्यारी किल्लेदाराकडेच होती. परंतु खेडेगांवचे खरे मुखत्यार त्या काळीं म्हटलें म्हणजे पाटीलबुवाच. गडावर जाणारा इसम आणि येणारा इसम दोघांनींही वर खालीं चालविलेल्या बातम्या आवजी पाटलाच्या मकाणावर गुडगुडीकरितां थांबून सांगितल्या पाहिजेत, व मग कोठें जावयाचें तें जावें, हा आपला तेथील अलिखित कायदा होता. आवजीच्या घरच्या गप्पांचें व त्याच्या घरच्या हुक्कापाण्याचें इतकें कांहीं जबरदस्त आकर्षण असे, कीं सुलतानपूरच्या पंचक्रोशींत माणसानें पाय ठेवले, कीं ते आपोआप आवजी पाटलाच्या घराकडे वळावयाचेच.

मागील प्रकरणांतील रात्रीं, सासवडच्या त्या बाजूला जरी इतका विलक्षण तुफानी पाऊस पडला होता, तरी सुलतानगडच्या व सुलतानपूरच्या आजूबाजूला आकाश अभ्रमय होण्यापलीकडे कांहींही विशेष झालें नव्हतें; आणि पहाटेच्या जंगी वाऱ्यानें ते सर्व ढग जाऊन प्रभातकाळची शोभा मोठी मजेदार दिसत होती. अशा वेळीं कोणी अंथरुणांत नसावयाचेंच ! पण आदले दिवशीं रात्रीं कांहीं कामासंबंधानें आवजीस फार जागरण झाल्यामुळें ते स्वस्थपणें अद्यापि आपल्या गुढघाभर उंच अशा गादीवरच घोरत पडले होते; परंतु तितक्यांत त्यांच्या दाराशीं त्यांचा एक नोकर "गडावरून सुभान्या आला आहे" असें मोठमोठ्यानें ओरडत होता; आणि सुभान्याही बाहेरच्या बाजूला सचिंत मुद्रा करून उभा होता.

सुभान्याला गडावरून लगबग उतरतांना व आवजीच्या वाड्यापुढें थांबतांना पाहतांच पांचपन्नास माणसें गडावरची काय खबर आहे ती ऐकण्यासाठीं आवजी पाटलाच्या अंगणांत जमलीं. इतक्यांत आवजीची झोंपही जरा दूर झाली व त्यानें “काय आहे रे कटकट?” असें एकदाचें मोठ्यानें म्हटलें. त्याबरोबर सुभान्या पुढें होऊन म्हणाला:-“पाटीलबोवा, आपल्याला साह्यबांनीं वर बलावलय्, लगबग चला.” सुभान्याचें भाषण ऐकून आवजी पाटील जरासा सचिंत बसला. नंतर स्वारी तांब्या घेऊन बाहेर गेली. प्रातर्विधि उरकून आल्यानंतर मोठ्या ऐषआरामांत हुक्का ओढून कुलकर्णीबोआंना कांहीं काम करण्याविषयीं बजावून, व तितक्यांत तेथें आलेल्या ग्रामजोशीबोआंना, “काय जोशीबोआ, तुमचीं तीं बोटं घालणं, कुंडल्या मांडणं सगळं व्यर्थना? नानासाहेबांचा कांहीं पत्ता नाहीं!” अशा तऱ्हेनें उपरोधिक बोलून, आपलें कंगणीदार पागोटें आणि अंगरखा चढवून दोन विती कांठाचें सदासर्वदा कोरें उपरणें अंगावर टाकून व हातांत आपली लांब वाकडी तलवार घेऊन स्वारी सुभान्याच्या बरोबर गडावर जाण्यास निघाली. बरोबर कोणी तरी पाहिजे म्हणून “सांवळ्या, लेका इथं बसून काय करणार? चल माझ्याबरोबर तिथें कांहीं जरूर लागली तर बरा तुला खालीं पिटाळायला. कांहीं नको मुंडासं, चल” असें म्हणून त्यांनीं त्यास बरोबर घेतलें. सांवळ्या एक चवदा पंधरा वर्षांचा पोऱ्या होता. त्याच्या मनांतून पाटीलबोआंबरोबर जावें असें होतेंच. त्यानें लागलीच पुढें पाऊल टाकलें.

गडावर जातांना आवजी पाटील सुभान्यास म्हणतात, “कायरे सुभान्या, थोरल्या साहेबांची मर्जी तर नानासाहेबांवर खास अं? त्याच्याखेरीज ते इतके बेमार झाले नसते; पण कायरे नानासाहेब नाहींसे झाले, त्याच्या आदल्या रात्रीं कांहीं विशेष झालं कारे?”

“तर तर, पाटीलबोआ! ते दिवशीं थोरले साहेब लई लई बोलले म्हणून तर नानासाहेब संतापून कुठं तरी गेले.” “काय कायरे असं बोलले?” “वा, वा! तुम्हांला कांहीं ठाऊकच नाहीं, पाटीलबुवा? अहो, नानासाहेबांना या मुसलमानांचं नांव काढलं कीं तिट्कारा येतो हें तर ठाऊक आहेना?” “अरे हो. पण नानासाहेब नाहींसे झाले त्या दिवशीं काय झालं तें सांग तेवढं.” “अहो, त्या दिवशीं

बादशहाकडून एक पोषाख आला आणखी एक खलिता आला, कीं 'नानासाहेब आतां मोठे झाले आहेत, आणखी त्यांच्या शूरपणाच्या अनेक गोष्टी आमच्या कानावर आल्या आहेत, तेव्हां त्यांना वर्ष दोन वर्षं दरबारांत हुजूरसेवेला हा खलिता देखतांच पाठवावें.' असा खलिता, आणखी तो ऐटबाज पोषाख आलेला पाहिल्याबरोबर 'इतके दिवस चाकरी केल्याचं आज सार्थक झालं?' असे आनंदाचे उद्गार थोरल्या साहेबांच्या तोंडून निघाले, आणखी त्यांनीं लागलींच नानासाहेबांस बोलावणं पाठविलं. नानासाहेब बराच वेळ आले नाहींत. दोनदां चारदां बोलावणीं गेलीं तेव्हां एकदांची स्वारी आली. थोरले साहेबांनीं तो पोषाख त्यांना दाखविला, व तो खलिता वाचण्यासाठीं त्यांचेपुढें केला. त्या पोषाखाकडे दृष्टि जाण्याबरोबर त्यांच्या कपाळास किती तरी आंठ्या चढल्या!" "आणखी खलिता पहाण्याबरोबर?" पाटीलबोआंनीं मध्येंच प्रश्न केला. "वा! तो पहाण्याबरोबर त्यांचं सर्वांग नुसतं लाल झालं. तितक्यांत थोरले साहेब त्यांना म्हणतात, 'पाहिलासना हा पोषाख? वाचलासना हा खलिता? आतां उद्यां तुला विजापुरास गेलं पाहिजे. बादशहाची आज्ञा शिरसामान्य केली पाहिजे. आज कित्येक पिढ्या आपण त्यांच्या अन्नावर वाढत आहोंत.' एवढे शब्द थोरल्या साहेबांच्या तोंडून निघाले मात्र, नानासाहेबांची जी स्थिति झाली ती सांगतांच येत नाहीं. छे. छे. छे. इतका संताप आजन्मांत मीं कधीं कोणाचा पाहिला नाहीं."

सुभान्या पुढें म्हणतो, "पाटीलबोवा, तुम्हांला खास सांगतों, कीं आमच्या नानासाहेबांसारखा पुरुष व्हायचा नाहीं बघा. पण या एका गोष्टीची त्यांना अशी चिरड आहे, कीं कांहीं पुसूं नका. संतापानें त्यांच्या तोंडून एक अक्षरसुद्धां निघेना." "पुढं काय?" पाटीलबोआंनीं आतुरतेनें विचारलें. "पुढें काय? थोरले साहेब तें पाहून त्रासानें म्हणतात, 'मग जाणार ना चारदोन दिवसांत? पाहूं ना मुहूर्त! गुरुवारीं चांगला मुहूर्त आहे. आतां तूं मोठा झालास, आतां या कारभारांत तुला नजर घातली पाहिजे. दरबारांत गेलं आलं पाहिजे,' असा थोरल्या साहेबांनीं किती तरी त्यांना उपदेश केला. पण नानासाहेबांच्या तोंडून एक नाहीं, दोन नाहीं. तेव्हां पुन्हां थोरल्या साहेबांनीं रागावून म्हटलें,

'कां, बोलत कां नाहींस?' 'काय बोलायचं आहे? माझं मीं आपलं उत्तर कितीकदां याच्यापूर्वी दिलं आहे; तेंच पुन: सांगतों पाहिजे तर. मी त्या मुसलमानांच्या दरबारांत जाऊन कधींसुद्धां राह्यचा नाहीं. त्याला कुर्निसात करायचा नाहीं.' नानासाहेबांचे हे शब्द ऐकतांच थोरल्या साहेबांच्या अंगाला संतापानं कांपरं सुटलं आणि ते एकदम म्हणाले, 'कारट्या, तूं आमचं कूळ बुडवायला निघाला आहेस. मीं तुला गय केली; पण आजपासून तूं माझा आणखी मी तुझा कोणी नाहीं. जा, चालता हो. तुझ्यासाठीं माझ्या तोंडाला दुरूनच काय काळोखी लागेल ती लागो! माझ्याजवळ राहून लागायला नको.' पुढें आणखी ते बोलणार तों त्या संतापाच्या लहरींत घेरी येऊन ते धाडकन् खालीं पडले. त्यांना घेरी आल्यावर सावध करण्याकरितां नानासाहेब धांवले, कांहीं उपाय केले, पण त्यांनीं डोळे उघडल्याबरोबर ते त्यांच्या दृष्टीच्या आड होऊन रात्रींच कोणीकडे निघून गेले. नानासाहेब गेल्यापासून थोरल्या साहेबांच्या जिवाला लई हुरहूर लागली. मोठा जीव त्यांच्यावर त्यांचा; अन् संतापानं ते तर निघून गेले. पण पाटीलबोवा, नानासाहेब कुठं बरं गेले असतील? इथून इतक्या तडफ़डीनं गेले ते?"

सुभान्याच्या मनांत आणखी कांहीं बोलावयाचें होतें पण तें तितकेंच राहिलें. कारण तितक्यांत, "यावं यावं, आवजी पाटील, यावं यावं" असें दहावीस मंडळींनीं केलेलें स्वागत त्या दोघांच्या कानीं पडलें. पण तिकडे विशेष लक्ष न देतां आवजी पाटील किल्ल्याच्या पांचही दरवाज्यांतून चौकीदारांकडून सलाम घेत घेत किल्लेदाराच्या वाड्याशीं आले व आंत येऊन त्यांनीं दिवाणखान्यांत लोडाशीं टेकून बसलेल्या थोरल्या साहेबांना दारांतूनच फार लवून तीन वेळां मुजरा केला. थोरल्या साहेबांच्या चेहऱ्यावर त्यावेळीं वार्धक्यापेक्षां चिंतेचीच छाया विशेष दिसत होती. आवजी पाटील येतांच थोरले साहेब वर नजर करून म्हणतात, "काय आवजी पाटील, अजून तुम्हांला कांहीं शोध लागला नाहींना? असेच तुम्ही गाफील असतां म्हणायचे गांवांतले लोक. अशा तऱ्हेनें जर गांवांतून हवा तो इसम हव्या त्या वेळीं जाईल आणखी येईल अन् त्याचा तम्हांला शोधही

कधीं लागणार नाहीं, तर पुढें चालणार कसं आवजी पाटील ? " आवजी पाटील एक शब्द सुद्धां बोलेना. बोलणार काय

तो वृद्ध गृहस्थ पुढ म्हणाला, "आवजी, किल्ल्यावरची बातमी काढण्यासाठीं कोणी माणस येऊन काय बातमी असेल ती काढून गेला, तरी तुम्हांला कांहीं समजेल कीं नाहीं कोणास ठाऊक ? खातां आहां त्या निमकाची अशाच तऱ्हेनं जर चाकरी करणार असाल तर इथन तोंड काळं कां नाहीं करीत ? बोला पाहूं तुम्ही कुठं कुठं शोधासाठीं माणसं पाठविलीं होतीं तीं ! " हें बोलतांना त्या वृद्ध गृहस्थाची मुद्रा इतकी कडक दिसली कीं, आवजी पाटील तर अगदीं घाबरूनच गेला. त्या काळचीं कित्येक वृद्ध माणसें म्हणजे केवळ जमदग्नीचे अवतारच असत. एकमार्गी, दृढनिश्चयी आणि मोठीं करारी माणसें. त्यामुळें हाताखालच्या लोकांवर त्यांचा मोठा दरारा असे. राष्ट्रांत अशीं माणसें असलीं, तर कांहीं तरी राष्ट्रकार्यें होतात. किल्लेदार रंगराव आप्पा अशा करारी गृहस्थांपैकींच एक होते. आवजी पाटलानें आतांपर्यंत थोडींथोडकीं माणसें नानासाहेबांच्या शोधास पाठविलीं होतीं असें नाहीं. परंतु आपणांस यश आलें नाहीं असें स्पष्टपणें सांगण्यास त्याची कांहीं हिंमत होईना. इतक्यांत थोरले साहेब संतापून अत्यंत तिरस्कारयुक्त मुद्रेनें म्हणाले, " आवजी, चार दिवसांच्या आंत हा कारटा कोणीकडे गेला आहे याचा काय तो खुलासा मला आणून द्या. जर एवढं काम तुमच्यानं नाहीं झालं, तर मग माझ्याशीं गांठ आहे ! निमकहराम लोक सारे ! " इतकें बोलून व पुढें आवजीकडे मुळींच न पाहतां मागल्या लोडावर त्यांनीं आपलें अंग टाकलें.

रंगराव आप्पासाहेब इतके करारी, निग्रही, परंतु त्यांच्या अंतःकरणाचें एक मर्मस्थान होतें. तें म्हणजे त्यांचें आपल्या मुलावरील प्रेम हें होय. प्रत्येक निग्रही मनुष्याच्या अंतःकरणाचा असा कांहींना कांहीं तरी एक अत्यंत नाजूक भाग असतो. लहानपणापासून तो त्यांचा जीव कीं प्राण ! त्याच्या हातून आपल्या कुळाची मोठी बढती व्हावी, त्याला मनसबदारी किंबहुना हुजूरची दिवाणगिरीसुद्धां मिळावी आणि हें सगळें आपल्या हयातींत आपल्या इच्छेप्रमाणें व्हावें, असें त्यांना फार वाटे. परंतु मुसलमानांचें नांव काढलें कीं, त्यांच्या त्या मुलाचा चेहरा तिरस्कारानें,

द्वेषानें व संतापानें लाल हात असे. त्यांना असेंहि वाटलें, कीं बादशहाकडील आमंत्रण आलें तर कदाचित् हा कांहीं वळला तर वळेल. पण आपण होऊन तशी खटपट करण्यापूर्वींच आयताच बादशहांकडून खलिता व पोषाख आला. तो येतांच आप्पासाहेबांस मोठा आनंद झाला. परंतु त्या आनंदाचें पर्यवसान कसें काय झालें, हें वर आलेंच आहे. आपला मुलगा गड सोडून चालता झाला आणि जाण्यापूर्वीं आपल्याशीं तो एक शब्दहि बोलला नाहीं, कीं आपल्याला एक बोटभर चिट्ठीहि त्यानें लिहून ठेविली नाहीं, याबद्दल त्यांस अत्यंत वाईट वाटलें. मुलगा होता तोंपर्यंत त्यांनीं त्यास अतोनात बालबोलून घेतलें. परंतु आपल्या बोलण्यामुळें वैतागून तो नाहींसा झाला, हें कळतांच त्यांचें धैर्य अतोनात गळालें. परंतु त्यांनीं तशी स्थिति बाहेर दाखविली नाहीं. तथापि हा भांडखोर मुलगा वाटेंतच कोणा मुसलमानाबरोबर भांडल्यामुळें मारामारी होऊन तींत कापलाबिपला तर गेला नसेल, असा भयंकर विचार मनांत येऊन त्यांचें काळीज अगदीं चर्र होई. शिवाजीच्या आचरट कृत्यांत मदत करण्यासाठीं तो त्याला जाऊन मिळाला असेल, हा विचारही त्यांस तितकाच भयंकर वाटून त्यांच्या इतकें मनांत आलें कीं, एकूण आपला पोरगा आपल्याला मुकला; आतां कांहीं तो परत येत नाहीं, असें वाटून त्यांची आतां अगदीं निराशा झाली होती. असो.

वर सांगितल्याप्रमाणें आवजी पाटलास, चार दिवसांच्या आंत आपल्या मुलाचा शोध आणला तर बरें आहे, असा हुकूम फर्मावून किल्लेदारांची स्वारी लोडावर अंग टाकून पडली. आवजी पाटील बिचारा घाबरून कसे तरी आपण आतां सुटलों यांतच आनंद मानून कुर्निसात् करून उठतो, तों दारांतून एका हुजऱ्यानें "सरकार, विजापुराहून सलामतखां स्वारानें 'एक जरूरीचा लखोटा आणला आहे, आणि आतांच्या आतां हुजुरांपाशीं दिला पाहिजे असें म्हणतो," अशी वर्दी दिली. "बोलाव! बोलाव त्याला तर मग!" स्वारी अत्यंत त्रासून म्हणते: "आवजी जाऊं नको. आणखी कांहीं कामगिरी असली तर सांगतों."

सलामतखां फारसा लांब नव्हता. हुजऱ्यानें त्याला लागलींच आंत आणलें आणि त्यानें रीतीप्रमाणें लवून सलाम करून विजापूरचा लखोटा

पुढें ठेविला. स्वारीनें त्याच्या सलामाकडे मुळींच लक्ष न देतां ताबडतोब आपल्या हातानें लखोटा फोडला. आंतील मजकूर फार लांबलचक नव्हता; परंतु तो वाचतांच स्वारीचें तोंड अगदीं काळेंठिक्कर पडलें.

---

३. भुयारांत

आमच्या शिपाईगड्यानें "बलभीमकी जय!" करून दंड थोपटून त्या मारुतीच्या बैठकीखालच्या भुयारांत पाय सोडले मात्र, तों "कोण? कोण हरामजादा आंत येण्याची इतकी छाती करतो आहे हा?" असे शब्द त्याच्या कानावर आदळले आणि कशाचा तरी जबरदस्त रट्टा पायांवर येऊन बसला. परंतु आमच्या शिपाईदादांनीं त्या रट्ट्यास मुळींच दाद न देतां एकदम "ज्याला छाती असेल तोच छाती करील, दुसरा कोण करणार?" असें ओरडून झटकन् वरून हात सोडून आंत दाण्‌कन् उडी टाकली आणि पायांवर रट्टा मारणाऱ्याच्या अंगावर तो धांवून गेला. परंतु त्याचा वेष, त्याचा नूर पाहण्याबरोबर तो दचकून मागें सरकला आणि चकित दृष्टीनें त्याच्याकडे पाहूं लागला. आंतील मनुष्याचा वेष म्हणजे गळ्यापासून पायांपर्यंत कफनी घातलेली, एका हातांत एक रुद्राक्षांची माळ, दुसऱ्या हातांत एक लांकडाची कुबडी, जटा वाढविलेल्या आणि दाढीही वाढविलेली असा होता; दोघे बराच वेळ एकमेकांकडे पहात उभे राहिले. कोणाच्याहि तोंडून शब्द निघेना. एकमेकांशीं मारामारी करण्याचा पहिला आवेशही आतां कमी होत चालला. शेवटीं तो रुद्राक्षमालाधर पुरुष आमच्या शिपाई गड्याला शुद्ध मुसलमानी भाषेंत म्हणतो, "तूं कोण? इकडे आलास कसा? इथं तुझं काम काय? तुला जर विनाकारण मृत्युमुखांत पडायचं नसेल तर मुकाट्यानं आल्या वाटेनं परत जा, नाहींतर हकनाक मरशील. तूं भुयारांत म्हणजे सिंहाच्या गुहेंत–मृत्यूच्या जाभाड्यांत–येऊन पडला आहेस! जर मुसलमान असशील तर मेलासच!" "काय? काय मुसलमान असला तर तो मरायचा अशी जागा आहे? वा! वा!! तर मग मी अगदीं योग्य

स्थळांतच आलों म्हणायचा. बोवासाहेब, खरोखर ही जागा तुम्ही म्हणतां तशी जर असेल, तर मी तुमचा बंदा गुलाम आहें म्हणून समजा. मी अस्सल मराठा आहें. पण मला मुसलमान समजून माझा अपमान करूं नका."

हे शब्द आमच्या शिपाईगड्यानें इतक्या आवेशानें उच्चारले कीं, तो रुद्राक्षमालाधारी पुरुष अगदीं अत्यंत कौतुकानें त्याच्याकडे पाहूं लागला व त्याला म्हणतो, "शाबास, शाबास! तूं जेवढं बोलतो आहेस, इतकं सगळं जर खरं असेल, तर तुला आतां या जागेंत भीति नाहीं. पण तूं कोण, कुठला, इकडे आलास कसा, हें मला सांग. तें मला कळल्या-खेरीज तुझ्यावर विश्वास बसावा कसा?" "बोवाजी, त्या हकीकतीशीं आपल्याला काय करायचं आहे? मला मागं पुढं कोणी नाहीं. आपण मला आपल्याजवळ राहूं द्याल, तर मी आजन्म आपल्या सेवेला राहतों, याच्यापेक्षां माझ्या स्वतःच्याबद्दल जास्त माहिती कांहींच देतां येत नाहीं." "छे, छे, तूं सांगतो आहेस याच्यावर माझा मुळींच भरंवसा बसत नाहीं. तूं आपल्याला कोणी नाहीं असें सांगतो आहेस तें अगदीं खोटं. तुझा हेतु मला समजला आहे व तो चांगला आहे हें मी जाणून आहें; आणखी तो सफल होण्याच्या मार्गाला तूं लवकरच लागशील हा मी तुला आशी-र्वाद देतों. मीं तुला ओळखलं नाहीं, असं समजूं नको–तुला आपलं नांवगांव गुप्त ठेवायचं असलं तर खुशाल गुप्त ठेव. पण–"

इतकें बोआजी बोलतात, तों शीळ वाजल्याचा भास होऊन, त्यांनीं कानोसा घेतलासें केलें; नंतर लागलीच ते पलीकडे अंधाराच्या बाजूला गेले व दिसेनासे झाले. तें पाहतांच आमचा शिपाई अगदीं गोंधळून गेला व इकडे तिकडे पाहूं लागला. बराच वेळ झाला तरी बोआजी परत येण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. तेव्हां बोआजीच्या शोधासाठीं, बोआजी गेला त्या वाटेनें, अंधारांतून चांचपडत चांचपडत तो बराच दूरवर गेला. इतक्यांत त्याच्या हाताला समोरच भिंत लागली व त्याचें अंग एका भगदाडाला आदळलें. तें भगदाड साधारण ओणव्यानें सुद्धां आंत शिरण्याला पंचाईत पडावी, इतक्या बेताचें होतें. तो लागलीच आंत शिरला. त्या वाटेनें बराच वेळ गेल्यावर तो थबकला. कोठें तरी उजेड दिसूं लागल्याचा त्याला

भास झाला; एका लांकडी दाराच्या फटींतून दिव्यासारखा उजेड येत होता. त्यानें तें दार उघडण्याची खटपट केली. परंतु तें लवकर उघडेना. त्याला बाहेरून कुलूप आहे किंवा काय, हें पाहतांना वरच्या बाजूस एक व खालीं उंबऱ्याला लावलेली एक अशा कड्या हाताला लागल्या. त्या काढून झटकन् दार सताड उघडून तो आंत शिरला. पाहतो तों आंत एक मोठा विस्तीर्ण सभामंडप असून मध्यभागीं अक्राळविक्राळ अशी अष्टभुजा देवीची मूर्ति आहे. व तिच्यापुढें मोठमोठाले नंदादीप तेवत आहेत. देवीला पाहतांच आमच्या शिपाई गड्यानें एकदम भक्तिभावानें साष्टांग दंडवत घातलें. त्या सभामंडपांत चोहोंकडे हत्यारेंच हत्यारें—तलवारी, ढाली, बंदुका-लावून ठेवलेलीं त्याच्या दृष्टीस पडलीं. तें सर्व पाहून आमचा शिपाईगडी अत्यंत विस्मित झाला. तो फार दमला असल्यामुळें त्या जागींच तो पडला व थोड्याच अवकाशांत त्यास अगदीं गाढ झोंप लागली.

इकडे बोआजी परत येऊन पाहतात तों, तो शिपाई गृहस्थ कोठें दिसत नाहीं. शेवटीं बाहेर येऊन त्यांनीं इकडे तिकडे पुष्कळ शोध केला, पण कोठेंही कोणी दिसेना. तेव्हां ते परत देवळांत आले आणि मारुती जेथल्या तेथें बसवून आपलें धुनीजवळचें स्थान त्यांनीं घेतलें आणि तोंडानें कांहीं दोहरा म्हणत स्वारी आपल्या चिलमीचे तयारीस लागली.

---

४. गुप्त भेट

सुलतानगडाच्या चोहोंभागीं झाडी बरीच होती. पिछाडीचे बाजूला तर ती जरा विशेष होती—व सगळ्या बाजूनें फड्या-निवडुंगाचें वेष्टण होतें. या झाडींत वाटा काढल्या होत्या, पण त्या केवळ चोरवाटां-सारख्या कांहीं विवक्षित लोकांना माहिती अशाच होत्या; अर्थातच त्या वाटांनीं कोणी फारसें जातही नसे. ज्याला कांहीं गुप्त गांठी घ्यावयाच्या असतील, गुप्त गोष्टी सांगावयाच्या असतील, गुप्त कारस्थानें करावयाचीं असतील, त्याला ती फार उपयोगाची व अशीच मंडळी अशा जागीं संकेत ठरवून जमत.

सुलतानगडावर सलामतखांनें आणलेला खलिता थोरले साहेबांच्याजवळ दिल्यावर व तो उघडून पाहिल्यावर अत्यंत खिन्न होऊन ते थोडा वेळ स्वस्थ बसले. परंतु थोड्याच वेळांत शुद्धीवर आल्यासारखें होऊन त्यांनीं आवजीस सलामतखांची रोटीची व्यवस्था करण्यास सांगितलें. आवजी व सलामतखां तेथून बाहेर येतात तोंच त्यांना चौकीदार सर्फोजी व त्याच्या बरोबरची एक दोन मंडळी भेटली. सर्फोजीला पाहिल्याबरोबर आवजीच्या कपाळाला आंठ्या चढून तो लागलीच सलामतखांस म्हणतो, " खानसाहेब, आतां आमची तुम्हांला मुळींच जरूर नाहीं. चौकीदारसाहेब आले, आतां तुम्हांला कसली म्हणून उणीव पडावयाची नाहीं. मी जातों. तुम्ही गडावरून उतरलां म्हणजे घरीं आल्याखेरीज राहूं नका." इतकें बोलून तो सलामतखांच्या उत्तराची वाटसुद्धां न पहातां पुढें चालता झाला. सर्फोजीनें तेवढ्यांतल्या तेवढ्यांत सलामतखांला कांहीं नेत्रसंकेत केला, मग त्या नेत्रसंकेताचा काय अर्थ असेल तो असो. पण सलामतखांनें आवजीस परत बोलाविलें नाहीं. आवजी पाटील निघून गेला. पण सांवळ्या कांहीं त्याच्या मागोमाग गेला नाहीं. तो इतक्यांत कोठें तरी नाहींसा झाला. थोडा वेळ गप्पागोष्टी झाल्यानंतर बाकीच्या मंडळींना सर्फोजीनें कांहीं तरी मिष काढून लावून दिलें. तो आतां सलामतखांशीं कांहीं बोलण्यासाठीं फार उतावळा झालासा दिसला. मंडळी गेल्याबरोबर त्यानें एकदां चहूंकडे पाहिलें आणि लागलीच तो सलामतखांस म्हणतो, " मला कांहीं...कडून विशेष निरोप नाहीं?" सलामतखांही इकडे तिकडे पाहून म्हणतो, " निरोप विशेष कांहीं नाहीं. 'आज रात्रीं बारा वाजल्यावर त्या आपल्या नेहमींच्या मकाणावर तूं ये आणखी मला कच्ची हकीकत प्रत्यक्ष सांग. मी तिथें येणार,' एवढेच शब्द तुझ्याजवळ मला सांगायला सांगितले आहेत." इतकें सलामतखांचें बोलणें पुरें होऊन ते दोघेही उठले व पाठमोरे झाले, तों जवळच्या चबुतऱ्यापाठीमागून सांवळ्या हळूच बाहेर पडला. आपण आतां या दोघांच्या मागोमाग जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं असा विचार करून त्यानें लागलीच गडावरून खालीं जाण्याचा मार्ग धरला व सलामतखां आणि सर्फोजी यांच्या अंगावरून मोठ्या शिताफीनें तो निघून गेला.

गड उतरून खालीं आल्यानंतर त्यानें थेट आवजी पाटलाच्या घराकडे धांव मारली. आवजी त्यावेळीं नुकताच येऊन हुश्श करीत पडला होता. सांवळ्या पाटीलबुवांच्या समोर जाण्याबरोबर पाटीलबोवांनीं त्याजवर एवढाले डोळे करून त्याला म्हटलें, 'सांवळ्या, लेका कुठें होतास इतका वेळ ?" "मी होतों तिथेंच आणि गेलों होतों कुठें ! तुम्ही आलां उगाच लगबगीनें त्या सर्फोजीला अन् त्या सलामतखांला भिऊन ! पण पाटील-बोआ, त्या सर्फोजीचं व सलामतखांचं कांहीं तरी वंगाळ काम आहे चगा. मी त्यांना एकमेकांना तुमच्या देखत चोरून डोळ्यांनीं खुणावतांना पाहिलं, आणखी त्यांचं कांहींबाहीं बोलणं पण ऐकिलं. आन् आणखी सांगतों तुम्हांला, पाटीलबोआ, आज रातच्या बारा वाजतां त्या आपल्या गडाच्या पलीकडच्या बाजूला तो वाघाचा झरा आहे नाहीं, तिथें सर्फोजीला कोणी तरी गुप्त भेट घेण्यासाठीं बोलाचलं आहे आन् त्याचं तिथं जाण्याचंबी ठरलंय." ही हकीकत ऐकून आवजी पाटील बराच वेळ स्तब्ध बसले. त्या हकीकतीवरून कांहीं मागील गोष्टींविषयींची सांखळी पाटीलबोवांच्या ध्यानांत आली असावी असें दिसलें. परंतु सांवळ्याच्या डोक्यावर एक थप्पड लगावून ते म्हणतात, "लेका, इतकं तूं सगळं कुठेरें होतास, आयकायला ? सगळं खोटंच सांगतोस वाटतं—" त्यावर सांवळ्या एकदम म्हणतो, "छेः छेः पाटीलबोआ, मी गायित्रीच्यान् कधीं खोटं म्हून सांगणार नाहीं; जें आतां तुम्हांला सांगितलं तें अगदीं म्यां आपल्या कानांनीं आयकिलं आन् धांवत धांवत सांगायला आलों. तुम्हांला सांगतों पाटील-बोआ, हा सर्फोजी फार वाईट माणूस आहे. कायना काय तरी काळंबेरं काम करण्यांत तो गुंतलाय् ! त्याचं तें बोलणं, चालणं, सांगणं, सगळं चोरावानी आहे." सांवळ्या खोटें सांगत असेल, किंवा कांहीं बनवून सांगत असेल असें आवजी पाटलाच्या मनांत मुळींसुद्धां आलें नाहीं. त्यांनीं आपल्या मनांत चालविलेले विचार झांकण्यासाठीं जणूं काय, कांहीं तरी बोलून सांवळ्यावर खोटें बोलल्याच्या आरोपाचें भाषण केलें. ते बराच वेळ विचार करीत राहिल्यानंतर एकदम उठले आणि सांवळ्याला म्हणतात, "पोरा, भाकर खाल्लीस ?" सांवळ्यानें अर्थातच 'नाहीं' असें उत्तर दिलें. त्याबरोबर

ते त्यास म्हणतात, “ चल तर माझ्याबरोबर, भाकर खा, आणि तडक पुन्हां गडावर जाऊन सुभान्याला बोलावून घेऊन ये.”

सांवळ्यानें भाकर खाल्ल्यावर तो हां हां म्हणतां गडावर गेला. त्यानें सुभान्याची गांठ घेतली व त्यास आवजी पाटलाचा निरोप सांगून तो लागलीच परतला. त्याच्या मागोमागच सुभान्याही गड उतरून आला व आवजी पाटलाच्या निरोपाप्रमाणें त्याच्याकडे गेला. त्या दोघांचें बराच वेळ एकांतांत भाषण होऊन रात्रीं गुप्तपणें सांवळ्यानें सांगितलेल्या वेळीं व ठिकाणीं जाण्याचें ठरलें. पण रात्रीं त्यांच्या आधींच सांवळ्या त्या गुप्त जागीं गेला व कोणत्या जागीं बसलें असतां आपणांस ऐकूं येण्यास अडचण पडणार नाहीं तें त्यानें हेरून ठेवलें होतें. ठरल्याप्रमाणें रात्रीं सुभान्या व आवजी निघाले. अंधारांतून ठेंचाळत ठेंचाळत ते ठरलेल्या जागेच्याजवळ आले; इतक्यांत समोरून कोणी तरी सपाट्यानें येत असून खूण करीत आहे असें सुभान्यास वाटलें आणि तो चटकन् थांबला, तोंच “ सुभानबा, पाटीलबोआ, आतां अगदीं एक अक्षरसुद्धां तोंडावाटें काढूं नका. तो लेक येऊन घोड्याला झाडाशीं बांधून त्या दरडीवर उभा आहे. तुम्ही असे दरडीच्या बाजूला या. ” असे सांवळ्याचे शब्द ऐकतांच ते दोघे दरडीच्या बाजूकडे निघाले. परंतु आवजीस त्या अत्यंत अवघड जागीं चढून जाणें अशक्य झाल्यामुळें तो त्या दरडीच्या खालीं, कोणास न दिसेल अशा ठिकाणीं, स्वस्थ बसला. सुभान्या व सांवळ्या आपापल्या जागीं बसून कान टवकारून उत्सुकतेनें वर लक्ष देऊन होते. बराच वेळ झाला तरी सर्फोजीचा पत्ता नाहीं. तेव्हां तो वर दरडीवर असलेला गृहस्थ फारच त्रासलासा दिसला. पण इतक्यांत कोणी तरी ती दरड चढतें आहे असें पाहतांच तो अगदीं शुद्ध उर्दूत म्हणालाः— “ हरामजाद्या, इतका वेळ आपल्या बापाला इथें वाट पहायला लावलंस, तुला कांहीं वाटत नाहीं ? पाजीची अवलाद ! तूं जितक्या गोष्टी मला सांगितल्यास तितक्या सगळ्या मी खऱ्या समजेन असं तुला वाटलं होतं काय ? ”

सर्फोजी घाबऱ्या घाबऱ्या आवाजानें म्हणतो, “ मीं सांगितलेल्यापैकीं एकसुद्धां गोष्ट खोटी नाहीं, महाराज ! ” “ तर काय, आतां तो निमकहराम पोरगा पुन्हां इकडे कधीं यायचा नाहीं अशी तजवीज झाली म्हणतोस ती

अगदीं खरी ?” “अगदीं अक्षरशः खरी. आपण त्याबद्दल बिलकुल शंका घेऊं नये. मीं स्वतःच त्याला जाण्यास मदत केली. आणखी माझ्यासारखा विश्वासू नोकर आणखी मित्र दुनियेंत कुठें मिळायचा नाहीं, असा भरंवसा त्याच्या मनांत अजून कायम आहे अशी माझी अगदीं खात्री आहे. आपण बिनदिक्कत पुढल्या मार्गाला लागावं. इथली सगळी व्यवस्था माझ्याकडे लागली, मात्र...” सर्फोजीच्या तोंडून ‘मात्र’ असा शब्द ऐकण्याबरोबर तो गृहस्थ म्हणतो, “मात्र म्हणून तुझी बक्षिसी तुला ताबडतोब मिळाली पाहिजे इतकंचना? आम्हांला त्याचं स्मरण तूं द्यायला नकोस. तुझ्या साहाय्याची आठवण—आणखी तुझीही आठवण—आम्ही पक्की ठेवूंच ठेवूं. बोल. आणखी कांहीं बातमी असली तर बोल. ज्या गोष्टीबद्दल मीं तुला विशेष सांगितलं आहे, तें होतं आहे का नाहीं? जर तें झालं नाहीं, तर तुझ्या आजपर्यंतच्या मसलतीचा आणखी मदतीचा फुटक्या कवडीइतका सुद्धां उपयोग नाहीं...” “तें काम फार कठीण आहे. माझ्याकडून कांहीं मार्गानें यत्न चालू आहे. पण......” “पण? पणबीण मी मुळींच ऐकून घेणार नाहीं. तें तर आधीं झालं पाहिजे. जातेवेळीं तुझ्याच भरंवशावर रहावं, तूं वेळप्रसंगीं प्राणसुद्धां देशील, असं जनानखान्यांत तो सांगून गेला म्हणून तूंच म्हणालासना?” “होय, पण त्याचा उपयोग होईलसं वाटत नाहीं.” नंतर बराच वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं. त्यानंतर तो गृहस्थ सर्फोजीस म्हणतो, “ठीक आहे. आजपासून आठ दिवसांच्या आंत मीं तुला सांगितल्याप्रमाणें सर्व व्यवस्था होईल; गडकऱ्याला खलिता येईल; त्याजबरोबर तुलाही एक लखोटा येईल. आतां आपल्या मनाप्रमाणें होण्याला कांहींच पंचाईत नाहीं. जा तर.” इतकें बोलून, तो गृहस्थ दरड उतरून गेला सुद्धां. इकडे सुभान्या व सांवळ्या यांनींही आपल्या जागा सोडून खालीं उतरण्याचा क्रम सुरू केला. त्यांनीं जें काय ऐकलें, त्याचा त्यांना कांहींच उमज पडेना.

सर्फोजी आणि त्याच्याशीं अत्यंत उद्दामपणानें बोलणारा तो सरदार या दोघांचा काय संबंध असावा हें जरी पक्केपणीं सुभान्याच्या लक्षांत आलें नाहीं, तरी पण किल्लेदाराचा घातपात करण्याच्या उद्देशानें सर्फोजीच्या

हातून कांहीं तरी वाईट कृत्यें घडत आहेत, हें तर त्यास पक्केपणीं दिसून आलेंच. आवजी पाटलास सर्व हकीकत सांगितल्यानंतर तो त्यास म्हणाला, "मला वाटतं आतां आपण जें ऐकलं आहे, तें आत्तांच्या आतां थोरल्या साहेबांच्या कानांवर घातलं पाहिजे. जर न घातलं आणखी कांहीं वेडंवांकडं झालं तर आपल्याला आधीं इतक्या गोष्टी कळल्या असून आपण वेळींच थोरल्या साहेबांना जागं केलं नाहीं असं होईल; आणखी आपण इतका सगळा जो खटाटोप केला, तें सारं व्यर्थ होईल." आवजी व सुभान्या नंतर आवजीच्या घरीं जाऊन त्यांनीं एकंदर काय ठरवावयाचें तें ठरविलें.

सुभान्या मोठ्या पहांटेस गडावर गेला. किल्लेदारसाहेब उठतात केव्हां आणि प्रसंग साधून त्यांस एकीकडे नेऊन एकंदर रात्रीची हकीकत सांगतों केव्हां, असें त्यास झालें होतें. होतां होतां त्यास हवी होती तशी संधि मिळाली आणि त्यानें आपण जें जें कांहीं रात्रींपासून केलें किंवा ऐकलें तें तें इत्थंभूत त्यांना सांगितलें. परंतु खासे स्वारींनीं तें इतक्या धीमेपणानें व शांतपणानें ऐकून घेतलें कीं त्यापासून त्यांच्या मनावर कांहीं परिणाम झाला कीं नाहीं हें समजणें अत्यंत दुरापास्त होतें. थोरले साहेब कांहीं तरी विचारांत गर्क होऊन गेले होते हें अगदीं उघड दिसलें. शेवटीं आपलें कर्तव्य आपण केलें, आतां त्यांचा विचार त्यांनीं करावयाचा असेल तर करावा, नाहीं तर नाहीं, असा कांहीं तरी मनांत विचार करून सुभान्या आतां जाणार तोंच त्यास थोरले साहेब म्हणाले:- "सुभान्या, तूं माझा इमानी नोकर आहेस. आज माझं एक अत्यंत जरूरीचं आणखी विश्वासाचं काम तूं स्वतः जाऊन केलं पाहिजेस. करशील माझं काम? गांवीं जायचं आहे. तूं आतां ज्या कांहीं गोष्टी सांगितल्यास त्याचं मला आधींच स्वप्न पडलं होतं आणि आज सकाळीं सलामतखानं......" परंतु मध्येंच ते थांबले आणि इकडे तिकडे पाहूं लागले. इतक्यांत दार उघडून एक हुजऱ्या आंत आला व म्हणतो, "सरकार, ह्या कुळंबिणींनीं काय बातमी आणली आहे पहा. आम्ही तर अगदीं घाबरून गेलों ती बातमी ऐकून." खासे स्वारी कपाळाला आंठ्या घालून म्हणते, "नीट बोल काय बातमी असेल ती. आज बातम्यांचाच दिवस आहे. बोल, काय आहे तें बोल." "कीं चंद्रा-

बाई आणखी चिंगी सकाळपासून आपल्या महालांत नाहींत आणखी कुठें सांपडत नाहींत!"

---

५. ही मंडळी कोण?

पहिल्या प्रकरणांतील आमच्या मराठा शिपाईगड्याची व त्या रुद्राक्षधारी गोसव्याची भुयारांत चुकामूक होऊन त्याचा कांहींच पत्ता लागत नाहीं असें पाहून बोआजी वर निघून आले व त्यांनीं आपल्या नित्यक्रमास सुरुवात केली. तेथून बऱ्याच अंतरावर असलेल्या कुव्यांत स्नानसंध्यादि विधि उरकून व जवळच्या खेड्यांत मिळाली ती भिक्षा घेऊन स्वारी देवळांत परत आली. सुमारें चार किंवा पांच घटिका रात्रीस एक माणूस आंत आला. आंत येण्याबरोबर त्यानें बोआजींस अगदीं लवून नमस्कार केला व हलकेंच म्हटलें, "आज स्वारी इकडे येईलसें वाटत नाहीं. आपण कदाचित् वाट पहाल म्हणून मी हें कळविण्यासाठीं आलों आहें." तें त्याचें बोलणें ऐकून बोआजी क्षणमात्र स्वस्थ बसले व म्हणाले, "आज तुम्ही इथें आलां असतां तर फार चांगलं झालं असतं. बरं, उद्यां आलां तरी हरकत नाहीं, असा माझा निरोप स्वारीला सांग." बोआजीचें एवढें बोलणें ऐकून तो मनुष्य तेथून निघून गेला. बराच वेळ बोआजी स्वस्थ बसल्यावर कांहीं वेळानें त्यांच्यासारखाच आणखी एक गोसावी आंत आला. त्यास बघण्याबरोबर आमचे पहिले बोआजी चकित होऊन म्हणतात, "काय? तूं इतक्यांत परतलास? अशी बातमी तरी काय आणली आहेस?" त्यावर त्या दुसऱ्या गोसाव्यानें एकदम म्हटलें, "सुलतानगडच्या किल्लेदारांची गठडी..." परंतु त्याचें बोलणें पुरें होण्यापूर्वींच आमचे बोआजी त्यास म्हणतात, "हा मूर्खा! ज्या कामगिरीवर तुला मीं पाठविलं, ती कामगिरी पुरतेपणीं करण्याचं टाकून मध्येंच परतून आलास त्या तुला म्हणावं तरी काय?" आपल्या बोलण्यानें त्याचा चेहरा उतरलेला पाहतांच बोआजी त्याच्या पाठीवर हात फिरवन म्हणतात, "बाळा, मी बोललों त्याचा तुला विषाद वाटूं देऊं नको. आतां तूं काय

सांगत होतास त्याची मला किती माहिती होती तें तुला प्रत्यक्ष दाखवितों. चल माझ्याबरोबर खालीं." असें म्हणून ते दोघेही भुयाराच्या वाटेनें खालीं अंबाबाईचे देवळापाशीं आले व बोआजी त्यास म्हणाले:- "बघ, आंत काय दिसतें तें. हा काल रात्रीपासून इथं आला आहे. हा प्रत्यक्ष इथें आल्यानंतर आतां तूं आणखी बातमी ती काय सांगणार? बरं, तूं आतां जा. मी याची काय हालहवाल आहे ती पाहून येतो."

थोड्या वेळानें बोआजी वर आले व त्यांच्याबरोबर भवानीच्या देवळांत झोंपी गेलेला तो पुरुषही वर आला. भुयारांतील तीं हत्यारें, कुलुपें लावलेल्या त्या मोठमोठ्या पेट्या, व एकंदरींत सर्वच कांहीं विलक्षण कारखाना पाहून हें काय गौडबंगाल, असा प्रश्न साहजिक त्या आमच्या शिपायाच्या मनांत येऊन तो बोआजीस म्हणतो, "बोआजी हें देऊळ काय आहे, भुयारांतलं देऊळ काय आहे, आंतल्या त्या पेट्या कोणाच्या, हत्यारं कोणाचीं हें सर्व मला सांगाल काय? तुम्ही आपल्याला केवळ गोसावी म्हणतां, परंतु तसेच खरोखर असाल असं माझ्या मनाला तर वाटत नाहीं. इथें बरीचशी मंडळी येत असावी. ते कोण येतात तें मला सांगाल काय? बोआजी, तुम्ही जर कांहीं राज्यकारभारांत गुंतलां असाल, तर मला तुम्ही आपला चेला करा. मला घरदार कांहींएक नाहीं. मी सर्वथा तुमच्या सेवेंत राहतों." बोआजी त्याचें तें बोलणें ऐकून गालांतल्या गालांत किंचित हंसले व त्याला म्हणतात, "एकूण तुला घरदार कांहींएक नाहीं आणि तूं आपला एक आमच्यासारखाच भणंग गोसावी होऊं म्हणतोस? पण पुढें कुठून तरी तुझं घरदार, तुझी मंडळी पुढें आली तर कसं काय?" बोआजीच्या या प्रश्नानें स्वारी जरा गोंधळल्यासारखी होऊन गप्प बसली. बोआजी विशेष हंसले व त्याच्या पाठीवर हात मारून म्हणतात, "हरकत नाहीं. तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी होतील; तूं एवढी ही उरलेली रात्र आणि उद्यांचा दिवस कसा तरी इथें काढ. संध्याकाळीं तुझ्या नजरेस इथें कांहीं एक चमत्कार पडेल व तुला असं वाटेल कीं, आपण इथें आलों हें फार चांगलं झालं!"

इतकें आश्वासन मिळालें तरी आमच्या शिपाईगड्यास एकंदर प्रकार काय आहे आणि आपण कोठें आलों याचा कांहींच उलगडा होईना.

तो अगदीं गंभीर चेहरा करून स्वस्थपणें विचार करीत बसला होता. सरतेशेवटीं बोआजी त्यास म्हणतात, "तूं असाच किती वेळ बसून राहणार ? माझ्याप्रमाणें घटकाभर पडून उजाडेपर्यंत वेळ काढ." परंतु त्यास कांहीं केल्या झोंप येईना. तो जातीचा शूर वीर खरा; परंतु त्याला कोठेंही पडून झोंप घेण्याची संवय असेल असें त्याच्या चर्येवर तरी निदान दिसत नव्हतें. श्रीमंतीचीं लक्षणें कधींही झांकलीं जात नाहींत. मध्येंच तो उठला आणि इकडे तिकडे पाहून एकदम बोआजींस म्हणतो, "बोआजी, मीं इथून आतां जावं असं मला वाटतं. माझ्या मनांतन ज्या ठिकाणीं जायचं आहे त्या ठिकाणीं मीं केव्हांच पोहोंचायला पाहिजे होतें. तर मला आज्ञा द्या. तुमच्या इथें काय मौज आहे ती पाहण्यास मी पुन्हां केव्हांतरी येईन." बोआजीस झोंप लागली नव्हती. त्याचें तें बोलणें ऐकून ते हसून त्याला म्हणतात, "तुला इथून जायचं होतं तर तूं पहिल्या रात्रीं जायला पाहिजे होतंस. आतां फार उशीर झाला. इथून थोड्या अंतरावर गेला नाहींस तों फटफटीत उजाडेल आणि गेल्या पांचचार दिवसांत तूं जीं दोनचार कृत्यं केलींस त्यामुळें दिवसा ढवळ्या इकडे तिकडे हिंडणं तुला धोक्याचं आहे हें तूं विसरलास काय ? मला तुझी इत्थंभूत माहिती आहे हें अजून तुझ्या लक्षांत आलं नाहीं काय ? तुझीं कृत्यं तुला भूषण मानणारी मंडळी तुला या ठिकाणीं भेटतील. मी सांगतों तसा तूं आतां वाग म्हणजे झालं." शिपाईगडी थोडा विचारांत पडला. परंतु सरतेशेवटीं त्यानें बोआजींच्या सांगण्याप्रमाणें करावयाचें ठरविलें. होतां होतां दिवस पार पडला तशी आमच्या शिपाईगड्याची उत्सुकता वाढूं लागली. सायंकाळच्या सुमारास दुरून पुष्कळशी मंडळी त्या देवळाकडेच येत आहेत असें त्यास दिसलें. आंत जाऊन त्यानें बोआजींना ती वर्दी दिली आणि ही मंडळी कोण असा प्रश्न विचारला. बोआजींनीं "ती मंडळी इथें आली म्हणजे काय तें कळेल," असें संदिग्ध उत्तर त्यास दिलें. इतक्यांत "जय भवानीकी जय !" अशा अक्षरांचा घोष करीत त्या देवळाच्या आवारांत मंडळी आली. ती सर्व मंडळी त्याच्यासारखी मराठे मंडळी होती.

त्यांतील एक तेजस्वी मुलगेलासाच तरुण बलभीमाच्या मूर्तीजवळ जाऊन नमस्कार करून बोआजींच्या धुमीकडे वळला व त्यांसही नमस्कार

करून म्हणतोः-" काय स्वामीमहाराज, आज आपण आंतच बसून राहिलां आहां. आम्ही आज कांहींतरी आणखी घेऊन आलों आहों, तें आपल्या पायांपाशीं आणून ठेविलं म्हणजे संपलं." तो इतकें बोलत आहे तों त्याची नजर त्या दारांतल्या आपल्या शिपाईगड्याकडे गेली आणि त्यानें स्वामींस लागलीच "हा कोण" अशा अर्थी प्रश्न केल्यासारखी खूण केली. स्वामींनीं लागलीच "आपल्याच वर्गांतील एक आहे", असें हंसत हंसत उत्तर देऊन त्या तरुण पुरुषास व त्याच्या बरोबरीच्या दोघांस, फक्त त्यांसच, ऐकूं जाईल अशा तऱ्हेनें कांहीं गोष्ट सांगितली. थोड्या वेळानें बाहेरील मंडळींनीं तो पेटारा आणून बलभीमाच्या मूर्तीच्या पाठीमागें नेऊन ठेविला व ती मंडळी बाहेर गेली. ती गेल्यानंतर त्या बोआजींनीं-श्रीधरस्वामींनीं-त्या तरुण पुरुषास म्हटलें, "ज्याप्रमाणें हे तुझे दोघे अगदीं जीवाला जीव देणारे स्नेही असं तूं समजतोस, त्याचप्रमाणें या (आमच्या शिपाईगड्याकडे बोट करून) शूर पुरुषालाही आपल्या जीवाला जीव देईल असा सोबती समज. तुझ्याप्रमाणेंच आपल्या भरतभूमीकरितां त्याचा जीव तिळातिळ तुटतो आहे. तो आपलं घरदार सोडून केवळ तुझ्या गोटांत मिळण्याकरितांच निघाला असून वाट चुकून इकडे वळला, तों मीं त्याला ठेवून घेतलं. आतां तुझी व त्याची गांठ घालून दिली आहे." श्रीधरस्वामींचें हें बोलणें चाललें असतां आमचा शिपाईगडी व तो तरुण पुरुष एकमेकांकडे अत्यंत स्तब्ध दृष्टीनें पहात होते; जणूं काय ते आपल्या नेत्राकर्षणानें एकमेकांचीं अंतःकरणें आकर्षून घेत होते.

तो तरुण पुरुष फारच तरुण म्हणजे अगदीं पोरवयाचा होता. परंतु तेजस्वी महात्म्यांचें महत्त्व वयावर अवलंबून नसतें. बराच वेळ त्यानें त्या शिपाईगड्याकडे लक्ष लावून पाहिल्यानंतर लागलीच स्वामींकडे वळून तो त्यांस म्हणतो, "स्वामी, ज्या मनुष्याची खातरजमा आपण केली त्या मनुष्याबद्दल जास्ती कमती चौकशी करणं हें माझं ब्रीदच नव्हे." इतकें बोलून तो त्या शिपाईमर्दाकडे वळला आणि त्यास म्हणतो, "स्वामींची आज्ञा आपण आतां ऐकलीच. आजपासून तुम्ही, हे दोघे आणि मी केवळ एक जीव. मूर्ति मात्र भिन्न असं समजायचं. आज मी इथून निघालों म्हणजे माझ्याबरोबर आपण चलायचं." नंतर थोड्याच वेळांत स्वामींनीं

बलभीममूर्तीचें आसन नित्याप्रमाणें ढळविलें व ते आंत गेले. त्यांच्या मागोमाग त्या तरुण पुरुषाच्या सोबत्यांपैकीं एक आंत उतरला. दुसऱ्यानें तो आणलेला पेटारा उचलून आंत सोडला व नंतर तो पुरुष आंत उतरला. आमच्या शिपाईगड्यास त्यानें वरच उभें राहण्यास सांगितल्याबरोबर त्याच्या चर्येवर असंतोषाची एक बारीकशी लकेर क्षणमात्र चमकली असें दिसलें; तथापि त्यानें रेसभरही आपलें पाऊल पुढें घातलें नाहीं. एखाद्या सेनाधिपतीनें हुकूम केल्याबरोबर त्याची आज्ञा शिरसावंद्य करून हुकूम पार पाडणाऱ्या शिपायाप्रमाणें तो सांगितल्याप्रमाणें जेथल्या तेथेंच तटस्थपणें उभा राहिला.

सुमारें पाव घटकेनें त्या पुरुषाच्या सांगण्यावरून त्याच्या एका सोबत्यानें त्यास खालीं उतरण्यास सांगितलें. तें ऐकण्याबरोबर तो खालीं उतरला आणि तडक त्याच्या मागोमाग भवानीच्या देवळांत गेला. तेथें त्या तरुण पुरुषानें एकवार त्या भवानीच्या मूर्तीभोंवतीं प्रदक्षिणा घातली व तो पुन्हां भवानीच्या समोर येतो, तों त्याचें तेज कांहीं निराळेंच दिसूं लागलें. तो तरुण पुरुष आपल्या सभोंवतालच्या सर्व गोष्टींपासून अगदीं अलिप्त होऊन जणूं दुसऱ्याच कांहीं परिस्थितींत पडला असावा असें दिसलें. बराच वेळपर्यंत तो कांहीं एक बोलला नाहीं, परंतु त्यानंतर त्यानें दोनदां तीनदां भवानीपुढें दंडवत घालून कांहीं शब्द उच्चारले. ते शब्द " संकट येईल, पण विनाश होणार नाहीं. काळजीनं असणं...अविंध मातवर...थोडा जोरावर..." इतकेच शब्द त्याचे तोंडून बाहेर पडले व देवीपुढें दंडवत घालून तो केवळ निश्चेष्ट असा पडून राहिला. त्यास त्यांतून जागृत करण्याची कोणीही खटपट केली नाहीं. हळूहळू तो तरुण पुरुष भानावर आला आणि त्यानें आमच्या शिपाईगड्यास जवळ बोलावून घेऊन व आपली तलवार काढून ती भवानीच्या पुढें ठेवून 'मी भवानीच्या सेवेंत आणि गोब्राह्मणांचा छळ होतो तो दूर करण्यांत प्राण खर्ची घालण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं' असें म्हण व आई अंबेला दंडवत घालून ही तलवार उचल असें त्यास सांगितलें. आमच्या शिपाईगड्यानें क्षणार्धाचाही विलंब न करितां सांगितल्याप्रमाणें अक्षरशः करून त्या तरुण पुरुषाची ती तलवार उचलली आणि आपल्या मस्तकावर धारण केली. इतकें सर्व झाल्यावर तो तरुण

पुरुष उठला व स्वामींकडे पाहून म्हणतो, "स्वामी, कांहीं नवीन वर्तमान आहे?" स्वामींनीं, "होय आहे. संकट येईल, विनाश होणार नाहीं. अविंध मातबर, थोडा जोरावर" अशीं अक्षरें उच्चारून दाखविलीं. त्याबरोबर त्या तरुण पुरुषाच्या चेहऱ्यावर किंचित् चिंता दिसूं लागली; तथापि ती दुसऱ्या कोणासही दिसूं न देतां तो सर्वांकडे पाहून म्हणतो, "चिन्ह बरं नव्हे. अंबाबाईनें सुचविल्याप्रमाणें संकट केव्हां येईल, हें सांगतां येत नाहीं. विनाश होत नाहीं हें तर ठरलेलंच. असो. आतां आपल्या मार्गाला लागावं तें बरें." इतक्यांत द्वारपाळाची कामगिरी बजाविणाऱ्या भिव्यानें बातमी आणली कीं, "खानाची एक जबर टोळी अगदीं नजीक आली असून तिनें आपला मोर्चा इकडेच फिरविल्याचा संशय येतो आहे; आणि ती आपल्या मागावर तर खास आहे." तो तरुण पुरुष श्रीधरस्वामींकडे वळून किंचित् हंसला व म्हणतो, "संकट आलें पण ही तोंड देण्याची वेळ नव्हे. आतां तोंड दिल्यास न जाणों क्वचित् जागा सांपडेल. करितां वर जा आणि हुकूम द्या कीं, 'उद्यां रात्रीपर्यंत जिकडच्या तिकडं असावं, आम्ही आपलं पाहून घेऊं.'" श्रीधरस्वामी हा हुकूम घेऊन वर आले; बलभीमाचें आसन त्यांनीं जेथल्या तेथें केलें; आणलेला हुकूम बाहेर दिला आणि सगळे लोक चटकन् जिकडच्या तिकडे गेल्यावर आपल्या धुमीजवळ स्वस्थपणें 'राजारामकी जय, सीतारामकी जय,' असा जयघोष करीत व आपल्या चिलमीचे फवारे सोडीत स्तब्ध बसले.

---

६. सांवळ्याचें धारिष्ट

वेळ अगदीं संध्याकाळची. झाडी किर्र दाट. पाऊलवाट जेमतेम दिसते न दिसते इतक्याच बेताची. त्या वाटेनें दोन माणसें झपाझप चाललीं होतीं. त्यांचे मनांतून थोड्याच वेळांत कोणता तरी गांव गांठावा असें होतें असें दिसलें. क्षणोक्षणीं अंधकार त्यांस गांठीत होता आणि तेही जणूं काय अंधकारास मागें सारण्याकरितां जीव घेऊन धांवत होते. त्या

दोहोंपैकीं मोठा माणूस त्या पोराच्या पाठीवर एक थापटी देऊन म्हणतो, “लेका सांवळ्या, तूं आपल्या आईला गुंगारा देऊन माझ्याबरोबर आलास, पण तिकडे आई शोध करून थकली म्हणजे काय करील रे?” सांवळ्या मोठ्यानें हंसून म्हणतो, “काय कां करीना? इकडे बघ, सुभानदादा, हा पोऱ्या असा तसा नाहीं राह्यचा. सरदार होणार एक दिवस, सरदार! मीं कधींच आईला सांगून दिलंय् कीं, आपण मोठे झालों म्हणजे कुठेंना कुठें तरी जाणार निघून तलवार गाजवायला.” “वा! वा! एकूण तुम्ही भले मोठे सरदार बनणार आं! अन् तलवार गाजवणार आं?”

थोड्या वेळानें सांवळ्या सुभान्यास म्हणतो, “पण कायरे सुभानदादा, तूं आतां चाललास कुणीकडे? मी तुझ्या पाठीमागून येतों, पण कांहीं सुगावा तरी लागूं देशील!” सुभान्या लागलीच त्याच्याकडे वळून म्हणतो, “लेका, तुला कशाला ही चौकशी? तूं अजून बच्चा आहेस. तूं आपला मुकाट्यानं बरोबर चल म्हणजे झालं!” सांवळ्या पोरगा मोठा बिलंदर. त्याला एवढें पक्कें ठाऊक होतें कीं, सुभान्याच्या खिशांत खाशा स्वारीनें दिलेला एक लखोटा फार महत्त्वाचा आहे. थोड्याच वेळांत गांव जवळ येतांच सांवळ्या सुभान्यास म्हणतो, “आपण आतां चावडीवर जाऊं नये. मला वाटतं आपण त्या म्हसोबाचे देवळांत पहांटेपर्यंत वेळ काढावी अन् पहांटेस उठून पुढें जावं. इथला पाटील सर्फोजीकडे उठल्या बसल्या येत असतो तो तेवढंच सर्फोजीला सांगितल्यावांचून रहावयाचा नाहीं.” सुभान्याला सांवळ्याचें म्हणणें पटून ते दोघे त्या म्हसोबाच्या देवळांत आले. सांवळ्या भुकेनें अगदीं कळंजला होता. त्यामुळें त्यांनीं आंत जाण्याबरोबर आधीं आपली घोंगडी पसरून आपली कांदाभाकरी यथास्थित चापली व घोंगडीवर अंगें टाकिलीं. सारा वेळ अतिशय चाल पडल्याकारणानें ते दोघेही जमिनीला अंगें लागतांक्षणींच अगदीं डाराडुर निजले.

मध्यरात्र उलटून चंद्रोदय झाला. इतक्यांत दोन माणसांच्या छाया त्या देवळाच्या पुढील प्रदेशावर पडलेल्या दिसूं लागून त्या हलके हलके देवळाच्या अगदीं जवळ आल्या. त्यांपैकीं एक स्त्री व एक पुरुष असावा असें त्यांच्या पोषाखावरून सहजींच दिसलें. देवळाच्या वळचणीखालीं बराच वेळ उभें राहून त्यांनीं आपण आतां सुरक्षित आहोंत असें जेव्हां

पाहिलें तेव्हां त्यांस थोडासा धीर आला असें दिसलें. त्यांपैकीं बायको होती ती किंचित् थट्टेचा आवाज काढून त्या पुरुषास म्हणते, "हेंच का तुमचं धैर्य तें? या पोषाखाला शोभेसें तरी वर्तन ठेवावं." त्याबरोबर तो पुरुष तिच्याकडे वळून म्हणतो, "गप्प बैस, गप्प बैस. चावट कुठली? ही वेळ थट्टा करण्याची का?" असें म्हणून तो देवळांत जाऊन विश्रांति घेण्यासाठीं हलकेंच दारांत जाऊन डोकावून पाहून आतां आंत पाऊल टाकणार, तों सुभान्यानें झोंपेंत एक मोठा थोरला सुस्कारा टाकलेला त्याच्या कानीं आला. त्याबरोबर एकदम दचकून तो मागल्या पायींच मागें झाला, आणि दोघेही तेथून निघून जाण्याच्या विचारास लागणार तोंच सुभान्या धडपड करीत बाहेर आला. आमची बाहेरली दोन मंडळी चटकन् वळचणीखालीं गेलीं. इतक्यांत सुभान्या आला तसाच आंत गेला. त्याबरोबर या दोघांनीं तेथून निघून जाण्याचा विचार केला आणि आतां मागल्या मार्गेच रस्त्याला लागणार तोंच सुभान्या व सांवळ्या आपल्या घोंगडया खांद्यावर टाकून बाहेर पडले. ते दोघे गेल्यानंतर तो तरुण पुरुष आणि ती स्त्री थोडीशी स्वस्थचित्त झाली. जी काय त्यांना भीति होती ती आतां नाहींशी झाली. तीं दोघेंहि देवळांत आलीं. तो तरुण पुरुष अंगांतले कपडे अगर डोक्याचा मंदिलवजा फेटा मुळींही न उतरतां तसाच पडला व थोड्याच वेळांत त्याला गाढ झोंप लागली. ती स्त्री मोठ्या ममतेनें त्याचे पाय चुरीत बसली.

सुभान्या व सांवळ्या रात्रीं चांगली झोंप झाल्यामुळें आतां खूप ताजे-तवाने झाले होते. ते तरतरीनेंच चालले होते. इतक्यांत झुंजूमुंजू दिसूं लागलें व दुरून बऱ्याच लोकांचा एक जमाव येत आहे असें सांवळ्याच्या लक्षांत आलें. तो लागलीच सुभान्यास म्हणतो, "सुभानदादा, ही मुसलमानांची एक टोळी येत आहे. न जाणो कोण आहेत अन् काय आहेत! आपण जरा रस्ता सोडून जाऊं या." परंतु "अरे जाईनात लेकाचे कोणी कां असेनात! चल आपण आपले मुकाट्यानं जाऊं." इतकें बोलत ते चार पावलें जातात तों समोरली मंडळी अगदींच नजीक आली व ते आपले टोळीला रस्ता देण्यासाठीं म्हणून अगदीं बाजूला उभे राहिले. समोरून येणाऱ्या मंडळींच्या संभाषणांत "सुलतानगड, चंद्राबाई,

नानासाहेब, हरामजादा सर्फोजी " अशीं नांवें व त्यांचं लक्ष्य तिकडे अगदीं वधून जाण्यासारखीं कांहीं वाक्येंही सुभान्याच्या कानीं पडलीं. त्याबरोबर त्याला कांहीं सुचेना. शेवटीं तो सांवळ्याला म्हणतो, " सांवळ्या, आतां प्रसंग मोठा बिकट आहे. आतां झालेला हा प्रकार गडावर जाऊन जितक्या लवकर होईल तितक्या लवकर कळविलाच पाहिजे. ज्या कामाला मला साहेबांनीं पाठवलं आहे तेंही काम तांतडीनं केलं पाहिजे." सांवळ्या लागलीच म्हणतो, " दोघेजण दोन्हीं कामं करूं. मी गडावर आतां जातों. तूं आपल्या कामाला जा." सुभान्या घुटमळला. तो एकदम त्या पोराला म्हणतो, "नको, नको, मीच गडावर जातों; तूं हा लिफाफा घेऊन जा. आणखी...... " बोलतां बोलतां त्यानें आपल्या मुंडाशांत अगदीं लपवून ठवलेला लिफाफा काढला. इतक्यांत दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, सुभान्यानें लिफाफा त्या पोरापुढें करायला, कोणाला कुठें द्यावयाचा तें नांवगांव सांगायला, आणखी त्या टोळींतला एक शिपाई चुकून मागें राहिला होता तो अगदीं जवळ येऊन पोहोंचायला एकच गांठ पडली. कांहीं तरी छपवाछपवीचा प्रकार आहे असें त्याच्या लक्षांत आलें आणि तो एकदम ओरडून त्यांना म्हणतो, " ए हरामजादे, कोण तुम्ही? काय करतां इथें? कसला तो लिफाफा? पाहूं!" एकंदर प्रसंगच फार अचानक. त्यांत सुभान्या विशेषच दचकला; त्याच्या हातून तो लिफाफा खालीं पडला. तो मुसंडा तो लिफाफा उचलण्यासाठीं खालीं वांकणार तोंच सांवळ्यानें चटकन् तो उचलला आणि इतक्या जोरानें धूम ठोकली, कीं पारध्याच्या भयानें आपलें पोर तोंडांत धरून एखादी वाघीण जशी ताडताड उड्या मारीत जाते, तसा तो गेला. सांवळ्याचें धारिष्ट व चपळाई पाहून सुभान्याला सुद्धां अत्यंत आश्चर्य वाटलें. इतक्यांत आणखी एक मुसंडा आला, आणखी दोघांनीं मिळून सुभान्याला पकडलें व त्यास गिरफदार करून त्यांनीं पुढें चालविलें.

सुभान्याची तर अशी स्थिति झाली; त्यांतल्या त्यांत त्याला एवढीच समाधानाला जागा होती, कीं सांवळ्यानें अजब चपळाई करून त्या मुसंड्याच्या हातावर खूप तुरी दिल्या; ते मुसंडे त्यास गचांड्या देत, शिव्या देत व त्याची थट्टा करीत त्याला पुढें घालून नेत होते, व 'तूं कुठें चालला

होतास ? लिफाफा कुणाचा ? कुणीकडे नेत होतास ?' असे प्रश्न त्याला विचारीत होते. आणि तो अगदीं एखाद्या मुखस्तंभाप्रमाणें गप्प होता. पुढची मंडळी मोठ्या जलदीनें चाललेली नव्हती, आणि सुभान्या हातीं सांपडल्यापासून मागली मंडळी जरा जलदी चालल्यामुळें त्यांनीं लवकरच पुढच्या मंडळीस गांठलें. ही मंडळी त्या मंडळींत सामील होतांच घोड्यावर बसलेल्या एका दुल्लेखानास या माणसास असें असें गिरफदार करून आणलें आहे, असें त्यांनीं सांगितलें. त्यावर त्या दुल्लेखानांनीं "आच्छा ! आतां छावणी दिली कीं तिथें त्याचा इन्साफ करूं. ए, करीमबक्ष, तूं पुढें जाऊन छावणीला जागा पाहून छावणी ठोक; या निमकहरामाला बरोबर घेऊन चला." असा अगदीं शुद्ध उर्दूमध्यें हुकूम दिला. करीमबक्ष जागा पहात पहात त्या म्हसोबाच्या देवळाजवळ आला व त्या देवळाच्या पुढेंच मुख्य तंबू ठोकण्याचा त्यानें हुकूम दिला. परंतु देवळांत कोणी माणसें आहेत असें समजतांच करीमबक्षानें अहंमदास बोलाविलें आणि सांगितलें कीं, आंतल्या माणसांस सांगः– "इथें खानसाहेबांची छावणी लागायची आहे, तुम्ही इथून कुठेंतरी लांब जा गांवांतबिवांत." आंतल्या मंडळीच्या मनांत तरी तोच विचार घोळत होता. इतक्यांत अहंमदानें दाराशीं येऊन त्या तरुण पुरुषास करीमबक्षाचा निरोप सांगितला. तो ऐकतांच त्या पुरुषास फार आनंद झाला व तीं दोघेंही बाहेर जाण्यास सिद्ध झालीं आणि तावडतोब निघालीं. ती स्त्री व तो पुरुष, करीमबक्ष ज्या झाडाखालीं बसून हुक्का पीत होता, त्या झाडाची बाजू गांवाकडे जाण्याची असतांना दुसरीकडून जाऊं लागलीं. इतक्यांत "आपल्याला हुजुरांनीं क्षणभर बोलावलं आहे" असा अहंमदानें येऊन त्याला निरोप सांगितला. त्याला नाहीं म्हणणें म्हणजे विनाकारण कांहीं तरी शंकेला कारण देऊन आपल्या मार्गांत आपण होऊन अडथळा आणण्यासारखें होणार आहे, असा क्षणमात्र विचार करून तो तावडतोब अहंमदाबरोबर माघारी गेला. अहंमद आणि करीमबक्ष दोघेही त्याच्याकडे अगदीं एकसारखे टक लावून पहात होते. त्यामुळें तर त्याला फारच चमत्कारिक झालें. करीमबक्षानें त्याला 'आपण आलां कुठून ?' 'चाललां कुठें' असे प्रश्न विचारले. परंतु त्या प्रश्नांचीं उत्तर देण्याऐवजीं तो अधिकाधिकच गोंधळला मात्र. शेवटीं त्यानें कांहीं

उत्तरें दिलीं. परंतु त्या उत्तरांनीं करीमबक्षाचें समाधान झालें नाहीं. "आम्हीं विचारल्या प्रश्नांचीं उत्तरं आपण खरीं खरीं दिलीं नाहींत, करितां खानसाहेब येईपर्यंत आपल्याला जाऊं देतां येत नाहीं. खानसाहेब आतां येतील. त्यांना आपली खरी हकीकत काय ती सांगा, आणखी मग त्यांनीं सांगितल्यावर जा," असें करीमबक्षानें त्याला सांगितलें. 'छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति' म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. त्या पुरुषास त्या वेळीं याचा चांगलाच अनुभव आला. बिचाऱ्यानें त्या स्त्रीला परत बोलाविलें व दोघेंही देवळांत जाऊन बसलीं. थोड्याच वेळांत तंबू ठोकण्याचें काम संपलें, आणि ती मागली मंडळीही आली. खानसाहेबांचा उपाहार होऊन हुक्का ओढून आराम झाल्यावर त्याला त्या रस्त्यांत गिरफदार केलेल्या मनुष्याची आठवण झाली व त्यानें त्याला घेऊन येण्याचा हुकूम केला. लागलीच एकानें सुभान्यास आणलें; तों करीम-बक्षानें आंत येऊन कानांत कांहीं विनंती केली. त्याबरोबर 'त्यालाही आणा' म्हणून हुकूम सुटला. अहंमद देवळांत जाऊन त्या तरुण पुरुषास घेऊन आला. आंत पाऊल टाकून कुर्निसात करून तो वर पाहतो तों सुभान्याची त्याच्या व त्याची सुभान्याच्या चेहऱ्याकडे नजर गेली आणि हा घोंटाळ्यांत घोंटाळा पाहून एकदम त्याची गंभीरता नाहींशी होत चाललीसें दिसलें, आणि सुभान्या आश्चर्यानें अत्यंत चकित होऊन गोंधळल्याप्रमाणें दिसला.

---

७. गोसावीबोआ

वाचकांस स्मरत असेलच कीं, कांहीं मुसंडे मंडळींची टोळी आपल्या देवळाकडेच येत आहे, अशी कुणकुण लागतांच मारुतीच्या देवळांतल्या मंडळींनीं आपआपली व्यवस्था यथास्थितपणें लावून देवळांत कशाचा कांहीं मागमूससुद्धां राहूं दिला नाहीं. फक्त गोसावीबोआ नित्या-प्रमाणें आपलं भजन अगदीं एकतानतेनें करीत होते. स्वामीमहाराज तोंडानें जरी सीतारामाचा एकसारखा जयघोष करीत होते, तरी बाहेरच्या

चाहुलीकडे त्यांचें लक्ष अतोनात असल्याचें अगदीं उघड दिसत होतें. नंतर चाहूल फार नजीक आली, हें पाहतांच त्यांनीं आपलें नामस्मरण फारच मोठमोठ्यानें सुरू केलें. बाहेरून जी मंडळी आली, त्यांचें लक्ष तिकडे ओढलें जाऊन त्यांच्यापैकीं दोघे अगदीं पुढें आले व देवळाच्या दारांत येऊन, "कोण आहे हा गोसावडा? इदर आव साला!" असले दरडावणीचे शब्द धडकावले. गोसावीबोआंनीं लागलीच पुढें येऊन, "कोण आहे? महाराज! मला कां हांक मारली?" असें विचारलें. त्याबरोबर त्या दोघांपैकीं एक लागलीच म्हणतो, "कुणाचं आहे हें देऊळ? कोण कोण असतो इथें? तूं काय करतोस इथें? तुला राह्यला कोणीं सांगितलं इथें?" गोसावीबोआ अगदीं शांतपणानें म्हणतात, "देऊळ मारुतीचं, मी एकटाच इथें असतों, आसपासच्या गांवांत भिक्षा मागून खातों." "आणखी कोण असतो इथें? खरं बोल गोसावड्या. इथें तो शहाजीचा पोरगा शिवाजी कधीं कधीं येतो का नाहीं?...बोल, ही त्याची नेहमींची जागा आहे का नाहीं? मी जातीचा मराठा आहें. पण बाहेर आलेले सगळे मुसलमान बादशाहाकडून त्याला धरण्यासाठीं आले आहेत चंग बांधून. तूं जर मुकाट्यानं आम्हांला दाद लागूं देशील तर ठीक आहे. नाहीं तर..." परंतु पुढें तो कांहीं बोलणार तोंच आमचा गोसावी त्याला म्हणतो, "हं? हं आपण एकूण त्या धोरणावर इथें आलां? आपण मराठे सरदार आणखी पादशाहाच्या मुलुखांतून आलां, शिवबाला पकडण्यासाठीं चंग बांधून! वाहवा!!! सीताराम प्रभूची काय लीला अगाध आहे!"

हे शेवटले शब्द ऐकून त्या मराठ्या सरदाराला मोठें विलक्षण वाटलें असावें. कारण तो त्या गोसावीबोआंकडे पाहून म्हणतो, "बस्स! बस्स! मला फाजील बोलणं नको. मी आंत येऊन पाहून जाणार." परंतु तो मराठा सरदार व त्याच्याबरोबर आलेला तो दुसरा मुसलमान सरदार पुढें होण्याबरोबर गोसावी अगदीं दारांत उभा राहून म्हणतो, "मराठ्याखेरीज—हिंदुखेरीज जर कोणी आंत शिरेल, तर त्याला माझ्या प्रेतावर पाय देऊन मगच आंत जातां येईल. मी जिवंत आहें तोंपर्यंत तर..." परंतु त्यावर त्या सरदारानें ताबडतोब, "मी मराठा आहें म्हणूनच आंत जातों, हे आतां नाहीं येणार आंत. पण जर कां मला कांहीं शंका आली तर संभाळ, तुमचा..."

इतकें म्हणून तो एकटाच त्या गोसाव्याच्या बरोबर आंत गेला. दारापासून बऱ्याच अंतरावर गेल्यानंतर तो गोसावी धीटपणा करून त्या सरदारास म्हणतो, " सरदारसाहेब, आपण तर पादशहाची कामगिरीच बजावायला आलां आहां. पण... मी थोडंसं बोलूं का ? " " हो. हो. बेषक बोला." " सरदारसाहेब, आपण हिंदु, आपण मराठे, आपल्याला आपल्या कुळाचा, आपल्या ज्ञातीचा, आपल्या देशाचा कांहींच का अभिमान वाटत नाहीं ? " हें गोसावीबोआचें बोलणें त्या मराठ्या सरदारास मुळींसुद्धां खपलें नाहींसें दिसलें. तो एकदम त्याच्याकडे वळून म्हणतो, " गोसावीबोआ, आपल्या या असल्या बोलण्यानं आपल्या खऱ्या गोसावीपणाबद्दल मात्र शंका येऊन आपल्याला त्या लोकांचे साथीदार म्हणून धरून न्यावं असं माझ्या मनांत येऊं लागलं आहे." " आम्हांला धरून नेणार. बेलाशक धरून न्या. सुळीं द्या, वाटेल त्या तऱ्हेनें हाल हाल करून आमचा जीव घ्या. आमच्या पाठीमागें कोणी रडायला नाहीं. आम्हांला बंदीची, शिक्षेची, मरणाची भीति दाखवून उपयोग काय ? मुसंड्यांच्या पदरीं राहिल्याकारणानं गोब्राह्मणांचे प्राण घेण्याबद्दल तुमच्या सुद्धां चित्ताला कांहीं वाटेनासं झालं, पोटासाठीं तुम्ही आपलं मराठेपण विसरलां, आपलं हिंदूंचं ब्रीद विसरलां, एवढंच जगाला दिसणार आहे, दुसरं काय ? "

गोसावीबोआ इतक्या शांतपणानें व मनःपूर्वक बोलत होता कीं, तें ऐकणाराच्या मनावर कांहीं तरी थोडासा परिणाम झाला असावा असें दिसलें; परंतु तो परिणाम बाहेर दिसूं न देण्याच्या हेतूनेंच तो सरदार गोसावीबोआस म्हणतो, " ठीक आहे, ठीक आहे, आपलं पांडित्य नको. मी ज्या कामाला आलों, तें काम मला करूं द्या. इथें खालीं कुठें तरी भुयार असून त्या भुयारांत कांहीं तरी--" परंतु त्या मराठा सरदाराचें बोलणें पुरें होतें न होतें, तोंच तो गोसावी त्यास म्हणतो, " काय ? काय ? इथें कुठें भुयार आहे ? कुठें ? कुठें आहे म्हणून आपल्याला बातमी आहे ? मला तर अशी बातमी कधीं लागली नाहीं. पण आपल्याजवळ जर खात्रीची बातमी असेल तर आपण काढूं शोधून ! आमच्यासारख्या गरीब माणसाला लपून बसायला जागा तरी होईल." तो मराठा सरदार अधिक कांहीं एक न बोलतां त्यानें एकदां दोनदां खालीं पडून जमिनीच्या आंतला कानोसा घेतला व जेथें जेथें म्हणून त्याला शंका

आली, तेथें तेथें त्यानें हातपाय आपटून परीक्षा केली. पण कोठें घुमल्या-प्रमाणें आवाज आला नाहीं. कारण त्या भुयाराची रचनाच मोठी विलक्षण होती. मारुतीच्या मागच्या बाजूस देवळाचा भाग फार थोडा असून तिकड-च्याच बाजूस तें भुयार होतें. शेवटीं किंचित् निराश झाल्याप्रमाणें होऊन तो तडक दाराकडे गेला आणि दरबारी भाषेंत मोठ्यानें त्या मुसलमान सरदारास म्हणतो, "कांहीं म्हटल्या कांहींसुद्धां इथें संशय घेण्याला जागा नाहीं. जितका म्हणून शोध करावयाचा तितका केला, पण आपल्याला बातमी लागली तसं कांहींसुद्धां दिसत नाहीं. तेव्हां आपण इथून..." "मला नाहीं वाटत या गोसाव्यावर विश्वास ठेवावा असं?" तो मुसलमान सरदार कपाळाला आंठ्या घालून म्हणतो, "तो मोठा बिलंदर दिसतो. मी त्याला गिरफदार करून घेऊन जाणार. मला तर शंका येते कीं, या गोसाव्यानं तुम्हांला मथविलं. तुम्ही हिंदु–हिंदु तेव्हांच एक होणार हें मला पक्कं समजलं आहे. किती झालं तरी मराठे लोक निमक..." परंतु त्या मराठे सरदाराची त्या वेळची मुद्रा दृष्टीस पडूनच कीं काय त्या मुसलमान सरदाराचे ते अर्धवट उच्चारलेले शब्द तितकेच जिरले. त्याचें तें बेअदबीचें भाषण ऐकून त्या मराठा सरदारास अत्यंत वाईट वाटलें, परंतु ती वेळ बोलण्याची नव्हती. आतां आपण जितक्या लवकर तेथून पाय काढावा तितका चांगला. कारण आपण जर आणखी कांहीं वेळ येथें बसलों तर या मुसंड्यानें म्हटल्याप्रमाणें खरोखरच या गोसाव्यास तो कैद करील, असें त्याला वाटलें व त्याच्या मनांतून तसें व्हावें असें नव्हतें. यामुळें त्यानें तें टाळण्याचा यत्न चालविला, परंतु तो साधला नाहींच. त्या मुसलमान सरदारानें एकदम त्या गोसाव्यास धरण्याचा हुकूम सोडला.

तो मुसलमान सरदारही कांहीं कमी तर्कज्ञानी नव्हता. त्या मराठ्या सरदाराकडे पाहून त्यानें म्हटलें, "आपण काय वाटेल तें जरी म्हटलें, तरी हा निव्वळ गोसावी असेल असं मला कांहीं वाटत नाहीं. मी याला गिरफदार करून नेणारच नेणार." इतकें म्हणून त्यानें 'या गोसाव्यास पकडून घेऊन चला' असा हुकूम दिला. तो ऐकतांच चार पांच लोक दुरून एकदम धांवले, तोंच तो त्या सर्व मंडळीकडे पाहून म्हणतो, "खबरदार! खबरदार माझ्या अंगाला हात लावाल तर! तुम्ही माझ्या अंगावर धांवून

मला गिरफदार करण्याची मुळींच जरूर नाहीं. मी होऊन तुमच्या स्वाधीन होतों. पण मी केव्हां या जागीं पुन्हां येईन, आणखी केव्हां नाहीं, तेव्हां बलभीमाला चार प्रदक्षिणा घालून येतों.” इतकें बोलून लागलीच त्यानें आपली पाठ फिरविली व एकदां दोनदां तीनदां मारुतीला चांगल्या प्रदक्षिणा घातल्या; व त्या घालून झाल्यानंतर त्यानें धिटाई करून एक दोन बोटें मारुती पुढें सारून त्यामुळें झालेल्या चिरेंत कांहीं टाकलें व पुन्हां मारुती जेथल्या तेथें सारला व परत येऊन म्हणाला, “हं चला आतां कुठें नेणार असाल तिथें. मात्र निघण्यापूर्वी मी पुन्हां एकदां तुम्हांला सांगतों कीं, तुम्ही विनाकारण माझ्यासारख्या गरीब बैराग्याला त्रास देतां आहां.” परंतु तो बाहेर येण्याबरोबर त्याचे भोंवतालीं त्या लोकांनीं गराडा घातला आणि मध्यें त्याला ठेवून तेथून निघण्याचें केलें.

ते दोघे सरदार अगदीं स्तब्धपणें चालले होते. परंतु मागील मंडळी उगीच आपली मागें पडून रेंगाळत आल्यागेल्याची कुचेष्टा करीत चालली होती. होतां होतां मंडळी एका खेड्यांतल्या पाणवठ्यावर आली. तेथें गरीब कुणब्यांच्या बायका पाणी भरण्यांत गुंतल्या होत्या; त्यांतल्या एका गोऱ्या-गोमट्या स्त्रीकडे त्यांची नजर जाण्याबरोबर त्यांनीं तिची चेष्टा करावयास सुरुवात केली. हा चाललेला वात्रटपणा पाहून गोसावीबोआ अतिशय संतापले. ‘या शिखानष्टांनीं आमच्या मराठ्यांच्या बायकांची अशा तऱ्हेनें थट्टामस्करी करावी आणि आम्हीं ती मुकाट्यानें पहावी, यासारखें दुसरं दुर्बलत्व तें कोणतें?’ असा विचार मनांत येऊन त्याचें मन अगदीं क्षुब्ध झालें होतें. इतक्यांत त्या तरुणीनें मानेला कळ लागल्याकारणानेंच काय, आपल्या दोन्हीं हातांनीं पाण्याचा घडा जरा वर करून मान जरा इकडे तिकडे फिरवून पुन्हां घडा ठेवून दिला. तें एकानें पहाण्याबरोबर तो दुसऱ्यास म्हणतो, “आय् हाय हाय! काय खुपसुरती आहे! घड्यामुळं तिला फार ताप झाला आहे.” इतक्यांत दुसरा एकजण म्हणतो, “घड्यानं होणारी तकलीफ दूर करण्याची मी करतों तजवीज! पहा काय होते मौज-ती!” असें म्हणून तो खालीं वांकला, आणि त्यानें हातीं घेतलेला एक कैरीएवढा धोंडा नेमका त्या बिचाऱ्या गरीब सुंदरीच्या घड्यावर मारला, आणि तोंडांतून “इतका वेळ बिजली चमकली, पण आतां पहा पाऊस

कसा पडतो तो ! ” असे शब्द त्या थोंडच्याबरोबर बाहेर पडले. त्याच्या इच्छेप्रमाणें घडा फुटला व सगळें पाणी तिच्या अंगावर सांडून ती अगदीं ओलीचिंब भिजली. परंतु खडा मारणाराची अवस्था फारच कठीण झाली ! गोसावीबोआंना आतां अगदीं राहवेना. त्यांनीं एकदम जाऊन कांहीं एक न बोलतां न सवरतां त्या माणसाच्या कमरेवर खूप जोरानें लाथ मारून त्याला खालीं पाडलें आणि आपण त्याच्या अंगावर बसून त्यांनीं त्याच्या कुशींत तडातड बुक्क्या मारण्यास सुरुवात केली. धुळींत धडपडणारा तो माणूस शेवटीं रक्त ओकला; तेव्हां गोसावीबोआ उठले व पुन्हां त्या मंडळीकडे अगदीं धीरगंभीर अशा दृष्टीनें पहात, जणूं काय कांहीं झालेंच नाहीं अशी चर्या करून स्वस्थ उभे राहिले. इतक्यांत तो पुढें असलेला मुसलमान सरदार घोडा भरधांव टाकीत तेथें आला व त्यानें मारामारीचें प्रकरण विचारलें. तें त्याच्या लोकांनीं जसें पाहिजे तसें सांगितलें. पण एक गोष्ट अर्थातच त्यांस लपवितां आली नाहीं. गोसावी गिरफदार झालेला, त्याच्या भोंवतीं इतक्या माणसांचा गराडा, परंतु तितक्यांत त्यानें छाती करून एका मुसलमानास लोळविलें. तें पाहून व सर्व हकीकत ऐकून तो सरदार स्वस्थ उभा राहिला व त्या गोसाव्याकडे वळून म्हणतो, “ काय गोसावीबोआ, तुम्ही सांगा पाहूं काय खरी हकीकत झाली ती ! म्हणजे मग खऱ्याखोट्याचा निवाडा करूं ? ” गोसावी तिरस्कारयुक्त हंसला आणि म्हणतो, “ माझी चौकशी करणारा तूं कोण ? माझं काय पारिपत्य करायचं तें अगदीं बेलाशक कर. ”

---

८. देवळापासून दीड कोसावर

कुलभीमाच्या देवळांतील भुयारांतून श्रीधरस्वामी ऊर्फ गोसावीबोआ वर आल्यानंतर देवळांत वर जाऊन त्या सरदाराशीं झगडत असतां खालीं भुयारांत त्या चार माणसांच्या बऱ्याच गप्पागोष्टी चालल्या होत्या. आपल्या गोसावीबोआला गिरफदार करून नेण्यापर्यंत मजल येईल असें त्या मंडळींच्या स्वप्नींही नव्हतें. बराच वेळ झाला. श्रीधरस्वामी परत येईनात

असें दिसलें, तेव्हां अर्थातच काळजी उत्पन्न झाली. येसाजी तीन वेळ त्या वरच्या द्वारापर्यंत येऊन कानोसा घेऊन गेला. चवथ्या खेपेस तानाजी आला, आणि त्यानें कानोसा घेतला तों शुक्ष होतें. इकडे तिकडे पाहतांना त्यास एका खंजिराच्या टोंकास एक फूल टोंचून तो खंजीर त्या द्वाराच्या फटींतून आंत सारला होता असें दिसलें. तानाजी ती खूण समजला व त्यानें लागलींच इतरांस वर्दी दिली. या खुणेचा नेहमींचा अर्थ असा होता कीं, आतां सरळ रस्त्यानें न जातां दुसऱ्या मार्गानें जावें. त्याप्रमाणें अर्थात् करण्याचें ठरलें. तानाजीनें आणखी एकदां वर जाऊन श्रीधरस्वामीला धरून नेल्याचें पाहून, खालीं जाऊन सर्व बातमी दिल्यावर पुढचा काय तो बेत ठरून, त्या भुयाराच्या दुसऱ्या मार्गानें ती चारही मंडळी देवळापासून दीड कोसावर त्या भुयाराचें दुसरें द्वार ज्या खवद्डींत निघालें होतें तिच्या तोंडाशीं आली.

तेथें आल्यावर येसाजीनें "जिवा! जिवा!" अशा दोन तीन हांका मारल्या; पण त्या हांकेस कोणीं ओ दिली नाहीं. शेवटीं तो बाहेर येऊन तेथें असलेल्या झोंपडींत गेला व "जिवा! ए जिवा! अरे काय लेका मेला आहेस का जिवंत आहेस? असाच पहारा करतोस वाटतं!" असें म्हटलें. त्याबरोबर जिवा खडबडून उठला व आपल्याला झोंप लागल्याबद्दल त्यानें येसाजीची माफी मागितली. येसाजीनें त्यास चार घोडीं आणण्यास सांगितलें व यम्याची चौकशी केली. "यम्या आतां अर्ध्या घटकेंत येतों म्हणून गेला आवशीसच. पण लेकाचा अजून आला नाहीं" असें म्हणून जिवा चटकन् झोंपडीच्या बाहेर पडला आणि पटकन् कोणीकडच्या कोणीकडे नाहींसा झाला. तो गेल्यावर येसाजी मागें परतून त्या खवद्डीजवळ गेला; व तींतून त्याच्या मागोमाग आलेल्या तीन गृहस्थांस म्हणतो, "आतां इथें फार वेळ राहतां कामा नये. जिव्या आतां पलीकडे जाऊन घोडीं तयार करील. आपण चढायला लागावं तेंच चांगलं. यम्या आला म्हणजे मी पुढच्या तजविजीला लागतों. श्रीधरस्वामींच्या केंसाला जर धक्का लागला, तर दक्षिणेंत लांडा म्हणून ठरूं द्यायचा नाहीं हीच प्रतिज्ञा!"

जिवाजीला सांगितल्याप्रमाणें त्यानें चार घोड्या सांगितल्या जागीं नेऊन उभ्या करून सुमारें दोन घटका झाल्या नाहींत तोंच आमचा तरुण शिपाई, तानाजी व तरुण अल्पवयी पागीदार पुरुष भराभर डोंगरावरून उतरून

आले व तिघेही घोड्यावर स्वार झाले. निघतांना तानाजी जिवाकडे वळून त्याला म्हणाला, " तूं थोडा वेळ इथेंच उभा राहा, चवथी घोडी ठेवून येसाजी आतां येईल. आजची वेळ तुला राजांनीं गय केली आहे. पण जर पुन्हां अशा तऱ्हेनें गाफील राहिलेला सांपडलास तर...... " परंतु पुढले शब्द पुरे होतात न होतात तों त्या तरुण गृहस्थानें आपल्या घोडीस भरधांव काढलें. एका बाजूस तो तरुण शिपाई आणि दुसऱ्या बाजूस तानाजी अशी स्वारी एकदम तेथून चालती झाली.

इकडे येसाजी त्या टेकडीच्या दुसऱ्या बाजूला वर सांगितलेल्या झोंपडीपाशींच यमाजीची वाट पहात होता. शेवटीं यमाजी एकदांचा आला; तो येतांच येसाजी त्यास म्हणाला, " यम्या, आजपर्यंत जी काय नौकरी तूं केलीस, ती तर मी जाणून आहेंच. तुझी हुषारी, तुझी कर्तबगारी राजांच्याही लक्ष्यांत झालीच आहे. आणखी वेळप्रसंग आला कीं तुला चांगलं इनामही मिळेल; पण आज तुला आणखी एक विशेष काम सांगतों. तें काम एवढंच. आमच्या त्या मारुतीच्या देवळांतल्या गोसाव्याला आज एका मराठ्या सरदारानं आणखी मुसलमानानं पकडून नेलं आहे; तर तूं आतांच्या आतां जा, आणखी त्यांच्या पाळतीवर राहून त्यांची काय खबर आहे ती वेळोवेळीं कळव. त्या गोसाव्याच्या जिवाला धक्का होण्याचा संभव असला, तर तुला वाटेल तें तूं कर, पण मला बातमी दे. तीन दिवसांच्या आंत मी त्याला सोडवितोंच. जा तर, ताबडतोब चालता हो कसा; मुळींसुद्धां डळमळूं नकोस. तूं इथून निघून अगदीं नाहींसा झालास म्हणजे मग मी टेंकडी चढूं लागेन. " येसाजीचें हें भाषण ऐकून यमाजी लागलीच आपल्या झोंपडींत गेला व सुमारें दहा पंधरा मिनिटें झालीं नाहींत, तोंच वाळे, घुंगरूं खडखडावीत व हातांतल्या डफावर थाप मारीत आसूड खांद्यावर टाकून मळवट भरलेल्या अशा भयंकर मरीआईचें सोंग घेऊन बाहेर पडला, आणि येसाजीस राम राम करून त्या देवळाच्या बाजूकडे चालता झाला. येसाजी यमाजीकडे हास्यमुख करून क्षणमात्र पहात राहिला, आणि तो दृष्टीआड झाल्यानंतर मग टेकडी चढूं लागला. टेंकडी उतरून आल्यानंतर त्याच्यासाठीं उभे केलेल्या घोड्यावर स्वार होऊन तो पहिल्या तिघांप्रमाणेंच भरधांव घोडा टाकून चालता झाला.

---

९. सांवळ्यानें काय केलें ?

खुभान्याची तिरपीट उडून सांवळ्यानें त्याच्या हातून पडलेला लखोटा पटकन उचलून यःपलाय केल्यानंतर त्यानें एकसारखी चाल ठेवून भर दोन प्रहरीं धारगांव गांठलें. याच गांवांत तो लखोटा खुद्द देशमुखांना नेऊन द्यावयाचा असल्यामुळें त्यानें थेट देशमुखांच्या वाड्याची वाट धरली. पण तेथें जाऊन पाहतों तों काय ? गांवांत जिकडे तिकडे धराधर आणि पळापळ चालली आहे ! देशमुखांच्या वाड्याला हत्यारबंद मुसलमान शिपायांनीं गराडा दिलेला असून सगळ्या वाड्यांतही मुसलमान लोक हत्यारें घेऊन शिरलेले आहेत. वाड्यांतून फार मोठा आरडाओरडा ऐकूं येत होता. पण काय गोंधळ चालला होता आणि काय नाहीं याचा सांवळ्याला कांहींच पत्ता लागेना. त्यानें आसपासच्या कांहीं लोकांना पुष्कळ प्रश्न विचारले, परंतु जो तो आपल्या नादांत गर्क. शेवटीं एकानें मात्र त्रासून त्याला म्हटलें, “ लेका, बादशहाचे लोक वाड्यांत शिरून सगळ्यांना धरून कैद करून नेताहेत, वाडा लुटताहेत, दिसत नाहीं का ? ” गांवच्या मंडळींचें देशमुखांवर अतोनात प्रेम होतें. पण उपयोग काय ? प्रसंग आल्यावर कोण कसा उपयोगी पडणार ! परंतु एकाएकीं असला प्रकार होण्याचें कारण तरी काय तें कोणालाच कांहीं ठाऊक नव्हतें. कारण सर्व प्रकार झाला तो अगदीं अचानक ! सकाळीं दहा अकरा वाजण्याच्या सुमारास एक सुमारें पन्नास स्वारांची— त्यांत पुष्कळ मुसलमानच होते — टोळी एकदम गलगा करीत गांवांत शिरली, आणि तडक वाड्याकडे गेली. ‘ कुठें आहेत देशमुख ! धरा मादरचोदाला ! कुठें आहे त्यांचा जनाना ! फितूर करायला पाहिजे नाहीं ? ’ असलें कांहीं तरी बहकत व आरडत ओरडत त्यांनीं एकच धुमाकूळ चालविला. शेवटीं त्या टोळीच्या मुख्यानें देशमुखांच्या मंडळींस व त्याला स्वतःला गिरफदार करून भर उन्हांत त्यांस चालविलें आणि मागें वाडा लुटून जमीनदोस्त करण्याचा हुकूम दिला. हा असा प्रकार चालला असतां गांवांतल्या एकाही व्यक्तीचें अंतःकरण भडभडून आलें नाहीं असें नाहीं, परंतु काय करणार बिचारे ! जे मराठे वीर त्या गांवांत होते, त्यांचीं अंतःकरणें तळतळलीं;

त्यांचे बाहु स्फुरण पावले; परंतु अद्यापि त्यांना यश येण्याचा काळ आला नव्हता. परमेश्वरानें अवतार घेऊन दुष्टांचें निर्दालन करण्याइतकी मुसलमान सरदारांची--तक्ताधिपतींची अपराधसहस्त्री पुरी झाली नव्हती. त्यांच्या दुर्दैवाचा पेला कांठोकांठ भरण्यास थोडा अवकाश होता. असो.

सांवळ्या तो प्रकार पाहून क्षणभर थांबला. तो एवढासा पोर. त्यांत सकाळपासून खायलाप्यायला कांहीं नाहीं. परंतु या अनान्वित प्रकाराच्या दर्शनापासून त्याची तहानभूक सर्व हरली. त्याला तिची आठवण सुद्धां झाली नाहीं. इतक्यांत त्याला कांहीं स्मरण झालें, आणखी एकदम तो आपल्याशींच म्हणतो, " काय ? इतक्या या धांदलींत सूर्याजीराव दिसला नाहीं कसा ! त्याला नोडग्यांनीं कापून तर नाहींना काढलं ! " सूर्याजीरावाची स्थिति काय आहे काय नाहीं हें प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज आपण इथून आतां जातां कामा नये असें त्याच्या मनास वाटूं लागलें. वाड्यांत मुकाट्यानें जाण्यासाठीं तो पिछाडीच्या बाजूनें आंत शिरला व चौकाचौकांतून सगळीकडे न्याहाळीत टेहळीत चालला. चौकांत कित्येक खोल्यांतून मुडदे पडले होते. अद्यापि सूर्याचा उजेड चांगला होताच. त्यानें प्रत्येक प्रेताकडे पाहिलें. परंतु सूर्याजीचें प्रेत कोठें दिसलें नाहीं. तो पहिल्या चौकांतून दुसऱ्या चौकांत गेला, तों तेथें काय भयंकर प्रकार त्याच्या नजरेस पडला !

सांवळ्याचें पाऊल दुसऱ्या चौकांत पडावयाला आणि वरून एक प्रेत खालीं चौकांत पडावयाला एकच गांठ पडली. तें प्रेत एका कुळंबिणीचें होतें. तो सर्व प्रकार पाहून सांवळ्याच्या अंगावर शहारे आले. त्याला कांहीं सुचेना. इतक्यांत त्याला असा भास झाला कीं, कोणीतरी किंकाळ्या फोडीत आहे. त्या किंकाळ्यांच्या अनुरोधानें तो तीरासारखा एका कोपऱ्यांतल्या जिन्यानें वर चढून गेला व पहातों तों बाजूच्या महालांत एक अत्यंत तरुण व अत्यंत रूपवती स्त्री निश्चेष्ट पडली आहे, व एक नोडगा एक लहानसें जाजम अंथरून तिला उचलून त्या जाजमावर ठेवण्याच्या विचारांत आहे. शेजारीं एका सुंदर पाळण्याच्या पलीकडे एक मूल रडत आहे. तो दांडगा त्या निश्चेष्ट पडलेल्या तरुण स्त्रीकडे एकवार पाहून म्हणतो, " ए खुबसुरत, माझा फार दिवसांचा डोळा तुझ्यावर ! आज साधला. आज

मी आतां तुला घेऊन जाणार. त्या तुझ्या भिकारड्या नवऱ्याला केव्हांच सैतानाकडे रवाना केलं. त्या लुडबुडणाऱ्या तुझ्या कुळंबिणीलाही दिली नरकांत ढकलून, आणखी या कारट्याला ठार मारायची भीति घातली तशी तूं मूर्च्छा येऊन पडलीस. तें एक माझ्या पथ्यावरच पडलं. काय या कारट्यानें आक्रोश चालविला आहे! देतों त्याच्या गळ्यावर पाय आणखी टाकतों दाबून!" असें म्हणून तो दुष्ट खरोखरीच पुढें सरसावला. त्यानें आपली तलवार नुकतीच टाकून दिली होती. आतां एक क्षणाचा अवकाश! तो दुष्ट—तो सैतान—आतां आपला जोडा घातलेला पाय त्या निरुपद्रवी अर्भकाच्या मानेवर देणार! तो देखावाच भयंकर होता. तो पाहून सांवळ्याच्या अंगांत कोणीतरी विलक्षण वीरानें संचार केला. तो इतक्या वेगानें पुढें सरसावला, इतक्या वेगानें त्यानें ती त्या नोडग्याचीच तलवार उचलली व इतक्या वेगानें त्याच तलवारीनें त्या दुष्मनाच्या पाठींत घाव घातला, कीं त्या मुसलमान शिपायास मागें फिरून बघण्यास सुद्धां अवकाश सांपडला नाहीं. तो एकदम धाडकन् मागेंच उताणा पडला. पोर वांचलें. सांवळ्यानें त्या प्रसंगीं मोठ्या माणसालासुद्धां साधावयाचें नाहीं असें अचाट कृत्य केलें. त्याचें प्रसंगावधान मोठें वाखाणण्याजोगें होतें यांत बिलकूल शंका नाहीं. आपला दुष्मन आणि आपण, दोघांत शक्तीच्या मानानें जमीन-अस्मानाचें अंतर आहे व यावेळीं जर आपण कसूर केली तर हा केव्हांच उठून आपलें चंदन उडवील हें त्यानें जाणलें आणि अणुमात्र मागेंपुढें न पाहतां आपल्या त्या चिमुकल्या हातांच्या नैसर्गिक शिताफीनें एक दोन तीन चार घाव जेथें बसतील तेथें त्यानें मारले. त्या दुष्टानें पुष्कळ तडफड धडपड केली परंतु त्याला उठवेना. त्याच्या सर्वांगाला भेगा भेगा पडून त्यांतून रक्ताचा एकसारखा प्रवाह सुरू होऊन त्या दुष्टाच्या सभोंवार रक्ताचा नुसता पूर झाल्याप्रमाणें झालें. तें पाहून सांवळ्याला शेवटीं चक्कर आल्यासारखें झालें, आणि तो एवढासा पोरगा मटकन् खालीं बसला व जागच्या जागींच बेशुद्ध झाला.

सांवळ्यानें तलवारीचा घाव मारलेल्या त्या दुष्टाला असें पक्कें कळून चुकलें होतें कीं, आतां आपण यांतून जगत नाहीं. मोठ्या कष्टानें तो या कुशीचा त्या कुशीवर झाला. त्यानें डोळे उघडले आणि पाहिलें तों त्याची

दृष्टि त्या सुंदर तरुणीकडे गेली आणि एकाएकीं त्याला शक्ति आल्यासारखें झालें. आजपर्यंत आपण ज्या गोष्टीकरितां एवढ्या खटाटोपी केल्या ती गोष्ट साधावी, या तरुणीचा ओष्ठस्पर्श होऊन तरी आपण कृतकृत्य व्हावें, असले विचार त्याच्या मनांत उभे राहिले आणि त्या वेडाच्या भरांत तो दुष्ट चांडाळ खरोखरच उठावयाची धडपड करूं लागला. परंतु तें साधेना. शेवटीं लोळत लोळत जाऊन तो त्या तरुण सुंदरीच्या बराच जवळ गेला आणि आतां आपलें तें दुष्ट तोंड वर करणार, तों ज्याप्रमाणें एखाद्या काळसर्पापासून अत्यंत वेगानें दूर व्हावें त्याप्रमाणें ती एकदम 'मेल्या' म्हणून किंकाळी फोडून दूर झाली. तिच्या त्या ओरडण्यानेंच सांवळ्या जागा झाला, आणि त्यानें डोळे उघडले, तों त्याच्या दृष्टीस ती स्त्री पडली. इतक्यांत सांवळ्या एकदम म्हणतो, "सूर्याजीराव कुठें आहेत?" तो त्याचा प्रश्न कानीं पडतांच त्या स्त्रीची अवस्था काय झाली त्याचें वर्णन करून सांगणें शक्य नाहीं. तिनें एकदम उडी मारली आणि तीराप्रमाणें त्या दिवाणखान्यांतून ती नाहींशी झाली. तिच्या पाठोपाठ सांवळ्याही गेला. त्याला तिच्या मनाची स्थिति काय झाली होती हें ठाऊक नव्हतें. एखाद्या चकित हरिणीप्रमाणें ती या दारांतून त्या दारांत, त्या दारांतून या दारांत अशी भडाभड उड्या मारीत शेवटीं दुसऱ्या एका दिवाणखान्यांत आली व तेथें तळमळत पडलेल्या वीरपुरुषाकडे पाहून सभोंवार शून्य दृष्टीनें पाहूं लागली. त्याच्याकडे नीट न्याहाळून पाहिल्यासारखें केलें, आणि मोठी थोरली किंकाळी फोडून ती एकदम बेशुद्ध पडली. सांवळ्या तिच्या मागोमाग धांवतच त्या जागीं आला. पाहतो तों सूर्याजी अगदीं घायाळ होऊन मृतवत् झालेला आहे. बेशुद्ध पडलेल्या माणसाच्या डोळ्यांस वगैरे पाणी लावलें असतां तो लवकर सावध होतो असें त्याला ठाऊक होतें. लागलीच त्यानें धांवतच जाऊन पाणी आणलें, आणि तें त्याच्या डोळ्यांना लावलें. त्याच्या तोंडांत एक घोट घातला आणि त्याच्या तोंडावर पाण्याचा एक हबका मारला. उपाय तावडतोब उपयोगी पडला. सांवळ्या त्यास मोठ्यानें, "सूर्याजीराव, सूर्याजीराव" करून हांका मारूं लागला. सूर्याजीराव अद्याप पुरा भानावर आला नव्हता. परंतु सांवळ्याच्या हांकांनीं त्याला जागृत केल्याप्रमाणें झालें. "कोण? सांवळ्या? तूं इथें केव्हां

आलास?" असें अत्यंत क्षीणतेनें उच्चारलेले शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडले. "सांवळ्या, बाबा कुठें आहेत रे? आई कुठें आहे? ताई कुठें आहे? ती कुठें आहे?" परंतु या त्याच्या प्रश्नांचें उत्तर काय द्यावें हें सांवळ्याला समजेना. मात्र "या पहा, या पहा, इथें आपल्या तान्ह्याजवळ पडल्या आहेत." असें म्हणून तो एकदम त्या तरुण सुंदरीजवळ गेला. ती मूर्च्छित पडली होती. सांवळ्यानें आपल्या पाण्याचा उपाय पुन्हां केला, तेव्हां ती शुद्धीवर आली; परंतु ती पहिल्यापेक्षांही अधिक वेड्यावल्यासारखी करूं लागली. तेव्हां सूर्याजीनें अर्थातच सांवळ्याकडे पृच्छादर्शक दृष्टीनें पाहिलें, व सांवळ्यानें आपण गांवांत शिरल्यापासून तों सूर्याजीजवळ येऊन उभें राहीपर्यंतची सर्व हकीकत सांगितली.

सूर्याजीनें ती सर्व हकीकत शांतपणें ऐकून घेतली आणि शेवटीं दीर्घ सुस्कारा टाकून तो बराच वेळ स्तब्ध बसला, व म्हणाला "सांवळ्या, तूं आज फार शूरपणाचं काम केलं आहेस. आज तूं माझ्या मोठ्या थोरल्या शत्रूला, गोब्राह्मणांच्या छळकाला, आपल्या मराठ्यांच्या मोठ्या थोरल्या हाडवैऱ्याला चीत केलेंस. तो आहे यःकश्चित्, पण बादशहाचा प्यार आहे. सांवळ्या झाली ती उत्तम गोष्ट झाली, पण त्याचे परिणाम फार भयंकर होणार आहेत. तूं आतां इथें क्षणभरसुद्धां राहूं नकोस. बागेंत जा. घोडं घे. हिला एका घोड्यावर बसव, आणखी एकदम इथून निघून जा. इथून उगवतीच्या बाजूला दोन कोसांवर रान लागतें. त्या रानांत एक फार मोठं वडाचं झाड आहे. त्याच्याखालीं झोपडी आहे. त्या झोंपडींत तुला एक म्हातारा भेटेल. त्याला ही कट्यार आणखी ही तायती दाखव. नंतर त्याला इथली सगळी हकीकत सांग, आणखी म्हण, "सूर्याजीनं आपली बायको आणि मूल आपल्या पदरांत घातलीं आहेत." हे शेवटले शब्द पुन्हां अत्यंत क्षीण अशा आवाजानें येऊं लागले. त्यानें पाणी मागितलें, सांवळ्यानें त्याला दोन घोट पाणी दिलें, आणि तो पुन्हां बोलूं लागला, "आणखी सांवळ्या, जर तुला नानासाहेब कधीं भेटले तर त्यांना माझा शेवटला निरोप सांग कीं, जर तुम्ही खरे मराठे असाल, जर तुमच्या आणखी आमच्या झालेल्या शपथा तुमच्या ध्यानांत असतील, तर माझ्या या मृत्यूबद्दल सूड उगवल्याखेरीज कधीं राहूं नका.'

इतकें बोलून तो बेशुद्ध झाला. सांवळ्यानें पुन्हां पाण्याचा प्रयोग केला. सूर्याजीची बायको अगदीं वेडी झाली होती. सांवळ्यानें उडविलेलें पाणी तिच्या अंगावर उडालें. त्याबरोबर ‘आग लागली, ठिणग्या उडाल्या’ असें म्हणून ती पटकन् तेथून चालती झाली. तितक्यांत सूर्याजीनें डोळे उघडले आणि सांवळ्याला पाहण्याबरोबर म्हणतो, “अरे, अजून तूं गेला नाहींस? जा, जा. अरे माझी काळजी नको. माझी आतां किती काळजी केलीस तरी मी जगत नाहीं. तिला वेड लागलं, तिचं ज्ञान गेलं तें एका अर्थी फार चांगलंच झालं. मला कोणी तरी मूठमाती देईल. तूं जा. तिला घेऊन जा.” सूर्याजीच्या तोंडून पुढें शब्द निघेना; परंतु तो अशा दृष्टीनें सांवळ्याकडे पहात होता कीं, आतां यापुढें आपण तेथें राहिल्यास खरोखरीच त्यांस संतापन्नायु होईल असें पक्कें वाटून सांवळ्या तेथून उठला. तो तडक तेथून निघाला आणि सूर्याजीच्या तरुण पत्नीला शोधण्यासाठीं गेला. इकडे तिकडे तो हिंडला पण कोठें तिचा शोध लागेना. पण इतक्यांत कोणी तरी मंजुळ स्वरानें गातें आहे असें त्यास वाटलें; व त्या आवाजाच्या अनुरोधानें तो गेला, तों वाड्यांतल्या देवघरांत देवाच्या पुढें बसून ती केव्हां हंसत, मध्येंच रडत व पुन्हां हंसत, केव्हां चुटक्या वाजवीत खालीं दिलेलें वेडेंवांकडें गाणें म्हणत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें.

पद

“फुलें कुसकरिलीं ।
कुणिग मेल्यानं पायदळीं तुडविलीं ॥ ध्रु० ॥
बागेंतुनि मीं वेंचियलीं ।
देवाच्या मस्तकीं वाहियलीं !
फुलें कुसकरिलीं !!
कुणिग मेल्यानं पायदळीं तुडविलीं ॥
ताजीं ताजीं आणियलीं ।
नाहीं कोमेजूं मीं दिलीं ॥
फुलें कुसकरिलीं ।
कुणिग मेल्यानं पायदळीं तुडविलीं ॥

माझा सोनचाफा गेला ।
माझा गुलाब कोमेजला ।
जाईजुईच्या मेल्या वेली ॥
फुलें कुसकरिलीं ।
कुणिग मेल्यानं पायदळीं तुडविलीं ॥ ”

हें गाणें ती अगदीं तनमन लावून आपल्याशींच घोळून घोळून म्हणत होती. सांवळ्याला तिच्या या गाण्याचें खरें स्वरूप काय तें समजण्याइतकें त्याचें ज्ञान नव्हतें. तिचा वेडगळपणा आतां पहिल्यापेक्षांही अधिक वाढला होता. सांवळ्या मोठ्या बुचकळ्यांत पडला.

---

१०. अग्नीच्या मुखांतून

मागील प्रकरणांतील ती तरुणी जर शुद्धीवर असती तर तिचें मन वळवून तिला तेथून काढून गुप्तपणें नेणें एक वेळ शक्य होतें; परंतु सध्यांच्या स्थितींत तिच्यावर आलेला भयंकर प्रसंग तिला समजावून देणें व तांतडीनें तेथून तिला निघण्यास सांगणें या गोष्टी किती अशक्य होत्या ! त्यामुळें सूर्याजीनें सांगितलेली कामगिरी कशा रीतीनें बजावावी याविषयीं सांवळ्याला चिंता उत्पन्न झाली. गांवांतला किंवा वाड्यांतला कोणी एक तरी माणूस यावेळीं मदतीस असता तरी फार चांगलें झालें असतें; परंतु कोणी सुद्धां येण्याची आशा दिसेना. शेवटीं सांवळ्या मोठ्या कष्टानें तेथून निघाला आणि पागेकडे गेला. त्यानें तेथें सगळीकडे नीट बारकाईनें पाहिलें. पाहतां पाहतां पलीकडच्या बाजूस लांब गवताच्या गंजी रचून ठेविल्या होत्या, तेथें कोणी तरी एक माणूस डोकावून पहात आहे असा त्यास भास झाला. आतां अगदीं सूर्यास्ताची वेळ होऊन गेल्यामुळें काळोख पडला होता. तथापि तो धीरानें गंजीकडे गेला आणि त्यानें त्या इसमास ओळखून म्हटलें, “ वा हरबा नाईक, अहो, जरा कांहीं तरी विचार करा ! सूर्याजीराव मरून पडले; देशमुखसाहेबांना,

बाईसाहेबांना, ताईसाहेबांना धरून नेलं, आतां वाड्यांत एकट्या बिचाऱ्या वहिनीसाहेब, आणखी त्यांचं तें तान्हं मूल अशी मंडळी राहिली आहेत. अहो, त्यांना अमुक ठिकाणीं पोंचवा म्हणून सूर्याजीरावांनीं शेवटली कामगिरी तुम्हां आम्हांला सांगितली आहे ती तरी बजावूं या. सूर्याजीराव गेले त्याच्याबद्दल तुम्हांला कांहींच कसं वाटत नाहीं ?" हें सर्व सांवळ्या इतकें काकुळतीनें बोलला कीं, त्या शेंदाड शिपाई हरबा नाइकाच्या मनास जरी त्यापासून कांहीं वाटलेंसें दिसलें नाहीं, तरी त्याच्या पाठोपाठ गंजींतूनच बाहेर पडलेल्या आणखी दोघां तिघांस फार कळवळा आला. ते पुढें झाले व त्यांच्यापैकीं एक सांवळ्यास विचारतो, "पण वाड्याभोंवतीं बादशहाचा पहारा नाहीं हें तरी खास? आपण जाऊं म्हटलं तर आपल्याला कुणाला न कळत जातां येईल काय ?" ही अडचण दिसून येतांच कांहीं वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं. नंतर त्या दोघांपैकीं एक दुसऱ्याला गहिंवरल्या आवाजानें म्हणतो, "संक्राजी नाईक, आतां तरी खाल्लुच्या मिठाला जागूं या. मी घोड्यावर खोगीर चढवितों. तुम्ही हलकेंच वाड्याच्या भोंवतालीं जाऊन टेहळणी करून या बरं, पहारा आहे कुठें कुठें तें पाहून ! काय वाटेल तें होवो, आपण आठ आसामी आहोंत, वहिनी-साहेबाला जिथें घालवायला सांगितलंय तिथें नेऊन घालवूं. मग त्या-पायीं गेला एकदोघांचा जीव तर जाऊं द्या !" असें म्हणून तो लागलीच घोड्यांच्या बाजूस वळला आणि दुसरे दोघे व सांवळ्या वाड्यांत जाऊन वहिनीसाहेबांचा शोध करूं लागले. परंतु काय चमत्कार ! वहिनी-साहेब कोठेंही दिसेनात ! इतक्यांत पुढच्या चौकांत अतिशय मोठा गलबला झालेला त्यांच्या कानीं पडला. त्या गलबल्याची भाषा मुसलमानी होती. यावरून ती मंडळी पियारीखानाच्या शोधांत आली होती हें उघडच होतें. ते शिपाई तो खान दुपारीं जेथें विव्हळत होऊन पडला होता तेथें गेले व त्यांची दृष्टि त्याच्या त्या मुडद्यावर जातांच त्या शिपायांच्या नाइकाच्या तळव्याची आग मस्तकास गेली आणि त्यानें एकच गोलमाल आरंभिला. इकडे सांवळ्यानें अंधारांत जिकडे तिकडे चाहूल घेऊन वाडा सोडून मागील वाटेनें अगदीं मुकाट्यानें तो पागेकडे गेला व तेथें घोडे तयार करून उभ्या असलेल्या इसमास त्यानें सगळी हकीकत सांगून म्हटलें

“आपण इथून वडाच्या झाडाकडे जाऊन सूर्याजीरावांच्या इच्छेप्रमाणें नुसत्या या खुणा तरी सांगूं.” त्याला सांवळ्याचें म्हणणें पटलें व ते दोघेही त्या वडाच्या झाडाकडे जाण्यास निघाले. बहिनीसाहेब न सांपडतां आपण चाललों आहों याबद्दल सांवळ्याला फार वाईट वाटलें; परंतु त्याला त्याचा इलाज नव्हता.

खानाचा मुडदा पाहतांक्षणींच त्या टोळीच्या मुख्याच्या डोक्यांत एक विचार येऊन त्यानें खानाचें प्रेत वाड्याच्या बाहेर काढण्याबरोबर वाड्यास चहूंकडून आग लावून द्यावयाची असा बेत केला. त्याच्या मनांतील हेतु हा कीं खानास मारणाऱ्या इसमांना आपण जाळून टाकिलें असें सांगतां यावें. त्याप्रमाणें त्यानें खानाचें प्रेत बाहेर काढिलें आणि गांवाच्या लोकांसमक्ष त्या देशमुखांच्या वाड्याला चहूंकडून आग लावून देऊन ती मंडळी तेथून “अलबिदा, ए अलबिदा,” करीत चालती झाली.

इकडे सांवळ्या व त्याचा सोबती थोड्याच वेळांत सूर्याजीरावानें सांगितलेल्या वडाच्या झाडाखालीं जाऊन तेथें असणाऱ्या वृद्ध गृहस्थास भेटले व त्यांनीं सूर्याजीच्या खुणा त्यास दाखविल्या. त्याबरोबर त्यानें त्यांस झोंपडींत बोलावून सर्व हकीकत विचारली, आणि हकीकत संपतांच त्यानें मोठ्यानें शीळ घातली, त्याबरोबर दूर अंतरावरून एक काळाकभिन्न धिप्पाड पुरुष त्यांच्याजवळ येऊन उभा राहिला. म्हाताऱ्यानें त्याच्या कानांत कांहीं सांगितलें. त्याबरोबर तो पुरुष बाहेर जाऊन एकदम सांवळ्या व त्याचा सोबती यांनीं आणिलेल्या घोड्यांपैकीं एका घोड्यावर स्वार होऊन घोड्याची छाती फुटेल इतक्या वेगानें तेथून चालता झाला.

इकडे वाड्याला चारी बाजूंनीं आग लागलेली असल्यामुळें वाड्याच्या कोणत्याही बाजूनें आंत जाण्यास आतां मार्ग राहिला नव्हता. सर्व दिशांनीं दारें, खिडक्या, झरोके वगैरेमधून धुराचे व आगीचे लोळचे लोळ बाहेर येत होते. परंतु इतक्यांत ज्वालांच्या त्या रों रों शब्दांच्या आंतून एका स्त्रीच्या किंकाळ्या स्पष्टपणें ऐकूं येऊं लागल्या; आंत जाऊन कोण असेल तिला सोडवावें असेही उद्गार तेथें जमलेल्या अनेक गांवकऱ्यांच्या तोंडून निघाले, परंतु पुढें होण्यास काय तो एकच तयार झाला. ते वेळीं

त्याला दुसऱ्या कितीकांनीं तरी मागें ओढलें, परंतु सटवाजीनें त्याच्या बोलण्याकडे मुळींही लक्ष न देतां आंत शिरण्याचा निश्चय करून तो आतां आंत पाऊल घालणार, इतक्यांत अतिशय जोरानें, अगदीं उरीं फुटेल अशा बेतानें, येणाऱ्या घोड्यांच्या टापा मंडळींच्या अगदीं मागेंच येऊं लागल्या. घोडा एकदम थांबला आणि त्यावर स्वार होऊन आलेला माणूस एकदम खालीं उडी टाकून, सटवाजीची आंत जाण्याची तयारी पाहून एकदम त्यास म्हणतो, " शाबास ! शाबास ! तूं न् मी बरोबरच आंत जाऊं, हे सगळे लोक भ्याड, हरामखोर ! स्वतः गुलामांना छाती नाहीं तर नाहीं; आणखी दुसऱ्याला मागं ओढतां कां ? थू: तुमच्या जिनगानीवर. " इतकें बोलून लागलीच त्यानें जेथून त्या अत्यंत केविलवाण्या किंकाळ्या ऐकूं येत होत्या, त्या खिडकीकडे पाहिलें आणि एकदम " जय शंभु महादेव ", " जय तुळजापुरची आई भवानी उदे ! तुझा उदे ! " असे प्रत्येक मराठ्याच्या अंगांत स्फुरण आणणारे शब्द उच्चारून मागेंपुढें न पाहतां एकदम दोघेहि जवळच्या एका दारांतून आंत शिरले. इतक्यांत एक तुळवट कडाडून पडलें. परंतु निश्चय—कधीं न ढळणारा, प्राणावर उदार झालेला निश्चय—कोणत्याही गोष्टीच्या मागें लागला म्हणजे फत्ते केल्याखेरीज अगर प्राण दिल्याखेरीज राहतो काय? ते हरतऱ्हा करून ज्या खिडकींतून त्या किंकाळ्या ऐकूं येत होत्या त्या खिडकीशीं गेले व त्या काळ्या पुरुषानें एका क्षणाचाही विलंब न करतां त्या स्त्रीला उचलून आपल्या रुंद अशा खांद्यावर घेतलें; दुसऱ्या हातानें तिच्याजवळ पडलेल्या मुलास उचललें आणि तो आपल्या साथीदारास म्हणाला, " सटवाजीराव, तुम्ही पुढें होऊन बाहेर निघण्याला रस्ता काढा; अगदीं दाराच्या बाहेर पडण्याच्या वेळीं हिला आणखी मुलाला तुम्ही घ्या. आणखी त्यांना दूर कुठें तरी नेऊन शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करा, तों मी पुन्हां परतून माझें आणखी एक काम राहिलं आहे. तें करून येतों." दैवयोगानें त्याच्या त्या अचाट साहसाला यशही आलें. ती स्त्री व तें मूल यांना त्यानें अग्नीच्या मुखांतून अग्नीनें अस्पृष्ट असें बाहेर आणून सटवाजीच्या स्वाधीन केलें, आणि तो तडक त्याच पावलीं माघारीं वळला. आपण वांचविलेली स्त्री व मूल खरोखर कोणत्या अवस्थेंत आहेत याबद्दल विचारसुद्धां त्यास आला नाहीं.

११. गड पुरंदर

प्रातःकालची वेळ. सूर्य नुकताच वर येत होता. त्याचे बालकिरण आपल्या तांबूस रंगानें गडास रंगवीत होते. अशा वेळीं पुरंदर गडावर एका खोलींत गोसावीबोआ आपल्याशींच तडफड तडफड करीत इकडे तिकडे हिंडत होते. गोसावीबोआस मारुतीच्या देवळांतून धरून आणल्याचा हा दुसरा दिवस होय. त्या मुसलमान सरदाराला आलेली शंका अद्यापि त्याच्या मनांत डांचतच होती. अर्थात् कांहीं युक्ति करून या गोसाव्यास पुरा आपल्या तावडींत धरून—वेळ पडल्यास त्याचा छळही करून—त्यापासून आपल्याला पाहिजे ती माहिती काढावी हा त्याचा मुख्य हेतु होता. देवळापासून गड पुरंदर फार नजिक, व जें काम या वेळीं त्या सरदारास साधावयाचें होतें त्या कामास तो गड फार उपयोगाचाही होता, व त्याच्याकडे या प्रांताची त्या वेळीं सुभेदारी होती.

गडाच्या एका अंधारकोठडींत गोसावीबोआ इकडून तिकडे, तिकडून इकडे, हिंडत होते. त्यांची सोबतीण—त्यांची जिवाची मैत्रीण—काय ती त्यांची कुबडी मात्र त्यांच्याजवळ होती. गोसावीबोआ अशा अस्वस्थ मनःस्थितींत असतांना त्यांस एकाएकीं कोठें तरी गडाचे खालचे बाजूस मोठ्यानें डफ वाजत आहे आणि तो आवाज आपल्या ओळखीचाच आहे असें वाटूं लागलें; व त्यामुळें त्यांचे चेहऱ्यावर किंचित् उल्हासही दिसूं लागला. थोड्याच वेळांत एक पहारेकरी आंत आला. त्यास पाहतांच गोसावीबोआ त्यास म्हणतात, "काय नाईक, गडावर सकाळच्या प्रहरीं डफ कुणीकडे वाजतोय ?" "डफ ?" तो पहारेकरी किंचित् विचार करून म्हणतो, "गडावर तर कुठें वाजलेला दिसत नाहीं. खालीं वाडींत मात्र मरीआई आली आहे. हा वाडींत आलेला मरीआईचा भक्त तर आठ-पंधरा दिवसांनीं येतो गडावर भिक्षा मागायला." गोसावीबोआंस जें पाहिजे होतें तें आणखीही मिळालें असें त्यांच्या चर्येवरून दिसलें. गोसावीबोआंचें व पहारेकऱ्याचें आणखीहि कांहीं वेळ बोलणें चाललें असतां गोसावीबोआ एकदम गप्प झाले. नाईक एकदम दाराशीं गेला व खुद्द गडकरी आंत आले.

गडकरी वयानें अगदीं वृद्ध होताच. परंतु त्याच्या गालाला पडलेल्या

सुरकुत्या आणि खळ्या केवळ वयाच्याच नव्हत्या. चिंतेनेंहि आपला पराक्रम त्याच्या चर्येवर बराच गाजविलेला दिसला. गडकरी आंत येतांच पहारेकऱ्यानें एक लोड व एक गादी आणून दाराजवळ टाकली, व आपण जवळच उभा राहिला. त्यास दूर जाण्यास सांगून अगदीं सौम्यपणानें गडकरी आमच्या गोसावीबोआंस म्हणतात, "गोसावीबोआ, तुम्ही यांच्या तावडींत कुठून सांपडलांत !" "मी ? मीचसा काय ? महाराज, आपला सगळा धर्म, आपला सगळा देश, सगळे गोब्राह्मण यांच्या तावडींत सांपडले आहेत, मग माझी गरिबाची काय कथा ? आलं कांहीं मनांत, सांपडलों देवळांत, आणला धरून, टाकला कोंडून !"

गोसावीबोआचें हें बोलणें चाललें असतां गडकऱ्याची सगळी नजर त्याच्या चेहऱ्याकडे होती. ते लागलीच त्याला म्हणतात, "गोसावीबोआ, तुम्ही गोसावी कधीं झालां ? तुमचं वय काय, कुठें कुठें हिंडलां ! तुमची स्थिति काय ? खरोखरी सांगाल काय ?" हे प्रश्न ऐकतांच गोसावीबोआ आपल्या मनाशींच म्हणतात, "मला जें भय पडलं होतं तें खरं तर नाहींना होत ? काय ? यांनीं मला ओळखलं तर नसेल ?" परंतु आपल्या स्वस्थ बसण्यानें गडकऱ्याच्या मनांत उगीच नसत्या शंका येण्याचा संभव आहे, असें मनांत येऊन त्यांनीं हलकेंच मान वर करून म्हटलें, "महाराज, कोण कशामुळें वैतागतो आणि गोसावी बनतो याचा काय नेम आहे ? माझे आईबाप लहानपणींच वारले. घरांत अठराविश्वें दारिद्र्य, पालनपोषण करण्याला कोणी नाहीं. तेव्हां सहजच एका गोसाव्यानें मला आपला म्हटलें आणि मी तेव्हांपासून हा अशा स्थितींत आहें." हें भाषण तो गोसावी करीत असतांना गडकऱ्याची दृष्टि एकसारखी त्याच्या चेहऱ्याकडे लागून राहिलेली होती. इतक्यांत त्याच्या त्या कोठडीपासून सुमारें पंधरावीस हातांवर मघांपासून गोसावीबोआंच्या कानीं पडत असलेला तो डफाचा आवाज निघूं लागला, व नाचत नाचत मरीआईचा फेरा त्या बाजूस आला. मरीआईची ती भयंकर दृष्टि त्या गोसावीबोआंकडे गेली. तिची मान एक वेळ कांहीं चमत्कारिक अर्थानें हालली व मग हळूच तिनें आपलें एकेक पाऊल मागें घेण्यास सुरुवात करून ती तेथून चालती झाली. बराच वेळ झाला, तरी गडकरी तेथून हालेना व गोसावीबोआंशीं

कांहीं बोलेनाहीं. सरतेशेवटीं गोसावीबोआ गडकऱ्यास नम्रपणानें म्हणतात, "महाराज, आपण जर माझ्यापासून कोणत्याही गोष्टीची माहिती मिळविण्यासाठीं बसलां असाल तर......" "आपला प्रयत्न व्यर्थ आहे! असेंच कीं नाहीं आपलं म्हणणं?" गडकऱ्यानें तावडतोव विचारलें. "एकूण ज्या बातमीसाठीं ही स्वारी इथें आली आहे, ती बातमी तुम्हांला कांहींच ठाऊक नाहीं म्हणावयाची? उगीच पकडून आणलं अं! बरं आहे. आणखी तुम्ही आपली स्वतःचीही माहिती कांहीं जास्ती सांगत नाहीं आम्हांला? पण इकडे पहा." इतकें बोलून गडकरी गोसावीबोआंच्या अगदीं जवळ गेले, व अतिशय हळू आवाजानें त्यांच्या कानांत कांहीं कुजबुजले. त्यावरोबर गोसावीबोआंची चर्या एकदम पालटली. ते तोंडानें, "नाहीं, नाहीं. आपण चुकतां आहां. मी तो नाहीं." असें पुटपुटले. पण त्यांचा स्वतःचाच त्या शब्दांवर विश्वास नाहीं असें स्पष्ट दिसत होतें. थोड्याच वेळांत नाईकास पहारा फार काळजीपूर्वक करण्याविषयीं अगदीं निक्षून बजावून गडकरी तेथून चालता झाला.

संध्याकाळपर्यंत आणखी कांहींही विशेष घडलें नाहीं. एक प्रहर रात्र झाली. सुभेदारसाहेब निशा घेऊन प्रमत्त होऊन नेचा ओढीत बसले असतां एकदम त्यांनीं त्या गोसावड्यास आपल्यासमोर बोलावून आणण्याचा हुकूम केला, व "हा निमकहराम कबूल होत नाहीं तर याच्या हातापायांत मणामणाच्या बिड्या ठोकून अंधारकोठडींत टाकून ठेवा." असा हुकूम केला. तावडतोब सुभेदारसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें खूप जड अशा बिड्या आणल्या व त्या गोसावीबोआंच्या हातापायांत ठोकल्या जाऊन त्यांस अंधारकोठडींत नेऊन टाकण्यांत आलें. अशा तऱ्हेनें गोसावीबोआंची स्थिति सकाळच्यापेक्षांही अतिशय वाईट झाली.

दुसरे दिवशीं सकाळीं आदले दिवसाप्रमाणेंच गडावर मरीआईचा डफ सपाटून वाजला. परंतु तो गोसावीबोआंच्या कानीं पडून त्यांस मरीआईकडे पाहण्यास सांपडलें नाहीं, व मरीआईलाही त्यांचें दर्शन मिळालें नाहीं. शेवटीं जितकी माहिती मिळणें शक्य होतें तितकी माहिती मिळवून उदास होत्साती मरीआई किल्ल्यावरून चालती झाली.

१२. कड्यावर नेलें

किर्र झाडी आणि त्यांत अंधार. पुण्याहून विजापूरला जाणाऱ्या रस्त्यावरच पुण्यापासून सुमारें तीसबत्तीस कोसांवर एक भयंकर अरण्य होतें. या अरण्यांत झाडें इतक्या गर्दीनें लागून गेलेलीं होतीं कीं त्यांतून वाट काढणें म्हणजे केवळ अशक्यच होय. या अरण्यांत कित्येक वेळां बादशाही सैन्यावर दबा धरून बसलेल्या मराठे लोकांनीं अचानक घाला घालून त्याच्या अगदीं राईएवढ्या ठिकऱ्या उडवून दिल्या होत्या. या अरण्याच्या मध्यभागीं सुमारें पाव मैल क्षेत्रफळाची जागा थोडीबहुत साफसूफ केलेली होती. या प्रसंगीं या जागेंत कोणी चोर लुटारू नसून आपलीं जुनीं ओळखींचींच चार माणसें बसलेलीं होतीं. या वेळीं त्यांच्या चर्या फार निराळ्या दिसल्या. कोणीही कोणाशीं बोलत नव्हतें. परंतु प्रत्येकाच्या मनांत कांहींना कांहीं तरी बोलावयाचें आहे असें स्पष्ट दिसत होतें. त्यांच्यापैकीं एका तेजस्वी तरुण पुरुषानें आपल्या सोबत्यांकडे पाहून म्हटलें, " स्वामी-सारख्या पुण्यपुरुषांची आमच्यासाठीं अशी दुर्दशा व्हावी, यापरती आणखी लाजिरवाणी गोष्ट कोणती ? कांहींना कांहीं तरी अचाट कृत्य केल्याखेरीज आतां त्यांची सुटण्याची आशा नाहीं. जें काय करायचं आणखी काय नाहीं, तें माझ्या मनांत अगदीं ठरून राहिलं आहे." तो तरुण पुरुष पुढें कांहीं बोलणार तोंच दूर कोठें तरी कोणा माणसाची चाहूल लागली असा त्यास भास झाला. ती चाहूल जवळ येतांच आमचा तरुण शिपाईगडी आपली तलवार सांवरून पुढें सरसावला आणि दुरून झाडाच्या आडून कोणी माणूस पळतो आहे, असें पाहून त्याच्या अंगावर धांवला. परंतु त्यानें " मी यमाजी —मी आपला—" असें म्हणून पुढें येऊन त्या तेजस्वी तरुण पुरुषास लोटांगण घालून म्हटलें, " महाराज सरकार, आज रात्रीं गोसावीबोआंस बिड्यांसकट कड्यावरून खालीं लोटून देण्याचा हुकूम सुटला आहे. आपण त्वरा कराल तर..." हे शब्द ऐकतांच त्या तेजस्वी तरुण शिपायानें ताडकन् उडी मारली, घोडा सोडला व म्हटलें, " चला, काय करायचं तें, मी रस्त्यांत तुम्हांला सांगतों, अरे लां......" परंतु पुढचे शब्द घोड्यावर स्वार होण्यांत

त्याच्या तोंडांतून नीटसे बाहेर पडलेच नाहींत. चौघेही वाऱ्याप्रमाणें घोडे फेकीत चालते झाले.

वरील गोष्ट घडली त्याच दिवशीं संध्याकाळीं एक म्हातारा कातकरी व कातकरीण डोक्यावर मोठमोठाले दोन गवताचे भारे घेऊन पुरंदर किल्ल्याच्या वाडींत आलीं; आणि कोणी तरी आपले भारे घ्यावे म्हणून ज्याच्या त्याच्याजवळ तोंड वेंगाडीत चाललीं होतीं. शेवटीं त्या वाडींत कोणी गवत घेत नाहीं, आणि सूर्यास्त तर झाला, क्षणोक्षणीं अंधार दाट होत चालला, असें पाहतांच ती म्हातारी त्या म्हाताऱ्याला म्हणते, "आतां चला जाऊं गडावर. तिथें पागेला मस्त चारा लागतो. तिथें जाऊन इकूं." ते शब्द तिच्या तोंडून निघतात न निघतात तोंच तो म्हातारीच्या अंगावर जाऊन म्हणतो, "जा जा, रांडनं चार गांवं धिंड काढली माझी आणि आतां म्हणती चला जाऊं गडावर..." मग काय विचारतां! त्या दोघांत एकच भांडण जुंपून राहिलें. शेवटीं तिथें मंडळी जमली. म्हातारी आपला भारा उतरीना. ती म्हणे गडावर जाऊं. म्हातारा आपला भारा उचलीना. तो म्हणे इथेंच आपण पाटीलबोआंच्या भाकरीवारी देऊन टाकूं. शेवटीं तोही ऐकेना, आणखी तीही ऐकेना. तेव्हां ती मी एकटीच जातें म्हणून निघाली. म्हातारा जेथल्या तिथेंच बसला. गडाच्या पायथ्याशीं जाऊन ती आतां गड चढूं लागणार, तोंच तिथल्या रखवालदार माणसांनीं तिला दटावलें; पण ती बाई कसली विलक्षण बस्ताद! ती आपल्या त्या अमंगळ भाषेंत जी शिव्या देऊं लागली, ती कांहीं न भूतो, न भविष्यति! स्त्रीच्या अंगाला हात कोण लावणार? शेवटीं 'जाऊं द्या कीं, वरून येईल जोडे खात' असें म्हणून त्यांनीं तिला जाऊं दिलें. याप्रमाणें दर पहाऱ्याच्या जागेशीं तिचा क्रम चालला होता. इकडे तो म्हातारा कातकरीही पाटीलबोआंच्या घरापाशींच भारा टाकून बसला होता. तो अगदीं काकुळतवाणी होऊन, 'आतां माझा भारा घेऊन रातोरात मला निजायला जागा आणि थोडी भाकर अन् कोरड्यास द्या' असें म्हणून गयावया करूं लागला, व पाटीलबोआंच्या गोठ्याजवळ भारा टाकून पागेच्या न् गोठ्याच्या दरम्यान गवतपेंडीची जागा होती तिथें त्यानें आपली पथारीच

टाकली. इकडे म्हतारी वर सांगितल्याप्रमाणें लोटत लोटत अगदीं वरच्या थोरल्या दरवाज्याच्या पहाऱ्यापर्यंत गेली व तेथेंहि हरतऱ्हा करून तेथून ती वर तडक पागेकडे गेली. तेथें असणाऱ्या खाजदारांना भारा घेऊन आपल्याला भाकर देण्याविषयीं ती आग्रहपूर्वक सांगूं लागली. आणि आपल्या नवऱ्यापेक्षांही शंभरपट लोचटपणा करून तिनें रातोरात तेथें राहण्याचा तर घाट घातलाच.

होतां होतां चांगली रात्र झाली. याच रात्रीं मध्यरात्रीच्या सुमारास श्रीधरस्वामींस कड्याखालीं लोटून देऊन जगांतून नाहींसें करण्याचा ठराव झाला होता. मध्यरात्रीची वेळ जवळ जवळ येत चालली, तोंच गडकरी व त्यांच्याबरोबर आणखी एक दोन मंडळी गोसावीबोआंच्या कोठडीकडे आली. गडकऱ्याचा चेहरा अतिशय म्लान झाला होता. त्यांनीं आपल्या बरोबरीच्या माणसास म्हटलें, "कुशाबा, जें काय आतां बोलावयाचं असेल, सांगावयाचं असेल, तें तूंच सांग. माझ्या..." परंतु पुढें त्यांच्यानें एक अक्षरसुद्धां बोलवेना. ही मंडळी आंत येण्याबरोबर गोसावीबोआंनीं आपल्या स्तब्ध दृष्टीनें फक्त त्यांच्याकडे पाहिलें. कुशाबा मात्र लागलीच पुढें होऊन म्हणतो, "काय गोसावीबोआ, आतां प्राण जाण्याची वेळ आली, आतां तरी कांहीं बोलतां का? नाहीं तर हकनाक मराल, दुसरं कांहीं नाहीं." गोसावीबोआंचें एक नाहीं, दोन नाहीं. शेवटीं अगदीं जाण्याच्या वेळीं गडकऱ्यांच्यानें अगदीं राहवेना. गोसावीबोआंकडे वळून म्हणतात, "मग काय? नाहींच ना कांहीं प्राणांची पर्वा? खानांनीं हुकूम सोडला आहे, त्यांत मुळींसुद्धां कांहीं दया त्यांच्याकडून होणार नाहीं म्हणून म्हणतों, बोला बोला......पाहिजे तर एक दोन दिवसांची मुदत मागून घेतों. मी त्यांना सांगतों, कीं तो उद्यां सगळं सांगणार आहे......" गोसावीबोआ तावडतोब त्यांच्याकडे तोंड करून ओरडून म्हणाले, "नको, नको. जें आज तेंच उद्यां. जर सांगण्याजोगं माझ्यापाशीं कांहीं नाहीं, तर सांगूं काय? येऊन जाऊन मरणाची भीति ना? आजपर्यंत काय माझ्यासारखे थोडे मेले!" इतकें बोलून त्यांनीं पुन्हां आपले ओंठ अगदीं शिवून टाकल्याप्रमाणेंच घट्ट मिटून घेतले. शेवटीं कुशाबा व गडकरी दोघेही परत गेले.

थोड्याच वेळांत खानसाहेब पांचचार माणसांनिशीं पुन्हां गडकऱ्यास व त्याच्याबरोबरच्या त्या दोघांस घेऊन आले. खानसाहेब येण्याबरोबर गोसावीबोआंस कोठडींतून बाहेर आणलें. खानसाहेबांनीं अद्वातद्वा शिव्यांचा भडिमार चालविला. परंतु त्यांच्या तोंडून एकसुद्धां अक्षर निघालें नाहीं. शेवटीं त्यांनीं त्यास कड्याच्या टोंकावर नेण्याचा हुकूम केला. दोघांतिघांनीं त्याला धरलें आणि कड्यावर नेलें. परंतु गोसावीबोआंच्या चेहऱ्यावर अणुभरसुद्धां फरक झाला नाहीं. तोंडानें फक्त, ‘ जय रघुवीर ’, ‘ जय गुरुवर्य ’ असा घोष चालला होता.

---

१३. सुटका

कड्यापासून दोन हातांच्या अंतरावर गोसावीबोआंस उभे केल्यानंतर खानसाहेब पुन्हां एकदां त्याच्याजवळ आले व त्यांनीं त्यास “ सांग, सांग, नाहींतर आज कांहीं तूं येथून जिवंत सुटत नाहींस, ” असें म्हटलें. गोसावीबोआंनीं एक अक्षरसुद्धां उच्चारलें नाहीं. गडकरी खानाच्या जवळच होता. सरतेशेवटीं त्याच्यानें अगदीं राहवेना. तो एकदम सर्जेखानास कुर्निसात करून म्हणाला, “ हजरत, या गोसाव्यास आपण विनाकारण शिक्षा करीत आहांत. आम्हीं सगळ्यांनीं मिळून सर्व कांहीं वास्तपुस्त केली; पण गोसाव्याच्या तोंडीं एकही जवाब न आला, म्हणोन अर्ज हाच कीं, गोसाव्याची हत्त्या आजवरी झालेली नाहीं, तशी आजही न व्हावी. गोसावी खरा गोसावी दिसतो. याउपर साहेबांची मर्जी...... ” गडकऱ्याच्या तोंडून अधिक शब्द निघेनात.

सर्जेखानानें तें ऐकून किंचित् तिरस्कार दाखविला व तो लागलीच त्यास म्हणाला, “ तुम्ही सारे एकच. पण मी अशा तुमच्या भुलथापांवर भुलणारा नाहीं. माझी खात्री आहे कीं, या गोसावड्याला चांगली माहिती आहे. इतकेंच नाहीं, पण याला त्या देवळांत ठेवला आहे, तो रखवालदारीसाठींच. हा खरोखर गोसावी असता तर याच्या कुबडींत गुप्ती कशाला आली असती ? तुम्ही सगळे याला सोडून द्यायला तयार झालां आहां.

निमकहरामी तर तुमच्या अगदीं नखशिखांत भरली आहे. " हें मर्मभेदक बोलणें ऐकतांच गडकऱ्याच्या पायांच्या तळव्यांची आग मस्तकाला जाऊन भिनली. त्या म्हाताऱ्याचा संताप मावेना. त्यानें कुशाबाच्या हातची तलवार हिसकावून घेऊन उपसली, आणि एकदम तो त्या सर्जेखानाच्या अंगावर धांवला. एक क्षणाचा जर विलंब लागला असता तर, त्या म्हाताऱ्याच्या हातून सर्जेखान मेलाच असता. पण शिवदेवराव सरदार पुढें होऊन त्यानें त्या म्हाताऱ्यास मागें ओढलें. शेवटीं तो गडकरी गोसाव्याकडे वळून म्हणाला, "बाबारे ! आतां तूं कांहीं जगत नाहींस. आज किती वर्षांनीं तूं दिसलास. वाटलं होतं कीं सुटशील...पण नाहीं, कांहीं हरकत नाहीं. खुशाल मर ! सत्यासाठीं असा मेलास, तरी तूं जिवंत, आणि आम्ही या बेइमान लोकांची नोकरी मरेपर्यंत हलालानं करून शेवटीं 'निमकहराम' हें पद मिळवितों, आणखी मुकाट्यानें सहन करतों, ते खरोखरी जिवंत असून मेलेलेच ! एका आई...... " पुढें त्याच्या तोंडांतून काय शब्द निघाले ते पुरते ऐकूं आले नाहींत. शिवदेवराव सरदारसाहेबांनीं व कुशाबांनीं त्याला तेथून काढून नेलेंच.

इकडे सर्जेखानाचाही संताप दुणावलाच होता. त्यामुळें गोसावीबोआंस प्रथम ठरविल्याप्रमाणेंच देहान्त शिक्षा देण्याचा निश्चय त्यानें कायम केला, व आपल्या मुसलमान शिपायांस चांगले जाड साखळदंड आणून गोसावीबोआंचे हातपाय जखडण्यास हुकूम केला. सर्व तयारी झाल्यानंतर सर्जेखानानें पुन्हां एकदां त्याला प्रश्न केला कीं, "जर तुला कांहीं माहिती असेल तर ती सांग. नाहीं तर तुला आतां सैतानाकडे पाठवीन तर पाठवीनच; पण मला फार संशय आलेला आहे. तेव्हां मी तुझं तें देऊळ समूळ खणून टाकीन, कधीं सोडणार नाहीं." तथापि गोसावीबोआंच्या तोंडून एकही शब्द आला नाहीं. आपल्या दपटशाचा किंवा विनवणीचा कांहीं एक उपयोग होत नाहीं हें पक्कें जाणून त्यानें शेवटीं क्रूरपणानें "जाना देव, सालेकु फेंक देव !" असा हुकूम सोडला.

परंतु इतक्यांत एकदम मागल्या बाजूस एकच कल्होळ व बोंबाबोंब झाल्याचें कानीं आलें. हें काय म्हणून मागें वळून पाहतात तों पागेच्या जवळ असलेल्या गवताच्या गंजीस व पागेच्या सभोंवतालीं

सर्व छपराला झपाट्याची आग लागलेली दिसली. इतकेंच नव्हे तर खालीं वाडींतही तशीच पाटलाच्या घरादाराला, त्याच्या गवतकाडीला व आसपासच्या दहापांच खोपटांना जंगी आग लागलेली दिसली. अर्थातच जिकडे तिकडे एकच हाहाःकार झाला. कोणाची कोणाला दाद नाहीं. त्या काळीं हल्लींप्रमाणें शिपाईशिस्त कडक नव्हती. त्यामुळें कोणत्याही पहाऱ्यावर कोणी शिपाई वगैरे न राहतां एकदम धूमधडाका लोक कांहीं खालीं वाडींत व कांहीं वर किल्ल्यावर आगीची मौज पाहण्यास निघून गेले. सर्व दरवाजे तसेच मोकळे राहिले. आगीचा गोलमाला होतो व खानाचें व त्याच्या माणसांचें लक्ष त्या बाजूस जातें, तोंच कड्याच्या खालच्या बाजूनें अगदीं नजीक अशा चुडी पेटलेल्या एकदम दिसूं लागल्या, आणि सुमारें पंचवीस मंडळी एकदम भराभरा वर चढून येतांना दिसली. खानाचें लक्ष तिकडे जाऊन तो "तोबा ! तोबा ! ए क्या ? ए क्या ?" असें जों म्हणतो, तोंच ती मंडळी एकदम वर येऊन चार-जणांनीं त्याच्या भोंवतीं गराडा घातला आणि पांचचारजणांनीं गोसावी-बोआंचे साखळदंड सोडण्यास व बिड्या तोडण्यास आरंभ केला. सर्व मंडळींचें चित्त आगीकडे वेधल्याकारणानें आपल्या कार्यांत व्यत्यय येणार नाहीं ही त्यांची खात्रीच होती. त्यांनीं सावकाशपणें गोसावीबोआंस अणुमात्र इजा न होतां त्यांच्या हातापायांतील बिड्या तोडून गोसावीबोआंची सुटका केली.

गोसावीबोआ मोकळे होऊन सर्व मंडळींनीं त्यांचें पादवंदन केलें व एका धिप्पाड पुरुषानें त्यांस तावडतोब खांद्यावर घेतलें आणि आणखी दोघे त्यांच्याबरोबर संरक्षणार्थ म्हणून निघाले, व ती तीन मंडळी हातोहात आल्या बाजूनेंच खालीं उतरली. राहिलेल्या मंडळींनीं खानास उचलून त्याचा कडेलोट करण्यासाठीं त्यास कड्याच्या अगदीं टोंकावर आणलें. परंतु जीवाची आशा ही मोठी चिवट असते. सर्जेखान अतोनात गयावया करूं लागला असतां, त्या मंडळींपैकीं एक ठेंगणासा तेजस्वी नेत्रांचा पुरुष पुढें होऊन एकदम बाकीच्यांस म्हणाला, "बेसावध माणसास धरून त्याचा वध करणें हें हिंदूंचें ब्रीद नाहीं. जा, तुला जीवदान देतों." त्या पुरुषाच्या तोंडून तेवढे शब्द निघतांच सर्जेखानास कड्याजवळ नेणाऱ्या मंडळींनीं

त्यास मागें आणलें. त्याचे हातपाय गोसावीबोआंच्या हातापायांच्या साखळदंडांनीं जखडून टाकिले, आणि पुन्हां एकवार "हरहर महादेव ! आई भवानी की जय !" असा गजर करीत सर्व मंडळी आल्या वाटेनें परत निघून गेली.

सर्जेखानास साखळदंडांनीं जखडल्यानंतर त्याचा तो शक्तिहीन क्रोध तर नुसता पहाण्याजोगा होता. गोसावीबोआला सोडविण्याविषयीं गडकऱ्याचा यत्न अगदीं निरर्थक झाल्यावर तो अतिशय दुःखी होऊन वाड्यांत जाऊन आपल्या पलंगावर पडला. परंतु त्याचें चित्त सगळें तिकडे गडाच्या पिछाडीस कडेलोट करण्यासाठीं नेलेल्या गोसावीबोआंकडे होतें. शेवटीं त्याला अगदीं राहवलें नाहीं, तेव्हां तो वृद्ध गृहस्थ एकदम उठून तिकडे जाण्यास निघाला. अद्यापि त्यांनीं कडेलोट केला नसल्यास आपण यत्न करून पहावा असें मनांत योजूनच तो निघाला. त्याचें सगळें तनमन त्या कड्याकडे होतें. होतां होतां तो कड्याच्या अगदीं नजीक गेला, व तेथें तडफडत पडलेल्या सर्जेखानाला पाहून त्यास अत्यंत आश्चर्य वाटलें. तितक्यांत खानसाहेबांचे "आः दुस्मन ? तुला यावेळीं सोडवून नेला." हे शब्द गडकऱ्याच्या कानांवर पडतांच त्यांना किती तरी आनंद झाला ! त्यांनीं खानाजवळ जाऊन, "हें काय झालं ? हा काय विलक्षण प्रकार झाला ?" असें विचारलें. स्वाभाविकपणें खानास त्या प्रश्नांनीं मेल्याच्याही पलीकडे दुःख झालें. गडकऱ्यांनीं मोठमोठ्यानें इतरांस आरोळ्या दिल्या व त्याची एकदांची सुटका केली. सुटका झाल्यानंतर तर त्याच्या तोंडाचा एकसारखा भाडिमार सुरू झाला आणि तें मारुतीचें देऊळ जमीनदोस्त करण्याचा त्यानें अट्टाहास चालविला. परंतु शिवदेवराव आणि गडकरी त्याच्या म्हणण्याच्या आड येऊं लागले. सर्जेखान मोठा हुषार व कारस्थानी होता. त्यानें सर्व धोरण ध्यानांत आणून असा विचार केला कीं, झाली हकीकत सर्व तिखट-मीठ लावून हजरतीपाशीं सांगून, एक पथक घेऊन आपण या प्रांतांत यावें आणि मग या सगळ्यांचा यथास्थितपणें समाचार घ्यावा. असा विचार करून शेवटीं तो शिवदेवरावाला घेऊन गडावरून चालता झाला.

इकडे गोसावीबोआंस सोडवून नेणारी मंडळी मोठ्या आनंदानें उड्या मारीतच गडावरून खालीं गेली. मागें राहिलेली मंडळीहि सर्जेखानाची त्या-

प्रकारें त्रेधा करून लौकरच खालीं आली, व गर्द झाडींत पांच घोडे तयार ठेविले होते; त्यांवर आरूढ होऊन सरासरी अर्ध्या पाऊण तासाच्या आंत सर्व मंडळी यमाजीच्या झोपडीजवळील गुहेपाशीं जाऊन, तेथून त्या भुयारांतील मार्गानें भवानीच्या देवळांत आली. गोसावीबोआंनीं आपली सर्व हकीकत सांगितली व शेवटीं ते म्हणाले, "मला कांहीं तुम्ही येथून सोडवून आणूं शकाल अशी दुसरे दिवशीं आशा नव्हती. पहिले दिवशीं यमाजी मरीआईचें सोंग घेऊन गडावर आला व माझी त्याची दृष्टादृष्ट झाली. थोडासा आशेचा अंकुर उद्भवला होता. परंतु दुसरे दिवशीं मला अंधारकोठडींत टाकिल्यानंतर साहजिकच सर्व आशा सुटली." तितक्यांत तानाजी स्वामींकडे पाहून एकदम म्हणाला, "स्वामी महाराज ! शिवबा राजांनीं आजच्या प्रसंगाला युक्ति काढली नसती तर अतिशय दुर्धर प्रसंग ओढवला असता यांत मुळींसुद्धां शंका नाहीं. शिवबा राजांनीं येसाजीस म्हटलें, 'तुझ्या बोलण्याप्रमाणें तुझी प्रतिज्ञा तुला खरी करितां आली नाहीं, तेव्हां मी सांगतों असलं सोंग घेऊन कामाची फत्ते केली पाहिजे. यम्या आणखी तूं कातकरी जोडप्याचीं सोंगें घेऊन डोक्यावर गवताचे भारे घेऊन संध्याकाळच्या प्रहरीं गडाच्या पायथ्याशीं जा, तिथें खोटंच भांडण भांडा. यम्यानं त्रागा करून खालींच रहावं व तूं वर पागेंत जा; आणि चार पांच घटका रात्र झाली म्हणजे एकदम दोघेजण दोन्ही ठिकाणीं आगी लावा. किल्ल्याच्या पिछाडीला मी, तानाजी आणखी हे आमचे नवे पाहुणे, गड चढून जाऊन बसतों व तुम्ही आग लावल्याचा पहिला भपकारा दृष्टीस पडतांच सगळं कांहीं यथासांग उरकून खालीं निघून येतों.'" ही विलक्षण हकीकत सांगून झाल्यानंतर शिवबाच्या अजब युक्तीबद्दल आश्चर्य करीत व एकंदर काम अगदीं उत्तम प्रकारानें फत्ते झालें म्हणून आनंद मानीत व हांसत त्या मंडळींनीं थोडा वेळ घालविला. नंतर गोसावीबोआ गंभीर मुद्रा करून म्हणाले, "आतां पुढच्या विचारावर आपली एकंदर इमारत अवलंबून आहे. मोंगलांचे हातीं आज कितीतरी गड आहेत. त्यांपैकीं दोन चार, निदान एक तरी गड घेण्याच्या मार्गाला आपण लागलों नाहीं, तर पुढला कार्यभाग करणें फार जड जाईल......"

यावेळीं शिवबानें एकामागून एक अशा अनेक गडांविषयीं मनांतल्या

मनांत एकसारखी भवति न भवति चालविली; परंतु एकही गोष्ट निश्चित होईना. शेवटीं स्वामीमहाराज त्याच्या पाठीवर हात मारून म्हणतात, "काय शिवबा, कोणताच किल्ला नक्की होत नाहींना? माझ्या मनांत एक किल्ला येतो, पण त्या किल्ल्याचे मालक येथें बसले आहेत. त्यांना तो विचार कितपत पसंत पडेल कोण जाणे!" त्याबरोबर तो तरुण शिपाईही गोसावीबोआंकडे व शिवबा राजांकडे वळून म्हणतो, "मी तेंच सुचविणार होतों. तो किल्ला आपण सर करण्याचें मनांत आणल्यास हां हां म्हणतां काम फत्ते होणार आहे." तो इतकें बोलतो आहे तोंच गुहेच्या तोंडाशीं पहारा करणारा माणूस आंत येऊन त्यानें तानाजीच्या कानांत कांहीं मजकूर सांगितला. तो ऐकतांच तानाजी आज्ञा घेऊन तेथून तडक गुहेच्या तोंडाशीं आला, व तेथें एका गोसाव्यानें आणलेली बातमी ऐकून तसाच मागल्या पावलीं पुन्हां गुहेंत परत गेला, आणि गोसावीबोआंस एकीकडे बोलावून त्यांच्या कानांत त्यानें आतां आलेली सर्व बातमी सांगितली.

---

१४. जुलमाची सरदारी

गोसावीबोआंच्या कानांत तानाजीनें येऊन सांगितलेली हकीकत त्यांनीं आपल्या त्या शिपाईगड्यास सांगितली. ती कानीं पडतांच तो एकदम अतोनात संतप्त झाला व म्हणाला, "मला वाटलंच होतं, मी हजार वेळ तें त्यांना बोलून दाखवलं होतं; आतां तरी त्यांचे डोळे उघडले म्हणजे पुष्कळच चांगलं झालं म्हणायचं. एकूण त्यांना धरून विजापुराकडे चालविलं अं! आणि त्यांच्याबरोबर माझ्या पत्नीलाही त्यांनीं पकडून नेलं ना! त्यांच्याबरोबर तिचीही त्यांनीं विटंबना केली ना? काय स्वामीमहाराज, बोलत कां नाहीं? तुमच्या या न बोलण्यानेंच माझ्या प्रश्नास उत्तर मिळालें. ठीक आहे. याच पावलीं जाऊन त्यांना आणि तिला सोडविणें अगर त्या प्रयत्नांत आपला प्राण देणें हें माझं मुख्य कर्तव्य मी समजतों." हें त्याचें बोलणें एकसारखें चाललें होतें. ऐकलेल्या बातमीनें उठलेला शोकावेग एकवार शब्दांच्या द्वारें बाहेर पडून

त्याचा जोर कमी झाल्यानंतर मगच आपण बोललों तर त्या बोलण्याचा कांहीं उपयोग होईल, हें जाणून गोसावीबोआ किंवा तानाजी कोणीच त्यास बराच वेळ समाधानाचें वगैरे कांहींच बोलणें बोलले नाहींत. परंतु तो अगदींच निकरावर आलासें दिसलें, तेव्हां ते त्याला म्हणतात, "वेड्या, तुझें कुटुंब किती तरी चतुर आहे! ती आदले दिवशींच कोठें निघून गेली. कोठें गेली हें मात्र अद्यापि समजलें नाहीं. परंतु शिवबाकडून मी तुला तीन दिवसांत तिचा शोध आणविण्याबद्दल वचन देववतों. तूं असा घाबरूं नकोस. मराठ्याच्या बच्च्याला असें घाबरणें योग्य नव्हे." शेवटीं त्याचें चित्त कांहींसें स्वस्थ झालें व आतां पुढें काय करावयाचें या विचाराकडे पुन्हां एकदां सर्व मंडळींचीं मनें लागलीं.

सुलतानगडाच्या गडकऱ्यास अधिकारावरून दूर करून त्यास धरून नेण्यासाठीं विजापूरचा सरदार रणदुल्लाखान सुलतानगडावर चालला होता. वाचकांस आठवत असेलच कीं, त्या म्हसोबाच्या देवळासमोर खानाच्या तंबूंत सुभान्या दुसऱ्या एका तरुण मराठ्याकडे पाहून आश्चर्यानें गोंधळल्या-सारखा दिसत होता, व तो तरुणही सुभान्याकडे पाहून आपली गंभीरता गमावीत होता. सुभान्यास पाहतांच त्या तरुण मराठ्याचें चित्त बावरल्यासारखें झालें, हें खानसाहेबांच्याही लक्षांत येऊन चुकलें. ते एकसारखें टक लावून त्या तरुण पुरुषाकडे व मधून मधून सुभान्याकडेही पाहूं लागले. परंतु आपण या गृहस्थाकडे टक लावून पाहतों आहोंत हें बरें नव्हे, असें वाटूनच त्यानें "आपण कुठें असतां! इकडे कुणीकडे चाललां?" इत्यादि प्रश्न त्यांस विचारलें. त्यावर तो म्हणतो, "सरदारसाहेब, मी यःकश्चित् मनुष्य; आपला जनाना घेऊन दुसऱ्या गांवाला जात असतां सहज विसांवा खाण्याला या देवळांत येऊन बसलों, तोंच आपली ही मंडळी येऊन त्यांनीं 'खानसाहेब येईपर्यंत तुम्ही बसा. आणखी मग जा' असा हुकूम फर्माविला. आपण आतां मला माझ्या मार्गाला लागूं द्याल अशी खात्री आहे." हें त्या मराठ्या तरुणाचें भाषण ऐकतांच खानसाहेबांस किंचित् हंसूं आलें; त्यांच्या चर्येवर विश्वासाचा रंग दिसेना. परंतु त्यांनीं तें मुळींही शब्दांनीं उच्चारून न दाखवितां किंचित् स्मित करून पुन्हां म्हटलें, "आपण जर खरोखरी यःकश्चित् असाल, तर आपण तसेंच राहणें आणि

तेंही पण माझ्या गांठ पडल्यानंतर हें मला ठीक दिसत नाहीं. आपण आतां नेहमीं माझ्याबरोबर असावें. आपली आणि बादशहाची मुलाखत करून देऊं व आपल्याला चांगली सरदारी देऊं." तो तरुण पुरुष खानसाहेबांचें हें बोलणें ऐकून बराच गोंधळला व अगदीं सूक्ष्म अशा आवाजानें "मला कशाला सरदारी? सरदारी मिळविण्याची माझ्या अंगीं योग्यता नाहीं" इत्यादि इत्यादि तो पुटपुटला. परंतु त्या पुटपुटण्याचा मुळींही उपयोग झाला नाहीं. खानसाहेबांच्या आग्रहाप्रमाणें आपणांस आतां ही जुलमाची सरदारी पत्करावी लागणार असें त्यास स्पष्ट दिसून आलें व तो पुढें कांहीं एक बोलला नाहीं. त्याचें न बोलणें हीच संमति समजून खानसाहेबांनीं एकदम त्याची एकंदर बरदास्त उत्तम प्रकारें ठेवण्याविषयीं हुकूम दिला व सुभान्यास त्याचेच तैनातींत ठेवून पुन्हां पुढल्या मुक्कामास आपल्यापुढें हजर होण्याविषयीं हुकूम केला.

रणदुल्लाखानानें म्हसोबाच्या देवळापुढून तळ उठविला व तो थेट सुलतानगडावर गेला. गडावर जातांच गडकरी खानास सामोरा आला. खान स्वभावानें फारच चांगला व सद्गुणांचा चाहता असे. गडकरी सामोरे येतांच त्यानें आपण होऊन पुढें जाऊन त्यांना म्हटलें, "गडकरीसाहेब, मी हुकुमाचा बंदा. त्यामुळें हुकुमाप्रमाणें आलों आहे, पण आपली कोणत्याही प्रकारानें मानखंडना वगैरे होईल अशी काडीमात्र शंका घेऊं नका. आपण हुकुमाप्रमाणें माझ्याबरोबरच चला. आपल्या पश्चात् येथें कोणालाही त्रास होणार नाहीं अशाबद्दल मी काळजी घेईन." तें त्याचें अदबीचें भाषण ऐकतांच गडकरीसाहेबांस अत्यंत आश्चर्य वाटलें. आपणांस गिरफदार करून नेण्यास आलेला मुसलमान सरदार आपल्याशीं अशा तऱ्हेनें वागेल असें त्यांना स्वप्नींही वाटलें नाहीं. खानाच्या मनांतून गडावर मुळींच मुक्काम करावयाचा नसल्यामुळें, त्यानें आपला सर्व लवाजमा खालींच ठेवला. त्याची मर्जी ज्या मराठ्या सरदारावर नुकतीच बसली होती, तो त्याचेबरोबर होताच. खानानें त्यास आपल्याबरोबर गडावर येण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला, परंतु त्यानें ती गोष्ट कबूल केली नाही. तेव्हां मीच काय करायचें तें चटकन् करून येतों असें म्हणून खान वर निघून गेला. इकडे खालीं दिलेल्या तंबूंत तो नवीन बनविलेला तरुण मराठा सरदार अत्यंत विचारांत गढून

गेलेला असून इकडून तिकडे हिंडत होता. ‘ करायला जावें एक आणि होतें भलतेंच! हा प्रसंग! असा प्रसंग आजवर कोणावरसुद्धां आला नसेल ” असे विचार त्याच्या मनांत येत होते. मग त्या मराठा सरदारावरला प्रसंग कोणता होता कोणास कळे !

इकडे रणदुल्लाखान व गडकरी यांची भेट झाल्यानंतर इतर मंडळींस असें स्पष्ट दिसलें कीं, गडकरी गडावरून कांहीं दिवस विजापुरास जात आहेत, या पलीकडे दुसरी कोणतीही क्रांति होण्याचा रंग दिसत नाहीं. सरतेशेवटीं दुसरे दिवशीं विजापुरास जाण्यास निघावयाचें असें ठरून रणदुल्लाखान खालीं आपल्या छावणींत आला. खालीं येतांच त्यानें सरदारसाहेबांस बोलावणें पाठविलें व ते येतांच त्यांजकडे पाहून हंसत हंसत म्हटलें, “ काय सरदार-साहेब, आपण वर आला नाहीं, तेव्हां वर झालेली सर्व हकीकत आपल्यास सांगण्यासाठीं म्हणूनच इकडे बोलाविलें. ” नंतर गडावर जें काय झालें तें सांगितल्यानंतर कांहीं वेळ इकडल्या तिकडल्या गप्पागोष्टी होऊन सरदार-साहेब तेथून निघून आपल्या तंबूंत गेले. त्यावेळीं रात्र बरीच झाली होती. अहंमद आंत येऊन रणदुल्लाखानास ‘ खाना तयार आहे ’ म्हणून सांगून गेला. परंतु खानसाहेबांनीं आपणांस मुळींच भूक नाहीं असें सांगून आपले कपडे वगैरे काढून ते पलंगावर जाऊन पडले; व किती तरी वेळ निद्रादेवीची प्रार्थना करीत राहिले. परंतु त्यांस कांहीं केल्या झोंप येईना. खानास ती रात्र कशी गेली तें त्यांचें त्यांनाच माहीत ! पलंगापासून तंबूच्या दारा-पर्यंत व तंबूच्या दारापासून पलंगापर्यंत अनेक वेळां येरझारा घातल्यानंतर पुन्हां ते आपल्या विचारांत गर्क झाल्याप्रमाणें होऊन तटस्थपणें उभे राहिले. याप्रमाणें ते उभे असतां तंबूमध्यें कोणी इसम आला व खानसाहेबांच्या अगदीं जवळ येऊन, “ जी हजरत, आज आपली अशी काय स्थिति झाली ? ” असे त्यानें शब्द उच्चारिले. ते शब्द कानीं पडतांच खानसाहेब एकदम दचकल्याप्रमाणें होऊन त्यास म्हणाले, “ अहंमद, तूं माझ्या पाळतीवर आहेस कीं काय ? तूं आपली राहुटी सोडून इथें कां आलास ? ” अहंमद बिचारा घाबरून गेला व हात जोडून म्हणाला, “ मालिक, मी सहज आपल्या राहुटींतून बाहेर आलों होतों. तेव्हां आपली हालचाल ऐकिली. आपलें मन मीं ताडलें नाहीं असें नाहीं. गरीबपरवर, आपली मोहबत या

नवीन मराठा दोस्तावर फारच जडली आहे. पण खावंद, जी गोष्ट केवळ आपल्या हातची आहे, त्या गोष्टीबद्दल एवढी अस्वस्थता, आणखी एवढा विचार पाहिजे कशाला ? आपली आज्ञा असेल तर मी......" हे शब्द ऐकतांच खान इतका संतापला कीं, अहंमद पुढें काय बोलत होता तें क्रोधानें बधिर झालेल्या खानाच्या कानास मुळींही ऐकूं आलें नाहीं असें दिसलें.

---

१५. विजापुरास गेल्यावर

खान संतापानें इतका वेडा झाला कीं, त्यांच्या तोंडून पुरते कांहीं शब्दही निघेनात. सुमारें एक मिनिटभर याप्रमाणें गेल्यावर तो म्हणाला, "अहंमद, आज तुझ्या बापापासून सगळी मंडळी माझ्या घरीं इमानानें नौकरी करीत आली तें माझ्या लक्षांत आहे, म्हणून या वेळीं मी तुला गय करतों. जा, चालता हो. आणखी या बाबतींत जर एक अक्षर पुन्हां माझ्याजवळ किंवा कोणाजवळ बोलशील तर तुला जिवंत गाडून टाकीन हें पक्कं लक्षांत ठेव." धन्याचें हें बोलणें संपतांच अहंमद थोडासा गुटमळलासें करून तेथून चालता झाला. तो गेल्यानंतर खान अधिकच अस्वस्थ झाल्याप्रमाणें होऊन मनाशींच म्हणतो, "आजपर्यंत मी या असल्या गोष्टी म्हणजे केवळ काल्पनिक समजत होतों. केवळ दृष्टादृष्ट होतांच अशी स्थिति ? ...... पण नाहीं. हा रणदुल्लाखान असला नीचपणा कधीं करणार नाहीं. संगतीला मुकूं नये, एवढ्याकरितां मला अधिक माहिती आहे असं दाखवणारच नाहीं. पण ...... पण याच्या पलीकडे जर माझ्या अंतःकरणांत विचार येऊं लागले, तर दुसऱ्यावर चालविण्याकरितां हातीं धरलेलं हत्यार मी आपल्या स्वतःवरच चालवीन. यांत एक रेसभरसुद्धां मागें घेणार नाहीं." या निश्चयानें जणूं काय त्याच्या मनावरील मोठें थोरलें ओझें उचललें असें दिसलें. कारण झोंप येण्यासाठीं चालविलेल्या खटपटीस पहाटेच्या गार वाऱ्याचें साहाय्य मिळून त्यास लौकरच चांगली गाढ झोंप लागली. असो.

आदले दिवशीं ठरल्याप्रमाणें खान गडकरीसाहेबांस घेऊन निघाला, व वाटेंत कोणत्याही प्रकारचें विशेष असें कांहीं न होतां सर्व मंडळी विजापुराला जाऊन पोहोंचली. विजापुरास गेल्यावर रणदुल्लाखानानें आपल्या नवीन मित्रास राहण्यासाठीं अगदीं निराळी व्यवस्था करून दिली. मात्र सरदारसाहेबांशीं गप्पागोष्टी सांगण्यासाठीं अनेक वेळां खानाची स्वारी सरदारसाहेबांकडे येत असे. खानसाहेबांनीं गडकऱ्यांचीही बरदास्त फारच उत्तम प्रकारें ठेविली. आपण त्यांस घेऊन आल्याची—नव्हे त्यांस गिरफदार करून आणल्याची—वर्दी योग्य काळीं हजरतींच्या कानांवर नेली. रणदुल्लाखान हा जात्या अत्यंत सुस्वभावाचा असून त्या वेळच्या मुसलमान लोकांत तो एक अपवादच होता. त्यास दरबारांतील कित्येक सरदारांच्या कृति मुळींच आवडत नसत. आपण अणुमात्र दुसऱ्याच्या भानगडींत पडलों तर विनाकारण आपणच आपल्या पायांवर दगड पाडून घेतलासें होईल व आज आपल्या वजनामुळें आपणांस जें काय त्यांतल्या त्यांत कोणाचें बरें करितां येतें तें करतां येणार नाहीं हें जाणून तो इतरांच्या भानगडींत मुळींच पडत नसे.

यावेळीं मुरार जगदेव व रणदुल्लाखान या दोघांचेंही बादशहावर वजन फार असे, परंतु हळूहळू सय्यदुल्लाखानानेंही आपलें वजन बादशहावर पाडण्यास सुरुवात केली होती. सय्यदुल्ला हा मूळचा एका सरदारी घराण्यांत हुजऱ्या होता, परंतु कालेंकरून त्यास हुजूरच्या हुजऱ्याची पदवी आली आणि हुजऱ्याचा लवकरच सरदार बनून तो सय्यदुल्लाखान झाला. हा बादशहाचे मनांत नेहमीं असें भरवून देण्याचा प्रयत्न करीत असे कीं, मुरार जगदेव, शहाजीराजे, रणदुल्लाखान वगैरे मंडळी विजापूरच्या राज्याचें अनिष्ट चिंतीत आहेत. त्यांचे मनांतून मराठा बंडखोरांचें पारिपत्य व्हावें अशी मनांतून मुळींच इच्छा नाहीं. शहाजीराजांचा मुलगा उन्मत्तपणानें वागत आहे, व सुलतानगडच्या किल्लेदारांचा मुलगा अद्वातद्वा वर्तन करीत आहे, याचें तरी इंगित हेंच होय. आपण सुलतानगडावर जाऊन रंगरावअप्पांस व आणखीही कोण्या व्यक्तीस पकडून आणण्याची संधि आपणांस मिळावी ही सय्यदुल्लाखानाची मनापासून इच्छा. सर्फोजी व पियारीखान हे त्याचे हस्तक होते. सुलतानगडच्या किल्लेदाराबरोबर सूर्याजीचा

बाप धारगांवचा देशमुख याचीही उचलबांगडी करून त्यास आणण्या-विषयींचें कारस्थान (सूर्याजी नानासाहेबांप्रमाणें उन्मत्त झाला असून ते दोघे मिळून लौकरच बादशहातीविरुद्ध खास बंड करणार अशा सबबींवर, परंतु वस्तुतः आपल्या हस्तकांची इच्छा पूर्ण व्हावी म्हणून) त्यानें रचिलें होतें. परंतु आयत्या वेळीं हजरतींनीं रणदुल्लाखानास तिकडे पाठविलें. यावेळीं विजापूरच्या दरबारांत मुरार जगदेवाचें फार वजन असे. तो फार दिवसांचा इमानी नोकर असल्यामुळें त्याच्या मसलतीविरुद्ध जाणें बादशहासुद्धां फार जड जात असे. उत्कृष्ट कामीं उपयोगी पडणारे एक मुरार जगदेव व दुसरा रणदुल्लाखान; आणि अवाच्य अशा कामीं नेहमीं ज्याचा उपयोग होत असे, तो सय्यदुल्लाखान; या त्रयींच्या मध्यंतरीं सांपडल्यामुळें बादशहाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. त्यास स्वतःची अक्कल जितक्यापुरती तितकीच असल्यामुळें अर्थातच त्यास ऐकावें कोणाचें हें समजेना. अखेर सासवड, सुलतानगड व धारगांव या तिन्ही ठिकाणीं कोणी तरी माणसें पाठवून बंदोबस्त करण्याचें ठरलें, आणि सय्यदुल्लाखानाच्या सल्ल्याप्रमाणें तीन माणसें शोधूनही काढलीं. सर्जेखानास शिवाजीच्या प्रांतीं पाठविण्याचें ठरलें, सुलतानगडावर सय्यदुल्लाखान स्वतः जाणार होता व पियारीखानास धार-गांवच्या देशमुखांचे वाड्यांत पाठविण्याचें कायम झालें. परंतु शहाजीराजांस आपण विनाकारण दुखविणें मुत्सद्दीपणाचें होणार नाहीं असें जाणून शेवटीं शिवाजीच्या प्रांतीं मुरार जगदेवाच्या माणसानें मुख्य म्हणून जावें, आणि सर्जेखानानें नुसतें त्याचे बरोबर म्हणून असावें असें ठरलें. सय्यदुल्लाखानास हें अर्थातच आवडलें नाहीं. सुलतानगडावर जाण्याचेंही त्याला साधलें नाहीं. इतकेंच नव्हे तर तिकडेही मुरारपंताचाच माणूस गेला.

रणदुल्लाखानानें गडकऱ्यास गिरफदार करून आणलें असून, त्याची सून त्याच्या बरोबर आणली नाहीं, असें पहातांच सय्यदुल्लाखानास असें होऊन गेलें कीं, या रणदुल्लाखानास नष्ट करून टाकण्यास काय उपाय करूं आणि काय नाहीं ! सर्जेखान आपली कामगिरी करून परत आल्यावर त्यानें सय्य-दुल्लाखानास झालेली सर्व हकीकत झाली तशीच केवळ न सांगतां आपल्या मनास वाटेल त्याप्रमाणें तसि रंगरूप देऊन निवेदन केली. सय्यदुल्लाखानास पाहिजे होतें तें तेंच. मुरारपंतानें पाठविलेला शिवदेवराव शत्रूस फितूर

होऊन किती नीचपणानें वागला, त्यानें सर्जेखानाशीं भयंकर विश्वासघाताचें वर्तन कसें केलें, इत्यादि सर्व गोष्टी बादशहाचे कानांवर त्यानें अगदीं योग्य प्रसंग साधून घातल्या. या सर्व गोष्टी ऐकून बादशहाचे मनावर त्यावेळीं त्याचा जास्तीच परिणाम झाला, आणि विषाचें पहिलें बीं रुजलें गेलें.

---

१६. इतर कांहीं मंडळी

वैभवाच्या अत्यंत उच्च शिखरास जाऊन पोहोंचलेल्या विजापुरांत शिरून तेथील एकंदर रंग पाहण्यांत गुंतण्यापूर्वी वाचकांस धारगांवापासून कांहीं मैलांवर असणाऱ्या वडाच्या झाडाखालील झोंपडींत न्यावयाचें आहे. वाचकांस आठवतच असेल, कीं या झोंपडींत राहणाऱ्या एका वृद्ध माणसाकडे सांवळ्यानें येऊन वेळींच वर्दी दिल्याकारणानें म्हाताऱ्यानें पाठविलेल्या एका काळ्याकभिन्न इसमानें सूर्याजीच्या बायकोला मुलासकट अग्नीच्या मुखांतून सोडविलें. या हकीकतीनंतर पांच किंवा सहा दिवसांनीं आपण आतां तेथें जात आहों. या वेळीं तो म्हातारा अगदीं एकटाच असून तो कोणाची तरी मार्गप्रतीक्षा करीत इकडून तिकडे व तिकडून इकडे अशा येरझारा घालीत असतां आपल्याशींच कांहीं पुटपुटूं लागला. "दैवाची गति किती विचित्र आहे! चार वर्षांपूर्वी माझी स्थिति काय होती आणि आज काय झाली? 'ज्या दुष्टांनीं माझ्यावर असला भयंकर प्रसंग आणला त्यांच्या नरडीचा घोट घेऊं तेव्हांच आम्ही दोघे राहूं' ही प्रतिज्ञा पुरी होण्याजोगं आमच्या हातून कांहींसुद्धां झालं नाहीं. ही पोरगी बरी सुखांत होती पण तिच्या सुखाचेंही वाटोळें झालें. आतां ही कसली जगणार? मला तर मुळींच आशा नाहीं. पण अजून राणू कसा आला नाहीं?" इतक्यांत तो काळाकभिन्न गृहस्थ दाराशींच येऊन ठेपला. त्यास पाहतांच म्हाताऱ्यानें "कांहीं आशा?" असा प्रश्न त्यास विचारला. तो काळाकभिन्न गृहस्थ त्या म्हाताऱ्यास म्हणतो, "खरोखर मी सांगतों, तुम्हांला वाटतं इतकं निराश होण्याचं कारण नाहीं. आणखी यदाकदाचित् तितकी

निराशा होण्याला कारण असलं तरी, बाबा, तुम्हीच जर असं करूं लागला, तर मी एकटा काय करणार ? तर तुम्ही हा विचार, हा खेद अगदीं सोडून द्या. चला, आपण तिथें जाऊं आणखी अहोरात्र होईल ती खटपट करून त्यांना वांचवूं. तुम्ही असा शोक करूं नका." इतकें बोलून त्यानें त्याचा हात धरला व ते दोघे त्या रानांतील दुसऱ्या एका झोंपडीपाशीं आले. त्या दोघांची चाहूल लागतांच आंतून एक पोऱ्या चटकन् बाहेर आला. त्यास पाहतांच त्या तरुण गृहस्थानें एकदम त्यास म्हटलें, " सांवळ्या, कांहीं कमी अधिक नाहींना रे ?" सांवळ्यानें चटकन् उत्तर दिलें, " कांहीं नाहीं; आतां बडबड अगदींच नाहीं. तें मूल मात्र कसंसंच करतं आहे." इतक्यांत ते दोघे हलकेच झोपडींत शिरलेही. पाहतात तों त्या मुलास एकसारखा ऊर्ध्व झाला असून तें आतां खास वांचत नाहीं हें तर स्पष्टपणें दिसलें. जवळच त्याची जननी अगदीं बेशुद्ध अशी पडली असून तिचीही नाकीं सूत धरल्याप्रमाणें अवस्था झालेली दिसली व दुसऱ्या कोपऱ्यांत आणखीही कोणीतरी तशाच आत्यंतिक अवस्थेंत पडलेलें दिसत होतें. म्हाताऱ्यानें चटकन् त्या मुलाला उचललें आणि त्याला घेऊन तो हिंडत होता, इतक्यांत तो मटकन् खालीं बसला. मुलानें एकच शेवटचा गचका दिला आणि त्याचें प्राणोत्क्रमण झालें. म्हाताऱ्याला परमावधीचें दुःख झालें. " देवा ! देवा मला काय काय गोष्टी तरी पाहायला ठेवलं आहेस ! पण इतकं ठेवल्याप्रमाणें माझी प्रतिज्ञा शेवटास ने म्हणजे माझ्या जन्माचं सार्थक होईल ... पण काय आशा ?" म्हाताऱ्यानें वरील एकंदर शब्द अर्धवट आपल्या मनाशींच उच्चारले म्हटलें तरी चालेल. त्यावर तो तरुण एकदम त्याला म्हणाला, " बाबा, जर मी तुमच्या बीजाचा – पक्क्या मराठ्याच्या बीजाचा--असेन तर आजपासून तीन महिन्यांच्या आंत त्या दुष्टाचे राईराई एवढे तुकडे करून त्याचें शीर तुमच्या पुढें आणून तुम्हांला दंडवत घालीन. आतां मी या बालकाचं प्रेत घेऊन बाहेर पडलों, कीं पुन्हां मीं आपलें हें तोंड प्रतिज्ञा पुरी केल्याशिवाय तुम्हांला दाखवीत नाहीं." इतकें बोलून त्यानें त्या बालकाचें प्रेत उचलून घेतलें. सांवळ्याला आपल्या मागोमाग कुदळकंदील घेऊन येण्यास सांगितलें आणि तो दाराच्या बाहेर पडला.

बऱ्याच वेळानें सांवळ्या एकटाच कुदळखोरें घेऊन आंत आला.

सांवळ्याला पाहतांच म्हातारा त्यास म्हणतो, "पोरा, इथून जातांना त्यानें तुला शेवटीं कांहीं मला निरोप सांगायला म्हणून सांगितला का ?" ते एवढेंच म्हणाले कीं, "बाबांना सांग," सांवळ्यानें उत्तर केलें, "आजपासून तीन महिने संपतील त्या दिवसाची वाट बघा. त्याच्या आंत आलों नाहीं तर मेलों म्हणूनच समजा. आणखी जातां जातां ते आपल्याशीं एवढेंच म्हणाले कीं, मी आतां विजापूरला जाईन आणखी त्या हरामखोर चांडाळाची बातमी काढीन. अन् एकदां का सांपडला, कीं त्याच्या सावलीसारखा त्याच्या पाठोपाठ हिंडेन आणखी संधि साधून आपलं काम करीन." या सांवळ्याच्या बोलण्याकडे म्हाताऱ्याचें पूर्णपणें लक्ष होतें. परंतु सांवळ्याचें बोलणें थांबतांच तो त्याच्यावर अधिक कांहींही न बोलतां पहिल्याप्रमाणेंच अगदीं स्तब्ध बसला. तितक्यांत दोघांही रोग्यांना औषधपाणी देण्याची वेळ झाली. त्याबरोबर म्हाताऱ्यानें उठून त्यांना औषधें पाजलीं. अशा स्थितींत त्यानें रात्र तर कंठली. म्हाताऱ्यास मुळींच झोंप आली नाहीं. परंतु बिचाऱ्या पोराला झोंपेनें अगदीं आपलेंसें करून टाकलें. सकाळीं किती वेळ झाल्यावर तरी तो उठला. आणि इकडे तिकडे कांहीं जरूरीचीं कामें केल्यावर त्या म्हाताऱ्यास म्हणाला, "बाबासाहेब, आपल्या मदतीला मी आपल्या आईला घेऊन येतों. मी जाऊन येईपर्यंत सटवाजीला तुम्ही मदतीला घ्या, मी आतां त्याला लावून देतों." इतकें तो बोलतो तों सटवाजी त्यांच्यापुढें येऊन उभा राहिला. सांवळ्यानें आपण येईपर्यंत सटवाजीस राहण्यास सांगून त्यांचा निरोप घेतला. म्हातारा किती वेळपर्यंत तरी अतिशय कौतुकानें त्या क्षणोक्षणीं दूरदूर जात चाललेल्या पोऱ्याकडे पाहात होता. परंतु काय चमत्कार ? सांवळ्या आपल्या आईला घेऊन तिसरे दिवशीं तेथें आला, तों त्या दोनही झोंपड्यांत चिटूपांखरूंसुद्धां नव्हतें !

परंतु आतां सांवळ्यास तसाच गोंधळांत टाकून आपण आपल्या या कथानकांतील आणखीही इतर कांहीं मंडळींच्या हकीकती पाहूं आणि मग एकदम विजापुरांत दाखल होऊं. वाचकांस आठवत असेल कीं, शिवबाकडून नक्की बातमी तीन दिवसांचे आंत तुला आणून देतों, असें स्वामींनीं नानासाहेबांस सांगून त्याचें समाधान केल्यानंतर मंडळी आंत येऊन

पुढील विचारास लागली. आज जी बातमी आली, तिनें सुलतानगड हातीं येण्यास खरोखरीच फार सुलभ होणार आहे असें नानासाहेबांनीं सांगितलें. परंतु कोणतीही गोष्ट करणें ती आई जगदंबेच्या कृपाप्रसादाखेरीज व अनुकूलतेखेरीज करणें नाहीं, हा शिवबाचा पक्का निर्धार असल्यानें त्यानें गोसावीबोआंस व इतर सर्वांस स्वस्थ बसण्याची विनंती करून 'जय जगदंबे भवानी!' असें म्हणत डोळे मिटून मन एकाग्र केलें. थोड्याच वेळांत ओंठ हलूं लागून पुढील शब्द बाहेर पडले:—"सावधपणें उपक्रम केलियास यश खास. मंदिराचें तोरण बांधिजे." नंतर कांहीं वेळानें स्वारीचें भान परत आलें, आणि शिवबानें स्वामींकडे पाहतांच त्यांनीं "शिवबा झाली फत्ते म्हणून समज." "काय आपली आणखी त्या महात्म्याची कृपा करील तें खरें! पण शब्द काय निघाले तेवढे मला कळते तर—" "अरे, शब्द काय विचारतोस? आपल्याला अगदीं जसे पाहिजे तसे. 'सावधपणें उपक्रम केलियास यश खास. मंदिराचें तोरणच बांधिजे' हे शब्द. आतां याहून आणखी काय पाहिजे? चला, आजपासून तीन महिन्यांची मुदत अं? तीन महिने सरतात त्या दिवशीं सूर्यास्ताच्या आंत किल्ला घेऊन आपला अंमल तिथें चालू केला पाहिजे." शिवबाचें सर्व लक्ष स्वामींच्या बोलण्याकडे होतेंच. त्यानें त्यास म्हटलें, "स्वामीमहाराज, 'मंदिराचें तोरणच बांधिजे,' या शब्दाचा अर्थ काय?" स्वामींनीं लागलीच त्यास म्हटलें, "शिवबा, यांत एवढा तूं गूढांत काय पडलास! अरे, यवनांनीं उच्छेद केलेल्या मंदिराची पुन्हां संस्थापना तुझ्या हातून होणार. त्याचं तोरणच हें कीं पहिल्यानें तूं हा गड घेणार. चल ऊठ आतां; विचार करीत बसण्याची ही वेळ नाहीं. आतां सावध मात्र राहिलें पाहिजे." यानंतर स्वामी व शिवबा कांहीं वेळ एकांतांत बसले आणि नंतर शिवबा तेथून उठून आपल्या मंडळींसह निघून गेला. त्यानंतर गोसावीबोआ आपल्याशींच विचार करीत बसले होते व विचार करतां करतां बसल्या ठिकाणींच त्यांस निद्रा लागली.

उषःकालीं स्नानसंध्यादि कर्मैं करण्यासाठींच शेवटीं स्वारी आपल्या त्या गुप्त मंदिरांतून बाहेर पडली. ती रानांतल्या एका ओहोळावर जाऊन स्नानादि सर्व विधि आटोपून परत आली, तों एक गोसावी त्यांचीच वाट पाहात होता. त्यानें एक थैली दिली. स्वामींनीं ती घेऊन तिला वंदन करून

वाचली. नंतर त्यांनीं आपणांस धरून नेल्यापासून तों तहत आजपर्यंतची हकीकत लिहून काढली. शेवटीं समर्थांचे चरण प्रत्यक्ष अजून दृष्टीस पडले नसतांही शिवबाची भक्ति किती आहे, व ते चरण दृष्टीस पडावे म्हणून त्याची उत्कंठा किती आहे याबद्दलही वर्णन लिहिलें व ‘ समर्थांनीं आतां त्यास लवकर दर्शन दिल्यास त्यास अत्यंत आनंद होणार आहे. तरी पहिला पराक्रम होतांच तसें घडावें ’ अशा अर्थाचाही मजकूर लिहिला. एकंदर पत्र लिहून झाल्यानंतर त्यांनीं तें समग्र वाचलें. तें वाचतांना त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले आणि एकदम “ बा शिवबा, धन्य तुझी कीं, तुझ्यावर अशा महात्म्याचा कृपाप्रसाद आहे. मी केवळ निमित्त मात्र. पण तूं आणखी ते दोघेही केवळ उच्छेद होत चाललेल्या धर्माच्या संस्थापनेकरितां प्रत्यक्ष अर्जुनकृष्णाचेच अवतार खास ! ” असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले. तें पत्र तेच दिवशीं समर्थ रामदासस्वामींकडे रवाना झालें.

---

१७. बादशहा

महंमद आदिलशहा बादशहाच्या कारकीर्दींत विजापूर हें वैभवाच्या अत्यंत उंच शिखरावर चढलें होतें, ही गोष्ट जितकी खरी तितकीच हीही गोष्ट खरी आहे कीं, याच बादशहाच्या अमदानींत विजापूरच्या उतरत्या कळेसही न कळत सुरुवात झाली. बादशहा स्वतः कोणत्याही राजकारणांत मुळींच मन घालीत नसे. आपल्या राण्या आणि विशेषतः सय्यदुल्लाखानाच्या पाजी कारस्थानानें प्राप्त झालेली रंभावती यांच्या संगतींत नाना प्रकारचे विलास करण्यांत तो अगदीं चूर असे. त्याचे राज्याचे प्रारंभीं मुरार जगदेव व व शहाजी राजे यांनीं राज्यवृद्धीसाठीं बराच प्रयत्न केला आणि तेणेंकरून राज्याचें वैभवही थोडेंसें वाढलें. परंतु राज्याच्या मालकाचें मन मुळींही राज्यकारभारांत नाहीं, आणि त्यांत सय्यदुल्लाखानासारख्या दीडदमडीच्या माणसानें मुरार जगदेवासारख्याशीं प्रतिस्पर्धा सुरू केल्यामुळें राज्यांत दुफळी माजली.

मागील प्रकरणांतील हकीकतीनंतर सुमारें आठ दिवसांनीं पुढील हकीकत घडली. या दिवशीं बादशहा थोडासा मांदा असल्यामुळें रंभावती व सय्यदुल्लाखान यांच्याशिवाय कोणासही गांठ घेण्याची मुभा ठेवली नव्हती. सय्यदुल्लाखान आज बरेच दिवस बादशहास अगदीं एकांतांत गांठण्यासाठीं धडपड करीत होता. आपल्या इच्छेप्रमाणें संधि सांपडली असें पाहून सय्यदुल्लाखान बादशहाच्या सोनेरी पलंगाच्या उशागती बाजूला उभा होता. बादशहानें सय्यदुल्लाखानाकडे पाहून म्हटलें:– "क्यों सय्यद, काय आणलं आहे नवीन लचांड ? कांहीं तरी घेऊन आला आहेस खास !" "हजरत शांतपणानें ऐकून घेतील तरच सांगण्याचा उपयोग होणार आहे. कारण, काम फार नाजूक आहे. रंगराव‌अप्पांच्या संबंधानें रणदुल्लाखान इतका जो पक्षपातानं बोलतो, त्याचं कारण आतां अगदीं पक्कं समजलं आहे. रणदुल्लाखान स्वामिनिष्ठेला–आपल्या खाल्लुया निमकाला–बरीक अंतर देतो आहे दुसरं काय !" या संदिग्ध बोलण्यानें बादशहाची जिज्ञासा अगदीं कडेलोटास गेली. सय्यदुल्लानें आपण विण्याची तार फाजील चढविली हें ताडलें, आणि लागलीच दोन्ही हात जोडून बादशहाच्या अगदीं कानाजवळ आपलें तोंड नेऊन हलकेंच कांहीं मजकूर सांगितला. तो कानीं पडतांच बादशहा म्हणाला, "झूट ! झूट ! रणदुल्लाखान आपल्या बापाचा बच्चा आहे. तो इतका नीचपणा आणि असल्या यःकश्चित् गोष्टीसाठीं कधींही करणार नाहीं. तूं कांहीं तरी कुभांड मला सांगतो आहेस. सय्यद, मी तुला बरोबर आणखी पंधरा दिवसांची मुदत देतों. इतक्या मुदतींत जर तूं मला तुझं काय म्हणणं तें खरं करून दाखविलं नाहींस, तर यादच राखून ठेव." "हजरत, आपण दिलेल्या मुदतींत–मुदतीच्या आंत–मी आपली खात्री करून देतों. जर न देतां आली तर हें तोंड पुन्हां आपल्याला दाखविणार नाहीं." इतकें म्हणून तो झाल्या गोष्टीवर विचार करीत तेथून बाहेर पडला व मेण्यांत बसून गेला.

इतक्यांत रस्त्यांत एके ठिकाणीं अतिशय गोंधळ आणि आरडाओरड चालली आहे असें त्यास दिसलें. पुढें जाण्यास रीघ नव्हती. खानाची स्वारी तडकाफडकी उठून मेण्याच्या दारांतून काय आहे तें बाहेर पाहूं लागली. पाहातों तों एका गाईस सोडविण्यासाठीं हिंदु व त्या गाईची गर्दन उड-

विण्यासाठीं मुसलमान दंगामस्ती करूं लागले होते. हा प्रकार नजरेला पडण्याबरोबर त्याला अत्यंत त्वेष येऊन आपला अंमल गाजवून मुसलमानांची सरशी करून देण्यासाठीं तो खालीं उतरला. त्या दंग्यांत शिरून आतां कांहीं तो करणार तों त्या गाईला सोडविण्यासाठीं जोरानें दांडगाई करीत असलेल्या एका अगदीं काळ्याकभिन्न गृहस्थाकडे त्याचें लक्ष गेलें व दोघांची दृष्टादृष्ट होतांच तो कावरावावरा झाला, आणि तेथून पाऊल काढून चटकन् आपल्या मेण्यांत शिरला. त्याबरोबर तो काळाकभिन्न इसम चटकन् पुढें झाला आणि मेण्यांत आपली मुंडी घुसवून "याद राख ! याद राख ! तुझा दुस्मान मेला नाहीं. आणखी दोन महिन्यांच्या आंत तुला नरकांत पाठवील. बघ, माझ्याकडे बघ." असें त्यास बजावून लागलीच तो कोणीकडच्या कोणीकडे अंधारांत नाहींसा झाला.

---

१८. नानासाहेब

इकडे आमच्या बंडखोर मंडळीमध्यें आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें तीन महिन्यांचे आंत किल्ले सुलतानगड आपल्या ताब्यांत घेण्यासंबंधांत तयारी करण्यासाठीं विचार सुरू झाला होता. शस्त्रास्त्रें, संपत्ति आणि शूर लोक यांची मुळींच वाण नव्हती, फक्त वेळ भरण्याचीच राहिली होती, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. वरील प्रतिज्ञेनंतर आठ दिवसांनीं शिवबा, नानासाहेब, तानाजी व स्वामी वगैरे सर्व मंडळी आपल्या नेहमींच्या रानांतील जागीं विचार करीत होती. सुमारें एक घटकेच्या पूर्वीच खुद्द विजापुराहून एका बातमीदारानें, 'रणदुल्लाखानानें रंगरावअप्पांची तरफदारी केल्यामुळें व एक तरुण मराठा सरदार पकडून आणून त्याबद्दल बादशहास कळविलें नाहीं म्हणून रणदुल्लाखानावर बादशहाची अतोनात नाराजी झाली असून, सुलतानगडचे किल्लेदार यांचे हालहाल करून त्यांस तुरुंगांत अडकवून ठेवण्याचा हुकूम झाला आहे' अशी बातमी दिली होती. ही एकंदर बातमी ऐकल्यापासून नानासाहेबांस अर्थातच फार वाईट वाटलें आणि मंडळीसही अतोनात चिंता उत्पन्न झाली. या वेळीं कांहींना कांहीं तरी युक्ति योजली पाहिजे असें प्रत्येकास वाटत होतें. अद्यापि कोणासच कांहीं सुचलें

नव्हतें. इतक्यांत नानासाहेब मोठ्यानें म्हणाला, "आपली सगळ्यांची आणखी स्वामीमहाराजांची अनुमति असेल तर मी विजापूरला जातों आणि तेथली खरी काय हालहवाल आहे ती काढून आणतों. बाबांना सोडवून तरी आणावें, किंवा त्या प्रयत्नांत देहत्याग तरी करावा असें मला वाटतें." शिवबांनीं व स्वामीमहाराजांनीं त्याचें तें बोलणें शांत चित्तानें समग्र ऐकून घेतलें, व किती वेळ तरी त्यासंबंधानें ते आपल्या मनांत विचार करीत होते. शेवटीं स्वामीमहाराज शिवबाकडे वळून म्हणतात, "यावेळीं विजापुरास आपल्यापैकीं कोणी तरी गेला पाहिजे हें तर खास. पण एकट्या नानासाहेबांनाच तिकडे जाऊं देणें रास्त नाहीं. यावेळीं तानाजी किंवा येसाजी यांनीं त्या यमाजीला घेऊन वेषांतर करून गेलं पाहिजे." त्यावर "स्वामीमहाराज, मी आपल्या विचाराबाहेर आहे असं तर मुळींच नाहीं. पण आतां जो कार्यभाग करावयाचा आहे तो खुद्द त्यांच्या राजधानींत– त्यांच्या डोळ्यांसमोर––जाऊन करावयाचा आहे. फारच शिताफीनं काम केलं पाहिजे, त्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं" असें म्हणून शिवबानें स्वामीस एकीकडे नेऊन आपल्या मनांतील सर्व विचार सांगितला आणि दुसरेच दिवशीं ठरलेली ती तीन मंडळी विजापूरच्या मार्गास लागली.

---

१९. साईजी

एके दिवशीं ऐन संध्याकाळीं रंभावती आपल्या महालांतील खिडकींत अगदीं एकटीच बसली होती. बादशहा शिकारीच्या निमित्तानें कोठें रानांत गेला होता. तिची चर्या अत्यंत खिन्न दिसत होती. इतक्यांत तिच्या दिवाणखान्याचें दार कोणीं लोटलें, त्याबरोबर "कोण राई! आलीस? काय बातमी आणलीस? तीच मूर्ति ना! बोल; बोल!" असें ती म्हणाली. परंतु राईकडून उत्तर न येतां एक पुरुष दार लोटून कडी लावून आंत आला. रंभावती घाबरली व एकदम "चिराक? चिराक आणा. हा कोण..." असें ओरडते, तों त्या व्यक्तीनें तिच्या त्या सुकुमार तोंडावर हात ठेवून "चुप्, चुप् बोलूं नको. आरडलीस ओरडलीस तरी

कांहीं उपयोग व्हायचा नाहीं. बोल, मी कोण? तूं मला ओळखलंस?" असें मोठ्यानें म्हटलें. रंभावतीनें थरथर कांपत मोठ्या कष्टानें उत्तर केलें, "हो!" "मी तुला ठार मारण्यासाठीं आलों आहें. आज आतां या ठिकाणीं तुझा शिरच्छेद करणार. आणखी मग मी हलणार. तुला अशा ऐषारामांत राहिलेली पाहून माझ्या मनाला काय यातना होताहेत याची जर तुला कल्पना असती तर तूं माझ्यादेखत आपला प्राण दिला असतास. दुष्टे, चांडाळणी ..." "आपल्या हातून मरण आल्यावर आणखी काय पाहिजे? आपल्याला त्या दुष्टांनीं या जगांतून नाहींसं केलं असं मला येऊन जेव्हां सांगितलं, तेव्हां प्रतिज्ञा केली कीं, केव्हां तरी या मांगाच्या नरडीचं रक्त काढीन – पक्का सूड उगवीन, तेच दिवशीं आपली स्वतःचीही गर्दन छाटून घेईन. ती प्रतिज्ञा आतां खरी करण्याचा प्रसंग मुळींच नको. काढा, काढा ती तलवार आणखी खरोखरीच करा माझे दोन तुकडे." असें म्हणून ती धाडकन् त्या व्यक्तीच्या पायांपाशीं पडली. तें पाहतांच तो पुरुष अत्यंत चकित झाला. आपली समजूत अगदींच चुकीची ठरली. आतां आपला हेतु पार पाडावा कीं नाहीं, याबद्दल त्याच्या मनाची चलबिचल होऊं लागली. इतक्यांत दारावर कोणी थाप मारल्याचा त्याला भास झाला. त्या सुंदर स्त्रीचा प्राण घेण्यास त्याचे हात वाहिनात. दार उघडतांना त्याच्याच आड होऊन तो उभा राहिला व दार उघडतांच तो पटकन् बाहेर गेला. त्याचा सर्व पोशाख पांढरा असून उरावर पडेल इतकी दाढी अगदीं पोशाखाप्रमाणेंच पांढरी होती. तो बागेच्या पुढल्या दरवाजाजवळ आला तेव्हां तेथल्या रखवालदारांनीं "साईजी, आपण लवकरच चाललां!" असें म्हटलें, त्यावर त्यानें "बेगमसाहेबांस कांहीं कुराणाचा भाग ऐकवावयाचा होता, तो काजसाहेबांनीं सांगितल्यावर ऐकविला, आतां जातों!" असें अस्सल उर्दूंत उत्तर दिलें. आणि स्वारी तेथून बाहेर असलेल्या आपल्या मेण्यांत बसून निघून गेली. मेणा एका मशिदीजवळ उभा केला, त्या मेणेवाल्या भोयांच्या कानांत कांहीं सांगितलें आणि मशिदीच्या एका दरवाजानें आंत शिरून दुसऱ्या दरवाजानें स्वारी बाहेर पडली व गांवाच्या बाहेर अगदीं एका जुन्या पडक्या वाड्यांत शिरली.

साईजींनीं त्या पडक्या घराच्या दारांत पाऊल टाकतांच घराचें दार घट्ट

लावून टाकिलें आणि एकदम आपली ती दाढी, त्या मिशा, तो सर्व पोशाख दूर फेंकून देऊन तेथल्या त्या पडवींत इकडून तिकडे तिकडून इकडे ते फेऱ्या घालूं लागले. ‘ छेः तिनं जे उद्गार काढले त्यानं तर माझा हा हात अगदीं लटका पडला. मी जिवंत असेन याची तिला कल्पना नव्हती असंही पण दिसतं. तिच्याकडून जी गोष्ट झाली ती केवळ नाइलाजास्तव झाली असली पाहिजे. तरी पण ज्यानं हा प्रसंग आणला, त्याच्या नरडीचा घोट घेण्याची बुद्धि तिच्या ठिकाणीं खास आहे यांत शंका नाहीं. ” याप्रमाणें त्या गृहस्थाच्या मनांत नानाप्रकारचे विचार चालले होते. इतक्यांत एकाएकीं दारावर कोणीं तरी थाप मारली. ‘ अशा रात्रीं आजपर्यंत कधीं कोणीं आलें नाहीं आणि आजच हें कोण दाराजवळ येऊन ठोठावतें आहे ! आपण आज ज्या सोंगाची बतावणी केली ती सर्व बाहेर तर पडण्याचा प्रसंग येत नाहींना ?’’ असेंहि त्याच्या मनांत आलें. परंतु बाहेरील मंडळींनीं दार ठोठावण्याचा सपाटा चालविल्यामुळें शेवटीं दार उघडल्याखेरीज गत्यंतर नाहीं असा विचार करून त्यानें दार उघडून बाहेर जी मंडळी उभी होती त्यांचे अंगावर जाऊन त्यांना हिंदुस्थानींत ‘ कोण आहे ? काय आहे ? कशाला आलां ? ’ असें दरडावून विचारलें. तों “ कोणी नाहीं, आम्ही गरीब मुशाफर चार असामी आतां गांवांहून आलों आहों, कुठें उतरायला जागा नाहीं. शिवाय ही वेळ फार चमत्कारिक. एवढ्याकरितां आपल्याला तसदी दिली.’’ असें मोठ्या उमद्या हिंदुस्थानीमध्यें त्यांनीं उत्तर दिलें. तें उत्तर ऐकतांच त्या आंतिल पुरुषाच्या मनावर कांहीं तरी फार विलक्षण परिणाम होऊन त्यानें त्या बाहेर आलेल्या मुशाफरांस आंत येण्याविषयीं रुकार दिला. तो रुकार मिळतांच ही मंडळी आंत घुसली व सगळ्यांनीं मिळून जवळचें फराळाचें काढून त्यावर हात मारला, आणि थोड्याच वेळांत एक असामी पहारा करण्यास जागा राहून बाकीच्या तिघांनीं निद्रेचा अंगीकार केला. मध्यरात्र उलटून गेल्यानंतर दुसरा एक इसम जागा झाला व चटकन् उठून पहारा करण्याची जागा स्वतः घेऊन तो जागत बसला व त्याचा सोबती निजला. यावेळीं रात्रीचे दोन वाजायला आले होते. त्या घरांतला आमचा मूळचा गृहस्थ पहारा करणारा पहिला गृहस्थ झोंपेंत गुंग झाला असें वाटतांच त्या जाग्या असलेल्या

गृहस्थाच्या अगदीं जवळ गेला, व त्यानें त्याच्या खांद्यावर हात मारून हलकेंच त्याच्या कानांत म्हटलें, "तुम्ही मला ओळखणार नाहीं, पण मी तुम्हांला पक्कें ओळखतों. तुम्ही येथें कां आलांत, याचाहि पण मला तर्क होतो. बाकीच्यांना एव्हां उठवूं नका. जरा बाहेर चला. मग मी तुम्हांला कांहीं सांगतों." हें त्याचें बोलणें ऐकून आपण बाहेर जाऊन त्याचें बोलणें ऐकून घ्यावें किंवा कसें असा प्रश्न मनांत उभा राहून त्याच्या मनाचा गोंधळ झाला. तें पाहून तो मूळचा इसम त्यास म्हणतो, "आपण बिलकूल शंका घेऊं नका. मी खरोखर तुमचा दोस्त आहें. तुमच्या कामांत तुम्हांला साहाय्य करावयाला मी कधींही मागें घेणार नाहीं. याउप्पर तुमच्या मर्जीची गोष्ट आहे." हे शब्द त्यानें फार दृढनिश्चयानें उच्चारलेले दिसले व इतकें बोलणें झाल्यावर तो पहारा करणारा गृहस्थ उठला व त्याच्याबरोबर बाहेर गेला. बाहेर जाण्याबरोबर त्यास तो म्हणतो, "आपलें नांव नानासाहेबच ना? आपण या ठिकाणीं अप्पासाहेबांवर गुदरलेल्या प्रसंगांतून त्यांना सोडविण्यासाठीं खटपट करायची म्हणून आलां आहां. मी तुम्हांला ओळख देणारच नव्हतों, परंतु तुम्ही कांहीं काम करण्यास आलां आहां. मीही तेवढ्याचसाठीं आलों आहें. हो, वेळ आहे, वखत आहे, मला तुमची, तुम्हांला माझी मदत जरूर लागेल. एवढ्याकरितां आपल्याला आधींच हें सर्व सांगून ठेविलें आहे. आतां तुम्ही आंत जा. जोंपर्यंत या विजापुरांत मी जिवंत आहें, तोंपर्यंत आपल्या केंसालाही धक्का लागण्याची बिलकूल भीति बाळगूं नका. मात्र जपून असा. या भुताटकीचे घरांत कोणी जरी राहिला, तरी त्याला त्रास द्यायला कोणी येत नाहीं. तुम्ही गोसाव्याच्या वेषांत खुशाल येथें रहा. मी दररोज रात्रीं याच सुमाराला येत जाईन. तुमचा रात्रींचा पहारा याच वेळीं ठेवा. शेवटीं मी तुम्हांला एवढेंच सांगतों कीं, जो तुमचा दुस्मन् तोच माझाही पण दुस्मन् आहे. जर कर्मधर्मसंयोगानें माझ्या हातांत सांपडण्याच्या अगोदर तो तुमच्या हातांत सांपडला, तर त्याला शासन करूं नका. माझ्याकरितां तें काम राखून ठेवा. त्याला मी आपल्या हातांनीं नरकयात्रेला पाठवीन, त्याच्या रक्तानें न्हाईन अशी घनघोर प्रतिज्ञा करून मी बसलों आहें..." इतकें अर्धवटच बोलून तो गृहस्थ तेथून चालता झाला.

---

२०. नानासाहेब नाहींसे झाले

नानासाहेब हे त्या विलक्षण गृहस्थाचें तितकेंच विलक्षण भाषण ऐकून अगदीं गोंधळल्याप्रमाणें झाले होते. त्यांच्या मनांत अनेक प्रकारचे प्रश्न घोळूं लागले. 'हा इसम कोण? जातीचा मराठा तर खास! पण हा माणूस आपल्याला फसवणार तर नाहीं?' असा विचार मनांत येऊन झालेला सर्व प्रकार बरोबरीच्या मंडळींपैकीं तानाजीस तरी निदान सांगून टाकावा असें वाटून त्यांनीं लागलीच तानाजीला रात्रीच्या प्रसंगाची हकीकत सांगितली. ती ऐकून तानाजीसही फारच चमत्कारिक वाटलें. बरोबर असणाऱ्या दुसऱ्या दोघांसहि त्यांनीं ती सर्व हकीकत सांगून ठेविली. नंतर सुमारें एक प्रहर दिवस आल्यानंतर तानाजी व नानासाहेब आपल्या वेषाला उचित अशा सर्व बाह्योपाधि व्यवस्थित बनवून 'आल्लक' करीत बाहेर पडले. सुमारें तास दोन तास हिंडल्यावर आपल्या मकाणांत परततांना एकाएकीं एका उंच अशा वाड्याच्या अगदीं वरच्या मजल्यावर नानासाहेबांची दृष्टि गेली व तेथलि खिडकींतील तरुण पुरुष पाहून नानासाहेबांस कांहीं केल्या तेथून आपलें पाऊल काढवेना. बरोबरीच्या सोबत्यानें तें पाहतांच वर पाहिलें. हा पुरुष कोण असावा, असा प्रश्न दोघांच्याहि मनांत उद्भवला असावा. नानासाहेबांचें हें पाहणें आतां फाजील दिसूं लागलें, म्हणून त्यांच्या सोबत्यानें त्यांस तेथून चलण्याविषयीं दहाबारा वेळां तरी इषारा केला असेल! पण नानासाहेबांचें पाऊल कांहीं केल्या तेथून पुढें पडेना. इतक्यांत वर खिडकींत उभा असलेला तो तरुण पुरुष खिडकींतून नाहींसा झाला.

एक दिवस झाला, दोन दिवस झाले, नानासाहेबांचें वेड कांहीं केल्या आंवरेना. तें अधिकाधिकच वाढत चाललें. रोज संध्याकाळीं आपल्या कामाला म्हणून बाहेर पडावें आणि काम एकीकडे राहून खिडकींत पाहिलेल्या तरुण पुरुषाच्या त्या वाड्यावरून पांचपंचवीस येरझारा घालाव्या असें चाललें होतें. शेवटीं तानाजीस राहवेना. तो त्यांस म्हणाला, "नानासाहेब, असेच दिवस आणखी घालावावयाचे म्हटलें तर कसें चालणार? उद्यां इकडून थैली गेली पाहिजे. त्या थैलींत लिहून काय पाठवणार? तर

बोला, तुमची वृत्ति अशीच किती दिवस रहायची? एव्हांना आपण कांहींना कांहीं तरी मार्गाला लागलें पाहिजे होतें." नानासाहेबांना तानाजीच्या या बोलण्याचें फार वाईट वाटलें. परंतु कांहीं केल्या त्यांना आपलें मन मोकळें करून सांगतां येईना. त्यांनीं नुसतें एवढेंच उत्तर मोठ्या मिनतवारीनें दिलें कीं, "पहिले दिवशीं रात्रीं ज्यानें आपल्याला घरांत जागा दिली, तो गृहस्थ पुन्हां एकदां भेटून त्याची आणखी तुमची गांठ पडावी आणि मग आपण पुढच्या उद्योगाला लागावं असं मला वाटत होतं, दुसरं कांहीं नाहीं. आजची रात्र वाट पाहून आपण उद्यां अगदीं बिनदिक्कत आपल्या उद्योगाला लागूं." याप्रमाणें दोघांचें बोलणें होऊन तो विषय तितकाच राहिला. ते दिवशीं संध्याकाळीं नानासाहेब बाहेर गेले नाहींतच. ते आपल्याशींच विचार करीत होते. इतक्यांत कोणी दारावर थाप मारली. तेव्हां आपले सोबती बाहेरून आले असावे असें वाटून ते दार उघडण्यास गेले. पण काय चमत्कार? दार उघडून पाहतात, तों तेथें कोणी सुद्धां नाहीं, कीं आसपास कोणा माणसाची चाहूल सुद्धां नाहीं. मागें वळून पाहतात, तों दाराच्या सापटींत एक कागदाचा तुकडा व त्यावर "आज मध्यरात्रींनंतर सगळी मंडळी निजली असतां आपण या घराच्या उत्तरेच्या अंगास वडाचा पार आहे तेथें यावें." एवढींच अक्षरें होतीं. तीं पाहतांच त्यांना मोठें चमत्कारिक झालें. ज्यानें आपणांस भेटतों म्हणून वचन दिलें, त्याचें हें बोलावणें आहे कीं, दुसऱ्याच कोणी आपणांस फसवून तेथें नेऊन धरून नेण्याचा घाट घातला आहे असें त्यांच्या मनांत आलें. तथापि आपण त्या बोलावण्याप्रमाणें जावें आणि काय आहे तें पाहावें असा विचार करून नानासाहेब मध्यरात्र होतांच उठले व आपलीं हत्यारें सरसावून बाहेर पडले. ते उत्तरेच्या बाजूस गेले व त्या पाराजवळ जातात तों त्यांजवर मागून तीन असामींनीं एकदम हल्ला केला. पुढून दोघांनीं त्यांच्या तोंडास बोळा दिला, आणि हें काय लचांड असें त्यांस वाटतें न वाटतें तोंच त्यांस तेथून उचलून नेलें. त्यांच्या दंगामस्तीचें कांहींही चालेना.

नानासाहेबांस उचलून घेऊन जाणारी मंडळी एका अत्यंत भव्य—केवळ किल्ल्याप्रमाणें दिसणाऱ्या—अशा वाड्याचे पिछाडीस जाऊन थबकली व

त्यांपैकीं एक माणूस पुढें होऊन त्यानें खूप खूप जाड अशा कापडानें त्यांचे डोळे बांधले व त्या मोठ्या थोरल्या वाड्याच्या तळघरांत नेऊन त्यांस कोंडून ठेविलें. आपणांस कोणीं, कोणाच्या वाड्यांत, कां ठेविलें आहे याचा नानासाहेबांस कांहींही अजमास करतां येईना. नानासाहेबांस जाऊन तास झाला, दीड तास झाला, तरीही त्यांचा परत येण्याचा कांहीं सुमार दिसेना; तेव्हां अर्थातच तानाजीस थोडीशी काळजी उत्पन्न झाली. शेवटीं आपल्या एका सोबत्यास जागें करून ते दोघे नानासाहेबांच्या शोधासाठीं बाहेर पडले. बिचारे पुष्कळ वेळपर्यंत भिरीभिरी हिंडून शेवटीं अगदीं निराश होऊन नानासाहेब नाहींसे झाले याबद्दल आश्चर्य करीत परत आपल्या त्या घराकडे आले. तों पहांटही झाली. सकाळ झाल्यानंतर पुन्हां त्यांनीं आपले वेष योग्य प्रकारें चढविले. एकास घरराखणीसाठीं ठेवले व दोघे पुन्हां नानासाहेबांच्या शोधाकरितां बाहेर पडले. ज्या तरुण मराठ्या सरदारास पाहून तो वेडावला त्याच्याकडे तर तो गेला नसेलना ? असेंही मनांत येऊन ते त्या मराठा सरदाराच्या वाड्याभोंवतीं घिरट्या घालूं लागले. वाड्याच्या समोर विनाकारण रिकामटवळे गोसावी हिंडत आहेत हें पाहून सरतेशेवटीं एक पहारेकरी त्यांचे अंगावर आला. परंतु गोसाव्यास साहजिक असणारा लोंचपटणा करून हिंदुस्थानींत "कांहीं नाहीं, बाबा, दोन मुठी भिक्षा मिळाली तर पाहतों. तूं घुस्सा करूं नकोस. तूंही मोठा दिलदार आदमी. पाहूं तुझा हात. हात तर दाखवशील ?" असें म्हणून तानाजीनें त्याचेजवळ अगदीं लगटच केली, व त्याचा हात ओढून घेऊन बळेंच तो पाहून हंसत हंसत त्यास म्हणतो, "आपल्या हातावर लक्षणं तर फार सुरेख आहेत. आपल्याला खरं वाटो न वाटो, पण आपल्या मनांत असलेली गोष्ट खचितच महिन्या दोन महिन्यांत घडून येणार याबद्दल शंका नको. आपण देवडीवर जाऊन जरा बसाल, तर मी पुष्कळ गोष्टी आपल्याला सांगेन." शिपाईबोआंनींही नाहीं नाहीं म्हणत त्यास देवडीवर नेलें.

---

२१. विजापूरची बातमी आल्यावर

नानासाहेब वगैरे मंडळी विजापुरास गेल्यापासून सासवडकडे काय चाललें होतें तें पाहूं. आज शिवबाराजांच्या नेहमींच्या रानांत मंडळी जमली असून तेथें गोसावीबोआ, शिवबाराजे व येसाजी ही त्रयी कांहीं खोल विचारांत गुंतलेली होती. विजापुराहून काय बातम्या येतात, काय नाहीं याच्यावर त्यांचे पुढील सर्व प्रयत्न अवलंबून होते. सुलतानगडासारखा किल्ला सर करणें म्हणजे उघड उघड आपण आपलें निराळें राज्य स्थापूं पाहतों असें स्पष्टपणें जगाला जाहीर करण्यासारखेंच होय. तेव्हां आतांची ती उडी मोठ्याच महत्त्वाची होती. प्रारंभीं प्रारंभीं तरी अपयश येतां कामा नये; आणि अपयश नको असेल तर मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे चांगल्या व विश्वासू लोकांची मदत जरूर पाहिजे. लोक थोडे असेनात, पण ते निश्चयीं, स्वीकारल्या कामासाठीं जिवावर उदार होणारे, आणि अत्यंत विश्वासू असे असले पाहिजेत. असे लोक मिळण्याविषयीं तजविजी काय करावयाच्या याबद्दल त्या त्रयीचा खल चाललेला होता. शेवटीं शिवबानें आपल्या धीरगंभीर वाणीनें जमलेल्या मंडळींस तेथें बोलाविण्याचा उद्देश कळविला. शिवाजीराजांच्या वाणीमध्यें अत्यंत माधुर्य होतें. इतकें कीं ऐकणाराच्या मनांत त्यानें सांगितलेलें काम कायावाचामनानें झटून करण्याची बुद्धि व्हावयाचीच. शिवबाच्या भाषणापाठीमागून बक्षिसें दिलीं गेलीं, त्यामुळें तर त्या लोकांचीं मनें जास्तच उल्हासित झालीं. आणखी दहा किंवा पंधरा दिवसांच्या आंत आपल्यासमोर शें दोनशें काय पण पांचशें माणूस आणून उभें करितों, असें त्यांपैकीं मुख्य मुख्य अशा सातआठ जणांनीं छातीस हात लावून सांगितलें, व नंतर मंडळी तेथून निघून गेली. शिवबा, स्वामी व येसाजी इतकीच मंडळी काय ती जागेवर शिल्लक राहिली. शिवाजी आपल्या मित्रांजवळ व गोसावीबोआंजवळ आपल्या वडिलांविषयीं, दादोजी कोंडदेवाविषयीं, व घरांतील इतर अनेक बाबींविषयीं मन खुलें करून बोलत असे.

सुमारें दोन दिवसांपूर्वीं कांहीं कारणावरून दादोजी शिवाजीस थोड्याशा कडक शब्दांनीं बोलले होते; आणि तेच दिवशीं शहाजी राजांचेंही तसलेंच कडक असें पत्र आलें होतें. सकाळीं आलेलें पत्र दादोजींनीं त्याजपाशीं दिलें

आणि दोन घटकांनीं त्यास बोलावून नेऊन ते थोडेसें मर्मच्छेदक बोलणें बोलले. "आपले हातून होणें तर कांहीं नाहीं. परंतु आपण कुळाची बदनामी मात्र कराल. गरीबगुरीब लोकांचीं गांवें लुटणें हें पुरुषार्थाचें काम नव्हे. अविंध मातबर, त्यास अजून रेसभरसुद्धां उपसर्ग लाविला नाहीं. असेच दिवे लाविल्यास खासें स्वराज्य होईल. शहाणपणा करून आहे तें नीट जतन करा. स्वराज्य स्थापणाराचें लक्षण कांहीं निराळेंच असतें. आपण स्वतःचा, कुळाचा आणि आपल्याशीं ज्यांचा ज्यांचा संबंध आहे त्यांचा उच्छेद मात्र कराल." आजपर्यंत दादोजी अशा प्रकारें कधींही शिवबास बोलले नव्हते. त्यामुळें शिवाजीस अर्थातच अतिशय वाईट वाटलें; आणि आजपर्यंत ज्या दादोजीस त्यानें उलट उत्तर म्हणून केलें नव्हतें त्यांस तो एकदम म्हणाला, "ज्या कुळांत अविंधांच्या सेवेखेरीज, आणखी त्या सेवेची मातबरी जाणण्याखेरिज दुसरें कांहींच होत नाहीं त्या कुळाचा उच्छेद झाला तर त्यांत मोठें वावगें तें काय होईल? माझ्या हातून अविंधाच्या ताब्यांतला प्रांत घेतला जाऊन त्यांस अजून उपसर्ग पोहोंचला नाहीं, याबद्दल स्वामीला वाईट वाटत असेल तर हीच प्रतिज्ञा कीं, आसपासच्या किल्ल्यांपैकीं एखादा तरी किल्ला शौर्यानें लढून काबीज करीपर्यंत पुन्हां मी आपल्याला किंवा मातोश्रीला तोंड दाखविण्यास येत नाहीं." हें आपल्या शिष्याच्या तोंडचें अगदीं अनपेक्षित असें उलट उत्तर ऐकून आपल्या बोलण्यानें यास मर्मभेद झाला, त्याचें परिमार्जन करावें म्हणून दादोजी कांहीं बोलणार तोंच शिवाजी तेथून उठला, आणि गुरुजींस साष्टांग नमस्कार घालून तेथून चालता झाला, तों तडक जिजाबाईकडे जाऊन त्यांना वंदन करून व "आईसाहेब, आतां आपली व माझी गांठ केव्हां पडेल याचा नेम नाहीं. पडली तर कांहीं तरी आपल्याला भूषण वाटेल अशाच स्थितींत पडेल, व न पडली तर आपल्या कुळाचा कलंक नाहींसा झाला असें समजा." असें बोलून जी स्वारी निघून गेली, ती तडक आपल्या देवळांत जाऊन दोन दिवसपर्यंत देवीजवळ तिची मानसिक अर्चा करीत बसली.

दोन दिवस उलटून गेल्यानंतर किंबहुना तिसराही दिवस उलटून जाऊन ऐन मध्यरात्र झाली, तेव्हां शिवबाच्या तोंडून एकदम कांहीं शब्द बाहेर पडले. शिवबाचें ध्यान पुरें झालें. स्वामीमहाराजांस त्यांनीं अंबा-

बाईची आज्ञा काय झाली म्हणून विचारलें. तेव्हां स्वामींनीं ध्यानीं ठेविलेले शब्द पुन्हां सांगितले; ते असे :– " वडिलीं बोलिलें तें हिताकारण. माझा कृपाप्रसाद न जाणोन बोलिलें; चित्तीं विषाद न धरावा. हातीं पराक्रम जहालेवर ऐसें बोलणें न होय. आपले प्रयत्नीं अंतर न द्यावें. प्रतिज्ञा केली तें त्वरितच होय. साहाय्य मेळविणें तें मेळविण्यांत अंतर पडो नये. माझी कृपा पूर्ण असे. " तीन रात्रीं उपोषण करून केलेल्या भवानीच्या पूजेचें मानासिक फळ प्राप्त झालें हें पाहून शिवबास अर्थातच मोठा आनंद झाला. सूर्याचें बिंब पूर्व क्षितिजावर दिसूं लागतांच रात्रीच्या उपोषणाचें पारणें दुग्धपान करून सोडिलें. नंतर ज्या किल्ल्यावर आपली नजर आहे, तो किल्ला घेण्यास आपल्यास मनुष्याचें बळ किती लागेल, वगैरे गोष्टींचा विचार शिवबा, स्वामी व येसाजी या तिघांनीं एकत्र बसून केला व वर सांगितल्याप्रमाणें मंडळी जमवून त्यांस सांगण्यांत आलें.

ती मंडळी निघून गेल्यानंतर शिवबा वगैरे मंडळी विजापुरास गेलेल्या मंडळीकडून आज उद्यां इतक्यांत पत्र येण्याची वाट पहातच होती. तों इतक्यांत रानाच्या अगदीं बाहेरच्या बाजूस रखवालीसाठीं ठेविलेला माणूस तेथें आला. त्यास पाहतांच व ठरल्याप्रमाणें त्यानें खुणेची कस्यारही स्वामींस व राजास दाखवितांच त्यांनीं त्या आलेल्या माणसास आपलेकडे आणण्याविषयीं हुकूम केला. तो माणूस येतांच त्यानें लवून मुजरा करून आणलेली थैली स्वामींच्या स्वाधीन केली. याप्रमाणें विजापूरची बातमी आल्यावर स्वामींनीं तें पत्र मंडळींस समग्र वाचून दाखविलें. विजापुरास मंडळी जाऊन पोहोंचल्यापासून तों नानासाहेब नाहींसे झाल्यापर्यंतची हकीकत त्यांत होती. पत्र वाचतांच मंडळीची चित्तवृत्ति कांहीं विलक्षण झाली. शिवबाच्या मनांत अनेक विचार येऊन तो एकदम म्हणाला, " स्वामीमहाराज, नानासाहेबांस कोणी तरी कांहीं तरी दगलबाजी करून गोत्यांत घातलें आहे. अशा वेळीं आणखी कोणी तरी तेथें गेलें पाहिजे. मी स्वतः जातों." स्वामींनीं शिवबाचें बोलणें स्वस्थपणें ऐकून घेतलें. पहिला आवेग कमी होऊं दिला आणि मग एकदम त्यास म्हणतात, " शिवबा, हें तूं काय मनांत आणलेंस ? अरे, तूं आयताच सांपळ्यांत जाऊं लागलास तर त्यांची किती चैन उडणार आहे ? भलताच विचार मनांत आणूं नको. तुझ्यावर येथें किती तरी गोष्टी अवलं-

बून आहेत ! तूं गेलास म्हणजे मेरुमणिच सुटून गेल्याप्रमाणें होणार आहे." हें बोलणें ऐकून शिवबा एकदम स्वामींकडे वळून म्हणतो, "स्वामी, माझे स्नेही संकटांत असतांना मी जर असा स्वस्थ बसेन तर मग स्वीकारल्या कामांत यश येण्याची कशाला आशा करावी ! जोंपर्यंत वेळ पडल्यास मी-सुद्धां त्यांच्या जिवाला जीव देईन असा त्यांच्या मनांत दृढ विश्वास राहील, जोंपर्यंत लढाईच्या तोंडावर जाण्याला मी कधींही भिणार नाहीं असें त्यांना पक्कें वाटत राहील, तोंपर्यंत स्वीकारलेल्या कार्यांत यश संपादण्याची मीं आशा धरावी. तें कांहीं नाहीं. माझे हे पाठीराखे कांहींना कांहीं तरी विलक्षण संकटांत पडलेले आहेत. त्यांचेजवळ जाऊन त्यांस धीर देणें हेंच माझें कर्तव्य !"

---

२२. तळघरांत

नानासाहेबांस कोणी तरी अगदीं अज्ञात अशा माणसांनीं फूस लावून फसवून व दगा करून तळघरांत कोंडून टाकल्यानंतर त्याचें मन व शरीर हीं जितकीं म्हणून अस्वस्थ असावयाचीं तितकीं यावेळीं होऊन गेलीं व तो केवळ दैवावर हवाला ठेवून आतां स्वस्थ बसला होता. इतक्यांत त्याच्या त्या तळघराचें दार उघडून कोणी तरी माणूस आंत आलें व नानासाहेबांचे अगदीं जवळ येण्याबरोबर म्हणालें, "साहेब, आपल्याला बहोत भूक लागली असेल नव्हे ? या दासीनं दुपारीं आपल्यास फळफळावळ पोहोंचवावी म्हणून आटोकाट श्रम केले. परंतु आपलेकडे येण्याला कांहीं केल्या संधि सांपडेना. जिवाची तडफड तडफड झाली. पण काय करूं ? जर माझा इकडे येण्याचा बेत जरा उघडकीस येता, तर माझीही आपल्याच-सारखी गति झाली असती. आतां आपल्यासाठीं हे जिन्नस मुद्दाम करवून आणले आहेत ते आपण खा." नानासाहेब स्वस्थपणें तिचें तें बोलणें ऐकून घेत होता. तिच्या चेहऱ्यावरून तिची आपल्या ठिकाणीं खरो-खरच भक्ति आहे असें त्यास खात्रीनें दिसून आलें. त्यामुळें तो थोडासा धीर करून तिला अस्सल उर्दू भाषेंत म्हणतो, "तूं माझ्याविषयीं इतकी

भक्ति मनांत धरतेस तर तूं हा वाडा कुणाचा एवढं तरी मला सांग. आणखी जर खरोखर तुला माझी कींव येत असेल, तर मला कागद, दौत, लेखणी आणून दे. मी एक पत्र लिहून देतों. तें घेऊन मी सांगतों त्या ठिकाणीं पोहोंचतं करण्याची कृपा कर." हें भाषण ऐकून त्या माणसाच्या-फतिमेच्या-डोळ्यांत अश्रु उभे राहिले. ती नानासाहेबांस म्हणाली, "साहेब, आपण काय सांगितलं आणखी तें करणं किती कठिण आहे याची आपल्याला कल्पना-सुद्धां नाहीं. असो. पण आपण धीरे धीरे घ्याल तर आपली ही सांगितलेली कामगिरी मी बजावीन, इतकेंच नाहीं, तर आपल्याला इथून सुटून जाण्याची तजवीज करून देईन. आपण कोणत्याही गोष्टीची गर्दी करूं नये." तिचें तें बोलणें इतकें मनःपूर्वक दिसलें कीं, तें ऐकून नानासाहेब स्तब्ध बसला. फतिमेनें पुन्हां नम्रतापूर्वक हात जोडून त्याला आपण आणलेल्या त्या जिन्नसांचें सेवन करावें अशाबद्दल आग्रह केला, व नानासाहेबांनींही त्या पदार्थांचा रसास्वाद घेतला.

दुसरे दिवशीं संध्याकाळीं आदले दिवशीं कबूल केल्याप्रमाणें फतिमेनें दौत, लेखणी व कागद आणून देऊन नानासाहेबांस आपलें पत्र लिहिण्याची विनंती केली. "आपल्याला दिवा देऊन व तो ठेवून, येथून मला जाणं शक्य नाहीं. आपलं लिहिणं झालं म्हणजे तें खत कोणाकडे पोंचवावयाचं तें मला सांगा. मी पोंचतें करितें." याप्रमाणें फतिमेनें नानासाहेबांस विनंती केल्यावर नानासाहेबांनीं पत्र लिहिण्यास बसल्यानंतर एकदम फतिमेस म्हटलें," मीं लिहूं तरी काय? मला कोणीं धरून आणलं? मी कोणाच्या वाड्यांत आहें? कांहीं ठाऊक नाहीं. यापेक्षां तुझ्या हातून होईल तर माझी सुटकाच करीनास?" तें त्याचें बोलणें ऐकून फतिमा किंचित् हंसली व त्यांस म्हणाली, "ए जनाब, संधि साधेल तेव्हां मी तें केल्याखेरीज राहणार नाहीं, पण ती गोष्ट आजच करतां येणार नाहीं. आज फक्त आपण हयात आहांत, भय बाळगण्याचं कांहीं कारण नाहीं, एवढं जर कुणाला कळवायचं असेल तर कळवा. मी स्वतः आपलें तें पत्र नेऊन देईन." फतिमेच्या म्हणण्याप्रमाणें करण्यांतच आतां शहाणपणा आहे, असा विचार करून नानासाहेबांनीं तानाजी वगैरे मंडळी ज्या ठिकाणीं उतरली होती तेथला पत्ता तिला सांगून दिला. थोड्याच वेळांत फतिमा त्यांची रजा घेऊन निघाली. जातांना फतिमेनें नानासाहे-

बांच्या कानांत कांहीं सांगितलें व तें ऐकिल्यापासून तो चित्राप्रमाणें केवळ तटस्थ बसला. ज्याच्या वाड्यांत आपल्यास आणून ठेविलें आहे तो तर आपल्या घराण्याचा मोठा स्नेही असून आपणांस त्यानें काय म्हणून धरून आणावें याचा त्याला कांहींही तर्क होईना. परंतु आपण आतां नानासाहेबांस विचार करण्यास सोडून विजापुरांत असणाऱ्या इतर कित्येक मंडळींकडे वळूं.

वाचकांस आठवत असेलच कीं, नानासाहेबांच्या सोबत्यांनीं त्या मराठा सरदाराच्या देवडीवरील रखवालदाराशीं सलगी करून देवडीपर्यंत मजल मारली होती. तेथें गेल्यानंतर गोसावीबोआंचें खासेंच जुळलें. एकंदर बस्तान ठीक बसलें असें पाहतांच गोसावीबोआंनीं हलकेंच, "हा वाडा कुणाचा? वाड्याचा मालक कोण?" वगैरे गोष्टी विचारण्यास सुरुवात केली व तें देवडीवरील शिपाईमंडळ त्यास आपआपल्या परीनें एकंदर हकीकत सांगत आहे, तोंच एकाएकीं आंतून एक हुजऱ्या येऊन त्यानें रखवालदाराला सांगितलें कीं, "गोसावीबोआंस वर सरकारस्वारींनीं बोलाविलें आहे." तें ऐकल्याबरोबर गोसावीबोआंच्या आनंदाला काय पारावार? जें इष्ट त्याच्यापेक्षांही अधिक प्राप्त झालें. आपल्या बरोबरीच्या सोबत्यास तेथेंच बसण्याबद्दलची खूण करून मुख्य गोसावीबोआ तो तरुण सरदार जेथें बसला होता तेथपर्यंत गेला व त्यास आशीर्वादवचन बोलून त्यांनीं आपण गरिबास कां बोलाविलें असें विचारलें. सरदारसाहेबांनीं अगदीं हलक्याशा आवाजानें शेजारच्या हुजऱ्यास तेथून निघून जाण्यास सांगितलें व मग हळूंच गोसावीबोआंस विचारलें, "गोसावीबोआ, तुम्ही कुठून आलां? तुमच्या बरोबर दुसरे दोघेतिघे होते ते कुठून आले? आणखी आमच्या वाड्याभोंवतीं आज पांचचार दिवस तुम्ही इतक्या आतुरतेनें कां घिरट्या घालीत आहांत? तुम्ही दिसतां तसे नाहीं ही गोष्ट मी समजून आहें हें ध्यानांत धरून उत्तरें द्या." हें बोलणें ऐकतांच ज्याप्रमाणें एखाद्यानें फुलांची वृष्टि अपेक्षावी आणि त्याच्याऐवजीं त्याच्या अंगावर वज्राघात व्हावा, त्याचप्रमाणें गोसावीबोआंची स्थिति झाली. परंतु सरदारसाहेबांनीं ओळखलें तेंच खरें असें एकाएकीं कबूल करणें म्हणजे मोठा वेडेपणा होय हें जाणूनच ते एकदम म्हणतात, "महाराज, आपल्यास कां शंका आली कांहीं समजत नाहीं. आम्ही दिसतों

तेच खरोखर आहोंत." हें गोसावीबोआंचें बोलणें संपतांच सरदारसाहेब किंचित् मोठ्यानें हंसून म्हणतात, "गोसावीबोआ, तुम्हीं बहाणा तर खूप केला. परंतु आपल्याला ओळखलं, इतकंच नव्हे तर आपल्याबरोबर ते दिवशीं आणखी एक गृहस्थ होते त्यांसही मीं ओळखलं. जर तुम्हीं शहाणे असाल तर तुमचा अशा तऱ्हेनें येण्यांत काय हेतु आहे तो सांगा. माझ्यापासून तो फुटेल अशी अगदीं सुद्धां भीति बाळगूं नका." हे एवढे शब्द ऐकतांच गोसावीबोआ फारच चकित झाले आणि तशा त्या गोंधळून गेलेल्या स्थितींतच ते त्या सरदारास म्हणतात, "सरदारसाहेब, या शंकेनेंच आपण आमच्या सोबत्यास कांहीं केलें नाहींना? त्याचा घात तर केला नाहींना? आपल्याला विनाकारण शंका असेल तर आमचा सोबती आमच्या स्वाधीन करा. आम्ही आजच्या आज आपला गाशा गुंडाळून इथून चालते होतों." हें बोलणें ऐकतांच सरदारसाहेबांची चर्या एकदम कांहीं चमत्कारिक होऊन ते उठून बसून अतिशय उतावळीनें म्हणतात, "काय? काय? तुमच्या सोबत्यास कोणीं पकडून नेलें? त्याचा घात केला? बोला, बोला, तो कोणता सोबती? जो पहिले दिवशीं आमच्या वाड्यापुढें उभा राहून मजकडे एकसारखा टक लावून पाहात होता तोच काय? तो केव्हां नाहींसा झाला? कुठें गेला? तुम्ही बोलत कां नाहीं?" एकाएकीं आपल्या सोबत्याविषयीं सरदारसाहेबांच्या मनांत इतकी काळजी कां उत्पन्न झाली, हें गोसावीबोआंस कांहीं केल्या समजेना! परंतु न जाणो ही सरदारसाहेबांची आतुरता आपल्यास फार उपयोगी पडेल असा विचार करून त्यांनीं एकदम म्हटलें, "सरदासाहेब, अशी स्थिति झाली आहे खरी. आमच्या सोबत्यास कोणी तरी दगलबाजी करून कुठें तरी अडकवून ठेविलें आहे. कारण तो आपण होऊन आम्हांस सोडून कुठें जाईल असें स्वप्नांत सुद्धां वाटत नाहीं." सरदारसाहेबांनीं तें ऐकून गोसावीबोआंस पुन्हां दुसरे दिवशीं येण्याबद्दल हुकूम केला व गोसावीबोआ तेथून चालते झाले. दुसरे व तिसरे दिवशीं गोसावीबोआ पुन्हां गेले. परंतु सरदारसाहेब त्यांस भेटले नाहींत व गांवांतही कोठें त्यांस नानासाहेबांविषयीं माहिती लागली नाहीं. मात्र शेवटले दिवशीं रात्रीं त्यांस नानासाहेबांची चिठ्ठी येऊन पोहोंचली.

नानासाहेबांस कबूल केल्याप्रमाणें फतिमेनें त्यांची चिठ्ठी गोसावीबोआं-

च्या मठींत आणली होती. चिठ्ठी वाचतांच गोसावीबोआंनीं फतिमेस आंत बोलाविलें, व नानासाहेबांस तेथून सोडविण्याची काय युक्ति करावी याबद्दल तिला विचारलें. ती सर्व कामगिरी तुम्ही मजवर सोंपवा, मी मोठ्या युक्तीनें त्यांस सोडवून आणून तुमच्या स्वाधीन करीन असें फतिमेनें गोसावीबोआंस आश्वासन दिलें, आणि ती तेथून जाण्यास निघाली. तोंच एका इसमानें तिचा शेवटपर्यंत पिच्छा पुरवला, आणि ती मागील दारानें घरांत शिरतांच हाही तेथून नाहींसा झाला.

दुसरे दिवशीं सकाळीं रोजच्याप्रमाणें प्रातर्विधि आटोपून व टिळाटोपी करून आमच्या गोसावीबोआंच्या स्वाऱ्या बाहेर पडल्या. ज्या वाड्यांत नानासाहेबांस तळघरांत कोंडून ठेविलें होतें, त्या वाड्याजवळ अर्थातच त्यांचे पाय वळले, परंतु त्यांस कांहींही अधिक माहिती लागली नाहीं. नानासाहेबांस पाहिले दिवशीं जो इसम भेटून ज्यानें हा वाडा त्यांचे ताब्यांत दिला होता तोही पुन्हां कोठें दृष्टिस न पडल्यामुळें तानाजीच्या मनाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली. अशा स्थितींत एके दिवशीं रात्रींचे सुमारास गोसावीबोआंचे मठीचे दारावर कोणीं मोठमोठ्यानें ठोकलें व एक काळाकभिन्न गृहस्थ त्यांच्यापुढें उभा राहिला. तानाजीस पाहतांच त्या काळ्याकभिन्न गृहस्थानें एकदम त्यास म्हटलें, "तुमचे ते दुसरे सोबती कुठें आहेत ?" हा प्रश्न त्यानें मोठ्या आतुरतेनें व इतक्या साहाजिकरीत्या केला कीं, तानाजीचे सर्व संशय थोडेसे डळमळले. तानाजीनें त्यास सर्व हकीगत सांगितल्यावर अत्यंत चकित होऊन तो तानाजीस म्हणाला, "आपल्या स्नेह्याला कोणीं कोठें नेलें, याची कच्ची हकीगत तुम्हांला ठाऊक असली तर मला सांगा. तुम्ही माझ्यावर गैरविश्वास धरूं नका. तुमचा सोबती काळाच्या तडाख्यांत जर सांपडला नसेल तर दोन किंवा तीन दिवसांचे आंत मी त्याला तुमच्यापुढें आणून उभा करीन." परंतु न जाणों कोणाचा कावा कसा असतो आणि कसा नसतो, असा विचार करून तानाजीनें त्यास कांहीं थांग लागूं दिला नाहीं. तो गृहस्थ मात्र ताबडतोब तेथून चालता झाला. मात्र 'आतां तीन दिवस तुम्ही येथून हलूं नका' असें त्यानें तानाजीस बजाविलें.

२३. अहंमदाचें कारस्थान

तो काळा गृहस्थ तानाजीच्या वाड्यांतून निघाला तो थेट आपल्या मकाणाला जाऊन कांहीं वेळ स्तब्ध विचार करीत बसला. विचार करतां करतां मध्येंच एकदम टाळी वाजवून तो आपल्याशीं म्हणतो, "हां, मी तरी मोठा मूर्खच म्हणावयाचा! ही गोष्ट केव्हांच माझ्या लक्षांत यावयाला पाहिजे होती. रणदुल्लाखानाखेरीज हें दुसऱ्या कोणाचेंच कृत्य नव्हे. आज दोन महिने झाले. तेथून सुटून जाण्याकरितां तिचे काय काय प्रयत्न चालले आहेत, हें मी पाहतोंच आहें. परंतु हा अधमाधम तिला कांहींही करून आपल्या नजरेच्या पलीकडे जाऊं देत नाहीं. अर्थातच आपल्या मार्गातला मोठा थोरला अडथळा दूर करण्याला त्याला आयतीच संधि सांपडली. मग तो कां कमी करील? तर मग आतां आपल्यास नजर ठेवण्यास आणि झुंजण्यास दुसरा एक शत्रु उत्पन्न झाला म्हणावयाचा." याप्रमाणें एकामागून एक नानाप्रकारचे विचार त्याचे मनांत चालले होते. नंतर त्यानें आपल्या एका अत्यंत विश्वासू नोकरास हांक मारून "रणदुल्लाखानानं याला नक्की कुठं ठेविलं आहे, कसं ठेविलं आहे याचा तूं छडा काढून आण. आतां आपण दोन दिवस तिकडेच लागलें पाहिजे" असें सांगितलें.

परंतु आपण आतां त्या काळ्या गृहस्थाला सोडून खुद्द रणदुल्लाखानाकडेच वळूं. आपला पाडाव करण्यासाठीं सय्यदुल्लाखान अहोरात्र खटपट करीत आहे, ही गोष्ट रणदुल्लाखान जाणून होताही. परंतु जोंपर्यंत आपण बादशहाशीं निमकहराम होत नाहीं, तोंपर्यंत बादशहा सय्यदुल्लाखानाचें कांहींहि ऐकणार नाहीं अशीहि पण त्याच्या मनाची पक्की खात्री होती. यामुळें रंगरावअप्पांना आणल्या दिवसापासून रणदुल्लाखानास असें खात्रीनें वाटत होतें कीं, आज नाहीं उद्यां आपण त्यांना पुन्हां सुलतानगडावर ठाणेदारी देऊं. परंतु काय उपाय करून आपण आपल्या वचनांतून मोकळे होऊं हेंच त्यास समजेना. बादशहाची मर्जी आपल्यावर नाराज झाली आहे हें तर तो जाणतच होता. बादशहाजवळ या बाबतींत एकदां दोनदां गोष्ट काढली

असतां त्यानें धड उत्तर दिलें नाहीं. आणि त्याच वेळीं बादशहानें सय्यदुल्लाखानाकडे कांहीं अर्थपूर्ण दृष्टीनें पाहिलें. तेव्हां हें गौडबंगाल काय आहे आणि त्यांतून सुटून जावयाचें कसें, याबद्दल त्याला मोठें गूढ पडलें होतें व त्याबद्दल विचार करण्यांत स्वारी गुंतली होती. इतक्यांत अहंमद आंत आला आणि म्हणतो, "गरीब परवर, आज चार दिवस झाले, मीं एक कामगिरी बजाविली आहे. आपण ती ऐकल्याबरोबर बहुत खूष होऊन जाल. सरकार, आम्ही नोकर डोळे असून आंधळ्यासारखे वागतों तेवढ्यावरून आम्हांला आंधळे समजूं नये. आमच्यापासून आपण किती जरी गोष्टी लपविल्या तरी त्या आम्हांला दिसणारच. आपण दिवसानुदिवस क्षीण होत चालला याचं कारण मी का ओळखून नाहीं? सरकार, आपली मोहबत ज्या परीवर आहे, त्या परीचा पहिला मालक पकडून आणून तळघरांत कोंडून ठेवला आहे." "त्या परीचा पहिला मालक? कोण? कोण? तो तुला कसा सांपडला? अहंमद, तूं काय बोलतो आहेस याचा तुला अर्थ समजतो आहे?" "हां जी अलबत! मीं त्यालाच पकडून आणला; हां त्यालाच!" "कोणाला! कोणाला! कुठें कसा पकडून आणलास?" रणदुल्लाखान फार संतापून त्याच्या अंगावर जाऊन कर्कश आवाजानें ओरडला. "जहांपन्हा! इथें विजापुरांत. गोसाव्याच्या वेषांत हिंडत होता. आपल्या या वाड्यापुढें उभा राहून त्या परीकडे पाहात होता. मीं त्याला ओळखला. आणखी लबाडी करून त्याला पकडून आणला." नानासाहेब आणि विजापुरांत! रणदुल्लाखानास या दोन गोष्टी खऱ्याच वाटेनात. ज्या माणसाला पकडण्यासाठीं बादशहाचे खलिते सुटले आहेत, ज्याच्यामुळें त्याच्या बापावर एवढी नाराजी झाली आहे तो माणूस आपण होऊन विजापुरांत येऊन निर्धास्तपणें हिंडेल हें रणदुल्लाखानास कांहीं केल्या शक्य वाटेना. त्याचें चित्त अस्वस्थ झालें. त्याला काय करावें तें सुचेना. तो अतिशय उद्विग्न झाला. त्याच्या डोक्यांत सुविचार आणि कुविचार यांचें तुमुल युद्ध सुरू झालें. "आणखी कांहीं दिवस असेच जाऊं द्यावे, आपण त्याला भेटूंच नये. आणखी दोन दिवस विचार करावा. चांगलें करणें काय आपल्या हातचें आहे. तेव्हांच त्याला सोडून तिची व त्याची भेट करून दिली, आणि आपल्या मदतीनें गुप्तपणें दोघांना लांब पोहोंचवून दिलें कीं झालें!" असा त्यानें विचार केला.

अरेरे ! गरीब बिचारा! चांगलें काम काय तेव्हांच आपण करूं, असें त्याला वाटत होतें, हा केवढा भ्रम! चांगलें काम मनांत येईल त्या वेळीं करणें जर शक्य असतें तर जगाची स्थिति आज किती निराळी झाली असती ! ज्याप्रमाणें एखादा मनुष्य खूप चिखलाच्या जागीं एकदां रुतला म्हणजे अधिकाधिक रुतत जातो, तद्वत् रणदुल्लाखानाची स्थिति झाली. शेवटीं आजचा दिवस तरी आपण नानासाहेबांस जेथल्या तेथेंच खितपत पडूं द्यावयाचें असा बत करून त्यानें आपल्या अस्वस्थ मनाला क्षणिक व काल्पनिक स्वस्थता आणली. अहंमदानें तो सर्व प्रकार पाहिला. आपल्या धन्याचें मन आपण म्हणतों त्या गोष्टीकडे वळणार हें त्यानें पुरें ताडलें, आणि मनांत असा बेत केला कीं, धन्याला न विचारतां आपणच त्याचा निकाल लावावा.

अहंमदानें दुसरे दिवशीं सकाळींच फातिमेची गांठ घेतली आणि म्हणाला, "आज रात्रींच आपण त्याला या जगांतून नाहींसा करूं. तूं मला या कामीं मदत कर. मदत येवढीच कीं, ज्याप्रमाणें त्याला आणला त्याप्रमाणेंच त्याचें प्रेत मुकाट्यानें घराबाहेर नेतां येईल अशी तजवीज ठेव. पुढची व्यवस्था मी करतों." त्याचा तो भयंकर विचार ऐकतांच फातिमेच्या सर्वांगावर शहारे उठले. तिनें त्याला एकदम "नाहीं, या कामांत मी तुला मदत करणार नाहीं" म्हणून सांगितलें. तरी लघळपणानें त्यानें म्हटलें "फातिमा ! पण धनीसाहेबांच्या मनांतून ही गोष्ट व्हावी असंच आहे." अहंमदाचें हें बोलणें चाललें असतांना फातिमा या प्रसंगांतून अहंमदाला फसवून आपण निसटून कसें जावें या विचारांत होती. आपल्या यजमानाच्या कानावर हें अहंमदाचें कारस्थान घालावें, ते बहुतकरून तें होऊं देणार नाहींत, असें अनेकवार तिच्या मनांत आलें. पण न जाणों आपल्या या सांगण्यानें काय होईल आणि काय नाहीं असें तिला भय पडलें. ते दिवशीं तिन्हीसांजाच ती कोठें नाहींशी झाली ती चांगली आठ घटका रात्रीच्या सुमारास परत आली. जिकडे तिकडे निजानीज झाल्यानंतर रात्रीच्या सुमारास अकरा घटकांस फातिमेनें मागील दार उघडलें व आंत कोणा एकास घेतलें. मध्यरात्र झाल्यानंतर थोड्याच वेळांत अहंमद तिला भेटला व तीं दोघेंही नानासाहेबांस कोंडलें होतें त्या तळघराकडे गेलीं. त्यांच्या मागोमाग दुसऱ्याही कोणा व्यक्तीची छाया होती.

२४. नानासाहेबांची सुटका

नानासाहेब अंधारकोठडींत पडल्या दिवसापासून त्याचें मन तर इतकें अस्वस्थ झालें होतें कीं अहोरात्र हजारों प्रकारचे विचार त्याच्या मनांत येत असत. केव्हांही दार वाजलें म्हणजे काय प्रसंग येतो आहे असें वाटून तो अगदीं कावराबावरा होत असे. इतक्यांत मध्यरात्रीं दार उघडून नागव्या तलवारीसह फातिमेबरोबर अहंमद आंत शिरला. आपला बळी एकदां निरखून पहावा म्हणूनच काय अहंमदानें कंदील घेऊन नानासाहेबांच्या तोंडासमोर असा वर धरला व त्यास उद्देशून म्हणतो, "अरे बेवकुब, ऊठ. आज तुझा पुरताच समाचार घेऊन टाकणार. तुझी औरत तुला सोडून ज्याच्याजवळ येऊन राहिली तो तुला जिवानिशीं सोडील काय?" हे शेवटले शब्द ऐकतांच नानासाहेबास क्षणमात्र सर्व त्रिभुवन अगदीं पूर्णपणें विलयाला गेल्याप्रमाणें भास झाला. परंतु तो पहिला हतवीर्यपणाचा झटका लौकरच नाहींसा झाला आणि तो एकदम संतप्त होऊन अहंमदास म्हणतो, "अरे हरामखोरा! तोंड संभाळून बोल. मी निःशस्त्र आहें एवढ्यावरच जाऊं नकोस. तूं आतां जें बोललास तें कांहींही हेतूनें बोल, पण त्यामुळें माझ्यावर तुझे अत्यंत उपकार झाले आहेत. त्यामुळें माझा शत्रु कोण हें मला समजून आलें. तरी ठीक आहे. आज तूं तरी मला या ठिकाणीं मार; नाहीं तर मी तरी तुझा मुडदा इथें पाडून तुझ्या त्या दुष्ट हरामखोर बेइमान मालकाचा यथेच्छ समाचार घेतों." इतकें बोलून त्यानें एकदम त्याचे अंगावर धांव घातली. अहंमदानें उपसलेली तलवार झटकन् पुढें केली, आणि तिरस्कारानें हंसत हंसत नानासाहेबांस तो म्हणतो, "वाहवा! वाहवा! माझ्या मुडद्यावर पाय देऊन तूं जाणं तर शक्य नाहींच. परंतु तुझा मुडदा मात्र मी उचलून कुठें तरी गाडून टाकण्याची सगळी कांहीं तयारी करून आलों आहे." नानासाहेबांनीं जिवावर उदार होऊन अहंमदाच्या कमरेस एकदम विळखा घातला, त्याबरोबर अहंमदानें आपला तलवार धरलेला हात नानासाहेबांचे अंगावर वार करण्यास उगारला. परंतु काय चमत्कार! त्याचा तो हात कांहीं केल्या खालीं येईना. तो वरच्यावर एका धिप्पाड पुरुषानें धरून ठेवला. अहंमद मात्र नानासाहेबांच्या दणक्यानें धाडकन्

खालीं आला. नानासाहेबानें त्यास साफ चीत करून उताणें पाडलें व तो त्याच्यावर बसला. आतां स्थिति बदलली. किती झालें तरी अहंमद् केवळ हुजऱ्या. प्रसंग येऊन ठेपल्यानंतर हुजऱ्यासारख्यांना शूरत्व तें कोठून राहणार? अहंमद् लागलीच गयावया करूं लागला. नानासाहेबांनीं अहंमदास एक ठोसा लगावून म्हटलें, "बेस्या हुजऱ्या, तुझा प्राण घेऊन मी आपले हात विटाळीत नाहीं. जा, तुला असाच सोडतों. फक्त मी येथून निसटून जाईपर्यंत माझ्या पाठीमागें येऊं नयेस म्हणून तुला जायबंदी करून टाकतों." इतकें म्हणून त्यानें पुन्हां त्याच्या उरांत दोनतीन ठोसे मारून त्यास बेशुद्ध पाडलें आणि तेथून निसटून जाण्यासाठीं नानासाहेब व त्याचा साहाय्यकर्ता पुरुष दारांत येतात, तोंच समोर कोण? ज्याच्यावर सूड उगविण्याचा नानासाहेबांनीं क्षणापूर्वी निश्चय केला होता तो रणदुल्लाखान!

रणदुल्लाखानाच्या मनाची मागें सांगितलेली स्थिति फार वेळ कायम राहिली नाहीं. पुन्हां त्याचें मन त्यास खाऊं लागलें. एकेक क्षण दूरदूर लोटून सत्कार्यबुद्धीची त्यानें केवळ अवमानता मांडली होती. परंतु जात्याच तो सत्परायण असल्यामुळें आपण भलत्याच मोहपाशांत पडलों, आजपर्यंतची आपली दानत आपण खराब करून घेतली, असल्या विचारांचा त्याच्या मनावर अधिकाधिक पगडा बसून अहंमदास बोलावून आणण्याबद्दल त्यानें आपल्या एका नोकरास सांगितलें, परंतु अहंमद् कोठेंहि सांपडेना. आपली संमति सहज मिळेल असें समजून त्यानें नानासाहेबांचा प्राण तर खरोखरच घेतला नसेलना? असा भयंकर विचार त्याचे डोक्यांत एकदम उभा राहिला. शेवटीं बरीच रात्र झाल्यावर एका नोकरानें अहंमद व फतिमा अमक्या बाजूला तळघराकडे गेलीं आहेत असें येऊन सांगितलें. रणदुल्लाखान तत्क्षणींच उठला आणि त्या तळघराच्या दाराशीं येतो तोंच वर सांगितल्याप्रमाणें नानासाहेबांची व त्याची दृष्टादृष्ट झाली.

आधींच नानासाहेबांच्या चित्ताचा विलक्षण विक्षोभ झालेला आणि रणदुल्लाखानाविषयीं त्यांचें मन अत्यंत दूषित झालेलें. त्यामुळें त्यास पाहण्याबरोबर नानासाहेबांचें पित्त खवळलें आणि तो मागला पुढला कांहीं एक विचार न करतां रणदुल्लाखानास म्हणतो, "ए सैतान, तूं आतां मला मुकाट्यानें जाऊं दे. तुझीं सगळीं कारस्थानें मला समजून आलीं. आतांपर्यंत तूं माझी

इतकी विटंबना केली आहेस कीं, तुझें तोंड दृष्टीस पडल्याबरोबर मीं तुझ्या रक्तानें स्नानच करावयाला पाहिजे. पण-पण ही वेळ नव्हे." हा एकंदर प्रकार पाहून व नानासाहेबांचें भाषण ऐकून रणदुल्लाखान चकित होऊन स्तब्ध उभा राहिला. तोंच त्याच्या मागल्या बाजूनें एक अत्यंत मंजुळ परंतु आर्त स्वर कानीं पडला. तो ऐकतांच मागें वळून पाहतो तों आपली बहीण मेहेरजान फतिमेच्या हाताचा आधार धरून मागेंच उभी राहिलेली. तिला पाहण्याबरोबर त्याच्या तोंडून अर्थातच "काय मेहेरजान? तूं इथें कशी?" असा प्रश्न निघाला आणि हा सर्व प्रकार आहे तरी काय याबद्दल तो जों आश्चर्य करीत आहे, तोंच इकडे नानासाहेब व त्याचा साहाय्यकर्ता पुरुष तेथून चालते झाले. याप्रमाणें अखेर नानासाहेबांची सुटका झाली.

दुसरे दिवशीं रणदुल्लाखानानें फतिमेस मेहेरजान जनाना सोडून मध्यरात्रीं तळघराकडे आली कशी याबद्दल विचारलें. तिनें एकदम हात जोडून गयावया करून उत्तर दिलें, "सरकार, गरीब दासीला माफ होईल तर सर्व कांहीं आपल्यास सांगून देतें. अहंमदानें मला आपण त्या मराठ्याला ठार मारण्याचाही हुकूम दिला असें सांगितलें. हें मला खरें वाटेना. कांहीं तरी करून त्याला वांचवावा असा विचार मनांत येऊन ऐनवेळीं बीबीसाहेबां-कडून अहंमदास सांगून कांहीं झालें तर पाहावें, आणि मग त्यांच्याकडून आपल्याजवळ ही सर्व हकीकत सांगावी असा मीं विचार केला. बीबी-साहेबांनीं तेव्हांच ती गोष्ट कबूल केली आणि त्या आपण पाहिल्याप्रमाणें रात्रीं तेथें आल्या." फतिमेनें आपल्याकडून जें कांहीं सांगितलें तें सारें रणदुल्लाखानास खरें वाटलें काय? रणदुल्लाखानाच्या चर्येवरून तर तसें कांहीं दिसलें नाहीं, परंतु तो कांहीं बोलला नाहीं.

नानासाहेब व त्याचा तो साहाय्यकर्ता काळा पुरुष हे दोघेही तेवढ्या रात्रीं बाहेर पडल्यानंतर आपल्या सोबत्यांस जाऊन मिळण्यासाठीं निघाले. त्या काळ्या गृहस्थानें जातां जातां सांगितल्याप्रमाणें तीन दिवसपर्यंत तानाजीनें तें ठिकाण सोडलें नव्हतें. विजापूरच्या राज्यप्रकरणीं जितकी म्हणून माहिती पाहिजे होती तितकी आपणांस उपलब्ध झाली. बादशहा विलासी आणि विशेषतः एका स्त्रीच्या अंकित, व ती मिळवून देणाऱ्या सय्यदुल्ला-खानाचाच वरपगडा झाला आहे. अशा स्थितींत शिवबांनीं मनांत

आणल्याप्रमाणें खरोखरीच एकादा किल्ला घेतल्यास त्याबद्दल इकडे दाद्-सुद्धां लागावयाची नाहीं, अशी दरबारच्या अंतःस्थितीची बरीच माहिती त्यानें मिळविली. आज नानासाहेब या अरिष्टांत सांपडते ना, तर न जाणों याचे आधींही आपण प्रयाणाचा बेत केला असता असाहि विचार त्याच्या मनांत आला.

त्या काळ्या गृहस्थानें सांगितलेले तीन दिवस तर उलटून गेले. सुमारें एक प्रहर रात्र झाली. अद्यापि त्या काळ्या गृहस्थाची कांहींच बातमी नाहीं हें पाहून तानाजीचें मन अगदीं निराश झालें होतें. इतक्यांत मध्य-रात्रीनंतर थोड्याच वेळांत नानासाहेब व तो काळा गृहस्थ दोघेही एकदम त्याचेपुढें येऊन उभे राहिले. क्षणमात्र तानाजीस आपण जागेच आहोंत कीं स्वप्नांत आहोंत याबद्दल संशय वाटला. त्या काळ्या गृहस्थाचे उपकार मानण्यास शब्दांची तर त्यास पुरीच उणीव भासली. घटकाभर एक-मेकांशीं झाल्या गोष्टीबद्दल विचारपूस करण्यांतच वेळ गेला. नानासाहेबांनीं अत्यंत संतप्त होऊन आपला एकंदर वृत्तांत सांगितला. नानासाहेबांचें अंतःकरण एकदम खुलें झाल्याप्रमाणें होऊन तो तानाजीस म्हणतो, “तानाजीराव, मीं शिवबाच्या पायीं स्वतःच वाहून घेतलें आहे. निदान सुलतानगड त्याचे स्वाधीन होईपर्यंत तरी मी सर्वथा त्याचा आहें. पण या दुष्ट रणदुल्लाखानानें ज्याअर्थी माझ्या सगळ्या सुखाचा सत्यानाश करून सोडला आहे, त्याअर्थीं मला या गोष्टीचा पक्का सूड घेणें जरूर आहे. मला या विजापुरांत आणखी एकच दिवस राहूं द्या, मग तुमच्याबरोबर येतों. झाली ही सर्व गोष्ट वडिलांना सांगणें अतिशय जरूर आहे. केसानें गळा कापणाऱ्या कसायाच्या तावडींत तुम्ही सांपडला आहां हें त्यांना सांगितल्या-खेरीज व त्यांचे डोळे उघडण्याचा आणखी एकदां प्रयत्न केल्याखेरीज येथून निघून जाणें मला मुळींसुद्धां प्रशस्त वाटत नाहीं.” इतकें बोलून त्या आपल्या साहाय्यकर्त्या पुरुषाकडे तो वळला आणि त्यास किंचित् नम्र-पणानें म्हणतो, “महाराज, आपण आजपर्यंत मला साहाय्य केलेंत, तसेंही पुढें करा. आज मी तुमच्याजवळ एवढेंच मागतों कीं माझी आणखी माझ्या वडिलांची एकदां गुप्तपणें गांठ घालून द्या.” हें नानासाहेबांचें मागणें ऐकून

तो गृहस्थ किंचित् हंसला मात्र. त्या हंसण्यांत खिन्नपणाची झांक होती; तानाजीस त्या एकंदर बोलण्याचा नीटसा अर्थच समजला नाहीं.

---

२५. बापलेकांची मुलाखत

समान शील आणि समान व्यसन हीं ज्यांच्या ठिकाणीं असतील, त्यांना एकमेकांविषयीं प्रेम वाटावयाचें आणि त्यांचें परस्परांशीं सख्य जडायचें, असा साधारणतः अनुभव आहे. त्या अनुभवाला अनुसरूनच नानासाहेबांचें व त्या काळ्या गृहस्थाचें सख्य होतें. नानासाहेबांचें बोलणें संपतेवेळीं त्या गृहस्थानें खेदयुक्त हास्य केलें. बराच वेळ तो कांहींच बोलला नाहीं. नंतर तो हलकेंच म्हणतो, " नानासाहेब, या तुमच्या मित्रांच्या देखतच आतां मी तुम्हांला चार गोष्टी सांगतों त्या ऐकाल तर पाहा. तुमच्या वडिलांची माहिती तुम्हांला तर चांगलीच आहे. पण मी तुम्हांला सांगतों, तुम्ही अगदीं अंतःकरण खोलून उघडं करून जरी सांगितलंत, तरी त्यांचं मन बदलायचं नाहीं. रणदुल्लाखानाचा आणखी त्यांचा स्नेह फार. तुम्ही कांहीं त्याच्या विरुद्ध बोललांत, तरी त्यांना बिलकूल खरं वाटायचं नाहीं. तुम्हांला विजापुरांतल्या दरबारांतली जी काय माहिती लागायची, ती सगळी लागली आहे, आतां तुम्ही या ठिकाणीं वाजवीपेक्षां फाजील एक क्षणभरसुद्धां राहूं नये. तुम्हीं आतां जावें असें मला वाटतें." हें त्याचें भाषण नानासाहेब मुकाट्यानें ऐकत होते. त्या भाषणांतील प्रत्येक अक्षर खरें आहे अशी त्यांची पक्की खात्री होती, तथापि त्यांनीं आपला आग्रह कायमच ठेविला. शेवटीं बापाची व त्यांची भेट घालून दिलीच पाहिजे असें वाटून त्या काळ्या गृहस्थानें तेथून कांहीं वेळ निघून जाण्याची परवानगी घेतली. नंतर थोड्या वेळानें पुन्हां परत येऊन तो त्यास म्हणाला, " ठीक आहे. आज प्रहर रात्रीला तुम्ही इथें तयारी ठेवा. प्रहर रात्रीच्या सुमारास कोणी त्यांकडे येत नाहीं किंवा ते कोणीकडे जात नाहींत; तुम्हांला मी त्या वेळीं घेऊन जाऊन सुखरूप त्यांच्या वाड्यांत प्रवेश करवितों." असें सांगून तो तेथून चालता झाला. याप्रमाणें शेवटीं बापलेकांची मुलाखत होण्याचें ठरून नानासाहेबांस समाधान

वाटलेंसें दिसलें. ठरल्याप्रमाणें तो काळा गृहस्थ त्यास न्यावयास आला. त्यानें आपल्याबरोबर मराठ्यास शोभणारा असा एक पोशाख आणला होता. नानासाहेबांनीं तो पोशाख चढविला आणि ते बाहेर पडले व निर्विघ्न-पणें रंगराव अप्पासाहेबांच्यापर्यंत त्यांची दाद पोहोंचली. कोण मराठा सरदार आणि एवढ्या रात्रीं कां आला आहे याचा अप्पासाहेबांस कांहींच अजमास होईना. परंतु त्या सरदाराच्या चेहऱ्याची बाह्यरेषा दृष्टीस पडतांच त्यांनीं त्यास ओळखलें, आणि चर्या लागलीच बदलून "कोण तुम्ही? एवढ्या रात्रीं माझ्याशीं एकीकडे काय बोलायला आलां आहां?" असें त्यास विचारलें. "मी आपला मुलगा नाना. तसंच कांहीं विचारायचं-सांगायचं होतं म्हणून ......". "माझा मुलगा? माझा मुलगा मेला! त्याचा आणखी माझा आतां कांहीं संबंध नाहीं. माझ्या तोंडाला काळोखी लावली आणखी तो निघून गेला, त्याच दिवशीं तो मला मेला. जा तूं येथून. तुझं तें काळं तोंड माझ्या डोळ्यांसमोर नको. नाहीं तर या घटकेस, या क्षणाला तुला गिरफदार करून बादशहाच्या पुढें नेऊन उभा करीन. कोण आहे रे तिकडे?......"

नानासाहेब अणुमात्र न डगमगतां अगदीं शांतपणानें म्हणतात, "आपण असें म्हणाल—नव्हे करायला तयार व्हाल, हें माझ्या मनांत आधींच आलें नाहीं असें नाहीं. अप्पासाहेब, स्वामिभक्ति करा पण जिथें स्वामी सेवकाची चाड बाळगील तिथेंच करा. तुम्हीं आजपर्यंत विचारांत, कृतींत, स्वप्नांत तरी कधीं स्वामिद्रोह केलेला तुम्हांला आठवतो का? मग आपली कां ही स्थिति?" "ही स्थिति? ही स्थिति अशी कां म्हणून तूं विचारतोस! निर्लज्जा, बेहराम, तुला लाज नाहीं वाटत असा प्रश्न विचारायला? ही स्थिति तुझ्यासारखा कुलांगार माझ्या पोटीं आला म्हणून! माझ्यापुढें तूं आलास म्हणजे पुत्र-मोहाच्या पाशांत सांपडून मी कर्तव्याला विसरेन असें तुला वाटलें होय! पण नांवसुद्धां घेऊं नकोस; अजून तुझ्या मुसक्या बांधून तुला हुजूरच्या पायांजवळ पाठवला नाहीं, तेवढें पुरें. जा, तूं जा!" "जातों. जातों. बाबा, अप्पासाहेब, आपल्या दृष्टिसमोर नको, तर जातों. पण ज्याला तुम्ही आपला दोस्त समजतां तोच तुमचा कट्टा दुष्मान्. त्यानंच तुमच्या कुळाला, नांवलौकिकाला आग लावली आहे." "चल नीच, नीच कारट्या;

आतां एक क्षणभरसुद्धां तूं माझ्या डोळ्यांसमोर उभा राहूं नकोस. जे माझे दोस्त, ते तुझे दुष्मान्. जे माझे दुष्मान्, ते तुझे दोस्त; येवढीच गोष्ट खरी." अप्पासाहेबांचें हें भाषण ऐकून नानासाहेबांचा संताप, द्वेष, खेद त्यांच्या पोटांत मावेना. त्यांच्या मनांतून जी काय शेवटली अगदीं रामबाण गोष्ट सांगावयाची होती ती मोठ्या जोरदार शब्दांनीं त्यांच्या तोंडून बाहेर पडली व ती कानीं पडल्याबरोबर मात्र अप्पासाहेबांची चर्या एकदम बदलून ते एकदम म्हणाले, "अशक्य! रणदुल्लाखान असला नीचपणा कधींहि करणार नाहीं!" "आणखी केला असला तर?" नानासाहेबांनीं दांतओठ खाऊन अत्यंत संतप्त होऊन विचारलें. अप्पासाहेब त्यावर कांहीं बोलणार तोंच "पण नाहींच केला अशाबद्दल पाहिजे तशी खात्री करून देण्यास तो तयार आहे" असे निराळ्याच एका व्यक्तीचे शब्द कानीं आले.

ही आलेली व्यक्ति म्हणजे रणदुल्लाखान होय हें नानासाहेबांनीं केवळ आवाजावरून ओळखलें आणि एकदम त्यांच्या सर्वांगाचा संताप झाला. अप्पासाहेबांकडे वळून नानासाहेब म्हणाले, "ठीक आहे, अप्पासाहेब! आतांपर्यंत माझ्याकडून जें काय करावयाचं तें मीं केलं. आपल्याला अद्यापि या आपल्या दुष्मानांचा विश्वास अधिक. ठीक आहे. मी येतों. यानं आतां संभाळून मात्र असावं" असें म्हणून तो तेथून चालताही झाला. अप्पासाहेब तर हा एकंदर प्रकार आहे तरी काय असें वाटून अत्यंत चकित झाले होते. बऱ्याच वेळानें रणदुल्लाखान त्यांस म्हणतो, "अप्पासाहेब, मी रणदुल्लाखान, स्पष्टपणें बोलतों त्याची माफी असावी; मी आपल्याकडे आलों तो आपला कांहीं अपराध माझ्या हातून घडला आहे तो सांगून क्षमा मागण्यासाठीं आलों आहे. झाला अपराध माझ्या ब्रीदाला अगदीं अयोग्य असाच घडला, परंतु तो घडला त्याच्यापलीकडे घडला नाहीं. खुदानें मला वेळीं जागें केलें. अप्पासाहेब, मी आपल्याला इत्थंभूत हकीगत सांगतों. ती आपण ऐकून घ्या." इतकें बोलून त्यानें आपण सुलतानगडावर जातांना आपली व एका तरुण मराठ्याची गांठ कशी पडली व त्यास आपण आपल्याबरोबर विजापुरास कसें आणून ठेविलें वगैरे सर्व हकीगत जशी झाली तशी सांगितली व शेवटीं "अप्पासाहेब, तो तरुण मराठा पुरुष म्हणजे आपली पतिव्रता सून होय" असें सांगितलें.

रणदुल्लाखानाचे ते शब्द ऐकतांच अप्पासाहेब अतिशय संतापून क्रुद्ध दृष्टीनें त्याच्याकडे पहात राहिले. असा एकंदर प्रकार होईल याचें अनुमान रणदुल्लाखानानें केलें होतेंच. योग्य तितकाच वेळ जाऊं दिल्यावर तो पुढें म्हणतो:-"अप्पासाहेब, मी हे शब्द उच्चारण्याबरोबर आपण संतापानें अगदीं लाल व्हाल व कदाचित् मला मारण्यालाही धांवाल असें मला वाटलें होतें. पण मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, झाल्या हकीगतींत त्या साध्वीचा कांहीं संबंध आहे, तिच्या शुद्ध नांवाला आणखी ब्रीदाला कलंक लावण्याजोगं कांहीं घडलं आहे, असं मात्र मनांत आणूं नका. ती मला मातु:श्रीसमान आहे. तिच्यासारखी पतिव्रता दृष्टीस पडणंसुद्धां दुर्मिळ. माझ्यामुळें तिचा छळ होऊं नये. मला वाटेल तें पारिपत्य झालें तरी मी सोशीन, हूं कीं चूं करणार नाहीं." रणदुल्लाखान एकदम थांबला; त्याला आतां बोलवेनाच, इतका तो सद्गदित झाला होता. त्याला खरोखरच झाल्या गोष्टीबद्दल वाईट वाटत होतें. तो आणखी कांहीं बोलणार तोंच अप्पासाहेब त्यास एकदम म्हणाले, "खानसाहेब, तुमच्या शब्दांवर माझा विश्वास नाहीं असें नाहीं. पण तुमच्या हातून झाली ही गोष्ट वाईट झाली. असो. तुम्ही तिला आपली मातोश्री म्हणतां यांतच सारं आलं. आपल्याला झाल्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप झाला आहे. तेव्हां आतां अधिक बोलणं वाजवीच नाहीं." इतकें बोलून अप्पासाहेब स्वस्थ बसले आणि रणदुल्लाखानहि कांहीं वेळ स्तब्धच बसला. त्यास पुढें काय बोलावें तें सुचेना. परंतु शेवटीं तो म्हणतो, "अप्पासाहेब, मी आतां आपल्याला एक आनंदवार्ता सांगणार आहें; आपली येथून सुटका झाली कालच. काय कारण असेल तें असो, हजरतींनीं मला आपण होऊन विचारलें, कीं सुलतानगडच्या किल्लेदाराची काय हकीगत आहे?" मीं त्यांना सांगितलं, 'ठीक आहे.' त्याबरोबर परवां त्यांना मुलाखतीला घेऊन या, त्यांना पुन्हां किल्ल्यावर जाऊन पूर्वीप्रमाणें किल्लेदारी करण्याचें काम करण्याचा हुकूम देतों असे शब्द निघाले. आपल्यावरची बावटळ आतां गेली. आपण जाल तेव्हां आतां माझी एकच विनंती आहे. माझी बहिण मेहेरजान दिवसानुदिवस अधिकाधिक क्षीण होत चालली आहे. आणखी सुलतानगडावर जाऊन राहण्याचा तिनें एकसारखा निदिध्यास घेतला आहे. आतां आपण जाणार, आपल्याबरोबर त्याही

जाणार; तेव्हां मला तिला व तिच्या दासीला पाठविण्याबद्दल मुळींच कांहीं काळजी वाटत नाहीं. आपण तिचा आपल्या मुलीप्रमाणें संभाळ कराल यांत मला तिळमात्र शंका वाटत नाहीं." इतकें बोलून रणदुल्लाखान तेथून निघून गेला.

रणदुल्लाखान गेल्यानंतर अप्पासाहेबांची स्थिति फारच विलक्षण झाली. त्या रात्रींत झालेल्या एकंदर गोष्टी इतक्या विलक्षण व इतक्या एकामागून एक घडल्या कीं म्हाताऱ्यास किती वेळ तरी पुनः पुनः भ्रांति पडे कीं, आपण जागेच आहों कीं स्वप्नांत आहोंत; आणि अशा स्थितींतच सकाळ उजाडली. दुसरे दिवशीं खरोखरच बादशहाकडून त्यांस पाचारण आलें आणि बादशहाची मुलाखत झाली. "मुलाच्या मोहानें तुम्ही निमकहराम होऊं नका. तो जर तुमच्या ताब्यांत सांपडला, तर त्याला निवळण्याचा यत्न करा, नाहींतर दरबारांत वर्दी देऊन इकडे पाठवून द्या" असें बादशहानें म्हटलेंच. त्यावर अप्पासाहेब कांहीं बोलणार तोंच रणदुल्लाखान जवळच होता, त्यानें अप्पासाहेबांच्या मनाची चलबिचल पाहून एकदम म्हटलें, "हां हां, असं तर ते करण्याला कधीं चुकणार नाहींतच." यानंतर बादशहाकडून अप्पासाहेबांस काय हुकूम मिळायचे ते मिळाले आणि थोडाबहुत अधिकच अधिकार मिळून त्यांस निरोप मिळाला. परंतु दोन दिवसांत इकडे काय मौज झाली पाहा. रणदुल्लाखानास पश्चात्ताप होतांच त्यानें आपल्या त्या मराठ्या सरदारावरील बाहेर पडण्याचा कडक प्रतिबंध कमी केला व त्याचा फायदा घेऊन त्याच रात्रीं तो मराठा सरदार व त्याच्या बरोबरची ती स्त्री एकदम नाहींशी झाली. दुसरे दिवशीं अप्पासाहेबांची व बादशहाची मुलाखत होऊन ते परत आल्यावर आतां त्यांना सर्व मंडळींसमवेत रवाना करून द्यावयाचें अशा विचारांत रणदुल्लाखान असतां त्यास ती बातमी येऊन लागली. मग काय विचारतां? त्याच्या मनाची स्थिति काय झाली असेल ती त्याची त्याला ठाऊक! आतां हें अप्पासाहेबांस सांगितलें तर त्यांना काय वाटेल? आपल्या शब्दांवर त्यांचा विश्वास तरी बसेल काय? असे अनेक विचार बिचाऱ्याच्या मनांत येऊन त्याची चित्तवृत्ति गोंधळून गेली.

२६. परत जातात

आपल्या बापाच्या घरांतून बाहेर पडल्यानंतर नानासाहेब आपल्या मंडळीकडे आले. त्यावेळीं त्यांची चर्या विलक्षण झालेली पाहिली, तेव्हांच मंडळींनीं ताडलें कीं हा ज्या उमेदीनें गेला त्या उमेदीचें कांहीं चीज झालें नाहीं. त्यामुळें आतां याला येथून जितक्या लवकर बाहेर काढावा तितकें चांगलें असें मंडळींनीं ठरविलें आणि त्यांचें बिऱ्हाड-बाजलें सर्व पाठीवरच असल्याकारणानें त्यांनीं तात्काळ विजापूर सोडण्याचा निश्चय केला. नानासाहेबांनीं त्यांस आपण तेथेंच राहून सूड उगविण्याचा बेत कायम केल्याचें सांगितलें. परंतु मंडळी कोठची ऐकणार ? त्यांनीं त्यास अनेक प्रकारांनीं सांगितलें कीं, ही वेळ तुझी विजापुरांत रहाण्याची नव्हे. आपण आपल्या सूडाबद्दल त्याच्या तोंडावर बोललों आहों तर तो सावध असणारच. आपल्या दुष्मानाला कांहीं दिवस गाफील ठेवलें तरच आपल्या मनांतील हेतु साधेल, नाहीं तर साधणें केवळ अशक्य. त्याच्या त्या अज्ञात सोबत्याचीहि सल्ला तशीच पडली. त्यामुळें आतां तेथून मंडळी निघण्यास क्षणाचाहि विलंब लावण्यांत कांहीं अर्थ नव्हता. तथापि एकदम साऱ्यांनीं शहर सोडून बरोबर जाणें कदाचित् धोक्याचें होईल. तेव्हां सगळ्यांनीं बरोबर न जातां शहरापासून सुमारें सात कोसांवर एक खेडें होतें तेथें सगळ्यांनीं जमावें असें ठरवून लागलीच चार वेशींनीं चौघेजण बाहेर पडले.

मंडळी परत जातात असें पाहतांच नानासाहेबांचा सोबती त्यांचेबरोबर बाहेर पडला व ठरल्याजागीं जाऊन पोहोंचण्याला कोणकोणत्या रस्त्यानें कसें कसें जावयाचें तें नानासाहेबांस सांगून नंतर तो तेथून एकदम निघून गेला. नानासाहेबांस घरदार सोडल्यापासून किती तऱ्हेचे तरी संकटकारक अनुभव आले ! त्यामुळें वाटेनें जातां जातां अर्थातच हजारों गोष्टींचे विचार त्यांच्या मनांत चालले होते. इतक्यांत पूर्व दिशा उजळ दिसूं लागली, आणि सहज बाजूच्या शेतांतील एका झाडाखालीं बसलेल्या दोन माणसांकडे नानासाहेबांची दृष्टि गेली. त्याबरोबर त्यांच्या अंतःकरणांत कांहीं विलक्षण धक्का बसला व ते डोळे वटारून पाहूं लागले.

झाडाखालीं बसलेली मंडळी कोण होती हें वाचकांनीं ताडलेंच असेल. तो मोठाच विलक्षण प्रसंग होता. नानासाहेबांची पत्नी अद्यापि आपल्या कृत्रिम वेषांतच होती. दिवस तर उजाडला आणि दुरून नानासाहेब येत असलेले पाहून नैसर्गिकपणें ती किंचित् स्मित करून उठून उभी राहिली. नवरा बैराग्याच्या वेषांत उभा आणि बायको पुरुषाच्या वेषांत त्याला पाहून लाजून उभी राहिलेली ! नानासाहेबांच्या मनांत किती प्रकारचे विचार चालले होते याची कल्पनासुद्धां वाचकांस होणें कठिण आहे. ज्या आपल्या पत्नीला मुसलमानानें धरून नेऊन आपल्या आश्रयास ठेविली, अर्थात् जिनें आपल्या नांवलौकिकाला व कुळाला बट्टा लावला, तीच आपल्यासमोर उभी आहे, असें पाहतांच अशा वेळीं प्राचीन काळच्या रजपुतांप्रमाणें आपण तिला ठार करून पुढें जावें, कीं तिच्याकडे न पाहतां तसेंच चालतें व्हावें हा प्रश्न त्यांच्या मनांत उभा राहिला, आणि त्यांच्या मनांत अत्यंत चलबिचल झाली. इकडे त्यांची पत्नी व तिची ती कुळंबीण यांच्या चित्तवृत्तीही कांहीं विलक्षण झाल्या होत्या हें सांगणें नकोच. मध्यंतरीं झालेल्या एकंदर प्रकाराची कांहींच माहिती त्या मराठा सरदारास नसल्यामुळें त्याला सहजच असें वाटलें कीं, हा गोसावी आपलेकडे एवढ्या संतत दृष्टीनें पाहतो याचें इंगित काय ? तेव्हां याच्यापासून आपलें सत्यस्वरूप चोरून ठेवावें आणि क्षणभर याची थट्टा करावी असें सहजच त्याच्या मनांत आलें आणि त्यानें आपल्या त्या कुळंबिणीस गोसावीबोआस आपलेकडे बोलावण्यास सांगितलें. कुळंबिणीसही ती मौज वाटून ती त्याचेजवळ गेली व हंसतहंसत त्यास म्हणते, "गोसावीबोआ, आपल्याला आमचे धनी झाडाखालीं जे बसले आहेत ते बोलावताहेत." परंतु एवढें एक वाक्य उच्चारतांना तिची अगदीं तिरपिट उडाली व बोबडी वळली. तिला वाटलें कीं आपल्याला त्यानें ओळखलें. विचारी त-त-म-म करीत म्हणते, "बाईसाहेब आहेत त्या. पण थट्टा..." तिची अगदीं बोबडी वळली असें पाहतांच "चल, चल. चालती हो तूं, आणखी तुझी बाईसाहेब नेऊन जाळ तिकडे ! एकदां वाट लागल्यावर पुन्हां असलं काळं तोंड दाखविण्यापेक्षां नरकलोकांत कां नाहीं गेलां ?" इतकें बोलून तो तेथून जाण्यास निघाला. परंतु तितक्यांत त्याच्या मनांत काय विचार आला कोणास ठाऊक ! तो वळला आणि

त्या पुरुषवेषधारी अशा आपल्या पत्नीकडे गेला, आणि आपला संताप सर्व गिळून धीरप्रशांत शब्दांनीं तीस म्हणतो, "तूं आपल्या स्वाभाविक वेषांत माझ्या नजरेस पडली नाहींस हें फार चांगलं. त्या वेषांतली तूं आतां मला मेलीस आणि मीही तुला मेलों. तूं माझं कूळ भ्रष्ट केलंस, नांव बुडवलंस, माझ्या सगळ्या सगळ्या महत्त्वाकांक्षेचा विध्वंस केलास. आतां तूं पुन्हां कधीं मला आपलं काळं तोंड दाखवूं नकोस, एवढीच माझ्यावर दया कर." त्या बिचारीला त्या त्याच्या बोलण्याचा कांहीं अर्थ कळला नाहीं. ती अत्यंत भयभीत मुद्रेनें त्याच्याकडे पहात राहिली. तो जाऊंच लागलासें दिसलें, तेव्हां "कां" एवढाच प्रश्न तिच्या तोंडून बाहेर पडला. परंतु इतक्यांत तिची ती कुळंबीण तेथें आली. तिनें त्या आपल्या धनिणीस पुढें बोलूंच दिलें नाहीं. आपण होऊनच ती त्यास म्हणते, "ठीक आहे. आतां अधिक बोलण्याची ही वेळ नाहीं आणखी तुम्ही सगळी हकीकत ऐकणारही नाहीं. आम्ही जातों. जे दिवशीं आपण म्हणतां तशी काळोखी बाईसाहेबांच्या तोंडाला लागली नाहीं अशी आपली खात्री होईल, तेच दिवशीं त्या आपल्या नजरेला पडतील. नाहीं तर त्या चिता करून जाळून घेऊन मेल्या म्हणून समजा!" तिच्या त्या आविर्भावानें नानासाहेबांच्या मनावर कांहीं तरी विलक्षण परिणाम झाला आणि ते कांहीं बोलणारही होते; परंतु तितक्यांत कोणी रस्त्यानें जाणारे लोक गोसावीबोआंचें आणि त्या मंडळींचें काय भांडण चाललें आहे म्हणून पाहण्यास येतातसें दिसलें. तें कोणासच इष्ट नव्हतें, त्यामुळें गोसावीबोआ तेथून एकदम चालते झाले. थोड्याच वेळांत तो मराठा सरदार व त्याच्या बरोबरची ती स्त्री यांसही तेथून प्रयाण करावें लागलें.

संतापाच्या भरांत नानासाहेब तेथून निघाला तो थोड्याच वेळांत अत्यंत व्यग्र अशा चित्तानें नेमल्या जागीं गेला आणि आपल्या सोबत्यांस मिळाला. मजल दरमजल करीत मंडळी आपल्या पुण्याजवळच्या नेहमींच्या मिळण्याच्या ठिकाणापासून सुमारें एक मजलेवर येऊन पोहोंचली. त्याप्रमाणें पोंहचतांच पुढें सांगून पाठविण्यासाठीं त्यांनीं आपल्यापैकींच एक इसम तयार केला. तो माणूस गेला असतां तानाजीनें आसपास गांवांत जाऊन इकडची तिकडची हालहवाल मिळविण्यासाठीं खटपट चालविलीच

होती. त्यांत त्याला दादोजी कोंडदेव आणि शिवाजी राजे यांचा तंटा झाला आणि तेव्हांपासून शिवाजीराजे कोणीकडे तरी निघून गेले होते, वगैरे बातमी लागली. बातम्या आपल्या मतानें कोणी कितीही गुप्त ठेवल्या, तरी त्यांना पंख कसे फुटतात व सगळीकडे ज्याच्या त्याच्या तोंडीं कशा होतात हें ज्याला त्याला माहिती आहेच. वरील बातमी तानाजीच्या कानीं आल्याकारणानें त्याचें चित्त साहजिकच व्यग्र झालें. आवश्यक तेवढी विश्रांति घेतल्यावर तो नानासाहेबांस घेऊन त्या आपल्या नियमित जागीं येण्यास निघाला. तीनचतुर्थांश वाट चालून झाली नाहीं तोंच त्यानें पुढें पाठविलेला माणूस परत येऊन त्यानें "स्वामी व राजे इथें नाहींत. आणि कोठें केव्हां गेले याचा तपास लागत नाहीं" असें सांगितलें. ती बातमी ऐकून तानाजी सचिंत बसला. त्याच्या उत्साहावर अगदीं पार विरजण पडल्याप्रमाणें झालें.

परंतु तानाजीस आपण तसाच विचारांत सोडून थोडासा मागला म्हणजे राजांकडील हकीगतीचा इतिहास काय होता तो पाहूं. वाचकांस आठवतच असेल, कीं शिवाजीराजांच्या विजापुरास जाण्याच्या विचारास स्वामींनीं मोडता घातला. 'राज्यकार्य बांधावयाचें तर त्यासाठीं प्रत्येक प्रसंगीं आपला जीव धोक्यांत घालण्यांत कांहीं अर्थ नाहीं. इतकेंच नव्हे तर, पुष्कळ कामें आपल्या हातून होण्याजोगी असलीं तरीसुद्धां तीं दुसऱ्यांकडून करवावीं यांतच ठीक असतें. माणसांना विश्वास वाटतो, आणि त्यांचें प्रेम वाढतें. लढाईत सेनाधिपति जर प्रत्येक माणसाचा बचाव करण्याला धांवेल तर त्याच्या हातून कार्यसिद्धि कांहींच होणें शक्य नाहीं" वगैरे अनेक गोष्टी स्वामींनीं राजास सांगितल्या; तरी त्यांचे चित्तांतील विषाद कमी होत नाहीं असें पाहतांच त्यांचें चित्त दुसरीकडे लावावें म्हणून स्वामींनीं पुढीलप्रमाणें योजना केली.

आजपर्यंत राजांनीं समर्थांच्या गोष्टी अनेकवार ऐकल्या होत्या, व तेच आपले गुरु असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. समर्थांची त्या वेळीं तितकी ख्याति झाली नव्हती, तरी त्यांचा हेतु कोणा तरी क्षत्रिय पुरुषाच्या हातून मराठी राज्याची संस्थापना करावी आणि गोब्राह्मणांचा जो छळ हल्लीं होत आहे तो बंद व्हावा असें असल्यामुळें व तसा वीर पुरुष कोठें निपजतो कीं

काय हें पाहण्यास आपली शिष्यशाखा सर्व महाराष्ट्रभर पसरविण्याचा गुप्त उद्योग त्यांनीं आरंभला होता. श्रीधरस्वामींनीं याच हेतूनें शिवाजीमहाराजांस आपल्या पंथांत ओढून उपदेश करण्यास सुरुवात केली. राजांची मनोवृत्ति अगदीं बालपणापासूनच त्या विचाराकडे पुरतेपणीं वळलेली असल्यामुळें अगदीं उत्तम तयार झालेल्या जमिनींत टाकलेल्या उत्तम बीजाप्रमाणें ते त्यांचे विचार चांगलेच रुजले. राजांचें घरांतील एकंदर शिक्षण दादोजी कोंडदेव यांचेकडून होत होतेंच. परंतु त्या शिक्षणाची गोडी राजांस मुळीं कशी ती लागली नाहीं. दादोजीचा सर्व उपदेश आपली जहागीर नीट राखावी, बादशहाची सेवा करून वडिलांनीं नांवलौकिक मिळविला तो कायम राखण्याकरितांच नव्हे, तर त्याच पद्धतीनें वाढविण्यासाठीं सदोदित झटावें, आपल्या दांडगाईमुळें वडिलांस त्रास होईल, किंवा त्यांजवर आणि आपल्यावरहि बादशहाची नाराजी होईल असें कांहींहि करूं नये, असा व्यवहारदृष्टीचा होता. तर इकडे श्रीधरस्वामींचा उपदेश त्याच्या अगदीं उलट, परंतु इष्ट असा होता.

---

२७. ओझरतें दर्शन

ज्या वस्तूच्या लाभाची अतोनात वांच्छा धरावी, व ती वस्तु मात्र लाभूं नये, परंतु तिचें महत्त्व मात्र घटकोघटकीं अधिकाधिक नजरेस यावें अशा स्थितींत त्या वस्तूच्या लाभाबद्दल किती औत्सुक्य उत्पन्न होतें याचा अनुभव प्रत्येक मनुष्यास आहेच आहे. राजांची अवस्था अशीच झालेली होती. विजापुराकडील कांहींच वार्ता नाहीं हें पाहून उद्विग्न झालेल्या राजांना आतां इकडे परळीकडे एकवार जाऊन येण्याची स्वामींनीं गोष्ट काढली. हें स्वामींचें बोलणें राजांस पटून दोघेही समर्थांकडे जाण्यास निघाले. समर्थांकडे जातांना स्वामींनीं आपला कित्येक वर्षांचा अनुभव राजांस सांगितला. प्रवास करीत करीत ते दोघे एका खेड्यांत जाऊन पोहोंचले. उन्हाची वेळ झाली होती. त्यामुळें त्यांनीं गांवाच्या बाहेर महादेवाच्या देवळांत गाशा अंथरला. राजांस रात्रीं बराच ज्वर आल्या-

कारणानें राजे स्वस्थ पडले होते. या देवालयाला लागून नदी वहात होती, व नदीच्या पैलथडीलाहि एक देऊळ होतें. त्या देवळाकडे व तेथील घाटाकडे राजांची सहज दृष्टि गेली, तों तेथें विलक्षण प्रकार त्यांचे नजरेस पडला. लागलीच स्वारी त्वेषानें उठली आणि आदले दिवशीं आपल्यास ज्वर आला होता, हा प्रश्न मनांत येऊं सुद्धां न देतां, कपडे काढून आपली तरवार आडवी तोंडांत धरून स्वारींनीं पाण्यांत उडी घेतली. घाटाजवळ जाऊन काय हकीगत झाली ती विचारली, तों तेथील ब्राह्मणानें सांगितलें, “महाराज, मी आपला स्नान करून त्या तिथें माध्यान्ह संध्या करीत होतों, इतक्यांत हा खाटीक तीं गोमातेचीं आंतडीं घेऊन आला, आणखी त्यानें तीं माझ्या शेजारींच पलीकडे पाण्यावर धाडकन् टाकून दिलीं. माझ्या अंगावर शिंतोडे उडाले, आणखी मी तसाच निवून इकडच्या बाजूला येऊन स्नान करून वर चाललों. तों पुन्हां दुष्टानें येऊन माझ्या अंगावर हीं आंतडीं टाकलीं. महाराज आतां ब्राह्मणांचा आणि गोमातेचा वाली कोणी नाहीं.” राजांस पुढें कांहीं ऐकवेना. तलवारीच्या एका फटक्यासारखें त्यांनीं त्या मुसलमानास खालीं पाडलें. तों तो मुसलमान अगदीं दीन होऊन पडल्या-पडल्याच दोन्ही हातांनीं सलाम करून करुणा भाकूं लागला. जबरदस्ताचे पाय धरून दुबळ्यावर दुगाण्या झाडण्याची जी मुसलमानांची खोड, ती त्या खाटका-च्या अंगीं पक्की बाणली होती. परंतु जो शरण आला त्याला जीवदान देणें हा तर भारतीय कथांपासून राजांनीं धडा उचललेला! तेव्हां त्या खाटकास जिवें मारण्याचा विचारसुद्धां त्यांनीं मनांत आणला नाहीं. अस्सल हिंदुस्थानी भाषेंत त्यांनीं त्यास “तूं इतका गयावया करतो आहेस तर सोडतों. पण ज्या हातांनीं तूं हीं असलीं नीचपणाचीं कामें करतोस ते हात शाबूत ठेवीत नाहीं. ते तोडूनच टाकणार.” इतके शब्द उच्चारून त्यांनीं लागलीच त्याप्रमाणें केलेंही. नंतर आपण पुन्हां नदींतून आल्या वाटेनेंच परत आले. स्वामी परत येतात तों पुन्हां स्वारी आपले कपडे वगैरे घालून तरवार जेथल्या तेथें ठेवून गाशावर पडलेली. स्वामींनीं आणलेल्या सामानाची व्यवस्था करून जेवणखाण्याचें करून शिववास आग्रह करून थोडें जेवूं घातलें, आणि आपणही जेवून पुढें मजल मारण्याचा बेत शिववाच्या ज्वरामुळें रहित केला. परंतु राजांस तें बरें वाटलें नाहीं. माझ्या ज्वरांत कांहीं अर्थ नाहीं असें त्यांनीं

उत्तर दिलें आणि सपाट्यासारखें उठून त्यांनीं आपला गाशा गुंडाळला. यावेळीं राजांच्या अनुसंधानानेंच येणें स्वामींस बरें वाटलें आणि त्यांनींही आपलें श्यामकर्ण तयार करून त्याजवर आसन ठोकलें. रस्त्यानें जातांना राजांनीं स्वामींच्या पश्चात् समोरच्या तीरावर दृष्टीस पडलेला अनन्वित प्रकार आणि त्याच्या निरसनासाठीं आपण काय केलें तें सर्व स्वामींना सांगितलें. स्वामींनीं सर्व हकीगत ऐकून म्हटलें, "शिवबा, झाली ही गोष्ट फारच उत्तम झाली. हें आजचें तुझें असलें एक साहसाचें व उदारपणाचें कृत्य इतर असल्या लाखों कृत्यांपेक्षां मी अधिक समजतों." यानंतर पुन्हां त्यासंबंधांत अवाक्षरही कोणीं काढलें नाहीं. नंतर मजल दरमजल करीत स्वाऱ्या परळीला गेल्या. गेल्या-बरोबर मठांत शोध केला, तेव्हां समर्थ स्वामी कोणीकडे गेले आहेत याचा मुळींच पत्ता नाहीं हें ऐकून राजांस मोठें वाईट वाटलें. तो दिवस व दुसराही दिवस गेला. तिसराही दिवस गेला. सरतेशेवटीं राजांच्या ध्यानींमनीं तोच विषय असल्याकारणानें म्हणा, किंवा अन्य कांहीं कारणानें म्हणा, राजांच्या स्वप्नांत एक वृद्ध ब्राह्मण येऊन त्यानें त्यांस सांगितलें, "बाबारे, असा तळमळतोस कां? स्वामी तुझ्यावर अत्यंत प्रेम करीत आहेत. पण ही वेळ तुझ्याशीं भाषणसंभाषण करण्याची नव्हे. वीतभर जागा तरी मुसलमानांचे ताब्यांतून आपले हातीं घे आणि मग ये. तुझ्या धैर्यशौर्याला यशःप्राप्ति व्हावी म्हणून स्वामी उत्तरेच्या बाजूस सुमारें अर्ध कोसावर एक गुंफा आहे तेथें पुरश्चरण करीत बसले आहेत. तेथें एकटा जा, तुला दर्शन होईल." इतकें बोलून तो स्वप्नांतील वृद्ध ब्राह्मण गुप्त झाला आणि राजे जागे झाले. राजांची धर्मश्रद्धा व दृष्टान्तश्रद्धा हीं फार जबर होतीं. दुसरे दिवशीं आकाशाला तांबडें फुटलें नाहीं तोंच स्वारी उठली. श्रीधरस्वामींनाही त्यांनीं आपलें स्वप्न कळविलें नाहीं आणि स्वारी निघाली व स्वप्नांत ज्या दिशेला सांगितलें होतें त्या दिशेला चालली. गुंफेच्या ठिकाणीं जातात तों वृक्षच्छायेनें अगदीं थंडगार केलेल्या एका दरडीच्या आड ती पुण्यमूर्ति आसन घालून कुबडीवर हात टेंकून बसली असून रामनामाचा जयघोष चालला आहे. तें पाहून राज्यतृष्णा, महत्त्वाकांक्षा वगैरे सर्व गोष्टींचा त्याग करून या पुण्य पुरुषाच्या सेवेंत दिवस घालवावे असें शिवबास वाटूं लागलें. स्वामींस पाह-तांच त्यांनीं "शहाजीराजांचा मुलगा शिवाजी आपल्यापुढें साष्टांग दंडवत

घालीत आहे, त्याजवर कृपादृष्टि ठेवावी." असें मोठ्यानें म्हणून एकदम आपलें शरीर दंडाप्रमाणें जमिनीवर टाकून दिलें. ते कांहीं केल्या उठेनात. परंतु तितक्यांत कोणी अगदीं मंद मधुर वाणीनें बोललेंसें त्यांस अगदीं स्पष्टपणें ऐकूं आलें. "गोब्राह्मणांचें प्रतिपालन, म्लेंच्छांच्या छळापासून त्यांचें संरक्षण, आणखी स्वराज्यसंस्थापन हेंच तुमचें कर्तव्य. याच्याचसाठीं तुमचा अवतार. तुमचें पुरश्चरण हेंच. तुमची तपश्चर्या हीच आणि गुरुसेवाही हीच. कार्याला आरंभ होतांच प्रथम सिद्धीचे प्रसंगीं येऊन भेटेन. तोंवर भेटीसाठीं व भाषणासाठीं उतावळी करूं नये. उतावळी करणें ती कार्यकारणीं करावी." हे उद्गार ऐकतांच राजे खडबडून उठले व पाहतात तों जवळ कोणीही नाहीं. राजांनीं आसपास हिंडून सर्वत्र पाहिलें; परंतु कांहींसुद्धां तपास लागेना. ती मूर्ति अंतर्धान पावली हेंच खरें. आपणांस शेवटीं स्वामींचें फक्त ओझरतें दर्शन झालें, प्रत्यक्ष दर्शनभाषण होण्याचा योग आला नाहीं, याबद्दल त्यांस वाईट वाटलें. स्वामींच्या आज्ञेप्रमाणें करण्यास आतां खरोखरीच विलंब लावावयाचा नाहीं, असा निश्चय करून स्वारी उठली व मठाकडे परत आली. त्यांची चर्या आनंदानें अगदीं प्रफुल्लित दिसत होती. श्रीधरस्वामींस राजांनीं जेव्हां एकंदर हकीकत सांगितली, तेव्हां तर त्यांस फारच समाधान झालें, आणि "राजा, तुझ्यासारखा भाग्यवान् तूंच" असा एकदम उद्गार त्यांच्या तोंडून अगदीं साहजिकरीत्या निघाला. नंतर मठांत तो दिवस व ती रात्र मोठ्या आनंदानें काढून आमचे दोघेही प्रवासी परत फिरले.

---

२८. वेडी

नानासाहेब वगैरे मंडळी पुण्याच्या बाजूस येऊन राजे त्यांस भेटले नाहींत इत्यादि गोष्टी वाचकांच्या स्मरणांत असतीलच. राजे कोणीकडे तरी गेले, आणि त्यांचा पत्ता नाहीं, असें कळतांच नानासाहेबांस अतोनात वाईट वाटलें. एक दोन दिवस वाट पाहिल्यावर त्यांना असें वाटलें कीं, एकवार आपण सुलतानगडाकडे नुसतें जाऊन काय हाल-

हवाल आहे तें पाहून तरी यावें, म्हणजे पुढें आपले बेत कसे करावयाचे याचा विचार करण्यास ठीक पडेल. झालें, मनांत येण्याचा अवकाश, त्यांनीं लागलीच तानाजी वगैरे मंडळींचा विचार घेऊन आपल्या घोड्यावर मांड ठोकली आणि स्वारी निघाली. नानासाहेब निघाले, ते मजल दरमजल करीत चालले होते. एके दिवशीं रात्रीचे प्रहरीं त्यांनीं एका गांवाबाहेर एका झाडाखालींच गाशा टाकला आणि त्यावर पडले, तों कोठून तरी मंजुळ गाणें ऐकूं येत आहे असें त्यांस वाटलें; परंतु थोड्या वेळानें तें मंजुळ गाणें ऐकूं यायचें बंद होऊन अत्यंत आर्त असा शोकस्वरच कानीं पडला. अशा अपरात्रीं हें गाणें-रडणें ऐकूं येतें तरी कोठून या गोष्टीचा पुरा तलास लावावयाचा त्यांनीं निश्चय केला, व त्याप्रमाणें त्या आवाजाच्या अनुरोधानें जाऊन शोध करतां तो आवाज एका झोंपडींतूनच निघतो आहे अशी त्यांची खात्री झाली. त्या गाण्याचे शब्दही आतां अगदीं स्पष्टपणें त्यांस ऐकूं येऊं लागले होते. ते कांहीं "फुलें कुसकरलीं, कुणीग मेल्यानं पायदळीं तुडविलीं" अशा प्रकारचे होते. नानासाहेबांनीं झोंपडीशीं जाऊन दारावर थाप मारली परंतु कोणी लवकर दार उघडीचना. नानासाहेबांनीं दारावर थाप मारण्याचा सपाटाच चालविला. तेव्हां चडफडत चडफडत आंतिल इसमानें दार उघडून दरडावून नानासाहेबांस आंत बोलाविलें आणि नानासाहेबांनीं विनंती करण्यापूर्वींच चकमक झाडून पणती लाविली. त्याबरोबर झोंपडींतिल त्या म्हाताऱ्यानें नानासाहेबांस ओळखलें असें दिसलें, कारण त्याच्या एकंदर वागणुकींत फरक पडला. इतक्यांत बाहेर घोड्याच्या टापा वाजलेल्या ऐकूं आल्या आणि एक स्वार घोड्यावरून दौडत येऊन झोंपडीच्या दाराशीं उभा राहिला व आंत शिरला. नंतर त्याचें व त्या वृद्ध गृहस्थाचें काय बोलणें व्हावयाचें तें होऊन तो जाण्यास निघाला. त्यावेळीं नानासाहेबांस एकदम कांहीं स्मरल्यासारखें होऊन ते म्हणतात, "आपण इतके दिवस कुठें होतां महाराज? मीं आपला किती वेळां तरी शोध केला. परंतु कांहींच शोध लागला नाहीं. आज अनायासानंच आपली गांठ पडली."

सूर्याजीनें जेव्हां पाहिलें कीं आतां कांहीं आपला वेष लपविण्यांत तात्पर्य नाहीं, तेव्हां नानासाहेबांबरोबर तो आंत गेला व फारा दिवसांचे स्नेही भेटल्या-

नंतर ज्या कांहीं हितगुजाच्या गोष्टी व्हावयाच्या त्या सर्व झाल्या. सूर्याजीनेंही मध्यंतरीं घडलेली आपली सर्व हकीगत सांगितली. तो म्हणाला, "नानासाहेब, माझ्या कुटुंबावर असा भयंकर गहजब गुदरला त्यावेळीं मला इतक्या जखमा झाल्या होत्या कीं त्यांतून मी वांचेन हें शक्यच नव्हतें, पण तुझ्या बापाकडून लखोटा घेऊन येणाऱ्या त्या पोऱ्यानें माझ्या कुळाची लज्जा आणखी माझा प्राण वांचविला; केवळ त्याच्या चपळाईमुळें मला आज हे दिवस दिसताहेत. मध्यंतरीं कांहीं कारणामुळं आम्हांला त्या आमच्या मूळच्या झोंपडींतून एकदम निघून जावं लागलं. सांवळ्याला तें कळविण्याला सुद्धां फुरसत सांपडली नाहीं. परंतु सांवळ्या म्हणजे एक विलक्षण पोरगा आहे. आमचा तपास काढून तो आमचेकडे आला. आज तर तो माझा दुसरा जीव होऊन बसला आहे. मी बरा झाल्यानंतर आतां झाल्या गोष्टीचा सूड कसा उगवावा या विचारांत असतां उगीच बसून उपयोग नाहीं, म्हणून पांचपंचवीस रामोशांची टोळी जमवून या रानांत असतों. नानासाहेब, लुटालूट करणें, दरवडा घालणें हें आतिशय नीचपणाचं काम म्हणतात, पण तें स्वतःचें पोट भरण्यासाठीं असेल तर तसं समजावं. माझा हेतु तसा नाहीं. या चोरांनीं जें लुटलं आहे तें त्यांच्या हातून हिसकावून घेऊन त्याचाच उपयोग करून स्वराज्य स्थापायचं. यत्न करणं आपल्या हातचं आहे, सिद्धि येणं परमेश्वराधीन. हा सगळा विचार करून मी या नादांत पडलों आहें." नानासाहेबांनीं सूर्याजीस शिवबाराजांची सर्व हकीकत सांगून सुचविलें कीं, आपण त्यांनाच जाऊन मिळावें. त्यांच्याजवळ आयुधांची सामुग्री चांगली आहे आणि सुलतानगड एकदां त्यांनीं घेतला म्हणजे त्यांची युद्धाची तयारीही चांगली होईल. सूर्याजीस तें अर्थातच मानवलें आणि गेल्या महिन्या दोन महिन्यांत आपण जें काय दरवड्यांनीं किंवा वाटमारीनें मिळविलें होतें तें सर्व त्यांच्या स्वाधीन करण्याचा विचार त्यानें केला. याप्रमाणें त्या दोघांच्या गप्पागोष्टी होतात तों पूर्वदिशा उजळली. सूर्याजीची पत्नी मध्यंतरीं अंमळ कोठें स्वस्थ निजली होती, ती पुन्हां आपलें नित्याचें गाणें गाऊं लागली, आणि मधून मधून पहिल्याप्रमाणें रडूं लागली. नुकतीच तिची हकीगत सूर्याजीच्या तोंडून ऐकली असल्यामुळें नानासाहेबांस फार वाईट वाटलें. थोड्या वेळांत चांगलें उजाडलें आणि दिसूं लागलें तेव्हां ती वेडी

नानासाहेबांच्या दृष्टीस पडली. ती स्वरूपानें फार सुंदर आणि तिची अशी स्थिति व्हावी याचें तर नानासाहेबांस अधिकच वाईट वाटलें. परंतु तितक्यांतच काय झालें कीं नानासाहेबांस पाहण्याबरोबर ती वेडी बसल्या जागची उठली, एकदां विकटपणें हंसली, 'आला मेला' असें म्हणत दीर्घ रोदनस्वर काढून झोंपडींतून बाहेर पडली आणि जितक्या सपाट्यानें धांववेल तितक्या सपाट्यानें धांवत सुटली, आणि पार नाहींशी झाली !

---

२९. सांवळ्या

'तिच्या मागें जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, ती अशी वाटेल तेव्हां वाटेल तिकडे हिंडते भटकते,' असें म्हणून सूर्याजीनें नानासाहेबांस आपल्या गोटाकडे चलण्याची विनंती केली, आणि दोघेही सूर्याजीच्या गोटांत आले. आपल्याकडून तयारी काय झाली व काय काय सामुग्री मिळवून आपण संग्रह करून ठेविला आहे, ती सर्व सूर्याजीनें नानासाहेबांस दाखविली. नानासाहेबांनीं सर्व तयारी पाहिल्यावर शिवबाराजांस तुमची मदत फार होईल, वगैरे सांगून त्यांनीं त्यास आपला सुलतानगडावर जाण्याचा उद्देश सांगितला. परंतु आधीं दुसऱ्या कोणास तरी पाठवून सगळी हालहवाल गुप्तपणें आणल्यावांचून आपण जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असा शेवटीं त्या दोघांचा विचार होऊन या कार्यास कोण माणूस योजावा याचा विचार ते करताहेत, तोंच दुरून सांवळ्या पोऱ्या येऊन त्यानें नानासाहेबांस लवून मुजरा केला. त्यास पाहिल्याबरोबर नानासाहेबांस मोठें समाधान वाटलें. सूर्याजी तर त्यास केवळ पोटच्या पोराप्रमाणेंच मानी. सांवळ्याचा मुजरा होतांच सूर्याजी त्यास एकदम म्हणाला, "कायरे, गडावर जाऊन तिथली एकंदर हालचाल काय आहे ती पाहून सर्व हकीगत आम्हांला सांगशील काय ?" सांवळ्यास तर अशी कांहीं तरी कामगिरी पाहिजेच होती. "मी जाऊन ताबडतोब तुम्हांला पाहिजे ती माहिती खडान्‌खडा आणून देतों." असें म्हणून दोघांचीही परवानगी घेऊन तो तेथून निघाला, तो प्रथम गडाच्या बाजूस न जातां आधीं विजा-

पूरच्या वाटेला गेला. आकृति लहान परंतु कृति जबर अशा व्यक्तींपैकींच तो एक होता. आपण कोणत्या बाजूनें आलों हें सुद्धां कोणास धडपणीं कळूं नये येथपासून त्याची युक्ति.

सांवळ्या विजापूरच्या वाटेवर बराचसा लांब जाऊन तेथून परतणार, तों दुरून एक स्त्री व एक पुरुष त्याच बाजूकडे येत आहेत असें त्यानें पाहिलें. सांवळ्याची दृष्टि अशी तशी नव्हती. दुरून येणारीं माणसें कोण असावींत तें त्यानें ओळखलें व अंमळ पुढें जाऊन त्यानें एकदम त्या दोघांपैकीं जी स्त्री होती तिला तिच्या नांवानें हांक मारली. तिनेंही त्याला त्याच्या नांवानें हांक मारून 'ओ' दिली आणि ती सांवळ्यास म्हणाली, "सांवळ्या, तुझ्याच घरीं येणार होतें मी. माझ्याबरोबर कोण आहे हें तूं ओळखलं असशीलच. तुझी आई कुठें असेल तिथें मला घेऊन चल. तिच्या मदतीनं गडाच्या आसपास कुठं तरी आम्ही राहणार. मात्र आम्ही इथें कुठें आहोंत हें कोणालाही समजूं देऊं नकोस. माझी एक मावशी इथून दोन कोसांवर नांदेगांवीं आहे. तिथें मी यांना आज नेऊन ठेवणार आहे." तिचें तें बोलणें एकतांच सांवळ्या म्हणाला, "असं का ? गडावर अप्पासाहेब नाहींत म्हणून ? पण त्याबद्दल आतां भीति बाळगायला नको. नानासाहेब इथून जवळच आहेत. त्यांना मी जाऊन हकीगत सांगतों म्हणजे मग......" परंतु नानासाहेबांचें नांव निघतांच त्या स्त्रीची चर्या कांहीं विलक्षण झाली. ती एकदम सांवळ्याचा हात धरून म्हणते, "नको, नको; अगदीं नको. सांवळ्या, बाईसाहेब जिवंत राहाव्यात अशी जर तुझी इच्छा असेल तर तुझी आमची भेट झाली ही वार्तासुद्धां त्यांच्या कानावर जातां कामा नये." सांवळ्यास तिच्या त्या एकंदर वर्तनाचा आणि भाषणाचा मुळींच अर्थ समजेना. परंतु अधिक विचारपूस करूं नको असें सांगतांच तो एक अक्षरही अधिक बोलला नाहीं. नंतर सांवळ्या पुढें आणि त्या दोघी पाठीमागें अशा चालल्या, व मोठ्या मिनतवारीनें एकदांच्या नांदेगांवास जाऊन चंद्राबाईच्या मावशीच्या घरीं दोघीहि जाऊन राहिल्या, आणि सांवळ्या आपल्या आईस बोलावून आणण्यास निघून गेला.

नानासाहेबांची व त्यांच्या पत्नीची विजापुरच्या बाहेर दृष्टादृष्ट झाली

आणि कुळंबिणीची व त्यांची बाचाबाच झाली, त्या दिवसापासून त्या माउलीची स्थिति फार विलक्षण झाली होती. त्या दिवसापासून तिनें आपल्या जीविताविषयीं अनास्था आरंभिली होती. तिचें अंतःकरण होरपळून करपून गेलें होतें. 'आपण केलें काय आणि झालें काय ?' या त्रयोदशाक्षरी मंत्राचा मनांतल्या मनांत एकसारखा जप तिनें चालविला होता. सुलतानगडापासून जवळच कोठें तरी राहण्यांत तिचा हेतु फार निराळा होता. तो काय हें लौकरच वाचकांस कळेल.

---

३०. खानाची बिबी झाली

याप्रमाणें त्या दोघींची व्यवस्था लावल्यानंतर सांवळ्यानें आपल्या आईची गांठ घेऊन तिला नांदेगांवास रवाना केलें आणि आपण आपल्या मूळच्या कामास पुन्हां चालता झाला. यामुळें पुन्हां आपल्या वाटेस लागण्यास सांवळ्यास अर्थातच पुष्कळ उशीर लागला. परंतु अंधारास डगमगणारा तो पोरगा नसल्यामुळें त्यानें अंधारांतच आपली गडाकडची वाट धरली. इतक्यांत दुरून एका घोड्यावर बसून एक मुसलमान प्रवासी येतांना त्याच्या दृष्टीस पडला. अलीकडे सूर्याजीच्या गोटांत शिरल्यापासून रस्त्यांत धरलेल्या एकट्या दुकट्या मुसलमानाची फटफजिती करावी किंवा त्यास फसवून आपल्या गोटाकडे कसें घेऊन जावें, या बाबतींत तो मोठा तरबेज झाला होता. थोड्याच वेळांत तो प्रवासी सांवळ्याजवळ आला व त्यास म्हणतो, "तूं खरोखरीच मोठा हुषार पोरगा दिसतोस. मी विचारीन तें इमानानें सांगशील तर तुला खूप बक्षीस देईन. बोल, गडकऱ्याचा मुलगा नानासाहेब गडावरच आहे कीं दुसऱ्या कोठें आहे ? पण कायरे, याच रस्त्यानें एखादा बोआ आणखी एखादी बाई जातांना आढळली ? आणि लवाजम्यासकट कोणी बेगम गडाकडे गेलेली तुला दिसली ! तिच्याबरोबर बराच लवाजमा होता, आणखी एक दासी होती." त्याचे ते प्रश्न ऐकून सांवळ्या एकदम म्हणतो, "हो ! हो ! खानसाहेब, नानासाहेब पुन्हां इथं चोरून लपून आला आहे. पण तो कुठं आहे तें मी आपल्याला सांगणार नाहीं;

आणखी तुम्ही म्हणतां तशी सर्व मंडळी गडावर जाण्यासाठीं म्हणून आली होती खरी. पण त्यांना चोरांनीं वाटेंत लुटून कैदेंत ठेवून दिलें आहे." तें ऐकतांच खान फारच संतापला व म्हणतो, "कुठें आहेत ते चोर? चल, मला दाखव म्हणजे मी त्यांची हड्डीन् हड्डी मऊ करून टाकतों." सांवळ्या तें ऐकून किंचित् हंसला व म्हणतो, "चोर फार आहेत, त्यांनीं एक मोठं थोरलं ठाणंच बसवलं आहे. आपण एकट्यादुकट्यानं जाऊन तिथं आपला निभाव लागावयाचा नाहीं. त्याला कांहीं तरी युक्तिच केली पाहिजे." कांहीं वेळ विचारांत घालविल्यानंतर खान सांवळ्यास म्हणतो. "अच्छा, कुछ हरकत नाहीं. तूं आतां मला कुठें तरी रातोरात उतरण्याला जागा दाखव. आणखी रात्रीं माझ्या खाण्याचीही तजवीज कर." "हां, तें तर काम माझ्याकडे लागलं. या पलीकडच्या खेड्यांतच दाऊदमिया म्हणून मोठे चांगले गृहस्थ आहेत. पण तुम्हांला त्यांच्याकडे घेऊन जाण्यापूर्वीं मला एकदां त्यांच्याकडे जाऊन येऊं द्या. तुम्ही आपलं घोडं देत असाल तर मी चटकन् जाऊन येतों."

सांवळ्याच्या म्हणण्याप्रमाणें करण्याशिवाय दुसरा कांहीं इलाज नाहीं असें पाहून खानानें त्याला आपला घोडा दिला. बऱ्याच वेळानें सांवळ्या धांपा टाकीत त्याच्याजवळ येऊन म्हणतो, "खानसाहेब, अहो तुम्ही होतां तरी कुठें? वाटेंत मला चोरांनीं घोड्यावरून पाडलं, बडवलं आणि ते घोडा घेऊन पळून गेले. शेवटीं तुमचा घोडा गेला तर गेला, पण राहण्याची तरी सोय लावावी म्हणून मी दाऊदमियाच्या घरीं गेलों आणखी सर्व व्यवस्था लावून तुम्हांला बोलवायला आलों. उगीच तुमच्यावर उपकार करण्यांत आम्हांला मार बरीक खावा लागला. चला, चला आतां लौकर." जातां जातां खान सांवळ्यास म्हणतो, "पण कायरे, त्या बेगमीबरोबर तिची एखादी दासी होती का? तूं पाहिलीस का?" "हो. हो. अगदीं खचित खचित होती; अगदीं मीं पाहिली." सांवळ्याचें एकंदर बोलणें इतकें विश्वासोत्पादक होतें कीं, खानास हा आपली थट्टा करतो अशी फारशी शंका आली नाहीं. मनुष्य कोणा एका विवक्षित गोष्टीच्या नादास लागला म्हणजे मग तो इतर प्रसंगीं व इतर बाबतींत कितीही चतुर व सावध असला, तरी त्या गोष्टीची बाब आली म्हणजे तो वेडाव ल्याप्रमाणेंच होतो. त्यांतलीच एक खानाची गोष्ट

होती. तो सांवळ्याच्या अगदीं भजनीं लागल्याप्रमाणें झाला. त्यानें त्यास जिकडे नेलें तिकडे तो गेला. दाऊदमियाचें घर म्हणजे एक लहानसें खोपट होतें. खानानें व सांवळ्यानेंही ती रात्र दाऊदमियाच्या घरीं घालविली. सकाळीं उठल्याबरोबर खान सांवळ्याच्या पाठीस लागला कीं, " काय तुझी युक्ति असेल ती सांग, आणखी ती करून आपण एकदां त्या चोरांच्या गोटांत जाऊं आणि जितके लोक त्यांनीं असे धरून ठेविले असतील तितक्यांना सोडवूं." सांवळ्या जणूं हें बोलणें कधीं येईल याची वाटच पहात होता. खानाचे तोंडून तेवढीं अक्षरें निघतांच तो एकदम म्हणाला, " खानसाहेब, आपल्याला खरोखरीच बेगमसाहेबांपर्यंत जाऊन पोहोंचायचं असलं तर माझी युक्ति ऐका. युक्ति जरा चमत्कारिक पण अगदीं बेमालूम. ते चोर बायकांना कांहीं सुद्धां करीत नाहींत आणखी पोरांच्याही वाटेस जात नाहींत. मी तर पोरच आहें. परंतु आपल्या बाबतींत मात्र खानाची बिबी झाली पाहिजे." हें बोलणें ऐकतांच खान संतापानें अगदीं लालभडक झाला, असें पाहतांच सांवळ्या एकदम म्हणतो, " मीं जी खरी गोष्ट सांगितली ती ऐकल्याबरोबर तुम्ही इतके संतापलां. पण जर खरोखर तुम्हांला त्या बेगमसाहेबांच्या दासीला भेटायला जायचं असेल, तर मी सांगतों त्याच्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं. जर असेल, तर काढा." सांवळ्याचें तें बोलणें ऐकून खान लागलीच त्यास म्हणतो, "पण कायरे पोऱ्या, तिचं किंवा बेगमसाहेबांचं नांव सांग पाहूं?" " नांव ? मुसलमानी नांवं आमच्या ध्यानांत राहणार कशीं ? आपण तिचं नांव घ्या. जर बरोबर असेल तर मी लागलीच हो म्हणेन. नसेल तर नाहीं म्हणेन !" " तिला फतिमा म्हणतात ?" खानानें मोठ्या ऐटीनें विचारलें. " बस्स, बस्स, बस्स ! अगदीं बरोबर आहे. हेंच नांव आहे. आपण म्हणतां हेंच नांव. ती तर नेहमीं नानासाहेबांच्याकडे येते." सांवळ्या एक क्षणभरसुद्धां न चाचरतां एकदम म्हणाला. परंतु ते शब्द ऐकतांच खानाची मुद्रा कितीतरी विलक्षण झाली ! आणि आपण आतां कांहीं तरी केलेंच पाहिजे, असा त्याचा पक्का निश्चय झाल्याप्रमाणें दिसलें, व शेवटीं तो म्हणाला, " बरं तर, आतां चल तुझ्या युक्तीप्रमाणें करूं."

परंतु आतां पोषाखाची अडचण आली. त्यावर दाऊदमियांनीं लगेच आपल्या मृत पत्नीचा पोषाख आहे म्हणून सांगितलें. बिबीचें काम झालें.

खानानें सांवळयाच्या युक्तीप्रमाणें सर्व कांहीं केलें व तोंडावरून बुरखा घेतला. याप्रमाणें सांवळ्यानें रात्रीच्या वेळीं तो तसला पोषाख घालावयास लावून त्याची धिंड तर काढलीच. बराच वेळ पायांची रखडारखडी झाल्यावर खान व सांवळ्या सूर्याजीरावाच्या छावणीच्या एका पहाऱ्याशीं आले. पहाऱ्यावरील मंडळींनीं बिबीचें खरें स्वरूप ओळखून तिच्या तोंडावरील बुरखा दूर केल्यावर तेथें मोठा हंशा पिकला. पहारेकऱ्यांनीं त्याच्या मुसक्या बांधून त्यास सूर्याजीरावाकडे आणलें आणि हा इसम औरतीचा पोषाख करून कांहीं तरी दगा करण्याच्या हेतूनें आपल्या गोटांत शिरला असा त्याजवर गुन्हा ठेवला. थोड्याच वेळांत हा एवढा हंशा कसला चालला आहे म्हणून पलीकडे बसलेला नानासाहेब येऊन पाहतो, तों हा औरतीचा पोषाख करून आलेला इसम आपल्या पक्का ओळखीचा ! नानासाहेबांस पाहतांच त्या बिचाऱ्यास अगदीं मेल्यापेक्षां मेल्याप्रमाणें झालें, आणि तो खालीं मान घालून बसला. विजापुरास असतांना या माणसानें आपला विनाकारण छळ कसा केला वगैरे हकीकत नानासाहेबांनीं सूर्याजीस सांगितल्यावर तर सर्व मंडळींचा त्याच्यावर जास्तच क्रोध झाला आणि त्याची विटंबनाही परमावधीची झाली. परंतु इतक्यांत सूर्याजीस त्याच्या एका माणसानें कांहीं विशेष बातमी आणून पोहोंचविली; त्याबरोबर "याला आतां दुसरा कोणताही पोषाख न देतां असाच ठेवा" अशी सूर्याजीनें ताकीद दिली, आणि तो नानासाहेबांना घेऊन कांहीं बोलण्यासाठीं एका बाजूला गेला. अहंमदाच्या—तो माणूस रणदुल्लाखानाचा नोकर अहंमद होता—मनांत अशा स्थितींत आपण आतां फतिमेच्या नजरेस पडूं नये असें आलें. परंतु त्याचें नशीब तितकें बलवत्तर नव्हतें. जें नको तेंच त्याच्या कपाळीं आलें. सूर्याजीच्या माणसानें जी विशेष बातमी सांगितली ती हीच कीं, आपल्या मंडळींनीं कांहीं मुसलमान मंडळी लवाजम्यासकट पकडली आहे. जें खरोखर घडलें नव्हतें, तें सांवळ्यानें कल्पून बिचाऱ्या अहंमदाच्या प्रश्नास होय म्हणून सांगितलें होतें, परंतु आतां त्याची ती कल्पना खरी झाली. केवळ थारेपालट म्हणून रणदुल्लाखानाची बहीण आणि तिची दासी फतिमा लवाजम्यासकट सुलतानगडास चालल्या होत्या. त्यांना सूर्याजीच्या माणसांनीं पकडून आणलें होतें. परंतु नानासाहेबांच्या रदबदलीमुळें त्यांस अटकावांत न

ठेवतां तसेंच जाऊं दिलें. मात्र तेवढ्यांत अहंमदमियाखान यांची 'अहंमद-मियाखानी' झालेली फतिमा व बेगम यांच्या नजरेस पडल्याखेरीज राहूं दिली नाहीं. थोड्याच वेळानें नानासाहेबांनीं सूर्याजीचा निरोप घेऊन सुलतान-गडाची वाट धरली. तेथें आसपास कांहीं मंडळीस भेटून त्यांस जी कांहीं माहिती पाहिजे होती, व जी कांहीं व्यवस्था करावयाची होती ती करून ते परतले, आणि अहंमदास सूर्याजीच्या ताब्यांतच ठेवून व पुढें काय काय होणार त्याचा सूर्याजीशीं खल करून ते सासवडाकडे जाण्यास निघाले.

३१. अप्पासाहेब परत आले

मुसलमानी दरबारांतील दिरंगाईबद्दलची व चंचलतेबद्दलजी आख्या अद्यापिही लहानापासून थोरांच्या तोंडीं आहे. आमच्या कथेचा काळ यापैकींच होता. अप्पासाहेबांस अधिक अधिकार देऊन पुन्हां सुल-तानगडावर नेमिलें. परंतु "पंचपक्वान्नांचा घास, पण तोंडीं पडण्यास विघ्नांची रास" असें म्हणतात तें खोटें नाहीं. बिचारे अप्पासाहेब गडाकडे जाण्याची तयारी करतात, तोंच त्यांस 'एव्हां आपण निघूं नये,' अशा-बद्दल फेरहुकूम सुटला. त्याचें कारण अप्पासाहेबांस कळलें नाहीं. त्यामुळें त्यांचें मन अतिशय उद्विग्न झालें होतें. अशा स्थितींत एके दिवशीं रणदुल्लाखान त्यांच्याकडे आला. रणदुल्लाखानावर त्यांचा मोठा विश्वास होता. अर्थातच भडभडून आलेलें त्यांचें अंतःकरण त्याचेजवळ त्यांनीं बोलून दाखविलें. तें ऐकून रणदुल्लाखानास फारच वाईट वाटून, तो त्यांस म्हणतो, "अप्पासाहेब, दरबारची स्थिति हल्लीं मोठी चमत्कारिक झाली आहे खरी. मला देखील सध्यां इथें राहण्याचा अतिशय कंटाळा आला आहे. मुरारसाहेबही मजजवळ अशाच प्रकारचे कांहीं उद्गार काढीत होते. परंतु मला ते म्हणाले, 'बाबारे, जोंपर्यंत इमानानं राहून पातशहातीच्या हितासाठीं नोकरी करणं शक्य असेल, तोंपर्यंत इथें राहून नोकरी करावयाची. बादशहाच्या पाजीं हुजऱ्यापाजऱ्यांनीं राज्यकारभारांत प्रत्यक्ष हात घालण्या-इतकी स्थिति आली नाहीं, तोंपर्यंत दुसरातिसरा विचार स्वप्नांतसुद्धां आपण आणतां कामा नये." विशेषतः मुरारसाहेबांचें सांगणें म्हणून जें रणदुल्ला-

खानानें सांगितलें तें ऐकून अप्पासाहेब रणदुल्लाखानास म्हणाले, " मुरार-साहेबांनीं सांगितलं तें अगदीं अक्षरशः खरं. इमानी नोकराचं ब्रीदच हें. जोंपर्यंत आपल्या हातून स्वामींचं कांहींना कांहीं तरी हित होईल अशी आपल्या मनाची खात्री आहे, तोंपर्यंत आपण होऊन स्वामिसेवा सोडूं नये. पण स्वामी धड सेवाही करूं देईनात, आणि धड सेवेंतून मुक्तही करीनात, अशा स्थितींत मात्र आमच्यासारख्या नोकरांची फार त्रेधा उडते." अप्पासाहेबांच्या या म्हणण्यास रणदुल्लाखानाचें अनुमोदन पडलें हें सांगणें नकोच. " आपण इतके निराश होऊं नये, एकवार मी पुन्हां प्रयत्न करून आपणांस इथून पाठविण्याची खटपट करतों " असें म्हणून रणदुल्लाखानानें त्यांचें समाधान केलें, व मेहेरजान फार आजारी आहे, तिच्या मनांतून सुलतानगडावर कांहीं दिवस रहावें असें आहे, तिथें तिची व्यवस्था ठेवा. आपली सुटका इथून लवकर झाली नाहीं, तरी मी मेहेरजानला इथून तिकडे पाठविणार आहें," असें सांगून रणदुल्लाखान गेला. रणदुल्लाखानानें आपल्या म्हणण्याप्रमाणें खरोखरीच पुढें चारपांच दिवसांत मेहेरजानची पाठवणी केली. पुढें चार दिवसांनीं कर्मधर्मसंयोगानें अप्पासाहेबांसही सुलतानगडाच्या गडकऱ्याच्या अधिकाराचा कायमचा हुकूम मिळाला. आणि 'शुभस्य शीघ्रं' या न्यायानें विजापुराहून तावडतोब निघून सुलतानगडावर अप्पासाहेब परत आले. ते येऊन पोहोंचण्यापूर्वी पांचसहा दिवसच नानासाहेब आपला जो काय जम बसवावयाचा तो बसवून तेथून सासवडाकडे निघून गेले होते. अप्पासाहेब गडावर आल्या-नंतर बऱ्याच लोकांस आनंद झाला. अप्पासाहेबांचा अंमल जरी कडक असे, तरी पण त्यांची दानत फार सचोटीची असल्यामुळें लोकांचें त्यांजवर तसेंच प्रेमही होतें.

अप्पासाहेबांना सुलतानगडावर येऊन दोन चार दिवस झाले अस-तील, तोंच एके दिवशीं एक तरुण पुरुष घोड्यावर बसून मुसलमानी पोषाख करून (त्या काळीं मराठ्यांचा आणि मुसलमानांचा पोषाख यांत फारसें अंतर नव्हतें) सुलतानगडापासून जवळच नांदेगांव येथें आला. गांवांत कोठें पैसे देऊन जेवणाची सोय होईल तर पहावी म्हणून जातां जातां एका घरीं दोघी बायाच होत्या, तेथें जाऊन इतर ठिकाणीं विचारल्या-

प्रमाणेंच त्यानें प्रश्न केला. त्यांपैकीं एका बाईनें त्यास म्हटलें, "बाबारे, ज्या कांहीं कण्याभाकरी आमच्याजवळ आहेत त्या आम्ही तुला घालतों; पण त्याबद्दल पैसे देण्याचं नांव मात्र काढूं नकोस. तूं कोणाचा तरी थोरामोठ्याचा मुलगा आहेस, तर तुला या वेळींच उतरण्याची वगैरे गरसोय असली, तर खुशाल आमच्या अंगणांत घोडा बांध आणखी ओटीवर पड." तो नवखा गृहस्थ जणूं काय अशा आमंत्रणाची अगदीं वाटच पहात होता, असें तें आमंत्रण स्वीकारण्याच्या त्याच्या त्वरेवरून दिसलें. थोड्याच वेळांत त्याचें भोजन यथास्थित झालें, व तो बाहेर येऊन विचार करीत पडला. होतां होतां आतां डोळा लागणार, इतक्यांत कोणी कांहीं तरी बोललेलें त्याच्या कानीं आलें : "एवढं जर त्यांना वाटत होतं, तर मला एकटीला इथं टाकून त्या शहाजीच्या मुलाच्या गोटांत मिळण्यासाठीं गेले कशाला? मलाही न्यायची होती. आपल्या पाठीमागें आपल्या बायकोचं काय होईल, ती काय करील, याचा विचार नको होता का त्यांना?" "खरंच, खरंच!" दुसरी कोणी तरी बोलली. "आपल्या बायकोची अब्रू राखण्याला इथेंच राहण्याचें सोडून धर्म राखण्याकरितां आणखी स्वराज्य करण्याकरितां म्हणे त्या शहाजीच्या बंडखोर पोराकडे जाणार!" पुन्हां पहिल्या स्त्रीचे शब्द ऐकूं आले : "स्वारी आतां इकडे येणार. पाहूं, काय काय चमत्कार होतो तो! ज्या बायकोला अगदीं तुच्छ करून सोडलें, ती बायकोच बरोबरीनं लढायला उभी राहील हें अनुभवाला आणून देतें." पुढेंही आणखी कांहीं बोलणें झालें. परंतु तें त्या बाहेरील गृहस्थास ऐकूं आलें नाहीं. परंतु ही मंडळी कोण याविषयीं त्यानें आपल्याशींच कांहीं तरी अनुमान केलें असावें असें दिसलें. दुसरे दिवशीं त्यानें आपण कोठें कामास निघून जातों असें सांगून व पुन्हां सायंकाळीं येईन असेंही सुचवून तो खरोखरीच संध्याकाळपर्यंत कोणीकडे तरी निघून गेला. त्यास सुलतानगडाला एक प्रदक्षिणा घालतांना कोणीं पाहिलें. सायंकाळ होतांच तो गृहस्थ परत आला. परंतु नंतर मध्याह्न रात्रीच्या सुमारास तो पुन्हां अतिशय हलकें उठून आपलें पाऊल न वाजवितां तेथून चालता झाला. पुन्हां त्यानें गडाच्या भोंवतालीं प्रदक्षिणा घातली, आणि पहांटे पुन्हां आपल्या जागीं येऊन पडला.

सकाळीं उठल्यावर आतां मी आपल्या गांवीं जातों असें म्हणून त्यानें एक लहानशी थैली त्या बाईच्या पुढें ठेविली व ती नाहीं होय म्हणणार तोंच तो अंगणांत जाऊन आपल्या घोड्याजवळ उभा राहिला. नंतर जणूं काय एकदम आठवल्यासारखें करून तो माघारीं आला व त्या बाईस हलकेंच म्हणतो, " बाई, मला गडावर जाऊन देवीचं दर्शन घेण्याची इच्छा आहे. मी एकदम एकटाच गेलों आणि पाहूं लागलों, तर कोण कुठला अशी चौकशी होऊन कोणी विनाकारण संशय घ्यायचें. ओळखीनें गेलों तर सहज काम होऊन मी आपल्या वाटेनं जाईन; तरी तुमच्या मदतीनं जमलें तर पहा. " " हो हो, आज तर ही गोष्ट फार सोपी. आजच सांवळ्या इथें येणार आहे. तो आला म्हणजे तुम्हांला नीटपणें दर्शन वगैरे करवून जें कांहीं बघायचं असेल तें दाखवून देईल. " इतकें बोलणें होऊन तो गृहस्थ पुन्हां तेथें थांबला. नंतर सांवळ्या येतांच त्या स्त्रीनें त्यास त्या नवख्या गृहस्थाच्या इच्छेप्रमाणें त्यास किल्ल्यावर नेण्यास सांगितलें. नंतर दिवस कसाबसा घालवून ऐन तिन्हीसांजाच्या सुमारास सांवळ्याच्या सांगण्याप्रमाणें धोंगड्याचा पोषाख करून सांवळ्याबरोबर तो गडावर जाण्यास निघाला. सांवळ्या म्हणजे त्या गृहस्थास गडावर बिनधोक जाण्याचा एक मोठाच परवाना असल्याप्रमाणें होता. फार दिवसांनीं तो पोरगा आला म्हणूनच काय किल्ल्यावरील सर्व मंडळींनीं त्यास नाना प्रकारचे प्रश्न विचारून पुरेपुरेंसें केलें आणि बरोबरीचा इसम कोण असें विचारतां, कोणास ' मामा ' कोणास ' काका ' असें वाटेल तसें सांगून त्यानें वेळ मारून नेली. जितका वेळपर्यंत आणि जेथें जेथें जाण्याची व जें जें पहाण्याची त्या गृहस्थाची इच्छा होती, तें त्यानें पाहून घेतलें, आणि मग रात्रबेरात्र याचा कांहींएक विचार न करतां पुन्हां त्या पोरास घेऊन तो गड उतरून खालीं आला व तेथें थोडा वेळ विश्रांति घेऊन त्यानें लागलीच तेथून प्रयाण केलें.

३२. बेत ठरला

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टीस सुमारें आठ दहा दिवस झाले. राजांनीं थोडे दिवसांपूर्वीं केलेली प्रतिज्ञा वाचकांच्या लक्षांत असेलच. ती प्रतिज्ञा त्यांनीं अक्षरशः खरी करून दाखविली असती. परंतु त्यांचे चित्तांत मातृभक्ति जाज्वल्य असल्यामुळें व स्वतः मातुःश्रींनीं त्यांचे रानांतील ठिकाणीं येऊन परत येण्याविषयीं आग्रह केल्यामुळें आपल्या प्रतिज्ञेचा भंग करून स्वारी घरीं परत आली. परंतु राजांचें चित्त दिवसानुदिवस आपल्या इष्ट कार्यांत अधिकाधिकच गढून गेलें. राजे वयानें जरी तरुण होते, तरी विचारांनीं ते वृद्ध असत, अशाबद्दल इतिहास साक्ष देईल. आपल्या गड घेण्याच्या प्रतिज्ञेचे दिवस भरत आल्यानें त्यांचे चित्तास किंचित् उद्विग्नता आली होती. त्यासंबंधींचे राजांचे विचार चालले होते. परंतु कोणत्याही विचारास कृतीचें स्वरूप येण्यास कांहीं निमित्त लागत असतें. अशा प्रकारचें निमित्त प्रस्तुत प्रसंगींही झालें तें असें:— शहाजी राजांकडे दादोजी कोंडदेवानें शिवाजी राजांच्या थोडे दिवसांच्या कृतीची एकंदर हकीकत लिहून पाठविल्यानंतर एके दिवशीं शहाजी राजांकडून पत्र आलें. त्यांत पुढील अर्थाचा मजकूर होताः– "गोरगरिबांना लुटून त्यांचा तळतळाट घेऊन आणि यवनांच्या नांवानें नुसती जळफळ करून यवनी राजांचा उच्छेद होईल व स्वराज्य स्थापलें जाईल, तर आजपर्यंत चोरस्याभामस्यांनीं किती तरी स्वराज्यें स्थापिलीं असतीं! गोरगरिबांस नाडणें, खेडींपाडीं लुटणें, आणि शहरें–किल्ले यांचे वाटेसही न जाणें, हें नामर्दपणाचें लक्षण होय. असा मतलब त्याचे ध्यानीं येत नाहीं हें कसें? ... ..." हें पत्र वाचून राजांच्या चित्तास खेद झाला. आपण उपदेश करून राजांस सुधारण्याचा प्रयत्न करण्यास ही संधि चांगली आहे असें पाहून दादोजीही त्यास बरेच कडक शब्दांत बोलले. थोर पुरुषांचीं मनें सामान्य लोकांचे मनाप्रमाणें नसतात. शिवाजी राजे तेथून उठून आपल्या मित्रमंडळींत गेले. मनाचा पक्का निश्चय करून ते गेले, ते तडक आपल्या गुप्त देवालयांत गेले. तेथें देवळांत जाऊन आपली तलवार उपसून देवीपुढें ठेविली, व अनन्यभावें तिची प्रार्थना करून

त्यांनीं आपले डोळे समाधि लावल्याप्रमाणें लाविले. घटका दोन घटका गेल्यानंतर त्यांचे चर्येवरील उदासीनता अगदीं नाहींशी झालेली दिसली. उद्विग्नतेचें नांवही नाहींसें झालें. श्रीधरस्वामींना त्यांनीं तात्काळ बोलाविलें व त्यांच्याशीं घटकाभर हितगुज होऊन पुढें तानाजी, येसाजी आणि नानासाहेब यांच्याशींही मसलत करून सुलतानगडावर स्वारी करण्याचा बेत ठरला, व सर्व तयारी ताबडतोब करण्यांत आली.

दुसरे दिवशीं मध्यरात्रीचे सुमारास सुमारें तीनशें साडेतीनशें मावळे हेटकरी यांचा सासवडचे रानांत नेहमींचे ठिकाणीं मेळा झाला. तेव्हां तानाजीनें त्यांस जितकें कांहीं सांगावयाचें तितकें सर्व सांगून भवानीचे देवळांतलि संग्रहापैकीं एक एक तलवार प्रत्येकास बक्षीस देऊन त्यानें त्यांच्या दोन टोळ्या केल्या. एकीवर तानाजी यानें स्वतः आणि दुसरीवर नानासाहेब यांनीं आधिपत्य करावें, आणि राजांनीं सांगितल्याप्रमाणें सुलतानगडाचे दोन बाजूस सुमारें चार चार कोसांचे अंतरावर अमके दिवशीं रात्रीं जाऊन छपून बसावें असें ठरलें. नानासाहेबांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. आपल्या हेतूप्रमाणें सुलतानगड, कीं जेथें आपण जन्म घालविला तोच, स्वराज्याचा पहिला पाया होणार, ह्यानें तर त्यांना विशेषच आनंद झाला.

---

३३. जवळ आलें

सय्यदुल्लाखानानें मुरारबाची व त्याच्याहीपेक्षां रणदुल्लाखानाची अप्रतिष्ठा करण्याची शिकस्त केली. शेवटीं रंगरावअप्पांस बादशहानें पुन्हां किल्लेदारी दिली, हें त्याच्या मनास मोठें डाचूं लागलें होतें. नीचांस आपला वैराग्नि प्रज्वालित ठेवण्यास यःकश्चित् नासकींकुजकीं कारणेंही पुरीं असतात, आणि त्या नासक्याकुजक्या दुर्गंधींत लोळत पडतां पडतांच त्यांच्या भ्रष्ट बुद्धींतून एखादी अजब कल्पना निघत असते. बादशहाचें मन कलुषित करून त्याच्याकडून रणदुल्लाखानाचा खूप अपमान करून आपला बेत पार पाडणें साधत नाहीं, तेव्हां आतां उलट प्रकार करून पहावयाचा, असा सय्यदुल्लाखानानें विचार केला. ‘सुलतानगडावर जाऊन कांहीं तरी युक्तीनें

रणदुल्लाखानाच्या बहिणीस काढून आणून बादशाही जनान्यांत नेऊन ठेवावें. अर्थातच ही हकीकत रणदुल्लाखानाच्या कानीं जातांच त्याला संताप येऊन त्यानें बादशहाचा अपमान करावा, म्हणजे आयतेंच आपलें काम होईल.' हा विचार शेवटीं कायम करून रणदुल्लाखानास त्यासाठीं प्रथम कांहीं दिवस कोठें तरी लांब पाठविण्याची तजवीज करण्याकरितां त्यानें कर्नाटकांत दंगेधोपे सुरू असल्याचें एक पत्र कर्नाटकांतील एका सुभेदाराकडून आणविलें, आणि दुसरी गोष्ट ही केली कीं, आज दरबारांत जर कोणी खरा शूर लढवय्या असेल तर तो एक रणदुल्लाखानच आहे, असें बादशहास सांगून त्यानें इतका मनाचा थोरपणा दाखविला कीं वा! बादशहास त्याच्या त्या थोरपणाचें फारच कौतुक वाटलें, आणि त्यानें लागलीच रणदुल्लाखानास बोलावून आणून कर्नाटकाच्या सुभेदाराकडून आलेलें तें पत्र त्यास दाखविलें, व तावडतोब बारा हजार फौज घेऊन जाण्याविषयीं आज्ञा केली. हा हुकूम होतांच रणदुल्लाखानानें मुराररावांची गांठ घेऊन त्यांच्याशीं एकंदर गोष्टीचा खल केला. कांहींना कांहीं तरी लबाडी आहे खास, असा त्यांचाही समज झाला. नीचपणाचा उद्देश असेल तर तो आपल्या बहिणीच्याच संबंधाचा असेल असें रणदुल्लाखानाच्या मनांत येऊन आपल्या बहिणीच्या संरक्षणार्थ त्यानें सुमारें पन्नास निवडक हत्यारबंद लोक सुलतानगडावर पाठविले, आणि आपल्या बारा हजार फौजेनिशीं कर्नाटकाचा रस्ता धरला.

इकडे आपलें कारस्थान सफल होऊन आपल्या मार्गांतला अडथळा जो रणदुल्लाखान तो तर दूर झाला असें वाटून सय्यदुल्लाखानास इतका आनंद झाला कीं कांहीं पुसूं नये. सुमारें दोन दिवसांनीं त्यानें सुमारें शंभर निवडक लोकांस बोलावून आणून सुलतानगडापासून सुमारें सहा कोसांवर दक्षिणेच्या बाजूस छावणी देऊन रहाण्यास सांगितलें आणि आपण पांचचार लोक बरोबर घेऊन सुलतानगडावर आला. सय्यदुल्लाखानाच्या पाठीमागें एक फार दिवसांचा काळा ससेमिरा होता. तोही विजापुरास मागें राहिला नाहीं. सय्यदुल्ल्यानें किल्ल्यावर येण्याबरोबर रंगरावअप्पांची जी काय व्यवस्था होती, ती सर्व बदलून त्यानें आपल्या हातीं किल्ल्याचा कारभारच घेतला असें म्हटलें तरी चालेल. पहिल्या दिवशीं तो इतक्या सुलतानशाहीनें वागल्यामुळें लोकांचीं मनें फार खट्टू झालीं.

सय्यदुल्लाखान किल्ल्यावर येण्याच्या दुसऱ्या दिवशीं रात्रीं आणखी एक विलक्षण प्रकार घडला. रात्र बरीच झाली होती. मात्र चांदणें स्वच्छ पडलें होतें. सय्यदुल्लाखानानें झोंप घेण्याची पुष्कळ खटपट केली. परंतु कृष्णसर्पाला कधीं रात्रीची झोंप आली आहे ? त्यांतून कोणाचा तरी दंश मनांत धरलेला असल्यावर मग काय विचारतां ? आतां एकदम चांदण्यांत जाऊन बसावें असें त्याच्या मनास वाटलें; आणि लागलीच त्यानें आपली खुर्ची समोरच्या बुरुजावर नेऊन स्वारी तेथें जाऊन बसली व विलकूल व्यत्यय उपयोगी नाहीं म्हणून त्यानें आपल्या सर्व चाकरनोकरांस तावडतोब तेथून जाण्यास सांगितलें. सय्यदुल्लाखान याप्रमाणें आपल्या कल्पनामंदिरांत दंग असतां एकाएकीं आपल्यापुढें एक अतिशय काळी छाया पडलेली पाहतांच तो दचकला आणि एकदम त्यानें वर पाहिलें, तों ती व्यक्ति पाहून त्याचीं सर्व गात्रें शिथिल झालीं. ज्याप्रमाणें कोणी कितीही शूर असला तरी यमदूत समोर आला कीं त्याची घाबरगुंडी व्हावयाचीच, त्याचप्रमाणें त्याची स्थिति झाली. इतक्यांत तो काळा पुरुष त्याच्या अगदीं जवळ आला व त्याच्या कानांत हळूंच "घाबरूं नकोस. आणखी सबंध दीड दिवस तुला मोकळीक आहे. तुझें मरण जवळ आलें आहे. काय करून घ्यावयाचें असेल तें दीड दिवसांत करून घे" इतकें बोलून तो तेथून पार नाहींसा झाला. त्याला शोधून काढण्याची सय्यदुल्लाखानानें पुष्कळ खटपट केली. शेवटीं अगदीं निराश होऊन व आपल्या सभोंवतीं चार निवडक माणसांचा सक्त पहारा ठेवून खानाची स्वारी तळमळ करीत आपल्या अंथरुणावर येऊन पडली.

चोहों बाजूंस चार पहारेकरी ठेवून तो निजला असतांही खानाची त्रेधा उडून त्यास सुरक्षितपणा वाटत नव्हता. तो बराच वेळपर्यंत विचार करीत होता. होतां होतां रात्र गेली. सकाळ झाल्यावर रात्रीच्या प्रकाराबद्दल विचार करतां करतां त्याच्या मनांत आलें कीं, त्या दुष्ट मनुष्यानें आपल्यास मुदत सांगितली आहे. तर त्या मुदतीच्या आंत आपण आपलें कार्य साधून घेऊन एकदांचें येथून निघून जावें हें चांगलें. लागलीच त्यानें निरोप पाठवून आपल्या सेनापतीस बोलावून घेऊन त्यास आपला काय बेत आहे व त्यानें काय केलें पाहिजे तें सांगितलें. सय्यदुल्लाखानाचा हुकूम घेऊन तो परत आपल्या लोकांमध्यें जाऊन त्यानें आपल्या विश्वासाचे चार लोक बोला-

विले, आणि त्यांस जी काय हकीकत सांगावयाची आणि तयारी करावयाची ती सांगून ठेविली. त्या चार लोकांकडून पुढें ती बाकीच्या लोकांत पसरली, आणि आज रात्रीं अमुक अमुक गोष्ट करावयाची आहे, असें ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें.

त्या दिवशीं संध्याकाळीं सुमारें सात वाजतां त्या काळ्याकभिन्न पुरुषानें सांवळ्याच्या मामाची गांठ घेऊन त्यास म्हटलें, "आज मी तुम्हांला एवढेंच सांगायला आलों आहें कीं, जो हेतु धरून तुम्ही इथें आलां आहां, तो हेतु एकदम साध्य करावयाचा असल्यास आजची वेळ फार चांगली आहे. किल्ल्यावर सय्यदुल्लाखान आज रात्रीं रणदुल्लाखानाच्या बहिणीस बळजबरीनें तेथून नेण्याचें आपलें नीच काम साधून घेण्याच्या विचारांत आहे. त्याचा उद्योग सफल होऊं न देतां त्याचा यथास्थित समाचार घेण्याची वेळ ही आहे. तुम्हीं यावेळीं शिताफी केल्यास तुमचें फार चांगलें साधणार आहे आणि एका साध्वीला वांचविलें असें होणार आहे. तुमच्या व्यवस्थेंत तुम्हांला फारसा फरक करावयास नको. रातोरात कसेंही करून त्याच्या माणसांस जेथल्या तेथेंच अडकवून ठेवून तुम्ही आपलीं माणसें वर जातील अशी तजवीज करा म्हणजे झालें. माझ्या सूचनेप्रमाणें वागल्यास तुमच्या प्रयत्नास सहजासहजीं यश येईल. वेळ बरोबर रात्रीं बारा वाजण्याची आहे. साधल्यास साधा, न साधल्यास माझा आग्रह नाहीं. नीट विचार करा. परंतु विचार करण्यांत वेळ घालविण्याला तुम्हांला अवधि मात्र नाहीं हें लक्षांत धरा." इतकें बोलून तो चटकन् उठला व 'येतों' असें म्हणून तेथून एकदम नाहींसा झाला.

---

३४. पितापुत्र

त्या काळाकभिन्न गृहस्थ निघून गेल्यानंतर आपला पूर्वीचा विचार कायम करून त्याप्रमाणें वर्तावें, कीं त्या गृहस्थानें सुचविल्याप्रमाणें आजच्या प्रसंगाचा फायदा घ्यावा, याबद्दल विचार मनांत येऊन सांवळ्याच्या मामाचें-शिवबाचें-चित्त द्विधा झालें होतें. शेवटीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यानें कुलदेवतेचा धांवा करण्याचें योजून तिचें ध्यान केलें.

या ध्यानांत साक्षात्कार होऊन असें सुचविलें गेलें कीं, "या प्रसंगीं तुला विनाकारण त्रास होऊं नये म्हणून मींच सर्व प्रकार जुळवून आणले आहेत." मग काय विचारतां ? लागलीच सूर्याजीस असा निरोप गेला कीं, सुलतानगडाच्या अमूक बाजूस अमक्या अंतरावर इतक्या लोकांची एक छावणी आहे. ती छावणी तेथून उठून किल्ल्यावर चाल करून जाण्यास अमुक वेळीं निघेल. तरी तिला जेथल्या तेथें अडवून टाकावें. पाऊलभरही पुढें सरकूं देऊं नये आणि आपल्या टोळीस हुकूम केला कीं अमुक वाजतां किल्ल्यावर अगदीं समोरच्या दिल्ली दरवाजानें चाल करून जावयाचें आहे, तर सगळ्यांनीं अगदीं खबरदारीनें असावें. इतकी सगळी तयारी होण्यास मग दोन घटकासुद्धां लागल्या नाहींत.

याप्रमाणें आपले लोक वेळच्या वेळीं दरवाजावर येण्याची तजवीज केल्यानंतर शिवबानें नानासाहेबांस एकदां ताबडतोब बोलावणें पाठविलें आणि पुन्हां एकदां किल्ल्यावर आपले वडील निजले असले, तरी त्यांना उठवून सर्व हकीकत सांगा आणि त्यांचें मन आपल्याकडे गुंतेल असें करण्याचा यत्न करा असें सांगितलें. "शेवटपर्यंत आशा म्हणून सोडतां कामा नये. मुलानें बापावर चाल केली, आणि त्याला कैदेंत ठेविलें असला लोकापवाद आपणां हिंदूंना उपयोगी नाहीं. बापाच्या जिवंतपणीं त्याला कैदेंत घालून आपण राज्यावर बसायचें हें हिंदूंचें ब्रीद नाहीं. एवढ्याकरितां तुम्ही जा, आणखी अजून त्यांचें मन वळलें तर पहा." नानासाहेब जाण्यास सिद्ध झालेला पाहतांच शिवाजीराजांनीं त्यास परवलीचा शब्दही सांगितला. "आतां आपल्यास वरून खालीं पुन्हां परत येण्यास मुळींच अवधि नाहीं. जें साधण्यास आपण जाणार तें साधलें तर ठीकच आहे, नाहीं तर तेथेंच असावें, योग्य वेळीं लोक चढून येतील. त्यांना नाकेबंदी करण्याला मदत करावी, आणि आपल्या जुन्या लोकांकडून जितकी कमी दांडगाई होईल तितकी करावी म्हणजे झालें." इतकें बोलून त्यांनीं त्यांना निरोप दिला, आणि नानासाहेब अगदीं निराश चित्तानें परंतु कर्तव्य म्हणून गडाकडे गेले. परवलीचा खुणेचा शब्द सांगून थोरल्या दरवाजाची अर्गळ निघून पूल पडल्याचा आवाज झाल्यापासून सय्यदुल्लाखान आपल्या मकाणांत अत्यंत आतुर झाला होता. त्याचे कान

सगळे तिकडे लागले होते. कोणी माणूस वर आल्याची वर्दी खानास केव्हांच पोहोंचली, आणि तो माणूस आपल्याचपैकीं असला पाहिजे, असें समजून तो अगदीं आपल्याजवळ केव्हां येतो असें त्याला झालें होतें. परंतु तितक्यांत तो माणूस किल्लेदाराच्या मकाणाकडे वळला असें लागलीच कळलें. मग काय विचारतां ! कांहीं तरी विश्वासघात झाला असें त्याला तेव्हांच वाटलें. लागलीच तो माणूस कोण तें पाहण्यासाठीं त्यानें माणूस पाठविला. त्याला तें जाणण्याची उतावळी इतकी झाली होती कीं, पहिला माणूस जाऊन पोहोंचला असेल नसेल तोंच दुसरा पाठविला, मागोमाग तिसरा, चौथा, पांचवा आणि शेवटीं आतां पाठविण्याला माणूस नाहीं असें होतांच तो स्वतःच तिकडे जाण्यास निघाला.

इकडे नानासाहेब वर येतांक्षणींच तडक आपल्या वाड्याकडे गेले. त्यांनीं आपलें खरें नांव सांगतांच पहारेकऱ्यांनीं तेव्हांच त्यांस जाऊं दिलें. ते आंत जाऊन दार बंद होतें न होतें तोंच सय्यदुल्लाखानाचीं माणसें एका पाठीमागून एक तेथें जाऊन दाखल झालीं. परंतु त्यांस आंत प्रवेश मिळाला नाहीं हें सांगावयास नकोच. नानासाहेबांस पाहतांच अप्पासाहेब संतापानें एकदम उभे राहिले, आणि म्हणाले, “ कारट्या, तूं जर उपजला नसतास, किंवा उपजला असतांच मेला असतास, तर काय क्षणिक दुःख झालं असतं आम्हांला तेवढंच ! विजापुरास आलास त्यावेळींच पुत्रहत्येचं पाप लागेल म्हणून हात मागें घेतला; पण पुत्रहत्येच्या पापापासून दूर राहून स्वामिद्रोहाचं महापातक मात्र पदरीं बांधून घेतलं. तें मनांत अजून डांचत आहे. आतां तूं माझ्या तावडींत आहेस. या घटकेस तुला कैद करून ठेवतों. कोण आहे रे बाहेर ? चला, या, बिड्या घेऊन या. ” अप्पासाहेबांची निष्ठुरता इतक्या कडेलोटाला गेली असेल अशी नानासाहेबांची कल्पना नव्हती. अप्पासाहेब व नानासाहेब पितापुत्र, त्यामुळें नानासाहेबांच्याही अंगीं त्यांतला थोडासा भाग आलाच होता. प्रत्यक्ष पोटच्या मुलापेक्षां मुसलमानांची सेवा त्यांना अधिक प्रिय आहे, त्यापेक्षां आतां आपण काय हेतूनें आलों तेवढें स्पष्टपणें सांगावें असा विचार करून तो लागलीच म्हणतो, “ अप्पासाहेब, कांहीं तरी विचार करा. तुमच्या स्वामिसेवेचं कांहीं तरी चीज झालं पाहिजे ना ? तुमची काय प्रतिष्ठा राहिली आहे आतां दरबारीं किंवा किल्ल्यावर याचा

विचार करा. यःकश्चित् हुजरडा येतो, आणखी किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन तुम्हांला धाब्यावर बसवतो! तुम्हांला तुमच्या वाड्याच्या बाहेर निघण्याची सुद्धां सुराणी नाहीं अशी स्थिति झाली आहे, हें लक्षांत घ्या. या स्वामिनिष्ठेच्या वेडांत तुम्ही किती वाहवणार? आज – आज या घटकेला – आपण या किल्ल्याचे खरेखुरे स्वामी व्हाल. पण आपल्या मनांत आलं पाहिजे."

याप्रमाणें नानासाहेबांचें बोलणें चाललें असतां म्हाताऱ्याच्या मनावर त्याचा खरोखरीच कांहीं तरी परिणाम झाला असावा असें नानासाहेबांस वाटलें आणि त्यांस मनांत थोडासा आनंदही झाला. पण तितक्यांत काय चमत्कार झाला! अप्पासाहेब त्याच्या अगदीं जवळ येऊन त्यास कांहीं चमत्कारिक चर्येनें व आवाजानें म्हणतात, "जा. जा. आतां अगदीं बोलूं नकोस, आणखी मला मोहांत पाडण्याच्या आशेनं माझ्या हातून भयंकर पाप करवूं नकोस. जा. तुला काय वाटेल तें कर. मी स्वामिसेवेला वाहिलों आहें. माझ्या हातून स्वामिघाताचें कार्य कालत्रयींसुद्धां होणार नाहीं. गप्प, गप्प, अगदीं एक अक्षरसुद्धां बोलूं नकोस, आणखी जागचं एक पाऊल पुढें टाकूं नकोस. जर टाकशील तर तुझ्यावर शस्त्र चालवायलासुद्धां मी कमी करणार नाहीं. माकडा, तुझ्यासारख्या माकडांच्या हातून स्वराज्य स्थापन होतें तर काय पाहिजे होतं?" "रामानं रावणाचें राज्य घेतलें तें माकडांच्या हातूनच!" नानासाहेब मध्येंच अतिशय तिरस्कारानें म्हणाले. मग काय विचारतां? प्रज्वालित केलेल्या चितेंत तेलाचा बुदलाच ओतल्याप्रमाणें झालें. अप्पासाहेब संतापून हात उगारून एकदम त्यांच्या अंगावर गेले, आणि आतां मारणार तोंच सय्यदुल्लाखान व त्याच्या पाठोपाठ चार पांच मंडळी "अप्पासाहेब, अप्पासाहेब, तोबा, ए क्या, ए क्या!" असें करीत आंत आली. अप्पासाहेबांनीं सय्यदुल्लाखानास पाहतांच ते एकदम म्हणतात, "खानसाहेब, हा माझा कारटा, हा निमकहराम, हा स्वामिद्रोही, याला आपल्या ताब्यांत घ्या तुम्ही......"

परंतु तितक्यांत बाहेर इतका गलबला झाला कीं काय गडबड आहे तें पाहण्यास अप्पासाहेबांस बाहेरच यावें लागलें.

---

३५. किल्ल्यावर गडबड

किल्लेदाराच्या मकाणाकडे आलेल्या माणसाच्या शोधास सय्यदुल्ला-खानानें एकामागून एक याप्रमाणें आपल्याजवळचीं सगळीं माणसें पाठविलीं व शेवटीं आपण स्वतः जाण्यास उठला. परंतु इतक्यांत बाहेर कांहीं गडबड झाल्याचें त्याला वाटलें, आणि पहातो तों आपलीं शोधाला गेलेलीं माणसें ! त्यांस पहारेकरी आंत जाऊं देत नाहींं, म्हणून किल्लेदाराच्या वाड्याच्या दरवाजापाशीं दंगा करीत आहेत असें त्यास दिसलें; परंतु आतां थोडक्या वेळासाठीं विनाकारण तंडातंडी, मारामारी करण्यापेक्षां एकदमच आपले लोक वर आले म्हणजे सगळ्यांची खोडकी मोडूं, असें मनांत आणून व आपण आतां तरी येथें एकटे बसून राहण्यापेक्षां किल्लेदाराच्या वाड्याकडेच जावें असा विचार करून व हत्यारबंद होऊन स्वारी किल्लेदाराच्या वाड्याकडे चालली. इतक्यांत नजिकच्या एका बुरुजावरल्या शिपायानें पुष्कळसे लोक किल्ल्याच्या अगदीं तोंडाशीं आल्याची वर्दी दिली. ती वर्दी कानीं पडतांच खानाच्या आनंदास काय पारावार ! शेवटीं मंडळी अगदीं वर आली. त्यांना सामोरें जाण्यासाठीं तो पुढें गेला, आणि त्यानें आपल्या लोकांवरील मुख्य माणसाचें नांव घेऊन त्यास हांक मारली. इतक्यांत एकदम पांचपन्नास चुडी पेटल्या आणि खानाची खात्री झाली कीं, हे आपले लोक नव्हेत. हे सैतानाचे लोक आपल्याला धरण्यासाठीं आले आहेत, असें त्यास पक्कें वाटून तो अप्पासाहेबांच्या वाड्याच्या दाराशीं असलेल्या आपल्या लोकांकडे धांवत गेला. त्याच्या मागोमाग कांहीं मावळे गेले. खानसाहेबांनीं अपेक्षिलेला 'दीन' 'दीन' शब्द कोणीकडच्या कोणीकडेच जाऊन त्याच्या जागीं 'हरहर महादेव' अशा गर्जनेची गर्दी उसळली. किल्ल्यावर गडबड सुरू झालेली पाहतांच खानानें ताडलें कीं, हा बापलेकांच्या मिलाफीचा कांहीं तरी बंडखोरीचा प्रकार खास. अप्पासाहेबांच्या वाड्याच्या दरवाज्यांतून खान व त्याच्या मागोमाग त्याचे चार असामी आंत शिरले, तों आंत काय चाललें होतें आणि कोठपर्यंत स्थिति झाली होती हें मागील प्रकरणांत वाचकांस कळलेंच आहे.

वाड्याच्या बाहेर चाललेला गलबला अप्पासाहेबांच्या कानीं पडल्या-

नंतर तर, त्यांचें डोकें संतापानें इतकें फिरून गेलें कीं, आतां म्हाताऱ्यास एक वायु तरी होणार किंवा वेड तरी लागणार अशी स्थिति झाली. ते तीराप्रमाणें बाहेर आले आणि दरवाज्यांत येऊन पाहतात तों तेथें सगळ्या वाड्याभोंवतीं घोंगड्याबहाद्दरांचा गराडा पडलेला, आणि दाराशीं सय्यदुल्लाखानाच्या नांवानें एकसारखी ओरड चाललेली! म्हातारा दरवाजाच्या बाहेर आला, आणि तेथें जमलेल्या लोकांस उद्देशून म्हणाला, "सय्यदुल्लाखान राजदरबारांतून माझ्या घरीं पाहुणा आला आहे. माझ्या या जर्जर देहांतून प्राण निघून जाईपर्यंत तो हातीं मिळेल अशी कल्पनासुद्धां मनांत येऊं देऊं नका." इतक्यांत दारापुढें असणाऱ्या मंडळींच्या मागून त्यांचें नांव घेऊन त्यांच्या एका शिपायानें म्हटलें, "महाराज, जिकडे तिकडे नाकेबंदी झाली आहे. आमचीं हत्यारें आंत राहिलीं आहेत; दाणागोटा, हत्यारपात्यार आमच्या हातीं येण्याजोगें कांहीं सुद्धां नाहीं." तें ऐकतांच अप्पासाहेब तर असे संतापले कीं, विचारूंच नये. एकदम "रडा, रडा रांडलेकांनो, बांगड्या भरा म्हणजे हें सगळं शोभेल." इतकें बोलून स्वारी परत फिरली, आणि सदरेवर आली. सय्यदुल्लाखान त्या ठिकाणीं अगदीं गरीब गाय होऊन बसला होता. अप्पासाहेब आंत येतांच तो त्यांना म्हणतो, "अप्पासाहेब, मी तुम्हांला शरण आलों आहें. कसेंही करून मला किल्ल्याखालीं माझ्या लोकांकडे नेऊन पोहोंचवा. तुम्हीं जर मनांत आणलंत तर हें होणार आहे. नाहीं तर तो सैतान माझा प्राण घेतल्याखेरीज आज ठेवीत नाहीं." "तो सैतान? कोणता सैतान? माझा कारटा? तो मांग, तो कुळांगार, ज्यानं पितृद्रोह, स्वामिद्रोह केला, त्यानं माझं घर विटाळूंच नये. आणा, आणा माझी तलवार, मी त्याची हत्या करतों, नाहीं तर त्याच्या हातून पितृहत्या तरी करवितों. त्यानें मला मारावं, नाहीं तर मी तरी त्याला मारीन." इतकें अतिशय त्वेषानें म्हणत म्हातारा एकदम पिसाळल्याप्रमाणें आपल्या मुलाच्या अंगावर धांवून गेला. त्यांचें चित्त खरोखरीच भडकलें. त्यांनीं खरोखरीच नानासाहेबांच्या नरड्यास हात घातला. स्वामिभक्तीची पराकाष्ठा झाली, परंतु तेथें असणाऱ्या त्यांच्या नोकरांनीं त्यांस दूर केलें आणि नानासाहेबांस बाहेर जाण्याविषयीं विनंती केली. सय्यदुल्लाखान दीन होऊन अप्पासाहेबांकडे पहात होता. पुन्हां त्यानें

अप्पासाहेबांस विनविलें आणि कसेंही करून बेगमेच्या लोकांची मदत घेऊन, पण मला खालीं पोहोंचवून एकदां आपल्या लोकांत मिळूं द्या अशी विनंती केली. अप्पासाहेबांनीं तें कबूल केलें. "माझा प्राण जाईपर्यंत मी तुमचें संरक्षण करतों. चला तुम्ही" असें म्हणून त्यांनीं आपलीं हत्यारें नीटपणें कसलीं, आणि डाव्या हातानें सय्यदुल्लाखानास धरून दाराच्या बाहेर पाऊल घातलें. लागलीच तीन असामी चवताळून पुढें झाले, परंतु तितक्यांत मागल्या बाजूनें धीरगंभीर वाणीनें कांहीं इषारा झाला. त्या इषाऱ्यासरसे एकदम लोक दुभंगले आणि अप्पासाहेबांस व त्यांनीं हातीं धरलेल्या त्या सय्यदुल्लाखानास निघून जाण्यास त्यांनीं वाट करून दिली.

इकडे बेगमेच्या लोकांस अद्यापि काय गडबड आहे हें समजलेंच नव्हतें. पांचसात असामी पहाऱ्यावर होते. त्यांनीं चौकशी केली असतां तानाजी तेथें आसपास मुद्दाम होता, त्यानें हिंदुस्थानींत सांगितलें, "सय्यदुल्लाखानाचे लोक वर आले असून ते तुमच्या बेगमसाहेबांना बळजबरीनें तेथून काढून नेण्याच्या विचारांत आहेत. सध्यां ते किल्लेदाराच्या सुनेसाठीं आरडा-ओरड करून किल्लेदाराच्या वाड्यांत शिरूं पहात आहेत. सांभाळा. तुम्ही अगदीं तयारींत असा." इतकें बोलून तानाजी तेथून निघून गेला. सय्यदुल्लाखानाचा हा बेत तर सगळ्यांनाच माहीत होता. यामुळें आतां तानाजीनें त्यांस सांगितलेली गोष्ट अगदीं खरी वाटली. तितक्यांत बेगमेच्या माणसां-पैकीं सय्यदुल्लाखानानें फोडलेल्या एका माणसाला पश्चात्ताप होऊन तो एकदम म्हणतो, "यार हो, सय्यदुल्लाखानाच्या मनांत बेगमसाहेबांविषयीं दुष्ट हेतु खचित आहे; तो मला कालच फितवायला पहात होता. तो म्हणत होता कीं, तुम्हांला सगळ्यांना दारू पाजून बेहोष करून ठेवावें, पण मी कबूल झालों नाहीं." हें बोलणें चाललें असतां किल्लेदाराच्या वाड्या-कडील मंडळी आपल्या वाड्याकडे येत आहेत असें त्यांनीं पाहिलें. मग तर त्यांची खात्रीच झाली कीं, यांत कांहीं तरी सत्य असलें पाहिजे. ही मंडळी हत्यारें सज्ज करून उभी राहिली. तीही मंडळी तिकडून पुढें आली. नानासाहेब पुढें होता. तानाजी त्याच्याबरोबर होता. नानासाहेबानें मोठ्यानें त्या बेगमेच्या वाड्यांतल्या मंडळीला हांक मारून म्हटलें, 'यार हो, तुम्ही जर मुकाट्यानें आपला सगळा खटला येथून हलवून

जात असलां तर आतांच्या आतां चालते व्हा. तुमच्या केंसालासुद्धां आम्ही हात लावीत नाहीं. जर तुम्ही आमच्याशीं दंगामस्ती करण्याच्या भानगडींत पडाल तर हकनाक मराल. हा किल्ला आतां अप्पासाहेबांच्या ताब्यांत नाहीं. आतां इथें जुना अंमल नाहीं; तुम्हांला मी एका घटकेची फुरसत देतों. तसं करायचं नसेल, तर आतांच्या आतां हत्यारं खालीं टाकून स्वस्थ बसा. सोईला येईल तेव्हां जा." हें त्याचें बोलणें ऐकतांच त्यांतील एकजण म्हणाला, "यार हो, हा दुष्ट आपल्या खानसाहेबांचा शत्रु. हा सय्यदुल्लाचा मिलाफी आहे. पाहतां काय? चला याच्या अंगावर तुटून पडूं." या वेळीं नानासाहेबांस त्याचा चेहरा दिसला. तो पाहून त्यांस अतिशय संताप आला व ते एकदम त्याच्या अंगावर तुटून गेले. दोन्हीकडल्या लोकांची एकाएकी जुंपली. इतक्यांत सय्यदुल्लाखानास किल्ल्याखालीं पोंचवून अप्पासाहेब वर आले आणि त्यांनीं तो प्रकार पाहून त्यांस स्फुरण चढून तेही त्या गर्दींत शिरले. ही चकमक अगदींच अचानक झाली. नानासाहेबांच्या मनांतही आलें नाहीं कीं, अशी चकमक उडेल. ते आतां किल्ला आपल्या हातीं पडला अशा विचारांत होते, परंतु बापलेकांचा सामना व्हावयाचा होता.

---

३६. चकमक चालली असतां दुसरीकडे

अप्पासाहेब चकमकींत शिरले आहेत, ही गोष्ट पाहतांच नानासाहेबाचे हातपाय अगदीं गळाले, आणि तो मागें सरला. त्याचा हात पुढें वाहीना. ही चकमक चालली असतां तो दुसरीकडे एकटाच दूर गेला. इतक्यांत मागाहून कोणी तरी त्याच्यावर अचानक असा तलवारीचा घाव घातला व तो अशा मर्मस्थानीं बसला कीं, त्यासरशीं तिरीमिरी येऊन तो धाडकन् खालीं पडला. वार करणारा माणूस अहंमद, एकदम त्याच्या छातीवर बसला, आणि "ए दुष्मन्, शेवटीं माझ्या इच्छेप्रमाणें तुझ्या नरडीचा घोट घ्यायला मला सांपडला!" असें म्हणून त्यानें त्यास एकदां खांद्याला धरून घुसळलें. नानासाहेब अजून जिवंत आहे असें वाटतांच त्यानें बिचवा

धरून मानेंत खुपसण्यासाठीं हात वर उचलला. एक क्षण जर उशीर होता, तर नानासाहेबांचा निकालच लागला असता. परंतु तितक्यांत कोणा तरी जबरदस्त माणसानें मागून तलवारीचा फटकारा मारून त्याचा तो बिचवा धरलेला हात सफाई उडविला आणि दुसरा जबर वार मानेवर बसून तो धाडकन् उलथून पडला. नानासाहेबांस वांचविणारा तो पुरुष त्याच्या जवळ येऊन अंधारांतच त्यानें त्याचा ऊर चांचपला आणि आतां नानासाहेबांस तेथून उचलून कोठें तरी निवाऱ्याच्या जागीं नेऊन ठेवण्यासाठीं मंडळीस आणावें म्हणून तो गेला. तो तेथून सुमारें शंभर पावलें गेला असेल नसेल, तोंच त्या बाजूनें किल्ल्यावर कोणी तरी चढून येत आहे असें त्यास वाटलें आणि बांगड्यांचा आवाज ऐकूं येऊं लागला. हा प्रकार काय आहे तें पाहण्यासाठीं तो किंचित् थांबला, तों पुढील शब्द त्याच्या कानीं पडले:—
"पण बाईसाहेब, इतका आग्रह धरून तुम्ही इथें आतां आलां तरी कशाला? इथें तर अजून केवढा तरी धुमाकूळ चालला आहे." "वेडे, तुला माहीत नाहीं! स्वारीच्या बरोबर लढायला! नाहींतर, अगबाई, पण हें काय हें? कोणीतरी इथं पडलं आहे. कोण बरं असेल? खचित् कोणी तरी वीर .." परंतु तितक्यांत नानासाहेबांस वांचविणारा तो पुरुष म्हणतो, "हो. हो. तो वीरपुरुषच पडला आहे, आणखी त्याला विश्वासघातानं पाडणारा पलीकडे मरून पडला आहे. तुम्ही त्या वीरपुरुषाजवळ बसा. आणखी इतक्यांत मी दोनतीन माणसं व चूड घेऊन येतों. आपण त्याला उचलून दुसऱ्या कुठें निवाऱ्याच्या जागीं नेऊं आणि सावध करूं. तो अजून चांगल्या स्थितींत आहे. घाबरूं नका, आणखी तिथून हालूं नका." तो वीरपुरुष कोण असावा याचा तर्क करीत त्या स्त्रिया तेथल्या तेथेंच घोटाळूं लागल्या. इतक्यांत तो वीरपुरुष एकदां कण्हला, व 'कोण आहे तें? अप्पासाहेब?" असे शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडले. ते शब्द कानीं पडतांच त्या दोघींपैकीं एक स्त्री म्हणाली, "तेच, वेडे, तेच. आतां कसं करूं? आणखी हा काय अनर्थ हा? अग जा, धांव, आणखी थोडंसं पाणी आणखी दिवा घेऊन ये. जा जा." ती दुसरी स्त्री लागलीच गेली. इकडे ही स्त्री अगदीं वेड्याप्रमाणें होऊन गेली; ती उठली आणि धांवत जवळच्या टांक्याकडे जाऊन तिनें ओंजळ भरून घेतली, व त्या वीरपुरुषाच्या मुखांत तें पाणी घातलें,

आणि ओला करून आणलेला पदर त्याच्या डोळ्यांस लाविला आणि कपाळावर ठेविला. त्याबरोबर गार होऊन "अहाहा!" असे शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडले. ते ऐकतांच त्या स्त्रीला किती तरी समाधान झालें!

थोड्याच वेळांत तिची ती दासी, तो मघांचा त्या दोघींना 'तुम्ही तेथें बसा' म्हणून सांगणारा पुरुष, आणखी कांहीं लोक अशी मंडळी आली व त्या पुरुषाचा हुकूम होतांच दोन असामी पुढें होऊन त्यांनीं नानासाहेबांस उचललें आणि वाड्याकडे चालाविलें. इतक्यांत मागल्या एका माणसाचें लक्ष त्या मरणाच्या द्वारीं पडलेल्या अहंमदाकडे गेलें. लागलीच याच हरामजाद्यानें नानासाहेबांची अशी स्थिति केली, असें त्याच्या मनांत येऊन त्यानें एक लाथ त्या प्रेतवत् पडलेल्या अहंमदाला मारली. त्याबरोबर शिवबा एकदम त्याला हांक मारून म्हणतात, "जिव्या, ही गोष्ट माझ्या कधीं-कधींसुद्धां कामास पडायची नाहीं, समजलास? मुसलमान काय किंवा हिंदु काय, मरणाच्या द्वारीं पडलेले सगळे सारखेच. समज कीं, तूं स्वत: मरायला टेकला असलास आणखी तुला एका मुसलमानानं लाथ मारली तर तुला काय वाटेल? जा, त्याच्याजवळ बस. मीही बसतों. त्याचं मरण त्याला जितकं सुखानं येईल तितकं करूं, चल." असें म्हणून शिवबा खरोखरीच त्या मुसलमानाजवळ बसला आणि जिव्यास दुसऱ्या बाजूस बसण्यास सांगितलें. नंतर पाणी आणवून तें शिवबानें आपल्या हातानें त्याच्या तोंडांत घातलें, व तो जिव्यास म्हणतो, "बाबारे, जोंपर्यंत समोरासमोर उभा राहून माणूस लढाई करील, तोंपर्यंत त्याचा द्वेष आणखी त्याचें शत्रुत्व. मरणाच्या काळीं सगळ्यांची गति एकच; तिथें भिन्न भाव नाहीं." हें ऐकून जिव्या अगदीं चकित होऊन बसला. इतक्यांत कांहीं माणसें धांवत येऊन त्यांनीं "किल्ला पक्का सर झाला" अशी बातमी दिली. आणि "मात्र अप्पासाहेबांस धरून ठेविलें आहे, त्यांचें काय करावयाचें त्याचा हुकूम व्हावा. बेगमेचीं माणसें लाचार होऊन हत्यारें टाकून स्वस्थ बसलीं आहेत, त्यांचें पुढें काय करावयाचें, याचाही हुकूम व्हावा," असें सांगितलें. शिवबानें "त्यांचा विचार मग करतां येईल, मात्र त्यांच्यापैकीं कोणा-तरी दोघांचौघांस या इसमाला मूठमाती देण्याला बोलवा" असें सांगितलें.

आणि तीं माणसें येतांच शिवबानें त्यांच्याकडून अहंमदास खालीं वाडींत नेऊन मूठमाती देवविली.

---

३७. प्रतिज्ञेप्रमाणें केलें

अप्पासाहेबांनीं सय्यदुल्लाखानास किल्ल्याच्या पायथ्याशीं आणून पोंचविल्यानंतर सय्यदुल्लाखान किल्ल्याचा पायथा सोडून आपले लोक ठेवले होते तिकडे गेला. त्याचा कट्टा दुष्मन् तो काळाकभिन्न गृहस्थ त्याच्या मागें होताच. त्याच्या मनांत विचार आला कीं, "वेळ तर भरत आली, आणि आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें घडण्याचें अद्यापि कांहींच चिन्ह वडून येत नाहीं याचा अर्थ काय? मीं तर असा निश्चय केला कीं, आपण त्याला कुठें तरी समरांगणांत गांठून तिथें त्याचा प्राण घ्यावयाचा; जर कां आजची ही संधि गेली, तर सगळें कांहीं बिघडणार आहे. मग आपली प्रतिज्ञा पुरी होत नाहीं; आणि आपल्याला स्वतःच्या हातानेंच आपली चिता रचून या जगांतून काळें केलें पाहिजे." शेवटीं सय्यदुल्लाखान खालीं येऊन आपल्या लोकांकडे गेला म्हणजे त्याच्या लोकांवर सूर्याजीच्या लोकांकडून हल्ला करून मग त्या चकमकींत आपण त्याला गांठावें, असा विचार करून तो काळाकभिन्न गृहस्थ त्याच्या पाठोपाठ छायेप्रमाणें चालूं लागला, व त्याच्या जवळ येऊन त्यानें त्यास म्हटलें, "अरे, आतां पळून जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. लबाडीनें व लुच्चेगिरीनें तुझा मला खून करावयाचा असता, तर आज इतक्या वर्षांत केव्हांच करून टाकला असता. आज आतां तुला सुटका नाहीं. तुझ्या लोकांची आणखी मराठ्यांची चकमक आतां झडते आहे, तींत तूं शीर. मराठ्यांच्या बाजूला मीं शिरतों आणखी मग तुझ्या हातून माझा किंवा माझ्या हातून तुझा अंत होऊं दे." इतकें बोलून तो तेथून चालता झाला. हें भाषण कानीं पडत असतांना बिचाऱ्या सय्यदुल्लाखानाचें सर्वांग लटलटां कांपत होतें. त्याला नखशिखांत घाम आला. तो मूळचा हुजऱ्या. त्याला लढाई म्हणजे काय, कशाशीं खावी याचें स्वप्न सुद्धां नाहीं. तो तेथून पळून जाण्याच्याच

विचारांत होता. इतक्यांत समोरून सूर्याजीचे लोक येऊन त्यांनीं त्यास पकडून सूर्याजीपुढें उभें केलें. सय्यदुल्लाखानास पाहतांच त्याच्या सर्वांगाची लाही झाली; आणि एकदम त्यास तो म्हणतो, “दुष्मन्, आतां तूं आमच्या हातांतून सुटत नाहींस. माझ्या सासऱ्याच्या, माझ्या स्वतःच्या, आणखी माझ्या मित्राच्या घराण्याचा सत्यानाश करायला कारण तूं. आज तुझे दिवस भरले. आतां तूं मरायला सिद्ध हो. एका फटक्यासरसा तुझा निकाल उडवितों.” असें म्हणून त्यानें आपली तलवार उपसली. इतक्यांत मागून एका व्यक्तीनें येऊन त्यास म्हटलें, “छे, छे. बाबा, हा अधिकार तुझा नाहीं, माझा आहे. त्याला एक तलवार दे. माझी माझ्याजवळ आहे; आम्ही दोघेही लढूं. तूं मध्यें पडूं नकोस. माझी प्रतिज्ञा मला पार पाडूं दे. हाच दिवस माझ्या प्रतिज्ञेचा शेवटला आहे.” त्या व्यक्तीस पाहून व तें भाषण ऐकून सूर्याजीस अतोनात आश्चर्य वाटलें. नंतर त्यानें हलकेंच म्हटलें, “हो. हो. याच्यावर सूड उगविण्याचा अधिकार तुमचाच. मी त्यास माझी स्वतःची तलवार देतों. ती त्यानें घ्यावी आणि खुशाल आपल्याशीं लढावें.”

हें सर्व ऐकून सय्यदुल्लाखान अतोनात घाबरून गेला. पण तितक्यांतल्या तितक्यांत त्याला कांहीं सुचून तो थोडासा नेट करून त्यांस म्हणतो, “मी आतां एकटा सांपडलों आहें. तुम्ही मला वाटेल तसा ठार माराल यांत मुळींच अशक्य नाहीं, आणखी नवलही पण नाहीं. पण मी मेलों म्हणजे तुमची सगळ्यांची काय स्थिति होईल याची अणुरेणु तरी तुम्हांला कल्पना आहे? बादशहाचं माझ्यावर इतकं प्रेम आहे कीं, त्याला ही गोष्ट कळली, तर तो मराठा म्हणून औषधाला सुद्धां उरूं देणार नाहीं. पण तुम्ही जर मला सोडाल, तर मी बादशहाजवळ तुमची शिफारस करीन.” हें त्याचें बोलणें ऐकून सूर्याजी व त्याचा मेहुणा तो काळा गृहस्थ दोघेही हंसले, व त्यास म्हणतात, “सय्यदुल्लाखान, तूं आपल्या देवाचं आतां स्मरण कर, आणखी शूराप्रमाणें लढायला उभा रहा. तुझ्या कृष्णकृत्यांबद्दल सूड उगविल्यावर मग मराठ्यांचं काय व्हायचं असेल तें होईल. तुला मी शूराप्रमाणें मरण्याला संधि देतों. इतक्या उपर तूं जर तयार नसलास तर माझी प्रतिज्ञाच खरी करण्याकरितां तुझ्या अंगचं रक्त काढण्यासाठीं एक छोटासा वार करून व त्या रक्तांत एक बोट बुचकळून मग तुला सगळ्यांच्या देखत या झाडाला बांधून

फांशी देईन. तूं म्हणतोस कीं, तुझ्यावर बादशहाचं प्रेम आहे; व त्यानं जर तुझ्या मृत्यूची हकीकत ऐकिली, तर तो त्याबद्दल सूड घेईल. पण बाबा, तूं अगदीं चुकतोस. बादशहाच्या दृष्टीआड तूं झालास म्हणजे त्याला स्वप्नांत-सुद्धां तुझी आठवण व्हावयाची नाहीं. ज्याप्रमाणें पाण्यावर ओढलेली रेघ कधीं टिकत नाहीं, त्याचप्रमाणें बादशहा, राजे यांच्या मनावर कोणाच्या उपकारांचा किंवा सेवेचा परिणाम होत नाहीं, ही गोष्ट लक्षांत धर. त्यांतूनही तुला आपल्या मागें बादशहा आपल्यासाठीं सूड घेईल एवढ्या विचारानं संतोष वाटत असेल, तर खुशाल वाटून घे. आम्हांला त्याची भीति मात्र दाखवूं नकोस म्हणजे झालं. बघ. अजून ही संधि दवडूं नकोस. ही तलवार घे आणखी लढायला उभा रहा. त्याचा काय नेम? तूंच मला मारणार नाहींस कशावरून?" परंतु सय्यदुल्लाखान एक अवाक्षरहि बोलेना किंवा तलवार हातीं घेईना. त्यास वीरमृत्यु कुठला आवडणार! शेवटीं, त्या काळ्या गृहस्थानें आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें केलें. सय्यदुल्लाखानाचा नेमानेम झाडाची फांदी आणि दोरी यांच्याशींच होता.

---

३८. थोडी पूर्वीची हकीकत

आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें आपल्या दुष्मनाशीं झगडून त्याचा रक्तपात करण्यास सांपडला नाहीं याबद्दल त्या काळ्या गृहस्थास फार वाईट वाटलें. तो काळा गृहस्थ म्हणजे रामदेवराव; ती लहानसहान व्यक्ति नव्हती. त्याचें घराणें आणि दौलताबाद अथवा देवगिरी येथील यादवांचें घराणें यांचा संबंध होता, व त्या घराण्यांतील प्रसिद्ध पुरुषावरून त्याचें नांव रामदेवराव ठेवण्यांत आलें होतें. आपण विजापुरच्या दरबारीं जाऊन आपल्या अलौकिक शौर्याचा व स्वामिभक्तीचा उपयोग करून बादशहाची मर्जी मिळवूं व घराण्याचें नांव उत्तम तऱ्हेनें उर्जित दशेला आणूं ही त्याची व त्याच्या बापाचीही इच्छा होती. त्याप्रमाणें आपला जहागीर गांव सोडून रामदेवराव सहकुटुंब विजापुरास जाऊन राहिलाही होता. तेथें बादशहाच्या दरबारांत त्याचें वजन लवकरच चांगलें बसून बादशहाची

त्याच्यावर मर्जी बसली. सर्व कांहीं झालें, परंतु ज्याप्रमाणें आकाश अगदीं निरभ्र असतां व सर्व प्राणिमात्र मोठ्या आनंदानें सूर्याच्या कोंवळ्या उन्हाचा उपभोग घेत असतां, एकाएकीं मेघ येऊन जिकडे तिकडे अंधार पडावा, जंगी गडगडाट होऊं लागावा, प्रचंड वृष्टि होऊन सगळ्या ब्रह्मांडाचा प्रलय होतो कीं काय असें वाटावें, तसाच एकदम प्रकार झाला.

रामदेवरावाची पत्नी अति रूपवती होती. तिच्या लावण्याची ख्याति सय्यदुल्लाखान व त्याच्यासारखे आणखी कित्येक नरपशु यांच्या मुखानें बादशहापर्यंत गेली; आणि सय्यदुल्लाखानानें नीचपणानें बादशहाच्या जनान्यांतून प्रत्यक्ष बेगमेच्या नांवानें बोलावणें पाठवून व बादशहास तिचें दर्शन करविल्यापासून तर बादशहा तिच्या लावण्यानें अगदीं वेडा झाला. पत्नी घरीं आल्यानंतर तिनें बेगमांचीं आदराचीं बोलणीं रामदेवरावास सांगितल्यानंतर त्याच्या आनंदास अगदीं पारावार नाहींसा झाला. आतां आपण सर्व प्रकारांनीं पुढें येणार असें त्याच्या मनांत येऊं लागलें. परंतु आपण जे मनःप्रासाद बांधीत आहों, त्याचा पाया कसा भयंकर रीतीनें पोखरला जात आहे, याची बिचाऱ्यास कल्पनासुद्धां नव्हती. बादशहास तर त्या दिवसापासून दुसरा कोणताच निदिध्यास राहिला नाहीं. शेवटीं एक दिवस बादशहानें सय्यदुल्लाखानास रामदेवरावाला मारेकऱ्यांकडून ठार मारवून त्याच्या बायकोला उघडाउघडीं येथें आणून ठेवतों असें सांगितलें. पण यामुळें आपला वरचष्मा राहणार नाहीं असें त्याला वाटून त्यानें बादशहास अगदीं मोडून काढलें व 'आपण दोन दिवसांत उत्तम युक्ति काढून देतों' असें अभिवचन दिलें. त्याप्रमाणें शेवटीं सय्यदुल्लाखानानें बादशहास अशी युक्ति सांगितली कीं, "रामदेवरावास दक्षिणेंत कर्नाटकांत बंडावा मोडण्यास किंवा प्रांत काबीज करण्यास पाठवावा आणि त्यास निघण्यास अवकाश अगदीं थोडा द्यावा. तो अशा कामगिरीवर अतिशय आनंदानें जाईल. मंडळी जहागिरीवर परत पाठविण्याचें व वडिलांकडे सुखरूप पोंचविण्याचें काम आपण आपल्या अंगावर घ्यावें व त्या मिषानें रामदेवरावाच्या पत्नीला तेथून बाहेर काढून गुप्तपणें अमुक ठिकाणीं आणून ठेवावें. लोक व रामदेवराव समजतील कीं, तिला बादशहानें वडिलांकडे रवाना केली. इकडे रामदेवरावाच्या घरच्या मंडळींचा तर

असा समज करून देऊं कीं, ती रामदेवरावाबरोबर गेली ! थोडे दिवस झाले म्हणजे रामदेवरावावर तिकडल्या तिकडे कांहीं तरी तोहमत आणून त्याचा समाचार घेऊं. आणखी त्याची पत्नी घरीं न जातां आपण होऊन जनान्यांत आली अशी कंडी पिकवूं." बादशहानें हें एकंदर कारस्थान ऐकल्यावर त्याची तब्येत इतकी खूष झाली कीं दुसरेच दिवशीं त्यानें रामदेवरावास बोलावून आणून त्याची खूप स्तुति केली आणि त्यास तावडतोब कामगिरी-वर जाण्याविषयीं सांगितलें. रामदेवरावाची महत्त्वाकांक्षा आधींच फार जबर होती, आणि तिला अंकुर फुटण्याची अशी ही संधि आलेली. त्यानें तत्काळ 'हो' म्हटलें. बादशहा आपल्या कुटुंबास वडिलांकडे नेऊन पोंचविण्याची हमी घेतो, मग आणखी काय पाहिजे ? आपला आतां पुरा भाग्योदय झाला, असें वाटून त्या आनंदांत तो बिचारा परत आपल्या वाड्यांत गेला. बादशहानें फौजफांट्याची काय व्यवस्था करावयाची ती करून देऊन त्यास तिसरे दिवशीं रवाना केलें. पुढें दोनचार दिवसांतच सगळ्यांत जें काय नीचांतलें नीच कृत्य करावयाचें होतें, तेंही सय्यदुल्ला-खानाच्या कृष्ण कारस्थानाप्रमाणें अगदीं गुप्तपणें जुळून येऊन बादशहाच्या अनान्वित इच्छेची तृप्ति करून घेण्यास संधि सांपडली. रामदेवरावाची पत्नी रंभावती या नांवानें पुढें प्रसिद्ध झाली. परंतु ती भ्रष्ट करण्याला बाद-शहाला काय काय अनान्वित प्रकार करावे लागले, आणि शेवटीं ती बळी पडून आल्या स्थितीला सादर कशी झाली याचा अत्यंत दुःखद इतिहास येथें देत नाहीं. त्याचें दिग्दर्शन तिच्याच तोंडून वाचकांना पुढें कळणारच आहे. असो.

इकडे रामदेवरावाची त्याच्या वडिलांस व त्याच्या वडिलांचीं रामदेव-रावास पत्रें जाऊं लागलीं असतां, त्यांचा मधल्यामधेंच विच्छेद करून सय्यदुल्लाखानानें अखेरीस रामदेवरावास एक पत्र लिहिलें, व त्यांत रंभा-वतीस बादशहानें भ्रष्ट केल्याचा सविस्तर मजकूर लिहिला आणि शेवटीं असें लिहिलें कीं, "रंभावती आतां बादशहाची पट्टराणी झाली असून बादशहाचे मारेकरी फार भयंकर रीतीनें तुझा खून करणार आहेत. तेव्हां अशा प्रसंगीं तुला जागें करावें असें आपलें कर्तव्य जाणून फारच गुप्त तऱ्हेनें मी हें पत्र लिहीत आहें. पत्र वाचतांच तें फाडून टाकशीलच."

हें पत्र हातीं पडल्यापासून रामदेवरावाच्या अंगाची अगदीं लाही लाही झाली. मारेकऱ्याच्या हातून मरण्यापेक्षां खरोखरच येथून काळें करावें, आणि बादशहाच्या रक्तानें हा अपमान—हा कलंक—धुवून टाकण्यास झटावें असा विचार करून तावडतोब तो त्यानें अंमलांत आणला. इकडे सय्यदुल्लाखानाचा विचार असा होता कीं, रामदेवराव नाहींसा झाला कीं, त्यानें बादशहाचा विश्वासघात केला आणि त्यामुळें त्यास तिकडच्या तिकडेच देहान्त शिक्षा देण्याचा बादशहानें हुकूम केल्याबरोबर तो पळून गेला, असें उठवावयाचें. त्या रागावर त्याच्या बापास धरून ठार मारावयाचें कारस्थानहि त्यानें बांधून ठेविलें होतें. परंतु रामदेवरावाच्या वडिलांस वेळींच कांहीं बातमी लागून त्यांनीं आपलें स्थान सोडून वेषांतर केलें. इकडे रामदेवराव वेषांतर करून व बादशहावर पक्का सूड उगविण्याच्या आपल्या बेताला आपल्या नानाप्रकारच्या विचारांनीं पुष्टि देत देत विजापुराच्या बाजूस आला, तों त्यास कोणा एका इसमानें ओळखून सय्यदुल्लाखानाविषयींची खरी हकीकत ज्यांत लिहिली होती असें एक पत्र दिलें, आणि अमुक रानांत अमुक ठिकाणीं झोंपडी आहे, तेथें एक भिल्ल राहतो, त्यास तावडतोब जाऊन भेट म्हणून सांगितलें. पत्राचें अक्षर ओळखीचें असल्यामुळें अर्थातच रामदेव-रावाचें चित्त द्विधा झालें. शेवटीं काय करावयाचें तें त्या भिल्लास भेटल्यानंतर करूं, असा विचार करून तो पत्रांत सांगितलेल्या रानांत जाऊन त्या भिल्लास भेटला. तो भिल्ल त्याचा बाप होय.

रामदेवरावाची व त्याच्या वडिलांची गांठ पडतांच रामदेवराव एकदम म्हणतो, “ आपण जी ही हकीकत लिहून मला कळविली ती खरी काय? आमचा दुष्मन् कोण? बादशहा कीं सय्यदुल्लाच? ” “ सय्यदुल्लाच! तो नीच सय्यदुल्लाच. ” त्याच्या वडिलांनीं उत्तर दिलें. तें ऐकून रामदेवराव किंचित् थांबला आणि उसासा टाकून मग म्हणतो, “ ठीक. ठीक. हें जर खरें असेल तर त्याच्या रक्तांत मी आपले हात बुचकळून मनाचें समा-धान करून घेईन आणि मग ... ” पुढें त्याच्यानें बोलवेना. तो स्वस्थ बसला. त्याच्या बापानें बराच वेळ आपलें मन आंवरलें आणि मुलगा आतां किंचित् शांत झाला आहे असें पाहतांच तो हलकेंच म्हणतो, “ मीं बारकाईनें सगळा शोध केला, आणि माझा प्राण वांचविला तो तिनें. तिनें

जर मला वेळींच सूचना पाठविली नसती तर मारेकऱ्यांच्या हातून माझा किती भयंकर रीतीनें खून झाला असता याचा मुळींच कांहीं सुमार नाहीं. मला तिनें बातमी दिली ती अक्षरशः खरी ठरली. मी वाडा सोडून निघाल्यापासून पाव घटकेनें मारेकरी वाड्यांत शिरले. मी सांपडलों नाहीं म्हणून त्यांनीं एकच दंगा केला. गड्यामाणसांस छळछळ छळलें, आणि शेवटीं वाडा जाळून फस्त करून नांगर फिरवला. मी आपल्या जिवाचें कांहीं तरी करून टाकणार होतों. परंतु खरा प्रकार काय आहे हें समजून घेऊन तो तुला सांगून सूड उगविण्याचें कार्य तुझ्यावर सोंपवून मग आपल्या जिवाचें काय करायचें तें करावें, असा बेत करून जीव धरून राहिलों आहें." रामदेवरावाचें चित्त मुळींसुद्धां बापाच्या बोलण्याकडे नव्हतें. बापाच्या तोंडून 'तिनें निरोप पाठविला' हें ऐकतांच, 'ती अजून जिवंत राहण्याइतकी निर्लज्ज आहे काय ? तिनें अजून आत्महत्या करून आपल्यास या जगांतून नाहींसें करून घेतलें नाहीं काय ?' असे विचार त्याच्या मनांत एकसारखे चालले होते. आणि इकडे त्याच्या बापाचें बोलणेंही चाललेंच होतें. होतां होतां एकदम त्याच्या मनांत कांहीं भयंकर विचार आला, आणि तो एकदम आपल्या बापास म्हणतो, "काय म्हणतां ! सगळी दुष्मन्‌गिरी सय्यदुल्लाखानाची ? सगळं कारस्थान त्याचं ! ही बातमी तुम्हांला तिनं पाठविली ? आणखी त्या बातमीवरून तुम्ही आपला जीव बचावून घेण्याला धांवला ?" या शेवटल्या प्रश्नांतला व्याजार्थ आणि मर्मभेदक झोंक रामदेवरावाच्या बापाच्या लक्ष्यांत आला नाहीं असें नाहीं. परंतु त्यानें तसें न दाखवितां तो एकदम त्यास म्हणतो, "हो तिनं कळविलं. तिला दुसरें काय करणं शक्य होतं ? तिला सुखरूपपणानं पोहोंचविण्याचं काम कोणाचं होतं ? आपल्याबरोबर नेण्याची बुद्धि कां झाली नाहीं ? ज्या स्थितींत तिचा विश्वासघात झाला त्या स्थितींत कोणी जरी असतं, तरी काय केलं असतं ? तिचा विश्वासघात होण्याला कारण कोण ?" बापलेकांची तेथल्या तेथें जुंपण्याची वेळ आली, परंतु थोडक्यांतच आटपलें. रामदेवरावानें बराच वेळ विचार केल्यानंतर ज्यानें असला भयंकर विश्वासघात केला त्याच्या रक्तांत आपले हात बुडविल्याखेरीज रहावयाचें नाहीं, अशी त्यानें प्रतिज्ञा केली. परंतु ही घोर प्रतिज्ञा तडकाफडकी अमलांत आणण्यांत हजारों विघ्नें येणार आहेत, तेव्हां

कांहीं दिवस अगदीं अज्ञातवासांत काढले पाहिजेत, असा विचार करून दोघा बापलेकांनीं सूर्याजीरावाच्या गांवापासून बऱ्याच अंतरावर रानांत एका वडाच्या झाडाखालीं झोंपडी घालून रहावें, असा बेत केला. मधून मधून विजापुरास जावें, नानाप्रकारचे वेष करून बातम्या काढाव्या, आणि आपला सूड उगवण्यास योग्य संधि अद्यापि आली नाहीं असें वाटून पुन्हां परत यावें असें त्यांनीं चालविलें होतें. हे दोघे रानांत राहणारे खरोखरीच कोण ही माहिती एका सूर्याजीखेरीज कोणासही नव्हती. सूर्याजी मात्र केव्हां केव्हां त्यांचेकडे अत्यंत गुप्तपणें येऊन काय हवें, काय नको हें विचारीत असे. असा प्रकार चालू असतांनाच सूर्याजीच्या घरावरही सय्यदुल्लाखानाची गदा आली. सूर्याजीच्या पत्नीस तिच्या तान्ह्यासकट व पुढें अगदीं मरणाच्या द्वारीं पडलेल्या सूर्याजीसही ज्या कोणा काळ्याकभिन्न गृहस्थानें आगींतून बाहेर काढलें तो रामदेवरावच होय. यानंतरची सर्व हकीकत वाचकांस पूर्णपणें माहीत आहेच.

सय्यदुल्लाखानाचा अंत केल्यानंतर सूर्याजी व इतर मंडळी रामदेवरावास आतां कुठें न जाण्याबद्दल आग्रह करीत होती. परंतु त्याचें चित्त ठिकाणीं नव्हतें. आतां शेवटीं एकच गोष्ट राहिली; ती म्हणजे रंभावतीचा निकाल लावणें ही होय. आणि त्यासाठीं तो ताबडतोब विजापुरांत गेला. बादशहाच्या जनान्यांत जाण्यास त्यास साईजीचा पोशाख फार उपयोगी पडे. या खेपेसही त्यानें मागीलप्रमाणें त्याच पोषाखानें ऐन तिन्हीसांजाचे वेळीं तेथें आपला प्रवेश करून घेतला. रंभावतीची गांठ पडली व तिनें त्यास पाहतांच ओळखलें. त्यानें शांतपणानें तिला " तूं बागेंत चल एका बाजूला, मला तुझ्याशीं कांहीं बोलावयाचें आहे" असें सांगितलें. ती लगेच तेथें गेली. आतां तिची चर्या फार विलक्षण दिसत होती. त्याच्या चित्तांत काय चाललें होतें तें ती समजली, आणि धीटपणानें पुढें उभी राहून म्हणाली, " आपण कां आलां आहां तें मी जाणून आहें, आणखी त्या गोष्टीला मी तयार आहें. पण आपल्या हातून तें पातक व्हायला नको. ही पहा, ही कुपी आज किती तरी दिवस मी जवळ बाळगून आहें. माझ्या स्वतःच्या जिवाबद्दल मला काडीइतकीसुद्धां काळजी नव्हती. पण मला असें वाटलें कीं, आपल्या आणखी मामंजींच्या जिवाचे हे मेले काय करतील नि काय नाहीं याचा

मुळींच भरंवसा नाहीं. याकरितां मन घट्ट केलें आणि तशा त्या भ्रष्ट स्थितींत कारस्थानें काय चालली आहेत तीं काढून घेतलीं आणि त्याचाच उपयोग करून मामंजींस सर्व प्रकार कळविला. परमेश्वरसाक्ष मी तुम्हांला सांगतें, माझ्या बाह्य वर्तनावर, माझ्या बाह्य भ्रष्टतेवर जाऊन मला खरी खरी भ्रष्ट समजूं नका. मी अंतःकरणानें अगदीं निर्मळ आहें. त्या दुष्टाचा अंत तुमच्या हातून झाला ही गोष्ट मला एकवार ऐकूं द्या म्हणजे मी या कुपींतलें हें जहर पिऊन इहलोक सोडून जातें. परमेश्वराला माझें खरें अंतःकरण काय आहे हें पक्कें ठाऊक आहे. तो मला पुढच्या जन्मीं पुन्हां आपल्याच पदरीं बांधील."

हें तिचें बोलणें रामदेवराव शांतपणानें ऐकत होता. ती बोलते तें त्यास सत्य वाटत होतें, किंवा असत्य वाटत होतें, हें त्याच्या चर्येवरून मुळींही दिसलें नाहीं. तिचें बोलणें संपतांच तो छद्मी बोलावें त्याप्रमाणें तीस म्हणतो, "घे तर मग त्या जहराचा घोट. आणि पृथ्वीवरून आपल्या भ्रष्ट देहाचा नायनाट करून टाक; मी त्याचा पुरा निकाल लावून आलों." रंभावती क्षणमात्र शांतपणें उभी राहिली. नंतर एकच वेळां "खरोखर ?" असा तिनें प्रश्न केला. रामदेवरावानें तावडतोब "हो ! हो ! खरोखर. कां ? तुला वाईट वाटतं कीं काय ?" असें छद्मी शब्दानें तिला विचारलें. त्याबरोबर रंभावतीनें आपल्या जहराच्या कुपीचें बूच काढलें. ती कुपी आपल्या तोंडाजवळ धरली, व "हो, मला अशाबद्दल वाईट वाटतं कीं, माझी खरी परीक्षा आपल्याला मुळींसुद्धां झाली नाहीं. आतां या घुटक्यानें तरी होवो !" असें म्हणून एका दमांत तिनें तें जालीम विष पिऊन टाकलें.

* * *

दुसरे दिवशीं एक बाईचें व एक पुरुषाचें अशीं दोन प्रेतें त्याच बागेंत सांपडलीं. तो तेथें आत्महत्या करूनच मेला कीं त्याला दुसऱ्या कोणीं मारलें हें कोणालाच समजलें नाहीं.

३९. सुलतानगडावर

मनुष्य बेत करतो, किंबहुना आपण अमुक केलें असतां त्याचा परिणाम अमुक होईल असें गृहीत धरून बहुतेक कृति करीत असतो. परंतु पुष्कळ वेळां त्याच्या कृतीपासून त्यानें अपेक्षित असा परिणाम न घडतां तिसराच कांहीं तरी प्रकार घडतो. रंभावतीनें आपल्याकडून जालीम विष पिऊन घेतलें. परंतु विषाचा परिणाम पुरता होण्यापूर्वीच तिच्या एका दासीनें तिला बेशुद्ध पडलेलें पाहिलें. अर्थातच लागलीच जिकडे तिकडे धांवाधांव झाली आणि राजवैद्याचीं औषधें मिळून विषाचा जोर नाहींसा केला गेला. परंतु रंभावती सर्वथा बरी अशी मुळींच झाली नाहीं! अंतःकरण अत्यंत पवित्र व एकनिष्ठ ठेवून बाहेरच्या दुःसह यातनांत तिला बराच काळ कंठावा लागला. एवढें मात्र झालें कीं, तिच्यावरील बादशहाची मर्जी सारखी होती. सय्यदुल्लाखानाच्या मरणामुळें विजापूरच्या दरबारीं व शहरांतहि कोणास वाईट वाटलें नाहीं. आणि रामदेवरावानें सय्यदुल्लाखानास सांगितल्याप्रमाणें थोड्याच काळांत बादशहाच्या मनांतून त्याचें नांव पाण्यावर काढलेल्या रेघेप्रमाणें पार नाहींसें झालें, व सुलतानगड शहाजीच्या पोरानें बळकावला अशी बातमी आली तरी तिच्यामुळें बादशहाला फारसा कांहीं राग आला नाहीं. तशांत 'मीही आपला, आपल्या सेवकाचा पुत्र. अर्थातच आपला मी सेवक आहें. आपल्या अंमलांतील इकडच्या प्रांताचा बंदोबस्त नीट रहावा म्हणूनच केवळ किल्ल्यावर येऊन राहिलों आहें. यापलीकडे कांहीं नाहीं.' अशा अर्थाचें गौरवयुक्त पत्र शिवबाकडून दरबारीं गेल्यानें तर त्याच्या कृतीचें थोडक्यांतच विस्मरण झालें. परंतु या हकीकती बऱ्याच पुढच्या झाल्या. सुलतानगड हस्तगत झाल्यानंतर सुलतानगडावर काय काय प्रकार झाले तें सांगणें अवश्य आहे.

नानासाहेबांस जबर जखम लागून ते पडल्यानंतर नानासाहेबांचें कुटुंबही तेच वेळीं आपल्या कुळंबिणीसह वर आल्याकारणानें त्यांच्या वाड्यांत त्यांस नेऊन त्यांच्या शुश्रूषेची उत्तम व्यवस्था करतां आली. कित्येक दिवसपर्यंत नानासाहेब अगदीं बेशुद्ध अशा स्थितींत होते. एके दिवशीं तर त्यांची प्रकृति अतिशय नादुरुस्त झाली. इतकी कीं, आतां

ते ती रात्र उलटून जगतील असें कोणासही वाटेना. सर्वच मंडळींच्या मनाची स्थिति फारच उदासीन झाली होती. परंतु त्यांतल्या त्यांत दोन व्यक्तींचें मन मात्र फारच शोकमग्न झालेलें दिसलें. एक व्यक्ति नानासाहेबांची पत्नी व दुसरी व्यक्ति म्हणजे रणदुल्लाखानाची बहीण मेहेरजान ही होय. लहानपणच्या कित्येक प्रसंगांनीं मेहेरजानचें मन नानासाहेबांवर पूर्ण बसलेलें होतें. परंतु तसें उघडपणें कोणासही कधीं दिसून आलें नव्हतें. नानासाहेबांच्या दुखण्यांत मेहेरजान बऱ्याच वेळां त्यांच्या समाचाराला येऊन गेली. परंतु आज तिच्यानें तेथून हलवेना, तिच्या डोळ्यांचें पाणीही खळेना. परंतु तें पाणी कोणासही तिनें दिसूं दिलें नाहीं. सायंकाळ झाली तरी नानासाहेबांची स्थिति तशीच्या तशीच कायम होती. क्षणोक्षणीं काय होतें आणि काय नाहीं, याचा भरंवसा वाटेना. सूर्याजी वगैरे मंडळी बाहेर बसली होती. नानासाहेबांची ही स्थिति अप्पासाहेबांस त्यांनीं कळविली. मनांतील हेतु हा कीं, म्हाताऱ्यानें शेवटीं आपल्या मुलाजवळ बसतों असें म्हणावें. परंतु म्हातारा खरा एकवचनी व एकनिष्ठ. तशा त्या भयंकर स्थितींतही त्याचें मुखावलोकनही करणार नाहीं, असेंच त्यानें उत्तर दिलें. तें ऐकून म्हाताऱ्याबद्दल साधारण लोकांस थोडा तिरस्कार, परंतु शिवबास अत्यंत पूज्यभाव वाटला आणि कोणत्याही स्वामीस सेवक असावेत तर असे असावेत, तरच स्वामीची फत्ते होते, असा विचार त्याच्या मनांत आला.

परंतु मध्यरात्र उलटल्यानंतर नानासाहेबांची नवली पालटली आणि होतां होतां पहांटेच्या प्रहरीं प्रकृतींत पुष्कळ सुधारणा झाली. इतकेंच नव्हे तर त्यावेळीं पहिल्या प्रथम त्यांनीं डोळे उघडून सभोंवार पाहिलें. त्या त्यांच्या पाहण्यांत त्यांचे डोळे मेहेरजानकडे वळले व तिची आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली. आतां यांस मृत्यूचें भय नाहीं असें मेहेरजानला एकदम वाटून त्या हर्षभरानें तिनें 'आतां संकट गेलें, खुदानें आपल्यावर मेहेर केली,' असें म्हणून नानासाहेबांच्या पत्नीस घट्ट मिठी मारली. परंतु नंतर एकाएकीं तिच्या मनांत कांहीं विचार येऊन ती चटकन् उठून आपल्या महालांत गेली. त्यानंतर नानासाहेबांची प्रकृति दर घटकेस सुधारत चालली व सुमारें तीन दिवसांनीं ते चांगले शुद्धीवर आले. परंतु आतां एक नवीनच संकट उपस्थित

झालें. ते शुद्धीवर आल्यापासून बायकोच्याबद्दलचा त्यांचा पूर्वींचा दुराग्रह पुन्हां उद्भवल्यामुळें त्यांचें मन अत्यंत अस्वस्थ झालें. त्यांच्या पत्नीनें त्यांच्या अंतःकरणाची स्थिति उत्तम प्रकारें ताडली. परंतु त्या स्थितीचें निराकरण होण्यास कोणी तरी मनुष्यानें त्यांच्या मनांतील किंतु घालविण्यास पाहिजे होता. शेवटीं या प्रसंगीं मेहेरजानला जाऊन भेटून आपण विनंती करूं असा तिनें बेत केला आणि लागलीच ती मेहेरजानकडे गेली व आपण आज कां आलों, हें तिनें सरळपणानें सांगितलें. तें ऐकतांच मेहेरजानच्या मनाची स्थिति अगदीं विलक्षण झाली. परंतु या वेळीं त्याचा जीव बचावण्यास व या साध्वीची निष्कलंकता स्पष्टपणें उघड करून सांगण्यास आपण यत्किंचितही मागें घेतां कामा नये, हें जाणून ती त्याच दिवशीं सायंकाळीं नानासाहेबांस भेटण्यास गेली व त्यांचेजवळ पडद्याचे आड बसून तिनें मोठा धीर करून पुढील शब्द उच्चारले : “ नानासाहेब, तुमचा संशय अगदीं अप्रयोजक व मिथ्या आहे, याबद्दल काडीइतकीसुद्धां शंका घेऊं नका. जर माझ्या शब्दांची तुम्हांला रतिमात्र किंमत असेल तर मी सांगतें या गोष्टीवर विश्वास ठेवा. तुमची पत्नी अगदीं निष्कलंक, साध्वी आहे. यापेक्षां जास्त काय सांगूं ? तुमच्या अप्रयोजक संशयानें तुम्ही आपलं दुखणं वाढवीत आहां, आपल्या पवित्र पत्नीला दुःखांनं वृथा गांजीत आहां आणखी ...... ” पुढें तिच्या ओंठावर “ मलाही ” असे शब्द खास आले होते. परंतु तिनें ते तितकेच मागें घेतले, आणि ती स्वस्थ बसली. आतांपर्यंत उच्चारलेले ते शब्द अशा कांहीं विलक्षण सद्गदितपणानें तिच्या कंठांतून निघाले कीं, या प्रत्येक शब्दांत नुसतें सत्य भरलें आहे अशी नानासाहेबांच्या मनाची खात्री होऊन, “ आपला शब्द मला पुरे आहे, माझी खात्री झाली; मी इतके दिवस विनाकारण आपल्यास दुःखांत पाडून घेतलें याबद्दल क्षमा करा ” असें त्यानें म्हटलें.

तो स्तब्ध बसला असतां मेहेरजानचें मन फारच अनिवार झालें. पूर्वीं लहान वयांत एके वेळीं हल्लींप्रमाणेंच सुलतानगडावर तिच्या बापानें तिला आणलें असतां नानासाहेब व ती खेळत होती आणि खेळतां खेळतां दोघांचें कांहीं विनोदपर भाषण झालें. तें भाषण नानासाहेब केवळ विनोदच समजून तेव्हांच विसरून गेला होता. परंतु मेहेरजान अस्सल मोंगल रक्ताची असल्या-

मुळें विसरली नाहीं. तिच्या चित्तांत तें कायम राहिलें, व तिला आजपर्यंत त्याचें अनेकवार स्मरण झालें. नानासाहेबांस त्या भाषणाचें स्मरण राहतें, तरी त्याचा कांहीं उपयोग नव्हता हें ती जाणून होतीच. पण तें स्मरण नाहीं असें दिसतांच तिला फार वाईट वाटलें. तेंच आज पुन्हां वाईट वाटून त्या गोष्टीचें स्मरण एकवार त्यांस द्यावें असें तिच्या मनांत आलें. पण तिची नैसर्गिक शालीनता क्षणांत तिच्या सोडवणुकीस आली. "असें करणें आपलें ब्रीद नव्हे," असें मनांत येऊन ती विद्युल्लतेप्रमाणें तेथून नाहींशी झाली. इतकेंच नव्हें तर तिनें आपल्या महालांत जाण्याबरोबर आपल्या लोकांस एकदम निघण्याविषयीं हुकूम केला.

इकडे शिवबानेंही अप्पासाहेबांचें चित्त आपल्याकडे वळावें म्हणून जितका प्रयत्न करावयाचा तितका केला; परंतु "तुझ्यासारख्या नष्टामुळें माझ्या-सारख्या स्वामिभक्तांचीं कारटीं बिघडतात. केवळ तुझ्यामुळें मीं त्याला आणि तो मला वैरी झालों. जर तुझ्यांत खरोखर कांहीं चांगुलपणा असेल तर तूं मला माझ्या मर्जीस वाटेल तिकडे जाऊं देशील. माझा कारटा तुला वाहिला आहे तेवढा पुरे." इतकें म्हणून म्हातारा चवताळून उठला. परंतु शिवबाच्या मनांतून त्यांच्याविषयींचा पूज्यभाव यत्किंचितही कमी झाला नाहीं. तो त्यांस एवढेंच म्हणाला, "अप्पासाहेब, माझ्या सर्व कार्याचा हेतु आपल्याला कळला नाहीं. असो. मी आपल्याला क्षणभर देखील अटकेंत ठेवणार नाहीं. आपण खुशाल वाटेल तिकडे जा." व म्हाताराही तेच दिवशीं तेथून निघून गेला.

सुलतानगड हातीं आल्यापासून रामदासस्वामींनीं आपण त्यांच्या दर्श-नास गेलों असतां आपणांस काय वचन दिलें होतें, हें शिवबास कित्येक वेळां आठवलें. आणि त्यांस आपली सिद्धि कळून ते आपल्यास दर्शन देण्यास येतात किंवा कसें हें पाहण्यासाठीं त्यानें श्रीधरस्वामीस तिकडे यापूर्वींच पाठविलें होतें. ते एकटे येतात कीं आपल्याबरोबर स्वामीमहाराजांस घेऊन येतात, याकडे त्याची एकसारखी दृष्टि लागून राहिली होती.

---

४०. समाप्ति

सुलतानगड हातीं आल्यानंतर ज्या कांहीं हकीकती झाल्या त्या वर आल्याच आहेत. परंतु आमच्या या कथानकाची समाप्ति करण्यापूर्वी आणखी कांहीं हकीकत वाचकांस सांगावयाची आहे. नानासाहेबांस बरें वाटूं लागल्यानंतर शिवबाचें सर्व चित्त आपण हा किल्ला हस्तगत करून घेतला, परंतु तो आतां सदैव आपल्या ताब्यांत कसा रहावा आणि दिवसानुदिवस आपला इच्छित हेतु अधिकाधिक सिद्धीस जाण्यासाठीं कसे प्रयत्न करावे, इकडे लागलें होतें. त्यामुळें प्रथम किल्ल्यावरील जी काय व्यवस्था करावयाची होती ती करण्यास त्यानें आरंभ केला. किल्ला सर करण्यास ज्या ज्या व्यक्तीकडून मदत झाली होती त्या त्या व्यक्तीस शिवबानें यथाशक्ति बक्षिसें देण्याचें योजिलें. सांवळ्यावर तर त्यांची इतकी वहाल मर्जी बसली कीं, त्यास त्यांनीं सदोदित आपल्याजवळ ठेवण्याचें ठरवून त्याप्रमाणें त्यास व त्याच्या आईस सांगितलेंही. सांवळ्याच्या हकीकतींत ज्या एका चौकीदारानें आपणांस किल्लेदारी मिळावी म्हणून आपल्या धन्याशीं बेइमानपणाचें वर्तन करून त्याजवर भयंकर प्रसंग आणला, त्या चौकीदारास आपल्यासमोर बोलावून आणून व त्याच्या तोंडून सर्व गुन्हा आणि कारस्थान कबूल करून घेऊन त्यास फारच जबरदस्त शिक्षा केली. नानासाहेबांस बापाचें काम देण्याचें योजिलें. सूर्याजीस नेहमीं आपल्यावरोबर असण्याबद्दल सांगितलें. इतकी सर्व व्यवस्था हलकें हलकें त्यानें केली. वाडीच्या पाटीलबोवासही योग्य इनाम देऊन आणखी चारसहा गांवांची पाटीलकी तुम्हांस दिली जाईल असें आश्वासन त्यास देण्यांत आलें. इतकी सगळी व्यवस्था झाली. परंतु विजापुरास एकंदर बातमी कळल्यावर काय प्रसंग गुदरेल आणि काय नाहीं याचा मात्र शिवबास अजमास करतां येईना. तथापि प्रत्यक्ष संकट येईपर्यंत त्याबद्दल उगीच नाना प्रकारचे तर्कवितर्क करण्यांत कांहीं मतलब नाहीं, असा त्यांचा नेहमींचा विचार असे. त्याचप्रमाणें याही प्रसंगीं झालें. सगळें चित्त स्वामींच्या चरणाकडे लागलेलें असून, आपण केलेला पराक्रम

स्वामींचे चरणीं निवेदन करून त्यांचा आशीर्वाद केव्हां घेईन असें त्यास होऊन गेलें होतें.

अशा स्थितींत एके दिवशीं किल्ल्याच्या वायव्य दिशेकडून कांहीं मंडळी येत आहेत असें शिवाजीराजांस वाटलें; व थोड्याच वेळांत गुरुवर्यांची स्वारी आली खास असें वाटून ते किल्ल्यावरून बऱ्याच मंडळीनिशीं त्यांस सामोरे गेले. स्वामींचें दिव्य स्वरूप खरोखरीच त्यांचे नजरेस पडून सर्वत्रांस त्या दर्शनानें शुद्ध आनंद झाला. सर्व मंडळींनीं पादवंदन केल्यानंतर शिवबांनीं पालखींत बसण्याविषयीं स्वामींस विनंती केली. तेव्हां "पालखींत बसण्याचा प्रसंग अद्यापि दूर आहे, सध्यां पायींच वर जाऊं" असें अर्थपूरित नेत्रांनीं शिवबाकडे पहात त्यांनीं म्हटलें. सर्व मंडळी पायींच चालूं लागली. इतक्यांत एक स्त्री समोरून धांवत धांवत त्यांच्याकडे आली. तिला पाहतांच सूर्याजीनें पुढें होऊन तिला दूर करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो काय करीत आहे इकडे स्वामींचें लक्ष जाऊन त्यांनीं एकदम "ती स्त्री कोण? माझेकडे आणा" असें म्हटलें. तेव्हां 'ती वेडी आहे, आपल्यासमोर आली असतां अदबीनें वागण्याचें तिला ज्ञान नाहीं' वगैरे मजकूर जवळच्यांनीं कानावर घातला. तेव्हां "आतां तिला ज्ञान नाहीं, कीं आम्हांस ज्ञान नाहीं, कोणास ठाऊक!" एवढेंच स्वामींनीं हंसून म्हटलें, तों ती स्त्री त्यांचे पुढें आलीच व तिचें तें नेहमींचें गाणें:-

"फुलें कुसकरिलीं।
कुणि गं मेल्यान पायदळीं तुडविलीं॥"

असें तिच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें म्हणत म्हणत हातवारे करूं लागली. तें पाहतांच स्वामींनीं चेहरा अगदीं वाईट केला. तिच्याजवळ चटकन जाऊन व मस्तकावर हात ठेवून म्हटलें, "खरंच, खरंच मेल्यांनीं फुलें कुसकरून पायदळीं तुडविलीं खरींच. तुला सुद्धां त्यांची काळजी वाटते आहेना! होतील, लौकरच तीं पुन्हां ताजीतवानीं होतील. तूं अगदीं काळजी सोड." असें म्हणून पुन्हां एकदां कृपापूर्ण दृष्टीनें त्यांनीं तिजकडे पाहिलें, आणि "जा, सुखांत रहा" असें म्हणून तिला जाण्यास आज्ञा दिली. झाल्या गोष्टीस कोणी चमत्कार म्हणो, सत्पुरुषाचा साक्षात्कार म्हणो, किंवा बोलाफुलास गांठ पडली असें म्हणो, परंतु स्वामींचा

आशीर्वाद ऐकतांच तिचें वेड पार जाऊन सर्याजीस त्याची बायको पुन्हां जशीच्या तशी मिळाली.

किल्ल्यावर स्वामी पोहोंचतांच जिकडे तिकडे मोठी गडबड उडाली. सर्व मंडळींनीं यथेच्छ दर्शनसुख व वंदनसुख घेतल्यानंतर मिळालेल्या आशीर्वादानें आनंदित होऊन मंडळी कमी कमी होत चालली. शेवटीं अगदीं शेलकी मंडळी राहिली. नंतर उपाहार होऊन स्वामी बसले असतां पुन्हां शिवाजीराजे वंदनासाठीं तेथें आले. नानासाहेब अद्यापि सशक्त झाले नसल्यामुळें खालीं गेले नव्हते, तेही आतां वंदनास आले. त्यांनीं वंदन करितांच त्यांचे मस्तकावर हात ठेवून स्वामी म्हणाले, "केली ही मात फारच उत्तम. पण याचेपेक्षां अजून किती तरी करावयाची आहे ! मात्र साध्वीविषयीं भलतेच तर्कवितर्क मनांत आणूं नयेत. त्यापासून कधींही कल्याण होत नाहीं," हें शेवटलें भाषण ऐकतांच नानासाहेब अगदीं कावराबावरा होऊन समर्थाकडे पाहूं लागला. ही गोष्ट समर्थांस माहीत काय? आणि कशी ? असें वाटून तो आश्चर्यचकित झाला. परंतु समर्थांस अज्ञात असें कधींच कांहीं असावयाचें नाहीं, असा त्याचा इतरांप्रमाणें पूर्ण भरंवसा असल्यामुळें "समर्थांची आज्ञा शिरसावंद्य आहे" एवढेंच म्हणून तो खालीं मान घालून बसला. तिसरे प्रहरीं स्वामींच्या दर्शनास वाडींतील व आसपासच्या गांवांतील बायकांच्या झुंडीच्या झुंडी आल्या. नानासाहेबांची पत्नीही दर्शनास आली, तिला स्वामींनीं फार चांगला आशीर्वाद दिला. रात्रीं अगदींच शेलकी मंडळी म्हणजे राजे, सूर्याजी, नानासाहेब, तानाजी, येसाजी, कल्याणस्वामी व श्रीधरस्वामी इतकीच मंडळी बसली असतां, राजांनीं उठून उभे राहून हात जोडून विनंती केली:—

"जगदंबेच्या आणखी आपल्या कृपाप्रसादानें येथवर तर सर्व निर्विघ्न होऊन पहिली व्यवस्था ठीक झाली. आतां पुढें असाच क्रम चालविणें आपल्या आज्ञेवर आणि कृपाप्रसादावर अवलंबून आहे. मी आपला सेवक, तेव्हां जें कांहीं म्हणून मीं आजपर्यंत केलें किंवा करीन तें सर्व आपल्या चरणकमलीं अर्पण आहे. आजचा पहिला लाभ गुरुदक्षिणा म्हणून आपले चरणीं वाहवा अशी उत्कट इच्छा आहे. हा किल्ला आजपासून

माझा नव्हे, आपला; आणि किल्ल्याच्या आसपासचें गांव तेंही पण आपलें. आपण त्याचा स्वीकार करून आशीर्वाद द्यावा एवढीच इच्छा आहे." तें ऐकतांच स्वामी मोठ्यानें खदखद हंसले व म्हणतात, "या आमच्या भगव्यावर आलां आतां ? किल्ला आणि राज्य चांगलें शोभेल नव्हे ? बाबारे, हे किल्ले आणि भावी राज्य तुझें नाहीं आणि माझेंही नाहीं. ज्यांना ज्ञान नाहीं, बळ नाहीं, आणि म्हणून बळवान् व क्रूर अशा मुसलमानांनीं केलेला छळ सोसावा लागत आहे, त्यांचें हें राज्य. आपण केवळ सूत्रधार. अशा बुद्धीनें वागलास तरच तुला यश येईल, आणि तें प्रशंसनीय होईल. तेव्हां अशी बुद्धि धर."

स्वामींचा हा उपदेश शिवबाच्या मनांत पूर्णपणें ठसला व तो एकदम म्हणतो, "हें सारें मीं केलें किंवा करीन अशी माझी बुद्धिच नाहीं. तथापि व्यवहारदृष्टीनें बोलतांना बोलावें तसें मी बोललों, याची क्षमा करून त्या अज्ञ व दुर्बळ लोकांकरितां कां होईना पण आपल्या चरणीं ही गुरुदक्षिणा अर्पण करतों. ती मनोभावें स्वीकारावी आणि येथून पुढें कांहीं मला लाभेल तें सर्व आपल्या कृपादृष्टीचें फळ असें दिसावें म्हणून कांहीं तरी खूण मला द्यावी." स्वामींनीं यावरही बरेच आढेवेढे घेतले, परंतु सर्वत्रांचा तसाच आग्रह पडल्यानें चटकन् आपली एक हुरमुजी रंगीत छाटी पलीकडे वाळत घातली होती ती घेतली, आणि शिवबाचे हातीं देऊन म्हटलें, "ही घे माझी खूण. हिचं निशाण कर आणि सांगतों हीं अक्षरें किल्ल्यावर कोरून कागदोपत्रीं तो शिक्का वापरीत जा."

विक्रमैर्वर्धिता विष्णोः सा मूर्तिरिव वामना ।
शाहासुतस्य मुद्रेयं शिवराजस्य राजते ॥

श्रीधरस्वामींनीं तीं अक्षरें चटाचट टिपून घेतलीं, आणि शिवबानें ती छाटी आपले मस्तकास लावून तिचा अत्यानंदें स्वीकार केला.

समाप्त